धार्मिक

# धर्मशास्त्र

५३ धार्मिक

सार्वजनिक वाचनालय

खेड, जि. पुणें

पुस्तकाचें नांव

लेखक बा. आ. पटवर्धन

पुस्तकाचा प्रकार धार्मिक

५३ र. नं.

धा ४८

धा ४८

NATIVE GENERAL LIBRARY, KHED.
सार्वजनिक वाचनालय खेड

ग्रंथ
02/03
परिगणना

ग्रंथ
परिगणना

ग्रंथ
परिगणना

# संगीत शिवलीलामृत

अथवा

## शिवलीलामृत ग्रंथांतील ओंवीबद्ध कथांचें पद्यात्मक रुपांतर

---

शीर्षेऽप्युत्कटकालकूटगरले प्लुष्टे तथा मन्मथे ।
नीते भासुरभालनेत्रतनुनां कल्पान्तदावानले ॥
यः शक्त्या समलंकृतोऽपि शशिनं शैलात्मजां स्वर्धुनीं ।
धत्ते कौतुकराजनीतिनिपुणः पायात्स वः शंकरः ॥

---

हें पुस्तक

बाळकृष्ण आबाजी पटवर्धन
पोष्ट मास्तर
सातारा सिटी

ह्यांनीं
तयार केलें तें

संस्थान जमखंडी
येथें
क्षेत्र रामतीर्थ प्रायव्हेट लायब्ररी प्रेसमध्यें छापून प्रसिद्ध केलें.
माहे मार्च सन १८९५ इसवी.

---

( सर्व हक्क पुस्तककर्त्यांनें आपल्याकडेस राखून ठेवले आहेत. )

किंमत एक रुपया.

NATIVE GENERAL LIBRARY, REGD. (POONA)
सार्वजनिक वाचनालय



NATIVE ... सार्वजनिक वाचनालय खेड, (पुणे)

# प्रस्तावना.

गुणदोषौ बुधो गृण्हान्निंदुक्ष्वेडा विश्वेश्वरः ॥
शिरसा श्लाघते पूर्वं परं कंठे नियच्छति ॥

शिवलीलामृत हा भक्तिरसपूरित सर्वमान्य ग्रंथ आबालवृद्धांच्या नित्य वाचनांत आहे. त्याच्या योग्यतेबद्दल निराळी प्रशंसा करणें ह्मणजे चंद्रज्योत लावून चंद्र दाखविण्यासारखे आहे. ह्या ग्रंथामध्यें श्रीशंकराच्या मनोरम लीला वर्णन केल्या आहेत. तथापि त्या ओंवीबद्ध असल्यामुळें त्या सर्वतोमुखीं सतत राहण्याचा संभव कमी आहे. कारण, सांप्रत-कालीं लोकांचीं मनें संगीत विषयाकडे विशेष लागल्यामुळें जिकडें तिकडें अर्वाचीन नाट्याचार्यांच्या शाकुंतल, सौभद्र आदि नाटकांतील शृंगारपर पद्यांचे मधुर आलाफ ऐकूं येतात! तेव्हां अशा समयीं आपल्या प्राचीन कवींच्या ईशवर्णनपर रसाळ कथांची लोकांस गोडी लागावी व अनायासें मनोरंजनच्या मनोरंजन होऊन ईश्वराचें नामस्मरण व्हावें ह्या हेतूनें शिव-लीलामृतास संगीत पद्यांचें रूप द्यावें अशी मला इच्छा झाली. व त्या-प्रमाणें हें पुस्तक तयार केलें आहे.

माझ्या अल्पमतीप्रमाणें बरी वाईट पद्यरचना करून शिवकथांस संगीत पद्याचें रूप दिलें; परंतु तें लोकांपुढें येणें बरेंच अशक्य होतें. तथापि, कविजनास उदारधी प्रभूचा आश्रय मिळाल्यास मग त्यांची काव्य-कृति प्रसिद्ध होण्यास कांहींच हरकत नसतें. कोणी कवीनें ह्मटलें आहे.—

यदि प्रभुरुदारधीः सुरसकाव्यकौतुहल ॥
स्तथैवच सभासदः सदसि सद्गुणग्राहिणः ॥

सुवर्णसदलंकृतिर्भवति तत्र नृत्योद्यता ॥
मदीय रसनानटी रसघटी यमानंदभूः ॥

परंतु अशा प्रकारची माझी कवित्व शक्ति नसतांना देखील एका उदार प्रभुच्या कृपाश्रयानें तिला चांगलें उत्तेजन मिळालें हें कळविण्यास मला फार आनंद वाटतो. **श्रीमंत राजश्री रामचंद्रराव गोपाळ उर्फ आप्पासाहेब सरकार संस्थान जमखंडी** ह्यांनीं हा माझा उद्देश लक्षांत घेऊन हें पुस्तक प्रसिद्ध करण्याचें सर्व श्रेय आपल्याकडे घेतलें व आपली शिवलीलामृतासारख्या परमपूज्य ग्रंथाविषयींची आदरबुद्धि व्यक्त करून लोकांना ईशगुणामृताचें पान करविण्याचे कामीं अत्युत्तम साह्य केलें, याबद्दल मजवर त्यांचे फार फार उपकार आहेत. ह्याबद्दल श्रीमंतांचें अंतःकरणपूर्वक जेवढें अभिनंदन करावें तेवढें थोडेंच आहे. श्रीमंतांच्या ह्या उपकारऋणांतून मुक्त होण्यास मी असमर्थ आहे तरी नम्र चित्तानें त्या सकल चराचर जगदीशापाशीं श्रीमंतास चिरायुरारोग्यादि सुखाचा लाभ मिळावा अशी माझी अनन्यभावें प्रार्थना आहे.

पद्य रचनेचा हा माझा नवीनच प्रयत्न असल्यामुळें त्यांत अनेक दोष असण्याचा फार संभव आहे. तथापि वाचकांनीं श्रीशंकराप्रमाणेंच शिरोभागीं दिलेल्या वचनान्वयें गुण दोषांचा स्वीकार करून आपली कृपाबुद्धि व्यक्त करावी ही त्यांस सविनय विनंति आहे.

हें पुस्तक छापून तयार होईपर्यंत माझें प्रिय मित्रांनीं मला फारच सहाय केलें याबद्दल मी त्यांचा फार उपकारी आहे.

सातारा, तारीख १४ माहे मार्च सन १८९५ इसवी. } वा. आ. प. ग्रंथकर्ता.

धार्मिक ५३

# अनुक्रमणिका.

| | |
|---|---|
| अध्याय पहिला | १ |
| अध्याय दुसरा | ९ |
| अध्याय तिसरा | २१ |
| अध्याय चौथा | ३५ |
| अध्याय पांचवा | ४४ |
| अध्याय सहावा | ५४ |
| अध्याय सातवा | ७२ |
| अध्याय आठवा | ९२ |
| अध्याय नववा | १०७ |
| अध्याय दहावा | १२१ |
| अध्याय अकरावा | १३२ |
| अध्याय बारावा | १५२ |
| अध्याय तेरावा | १७२ |
| अध्याय चौदावा | १९४ |

NATIVE GENERAL LIBRARY, KHED, (POONA)
सार्वजनिक वाचनालय
खेड, (पुणे)

GENERAL LIBRARY
सार्वजनिक वाचनालय
... ( पुणे. )

# संगीत शिवलीलामृत.

## अध्याय १ ला.

### कामदा.

पार्वतीसुता विघ्न हारका ॥ प्रार्थितों तुला मी विनायका ॥
पूर्णतेस ती जाउ कामना ॥ हेंच इच्छितों श्रीगजानना ॥ १ ॥
शारदेस मी प्रार्थना करीं ॥ ज्ञान गंध हा नाहिं अंतरीं ॥
मस्तकींच ह्या ठेवुनी करा ॥ बुद्धि देइगे देउनी वरा ॥ २ ॥

### साकी.

गुरुचे चरणीं ठेवुनि माथा शिवलीला मी गातों ॥
इच्छित हेतू पूर्ण करावे आशा ही मनिं धरितों ॥ १ ॥
श्रीधर स्वामी यांनीं केला ओविबद्ध जो ग्रंथ ॥
त्याच अधारें श्लोक पदांनीं गाइन लीला यांत ॥ २ ॥

### पद.

( हे याहो मन सुमन भृंगां कमळ, ) या चालीवर.

हे याहो महेश्वरा, त्रिपुरांतका, शंकरा, भवहारका, मृत्युंजया, या हे या हो ॥ हे याहो पुरुषोत्तमा, मुरमर्दना, श्रीवत्सलांच्छना, मधुसूदना, भक्तजन रक्षक या हे या हो ॥ १ ॥

### साकी.

शिव शिव उच्चारा ॥ चुकवा जनन मरण फेरा ॥ ध्रु० ॥
गंगातीरीं काशीमध्यें विश्वेश्वर तो आहे ॥
एकवार तरि दर्शन घ्याहो पाप न कांहीं राहे ॥ शिव शिव० ॥ १ ॥
ओंकारामाधिं ममलेश्वर तो आनंदाब्धिहि विलसे ॥
दर्शन घेतां पाप हरुनी रूप मम्रची भासे ॥ शिव शिव० ॥ २ ॥

उज्जयिनीमधिं महाकालपति भक्तीनें अवलोका ॥
स्मरण जयाचें मरण नाशितें, दर्शन तारी लोकां ॥ शिव शिव० ॥ ३ ॥
वेगु नृपवर संकट हारक घृष्णेश्वर तो ध्याहो ॥
भक्तजनांची भक्ति पाहुनी संकटिं घालि उडी हो ॥ शिव शिव० ॥ ४ ॥
उमाहृदय जो सोमनाथ तो सौराष्ट्रामधिं वसतो ॥
भक्तीनें जो भक्त होतसे निजपदिं त्याला नेतो ॥ शिव शिव० ॥ ५ ॥
कैरव लोचन करुणा सिंधू भीमाशंकर देवा ॥
स्वरूप तुझि दर्शन देउनि मुक्तिपदाला मिळवा ॥ शिव शिव० ॥ ६ ॥
अवंढे क्षेत्रीं नागनाथ जो ज्योर्तिलिंगचि विलसे ॥
भक्ती करितां आत्म लिंगही भक्ता देउनी वैसे ॥ शिव शिव० ॥ ७ ॥
परळी क्षेत्रीं वैजनाथ हा भक्ता मोठा थारा ॥
भावें त्याचें पूजन करितां चुकेल तुमचा फेरा ॥ शिव शिव० ॥ ८ ॥
त्रयतापाचें शमन कराया पूजा त्र्यंबक राजा ॥
कुशावर्ती त्या स्नान करूनी साधा अपुल्या काजा ॥ शिव शिव० ॥ ९ ॥
हिमनगवासी हिमकेदारी गहन स्थाळीं तो राहे ॥
दर्शन घेतां मुक्तिच मिळते स्वर्गाचे तेथें आहे ॥ शिव शिव० ॥ १० ॥
मल्लिकार्जुन हा शैल मस्तकीं आदि अंत ज्या नाहीं ॥
देवादिकही गाति जयाला मायामल हरण्याही ॥ शिव शिव० ॥ ११ ॥
श्रीरामानीं लिंग स्थापिलें रामेश्वर या नांवें ॥
अपूर्व स्थळ तें सागरतीरीं दर्शन सुख तें घ्यावें ॥ शिव शिव० ॥ १२ ॥

## दिंडी.

तुझा गुण हा सिंधूच मला भासे ॥ त्यांत मातें पोहतां येइ कैसें ॥
म्हणुनि नाथा मी प्रार्थितों तुम्हाते ॥ बुद्धि द्यावी तव गुणा कथायाते ॥ १
मेदिनीचें तें वजन करायातें ॥ ताजवा तो कोठुनी मिळे मातें ॥
जरी व्योमा इच्छितों सांठवाया ॥ सांठवण तें कोठुनी आणु राया ॥ २
महीवरचें जल आणि वालुका ही ॥ माप कैसें लाभेल मोजण्याही ॥
उष्ण रश्मीचें तेज हरायातें ॥ दीप कैसा पावेल योग्यते ते ॥ ३ ॥

धरित्री ही मानुनी पत्र ऐसें ॥ कुधर कज्जल जलधीच पात्र तैसें ॥
सुरतरूची लेखणी धरुनि हातें ॥ कंजकन्या वानीत तव गुणांतें ॥ ४ ॥
तीहि थकली वानितां स्तब्ध राहे ॥ पामराला मग बुद्धि काय आहे ॥
मजवरी तूं करशील दया कांहीं ॥ सांग तरि मग होणार काय नाहीं ॥ ५ ॥

## अंजनीगीत.

द्वितियेचा तो बालेंदु ॥ पाहुनि त्याला अनाथ बंधू ॥
जीर्ण दशा त्या करुणा सिंधू ॥ देती भक्तीनें ॥ १ ॥
तैसा मी तर अल्पमतीचा ॥ वर्णितसें कीं त्वद्गुण वाचां ॥
लेश नसेरे कवि सन्मतिचा ॥ ह्मणुनी विनवितसे ॥ २ ॥

## साकी.

( राग जोगी, ताल धुमाळी. )

शिवलीलामृत स्कंदपुराणीं ब्रह्मोत्तर खंडांत ॥
अगाध लीला फाराचि त्याची सांगतसे शुक तात ॥
सूत शौनकांना ॥ कथीतसें मी तत्कथना ॥ १ ॥

## पद

( आह्मि नमु त्याला, ) या चालीवर.

शिव शिव मुखिं ह्मणतां मुखिं ह्मणतां ॥ स्वर्गचि येई हातां ॥
जप तप नलगे कांहीं ॥ षडाक्षर मंत्रचि तो पाहीं ॥
भवभयहरणासाठीं ॥ पंचाक्षरि मंत्राचि घे काठी ॥
नव ग्रहिं दिनमणि जैसा ॥ मंत्रा माजिं पंचाक्षर तैसा ॥
सर्वी हाचि जपावा ॥ चिन्मय शांति सुखाचा ठेवा ॥
अखंड जपती याला ॥ गौरीहर रक्षण करि त्याला ॥ १ ॥

## पद.

( उद्धवा शांतवन कर जा, ) या चालीवर.

गुरु मुखें मंत्र तो घेई ॥ त्याविण जपणें तें काई ॥ ध्रु० ॥
परि गुरु तो पाहुनि करणें ॥ भक्ति युक्ताचि शांत उदार ॥
मित भाषणी अति विरागी ॥ मानितसे सर्व असार ॥

त्याविण जपाल जरि मंत्रा ॥ फळ नसें हो त्याचें फार ॥ चाल ॥
वर्णी ब्राह्मण गुरू करणें ॥ ऐसीं वेदांतिल वचनें ॥
असतीं ह्मणुनि शांत मनें ॥ लागे त्या गुरुपायीं ॥ १ ॥

## साकी

गुरू पासुनि तो मंत्र घेउनी उत्तम क्षेत्रीं जावें ॥
पुरश्चरण मग करुनी तेथें उत्तम पद मिळवावें ॥
या विषयिंची कथा ॥ सांगतों तुह्मांसाचि आतां ॥ १ ॥

## पद.

( दो दिवसाची तनु ही साची, ) या चालीवर.

यादव वंशीं दाशार्ह नामें मथुरा नगरीं राज्य करी ॥ राजे सारे नमुनी त्याला करभारातें देति वरी ॥ भुजा प्रतापें पृथ्वी जिंकुनी सत्ता वसना वरि पसरी ॥ दात्यामध्यें शूराचि मोठा याचक सारे तृप्त करी ॥ ज्याचा सेना सिंधू बघुनी जल सिंधू तो भीति धरी ॥ वचना पासुनि कधीं न चळे तो चकित झाला ध्रुव अंबरीं ॥ प्रजाजनांचें रक्षण करुनी पुत्रा ऐसें प्रेम करी ॥ १ ॥

## पद.

( भला जन्म हा, ) या चालीवर.

कळावती या नामें करुनि काशिराज कूमरी ॥
स्वरुपाची खाणाचि होती खरी ॥
कटिला उपमा हरि मध्याची हंस गती घेतली ॥
वदनीं चंद्र प्रभा रोखेली ॥
खंजनाक्षतें बिंबाधरिती भाषण मृदु ते अती ॥
ऐकुनी पीक मनीं लाजती ॥ चाल ॥
दंत पंक्ति भासे हिरेच जणुं ठेविले ॥
रक्त मांस यांच्या कोंदणांत बसविलें ॥
गौरवर्ण भासे गोरोचन माखलें ॥ चाल ॥
हिचे रुपाला उपमा द्याया बहुत शोधिलें परी ॥
नाहीं हो अशी दिसत दूसरी ॥

## साकी.

नूतन अणिलें पर्णुन रायें वदन देखुनी भुलला ॥
रति सुख आतां घ्यावें ह्मणुनी बोलावितसे तिजला ॥
पार ती नच आली ॥ कारण दुसरें त्या वेळीं ॥ १ ॥
स्वतां महालीं जाऊनि राजा रतिसुख मागे तिजला ॥
इच्छा माझी पूर्ण करीगे सुपुत्र होइल तुजला ॥
तेव्हां ती बोले ॥ ऐका काय तिनें कथिलें ॥ २ ॥

## पद.

( झाली ज्याची उपवर. ) या चालीवर.

कलावती मग बोले राया ॥ व्रतस्थ आहें मी या समया ॥ ध्रु० ॥
उपासिला म्यां गौरी शंकर ॥ कृपा करा मम प्राणप्रिया ॥
जी स्त्री रोगी व्रतस्थ गर्भिणी ॥ ती योग्य नसे हो भोगाया ॥
कुदीन सारे वर्ज करूनी ॥ षड्रस अन्नाहि सेवुनि सखया ॥
भोगिति ललना प्रीति करूनी ॥ उत्तम कुलिं हें लक्षण राया ॥
शास्त्र वचनही असेंचि आहे ॥ मनन करानि तूं पाहे सखया ॥ १ ॥

## दिंडी.

काम मदानें होउनी मत्त तेव्हां ॥ अलिंगन तें दीधलें तिसि जेव्हां ॥
तिची तनु ती वन्हीच असें भासे ॥ चकित होउनि नृप तिला पुसे ऐसें ॥ १ ॥
प्राणसखये गोष्ट कां अशी झाली ॥ तुझ्या तनुतें तप्तता कशी आली ॥
सकल संशय टाकुनी मला सांगे ॥ मुळापासुनि गोष्ट ती मज शुभांगे ॥ २ ॥
सकल कथितें क्रोध हा नसो तूतें ॥ स्वामि दुर्वासाचि होय गुरू मातें ॥
मंत्र दिधला तेणेंचि मला राया ॥ पूत ऐशी जाहली असे काया ॥ ३ ॥
नाहिं घडलें शिव भजन तुला कांहीं ॥ अभक्षातें भक्षिलें तुवां पाहीं ॥
पाप साचें तें अमुप तुझ्या देहीं ॥ ह्मणुनि भासे तुज मम तनू अशी ही ॥ ४ ॥
राज्यांतीं तो नरकची पुढें आहे ॥ कोण त्यांतुनि तारील तुला पाहे ॥
गुरुविण तुज तारील कोण राया ॥ शरण जाउनि त्या पुनित करी काया ॥ ५ ॥

बोल ऐकूनि अनुताप तया झाला ॥ कंठ त्याचा फारची भरूनि आला ॥
प्राग सखये देई तो मंत्र मातें ॥ पठण करितां ज्या पाप भस्म होतें ॥ ६ ॥

## अभंग.

प्राणनाथ माझे कांता मी तूमची ॥ दासि या पायाची वल्लभारे ॥
नाहीं अधिकार सांगाया मजला ॥ शिष्य कां गुरूला ज्ञान देती ॥
यादव कुळींचा गुरू तो विख्यात ॥ ब्रह्मज्ञानीं रत गर्गमूनी ॥
नृप श्रेष्ठा तया शरण जाऊनी ॥ गुरू तो करूनी दीक्षा घेई ॥ १ ॥
ऐकुनिया बोला नृप तो निघाला ॥ गर्गाश्रमीं आला कांतेसह ॥
साष्टांग नमूनी लागे गुरु पायीं ॥ ह्मणे दीक्षा देई गुरु राया ॥
देखुनी तयाचा भाव तो अंतरीं ॥ जात यमुना तीरीं तयासह ॥
जाऊनिया तेथें स्नानें हो करीती ॥ भक्तीनें पूजिती शंकराला ॥ २ ॥

## साकी.

अभिषेक मग करुनि मुनीला पूजन त्यांचें केलें ॥
अगणित धनही आणुनि रायें गुरुसी अर्पण केलें ॥
लीन होऊनी ॥ लागे तो मग गुरु चरणीं ॥ १ ॥

## पद.

( जाउ नकारे विषया. ) या चालीवर.

दारिद्रानें गुरू त्रासला भोगित दुःखाला ॥ त्याचा शिष्या धनिक असूनी न करि उपायाला ॥ विद्या शिकुनी व्यर्थाचि त्याची, कुबुद्धि रत झाला ॥ पापी किंवा काय ह्मणावें ऐशा प्राण्याला ॥ दाशार्ह राजा तसा नव्हे हो लीनाचे चरणाला ॥ १ ॥

## पद.

( श्रीहरिच्या वेणु नादें, ) या चालीवर

भक्तीतें पाहुनीया द्रव आला त्यास तो ॥ हृदयीं कीं धरूनि त्याला ममतेनें बोलतो ॥ उपदेशा योग्य होसी घेई रे मंत्र तो ॥ जपतां तूं पूत होसी जो पापा जाळितो ॥ १ ॥

## साकी.

ऐसें बोलुनि गर्गमुनींनीं मंत्रोच्चारचि केला ॥
मंत्र षडाक्षर कानीं सांगुनि उपदेश नृपा केला ॥
मोठा धन्याचितो ॥ ज्यावर गुरू कृपा करितो ॥ १ ॥
मंत्राचा तो अद्भुत माहिमा मोठें नवलचि झालें ॥
कोठ्यावधिते शरिरामधुनीं काग बाहेर आले ॥
गेलें पापचितें ॥ देहींचें सकल लयातें ॥ २ ॥
किंचित पडतां वन्ही तरि तो जाळीं कंटक वनतें ॥
तैसें सारे काग जळाले नवलाचें मोठें हो तें ॥
वाटे रायासी ॥ पुसतां गुरु सांगे त्यासी ॥ ३ ॥

## दिंडी.

पूर्व जन्मीं पातकें तुवां केलीं ॥ काग रूपें बाहेर सर्व आलीं ॥
पूत झाली तंव तनू अतां पाही ॥ मत्र महिमा सांगु मी तरी कांहीं ॥ २ ॥

## कटाव.

( श्रीकृष्णें सुदामजीला, ) या चालीवर.

सहस्त्र जन्मिंचें झालें ज्ञानचि मजतें गुरु राया ॥ झाली पुनित ही काया ॥ ॥ ध्रु० ॥ अगणित पापें जीं मीं केलीं ॥ मंत्र प्रतापें भस्म जाहलीं ॥ गुरु कृपेनें गोष्ट हि घडली ॥ मोठीं मोठीं पापें घडलीं ॥ सांगेन आतां एका ओळीं ॥ ऐका याद ती आतां ॥ ब्रह्म हत्या गोहत्याही ॥ स्त्री हत्या बाल हत्या ही ॥ गुरु तल्पग गुरु निंदा ती ॥ सुवर्ण चोरी केली हातीं ॥ परदारा ती नाहिं सोडिली ॥ वेश्या गणती कोणी केली ॥ ज्ञान चोरलें पुस्तक हरलें ॥ देवागर तें चूर्णची केलें ॥ न्यायान्याय नाहिं पाहिला ॥ शिष्ट जन तो उगाचि छळिला ॥ मित्र द्रोहही फारचि केला ॥ बुद्ध भ्रष्ट तो मार्ग स्थापिला ॥ अशीं हीं पापें भस्म जाहलीं ॥ काग रुपानें बाहेर आलीं ॥ कांहीं गाठीं पुण्य म्हणूनी ॥ नरदेहामधें जन्म घेउनी ॥ गुरु प्रतापें तरली काया ॥ लीनचि झालों मी गुरु राया ॥ १ ॥

## दिंडी.

नमुनि गुरुला तो राय गृहा गेला ॥ धन्य कांता ती पुनित पती केला ॥
आलिंगन तें दीधलें तीस जेव्हां ॥ परम शीतळ वाटली वपू तेव्हां ॥ १ ॥
नित्य नेमें शिवमंत्र जपे तोही ॥ राज्य वर्धन जाहलें तरी पाही ॥
अवर्षण तें राज्यांत नसें कोठें ॥ सर्व जन ते जाहले सुखी मोठे ॥ २ ॥

## पद.

रुद्राभिषेक शिव पूजन तें नित्याचि राजा करवी ॥
वैधव्य आणि रोग मृत्युही देशांतुनि ते पळवी ॥
या रायाचें आख्यानातें नित्य कारिति जे पठण ॥
शंकर त्यांचें रक्षण कारितो कराच नित्य हें श्रवण ॥ १ ॥

## पद.

( राम जोशी बोवांचें. )

भज भज भव जलधिं माजि मनुजा शिवाला ॥ ध्रु० ॥ धराशिल दृढ चरण कमल, वाडि भरि तरि करुनि विमल, तरिच सकल पाप शमल, त्यजरे भवाला ॥ १ ॥ सांडुनिया विपय वमन झडकरि करि षडरि दमन, पूजे मन हें करुनि सुमन, गिरिजा धवाला ॥ २ ॥ सावध हो कराशि काय, शंकर गुरु बाप माय, चिंतुनि मनिं राम पाय हृदयिं निवाला ॥ भज भज० ॥ ३ ॥

NATIVE GENERAL LIBRARY, KHED. (POONA)
सार्वजनिक ... खेड, ( पुं. )

६४८६

# अध्याय २ रा.

## साकी

शिवस्मरण हें जेथें घडतें विघ्नें तेथें कैची ॥
सदां सर्वदां स्मरणहि करितां मुक्तिच मिळते साची ॥
भोळा शंकर तो ॥ दासांचें रक्षण करितो ॥ १ ॥
नामरुपि ह्या परिसाला जरि लोहरुपि मुख लागे ॥
सुवर्ण रूपीं मुक्तिच मिळते अनुभव येइ वेगें ॥
शिव शिव मात्रा ही ॥ नाशी पाप रोग देहीं ॥ २ ॥
निंदा करितां हंसतां निजतां सहज घडे जरि स्मरण ॥
सकळ दोषते नाश पावती होतें पातक दहन ॥
हर हर गर्जावा ॥ भवफेरा तरि चुकवावा ॥ ३ ॥

## दिंडी

बिल्वदळ तें घेऊनि नित्य हातीं ॥ भक्तिनें जे शंकरा पूजिताती ॥
तरति ते हें नाहींच नवल कांहीं ॥ बहुत तरती त्यांचिया दर्शनेंही ॥ १ ॥

## आर्या·

प्रात:काळीं घेतां शिवदर्शन पाप तें जळे सारें ॥
निशिचें, मध्यान्हीं तरि नाशीतें पूर्व जन्मिचें घोर ॥ १ ॥
सायंकाळीं घेतां जाळी तें सप्त जन्मिचें पाप ॥
ह्मणुनी त्रिकाळ दर्शन घेउनि चुकवा तुह्मीच भवताप ॥ २ ॥

## साकी·

कपिलाषष्टी अर्धोदयही संक्रमण महोदय तें ॥
ग्रहणादिक हीं कमीच दिसतीं शिवरात्री पर्वातें ॥
शेषहि तो थकला ॥ वर्णन करितां महिम्याला ॥ १ ॥
त्रिकाळ पूजा रुद्रघोष ही रात्रीं जागर करिती ॥
काय वर्णु मी त्यांच्या भाग्या शिव रूपचि ते होती ॥
बापसगण ही तो ॥ भावें व्रत हें आचरितो ॥ २ ॥

मासामध्यें माघ मास हा महिमा वर्णी व्यास ॥
कृष्ण पक्षिच्या चतुर्दशीला समजा शुभचि तो दिवस ॥
पातक हारक तो ॥ ऐका सुकथा मी वदतों ॥ ३ ॥
विंध्याद्रीमार्धि परम घातकी एक व्याध तो होता ॥
बहुत जयानें जीव मारिलें संख्या नच ये वदतां ॥
घेउनि बाण करीं ॥ चाले परम दुराचारी ॥ ४ ॥
पाश वागुरा बांधुनि कक्षीं शस्त्रें घेऊनि हातीं ॥
चाले तेव्हां हिंसक पशुही फारचि भिउनी जाती ॥
जातां काननीं ही ॥ नेत्रें शिवस्थान पाही ॥ ५ ॥

## दिंडी

त्याच दिवशीं शिवरात्र पर्व होतें ॥ चहूं कडुनी यात्राहि येइ तेथें ॥
मंदिराला शृंगार फार केला ॥ जणू कैलासचि असा भास झाला ॥ २ ॥
गगन चुंबित तें शिखर तया होतें ॥ रत्नजडितांच तो कळस तरी त्यातें ॥
मौक्तिकांच्या झालरी मंदिराला ॥ फार शोभा हो आलि तये वेळा ॥ २ ॥
रत्नमय तें शिवलिंग मधें होतें ॥ लक्षयोगें पूजिती भक्त त्यातें ॥
मृदंगादिक घेऊनि वाद्य हातीं ॥ मुखीं हर हर हें नाम गर्जताती ॥ ३ ॥

## पद

( दो दिवसाची तनु ही साची.) या चालीवर.

परम सुवासिक द्रव्य घेउनी पुजिति कोणी मदनारी ॥
सहस्र नामाहि मुखीं घेउनी बिल्वदळातें वाहति वरी ॥
परिमळ पुष्पें प्रेमें वाहुनि शिवनामाचा गजर करी ॥
नानापरिचीं वाद्यें वाजति तद्रव नमाये अंबरीं ॥
दीपावळिनें मंदिर शोभे आहे हा कां भानु तरी ॥
विस्मय वाटे सकळ जनांना झाली मन्माते त्याच परीं ॥
शिव शिव हर हर नामें गर्जति होउनि सद्गद जन अंतरीं ॥ परम ॥ १ ॥

## कामदा (चालीवर)

पातला तिथें दुष्ट व्याध तो ॥ पाहि सोहळा क्षणभरीच तो ॥
पाहुनी तिथें गार्द दाटली ॥ फार मौज ती त्यास वाटली ॥ १ ॥
ह्मणतसे अहा काय मूर्ख हे ॥ जन किती तरी नाशिती स्वयें ॥
धन किती तरी देखुनी शिला ॥ अमर काय हा येथ बैसला ॥२ ॥
कां उपास हे अन्न वर्जुनी ॥ करिति कां तरी मूढ होउनी ॥
देह जाळुनी व्यर्थ शीणती ॥ दगड यास हे काय पावती ॥ ३ ॥
सहज मंदिरा सव्य वाळुनी ॥ कानना प्रती जाय तेथुनी ॥
नाम जें तिथें ऐकिलें असें ॥ तेंच तो मुखीं मार्गी घेतसे ॥ ४ ॥

## श्लोक (शिखरिणी)

विनोदें बोले तो शिव शिव असें नामहि मुखीं ॥
प्रतापें नामाच्या दुरितदहना होय तरि कीं ॥
वनीं हिंडे भारी परि नच तया जीव मिळती ॥
असें होतां होतां रजनि तरि ती होय परती ॥ १ ॥
निशा ऐशी होतां तमाचे भरलें तें चहुं दिशें ॥
नभीं ऐसें भासें जणु पसरिलें कज्जळ जसें ॥
नभी काळें उल्लोचचि पसरिलें भास मजशीं ॥
तशा मध्यें गेला सहज तरि तो बिल्वतरुशीं ॥ २ ॥

NATIVE GENERAL LIBRARY, KHED. (POONA)
सार्वजनिक वाचनालय खेड, (पुणें.)

## मालिनी

दिनभर उपवासी व्याध तो कष्टला हो ॥
मुखिं शिव शिव नामा घेतसे सर्वदा हो ॥
चढुनि झडकरी तो बैसला वृक्ष शाखें ॥
सहज नयनिं तो ही एक कासार देखे ॥ १ ॥

१ कन.

## पद

(भला जन्म हा तुला.) या चालीवर.

योग भ्रष्ट ते कर्म भुमिसी जन्मा येती जसें ॥ बिल्वकर खालीं आले तसें ॥ ध्रु० ॥ रवि शशि किरणें आंत न येतीं गर्दाचि तरु तो वसे ॥ माजीं व्याध बैसला असे ॥ शरासनीं तो बाण लावुनी ज्या कर्णीं ओढुनी ॥ बैसे सावज तें लक्षुनी ॥ बिल्वदळानें दृष्टि न चाले ऐसें जाणुनि मनीं ॥ टाकीं तीं सव्य करें तोडुनी ॥ पद्मजहस्तें स्थापित होतें दिव्य लिंग ही जिथें ॥ बिल्वदळें सहजाचि पडतीं तिथें ॥ चाल ॥ संतोष झाला मग त्या गिरिजा-वरा ॥ सायास न करितां घडलें त्या जागरा ॥ पाप क्षय होतसे मुखिं चाळा हर हरा ॥ चाल ॥ जलपाना ये हरणी तेथें गर्भिणी ती हो असे ॥ सुकुमार फारच ती कीं दिसे ॥ १ ॥

## मंदाक्रांता

व्याधालाही दुरुनिच तिनें पाहिलें सज्ज जेव्हां ॥
बोले त्यासी करुण वचनीं होउनी दीन तेव्हां ॥
अन्यायी मी नसुनि तरि तूं लाविशी बाण कां रे ॥
ज्ञात्या माझा वध न करणें गर्भिणी मी असें रे ॥ १ ॥
आहे माझ्या उदरिं तरि या गर्भ अज्ञान जाण ॥
दोषा कां रे वरिसि मग तूं मारुनीं यास बाण ॥
स्वर्गाचें वा त्यजुनि सुख कां रौरवा इच्छितोसी ॥
घ्यावा त्वां रे शर परतचीं धन्य तेणोंचे होसी ॥ २ ॥

## आर्या

रथभरि कीटक वधितां होई तो एक वत्स वधिलासें ॥
शत वत्साचि वधितां ते होई तरि वृषभ जीव हरिलासें ॥ १ ॥
शत वृषभातें वधितां झाला गोवध असें मुनी ह्मणती ॥
शत गो हत्या करितां ब्राह्मण हत्याचि जाहली हो, ती ॥ २ ॥
वधितां शंभर ब्राह्मण स्त्री हत्या एक होतसे पाही ॥
स्त्री हत्या शत होतां गुरु हत्या हेंच शास्त्र वदतें ही ॥ ३ ॥

गुरु हत्या शतसंख्येचि गर्भिणि वधिली असेंच तूं जाण ॥
होउनि सदय मनीं वा घेई परताच हा तुझा बाण ॥ ४ ॥

## साकी

कांतिसह मी उपवासींगे लेश नसें अन्नाचा ॥
मारुन तुजला भक्षण करणें हेत माझ्या मनिंचा ॥
ऐकूनि तव बोला ॥ होतो हर्षचि चित्ताला ॥ १ ॥

## दिंडी

पूर्व जन्मीं होतीस कोण तूं गे ॥ शास्त्र कैसें ठावके तुला आंगें ॥
पशू योनित जन्म कां तुला आला ॥ कवण देवाचा शाप तुला झाला ॥ १ ॥

## पद

( घेउनि मुशाफर वेश, ) या चालीवर.

क्षीर सागरीं मंथन करितां रत्नें आलीं वरी ॥ त्या माजीं मी रंभा वधूनी विस्मय भासे सुरीं ॥ ध्रु० ॥ नयन कटाक्षा पाहुनि माझ्या भुलती सुर अंतरीं ॥ मम कायेचा सुगंध घ्याया लगटाते भृंगापरी ॥ रूप मदानें मानि न कवणा झिडकारी त्या तरी ॥ सुधापान तें त्यागुनि मी हा हाला प्राशन करीं ॥ उपोषणादिक व्रत न करी मी न धरी भय अंतरीं ॥ चाल ॥ दुष्टचि मन्मन तें जडलें असुरा वरी॥ त्यासाठीं त्यजली शिवपूजा मीं तरी ॥ दुष्टा संगें मी रमलें नाना परी ॥ चाल ॥ एकवार तो मृगये गेला पाहुनि संधी बरी ॥ शिव दर्शन तें घ्याया गेलें मी कैलासावरी ॥ १ ॥

## साकी

क्षोभूनि तेव्हां उमारमण तो देतां झाला शाप ॥
सख्या सहित तूं मृगी होउनी भोगी आपुलें पाप ॥
जाउनि भूलोकीं ॥ नच राहें तूं गे नाकीं ॥ १ ॥
असावधाचि जो माझे भजनीं हिरण्य नामा दैत्य ॥
तोहि पावुनी मृग योनींतें देइल रति सुख नित्य ॥
ऐकुनिया बोला ॥ शंकर म्यां तैं विनवाला ॥ २ ॥

जगदानंदा अनंद कंदा भक्त मधुप अरविंदा ॥
छंदानें तुज गाती निगमें? आहें मी माते मंदा ॥
देउनि उःशापा ॥ वारी तरि या मम तापा ॥ ३ ॥

## दिंडी

दीन वच हें ऐकुनी नाथ तोरे ॥ देइ उःशापा ऐक सांगतेंरे ॥
वर्ष द्वादश राहुनी मृत्यु लोकीं ॥ फिरुनि अंती पावाल मत्पदांकीं ॥ १ ॥
शाप योगें जाहले मृगी पाही ॥ सख्यासह मी येऊनि वनीं राही ॥
अज्ञ गर्भाला दिवस पूर्ण हो तें ॥ गृहीं जाते ठेउनी परत येतें ॥ २ ॥

## साकी

नाना परिचें असत्य बोलुनि रक्षण करिती देहा ॥
काय तुझागे नेम धरावा जाउनि येशिल गेहा ॥
शपथचि घेऊनी ॥ यावें परतचि जाऊनी ॥ १ ॥

## कटाव

( दुर्योधन दुर्वास ऋषिला, ) या चालीवर.

ब्रह्मकुळीं ही जन्मा येउनी ॥ वेदशास्त्र ही न तो जुमानी ॥ सत्य शौच ही संध्या वर्जुनी ॥ पातक हें कीं वसो येउनी ॥ मम शिरिं जरि मी नये परतुनी ॥ वेदाचा वा विक्रय करिती ॥ कृतघ्न असुनो लोकां पीडिती ॥ परदानातें विघ्नचि करती ॥ गुरु निंदा ती सुखें ऐकिती ॥ हरिहराचा भेद मानिती ॥ दान देउनी परताचि घेतो ॥ पापें सारीं ॥ घेइं मी तरी ॥ यतिची निंदा ती एक करी ॥ शास्त्र पाहुनी द्वैतचि भारी ॥ असद्धर्मा-वारे विश्वास धरी ॥ देवालयें जे पुराण श्रवणीं ॥ बसती ऐकत विडा खाउनी ॥ जन्मा येती कोडी होउनी ॥ देवळीं जाती ॥ स्त्रीस भोगिती ॥ स्त्री पुरुषामधिं वियोग पाडिती ॥ उपजतांचि ते नपुंसक होतो ॥ दुसऱ्या-चें जे वर्म काढिती ॥ काक होउनि विष्टा भक्षिती ॥ विद्या असुनि शिष्या प्रति ती ॥ न देती ते पिंगळे होतो ॥ अनुचित प्रतिग्रह ब्राह्मण घेती ॥ गंडमाळा त्यांना होती ॥ परक्षेत्रिंच्या गाई आणती ॥ अल्पायुषि ते

जन्मा येती ॥ जो नृप आपली प्रजा पीडितो ॥ व्याघ्र सर्प या जन्मा येतो ॥ स्त्रिया कारती व्रत नेमाला ॥ अव्हेरिति ज्या आपल्या पतिला ॥ या पापानें होति वागुळा ॥ कुरुप ह्मणूनी त्यागिति पतिला ॥ वैधव्यचि ये बाळपणाला ॥ ॥ तेथें होती वश जाराला ॥ मग त्या जन्माते होउनि पांशुला ॥ निर्भत्सेति जी आपल्या पतिला ॥ दासीचा तो जन्माचे तिजला ॥ सेवक करि जो द्रोह स्वामिचा ॥ जन्माचे त्याला तो श्वानाचा ॥ रजस्वला जी आपण असुनी ॥ गृहींच हिंडे अशि जी पापिणी ॥ पूर्वज रुधरीं पडती पतनीं ॥ ॥ नंदादिपाचें तेल चोरेती ॥ निपुत्रिकाचे त्या जन्मा येती ॥ अन्न चोरुनि भक्षण करिती ॥ बिडाल योनी तयास मिळती ॥ देव ब्राह्मणा देति कदन्ना ॥ आपण भाक्षेति षड्रस अन्ना ॥ गर्भ त्यांचा पोटिं राहेना ॥ शीण देती आई बापांना ॥ मर्कट होउनि येती जन्मा ॥ सासु श्वशुरा करिते छलना ॥ बाळक शोकाचे होई त्याना ॥ परत नये जरि ॥ पापें सारीं ॥ बसोत मम शिरावर तरी ॥ गोष्ट बोलली ॥ मिथ्या झाली ॥ वडो पाप शिव पुजा भंगली ॥ १ ॥

## कामदा (चालीवर)

शपथ ही तिची व्याध ऐकुनी ॥ शंकलाच तो फार हो मनीं ॥
जाउनी गृहा येइं सत्वरी ॥ बैसतोंच मी येथ तों वरी ॥ १ ॥
ऐकुनी असे व्याध बोल ते ॥ काय हो तया हरिणि बोलते ॥
शिवपदास तूं जासिरें अहा ॥ उदक प्राशुनी जाइ ती गृहा ॥ २ ॥

## अंजनी गीत

दक्षिण हस्तें बिल्वदळें तीं ॥ खुडुनी टाकितो वरचे वरती ॥
यामिनी झाली दोनप्रहर तीं ॥ त्या समयासीं ॥ १ ॥
गिरिजारमणा तोष होउनी ॥ द्वितिय पुजा ती त्याचि मानुनी ॥
अर्ध पाप तें जाळि मुळिहुनी ॥ सप्तहि जन्मांचें ॥ २ ॥
नामिं लागली आवड त्याला ॥ वरवर करितो शिवस्मरणाला ॥
ऐके मृगिच्या निरूपणाला ॥ जागर सहज घडे ॥ ३ ॥

इतक्या मध्यें दुसरी हरिणी ॥ आली तेथें तृषित होउनी ॥
बाण ओढितां व्याध पाहुनी ॥ करुणा भाकेतसें ॥ ४ ॥

## दिंडी

ह्मणे व्याधा सांगतें ऐक तूंरे ॥ मदन बाणें फारची पीडिलेंरे ॥
पतीस देउनि भोग मी परत येते ॥ जाइ परिगे तूं शपथ देइ माते ॥ १ ॥

## कटाव

( दुर्योधन दुर्वाम क्राथिला, ) या चालीवर.

वापि सरोवर तडागाते ॥ मोडुनि टाकी देवागरते ॥ अहर्निशीं हो सुरापानतें ॥ करुनी वदतो भलतें सलतें ॥ क्षत्रिय असुनी समरांगणते ॥ सोडुनि जाई दुराचे परतें ॥ पतिस सोडुनी परगृहीं निजते ॥ पुत्र स्नुषा ती सन्मार्गानें ॥ वागत असतां त्रासचि देणें ॥ जन्मा येती करुप रूपानें ॥ सदा राहती भिक्षान्नानें ॥ बंधु बंधूचें वैरच होणें ॥ मत्स्य होऊनी जन्मा येणें ॥ दैवीं त्याच्या काय हें कथणें ॥ मार्गा वरतीं ॥ वस्त्रें हरतीं ॥ अति शूद्राच्या जन्मा येती ॥ प्रेत वस्त्रें धारण करिती ॥ तपस्याचें ढोंगचि करिती ॥ जन्म घुल्याचे तयास मिळती ॥ कन्येचा जे विक्रय करिती ॥ हिंसक योनींत जन्म पावती ॥ गांजी व्यर्थचि पतिव्रतेला ॥ भंगचि त्याच्या होय गृहाला ॥ ब्राह्मण असुनि विकी रसाला ॥ मद्यपि जन्माचि त्या दोघांला ॥ ब्रह्मवृंदही अवमानीला ॥ ब्रह्मराक्षस योनी त्याला ॥ जंत कृतघ्नचि पाही झाला ॥ श्राद्धे जेवुनी ॥ ललना घेऊनी ॥ भोगिति त्यानां सूकर योनी ॥ खोटि साक्षही दिधाले जयांनी ॥ पूर्वज त्यांचे पडले पतनीं ॥ दोघि स्त्रियांचा पती असूनी ॥ राही त्यानां दूर सोडुनी ॥ श्वतनु गोचिड तेणेंकरुनी ॥ देवा गारो ॥ भोजन सारी ॥ होय तरी तो क्षीण शरीरीं ॥ पर बाळाचो करितो विकरी ॥ दूर नेऊनी कुष्ट शरीरीं ॥ गर्भाचा जी पात करीते ॥ ती स्त्री वंध्या जन्मा येते ॥ देव द्वारिच्या अश्वत्थाते ॥ तोडिति होतो पांगुळ तरि ते ॥ दरिद्रेलक्ष्मी करि विघ्नाते ॥ तद्भार्याचे पोटीं सल ते ॥ गोवध करितो चांडाळचि ते ॥ अन्न द्वेषही होई त्यातें ॥ पूर्वज पावति त्या नरकातें ॥ पाराधे बाधे जो बहु जंतूते ॥

अपस्मार हा रोगाचि त्याते ॥ रडती पाहुनि बाळक मृत तें ॥ त्यासी हंसती निपुत्रिकाचि ते ॥ परत नये जरी ॥ पापें सारीं ॥ बसोत मम शिरावर तरी ॥ १ ॥

## साकी

याया परिची शपथ घेउनी हरणी गृहास जाई ॥
इतक्यामध्यें मृगराजाहे तो तृषार्त होऊनि येई ॥
पाहुनि त्या नयनीं ॥ ओढी व्याधचि ज्या कर्णीं ॥ १ ॥
शरासनींचा बाण पाहुनी अंतरिं भीती येते ॥
तोंवरि मजला मारुं नकोरे पुसोन येतों कांते ॥
शपथचि मी घेतों ॥ संशय दूर तुझा करितों ॥ २ ॥

## कटाव

( दुर्योधन दुर्वास ऋषिला, ) या चालीवर.

ब्रह्मकर्म जें शूद्रचि करिती ॥ सोडिति जे कीं स्वधर्म नीती ॥ नरकीं ते रे जाऊनि पडती ॥ ब्राह्मण पाहुन मान न देती ॥ शास्त्र सोडुनी कविता करिती ॥ वंशाचीरे वाढ खुंटती ॥ हरिहरादेविं जें भोजन करिती ॥ क्षोणतांच ही त्यांना येती ॥ शिवमहिमा जे मोडुनि टाकिती ॥ ते वा नरकीं कीटक होतो ॥ मातृद्रोही ॥ व्याधी देहीं ॥ पितृद्रोही पिशाच पाही ॥ गुरु द्रोहे तो यमपुरिं जाई ॥ बहुत अन्न तें ब्राह्मण खाई ॥ पाहुनि हांसे त्याच्या देहीं ॥ अरोचक तो रोगाचि होई ॥ जे जे विकती कन्या गायी ॥ बिडाल योनी प्राप्तचि होई ॥ जन्मुनि तेथें बाळें खायी ॥ परत नये जरी ॥ पापें सारीं ॥ बसोत मम शिरावर तरी ॥ १ ॥

## पद

( दोन प्रहर रात्र झाली ऋषि आले भोजना, ) या चालीवर.

शिव शिव हा छंद त्याला मुखिं घेई नाम तें ॥
सद्गदही होउनीया नयनीं ये अश्रु ते ॥
त्रिदळातें तोडुनीया हर शिरिं ही टाकि, तें ॥
नाहिं पुण्यापार त्याच्या किति वर्णूं मीच तें ॥ १ ॥

## पद

( चाल सदर. )

चार प्रहर वडालें पाही शिवपूजा सहजची ॥ निरूपण तें ऐकुनीया जागर हो त्यासची ॥ जन्मीचें पाप सारें होई तें भस्मची ॥ नाहीं पुण्या-पार त्याच्या जाणें तो ईशाचि ॥ १ ॥

## साकी

गरुडाग्रज तो उदया येतां तिसरी हरणी आली ॥
सकार्मुकाचि तो व्याध पाहुनी फारचि भिऊनि गेली ॥
व्याधा लागोनी ॥ बोले दीनचि होऊनी ॥ १ ॥
फुटला माझ्या स्तनिंया पान्हा बाळक स्मरणचि होतें ॥
गृहीं जाउनी त्यातें पाजुनि शीघ्र परत मी येतें ॥
ऐके शपथ आतां ॥ संशय सोडुनि दे परता ॥ २ ॥

## कटाव

( दुर्योधन दुर्वास ऋषिला, ) या चालीवर.

ग्रामें सारीं दहनाचि करिती ॥ ब्राह्मणाचें उदक कोंडती ॥ क्षयरोगी ते होउनि पडती ॥ ब्राह्मणांचीं सदनें हरिती ॥ पूर्वज सारे रौरवीं पडती ॥ मातृ पुत्रा विघडचि करिती ॥ स्त्रीपुरुषामाधें विघाड पाडिती ॥ देव ब्राह्मणा नमन न करिती ॥ कठोर बोलुनि त्यास निंदती ॥ कर चरण त्याचे छेदन होती ॥ पर वस्तुला ॥ चोरायाला ॥ अखंडचि तो गेव लाविला ॥ दुःखाचि देई साधुजनाला ॥ तिडका त्याच्या त्या नेत्रांला ॥ पुस्तक पाही ॥ चोरुन घेई ॥ मुका होउनी जन्मा येई ॥ रत्न चोरतां नेत्रचि जाई ॥ अत्यंत गर्वी महिषचि होई ॥ भक्ताला जो निंदित जाई ॥ त्याचे मुखाला वाणाचे येई ॥ आइबापा जो लाथा देई ॥ ॥ पायानें तो लुलाच होई ॥ कृपण जन ते भुजंग पाही ॥ द्वारीं येतां पाहुनि यातला ॥ रिताचे पाही त्यास दवाडेला ॥ शंकर त्यावरि कोपुनि गेला ॥ संतातला तो जाणा मुकला ॥ ब्राह्मण बैसे जेवायाला ॥ उठ-वुन घालीं बाहेर त्याला ॥ गणतो नाहीं त्या पापाला ॥ परत न ये जरि ॥ पापें सारा ॥ बसोत मम शिरावर तरी ॥ १ ॥

६४८९

## कामदा

( या चालीवर. )

ऐकुनी तिच्या दीन वाणिला ॥ जाई गे गृहीं व्याध बोलिला ॥
बाळकास तूं पाजुनी तरी ॥ मागुती इथें येइ सत्वरी ॥ १ ॥
जाउनी गृहीं फार सत्वरी ॥ पाडसास ती तृप्त हो करी ॥
वडिल ती मृगी प्रसुत जाहली ॥ दुसरिनें पती आस पुरविली ॥ २ ॥
पाडसा सह सर्व चालले ॥ व्याध बैसला तेथें पातले ॥
अज्ञ ते पशू असुनि पाळिलें ॥ वचन त्यांनि जें त्यास दीधलें ॥ ३ ॥

## अभंग

मृग ह्मणें व्याधा वधी मज आधीं ॥ नव्हे ऐसा विधी मृगि ह्मणे ॥
पतिच्या ते आधीं आह्मासी मारणें ॥ सौभाग्य ठेवणें तुझे हातीं ॥
पाडसे ह्मणती सर्वांच्या तें आधीं ॥ आह्मांसी तूं वधी पारध्यारे ॥
अंतरीं तयांचे बोल ते ऐकुनी ॥ सद्गद होऊनी व्याध बोले ॥
नेत्रांतून त्याच्या अश्रु हो चालले ॥ चरणावरीं लोळे मृगाच्या हो ॥ १ ॥
निरूपण तुमचें कर्णीं ऐकुनीया ॥ पुनीत ही काया झाली माझी ॥
माता पिता गुरू सर्व कांहीं तुह्मीं ॥ पुत्र कलत्र ही लटकेची ॥
मिथ्या हा संसार अवघा माया जाळ ॥ पापाचें तें मूळ कळें मज ॥
शिव पदा आतां कधीं मी पावेन ॥ आलें तें विमान त्यासी न्याया ॥ २ ॥

## साकी

पांच मुखें ज्या बाहु दश ही व्याघ्रांबर तें देहीं ॥
दिशा मडळी तेज माइना ऐसे शिवगण पाही ॥
वाद्यें वाजवितीं ॥ विद्याधर अलापाचि घेती ॥ १ ॥
हरिण पावली दिव्य शरीरा शिवगण दर्शन घेतां ॥
व्याधाचाही देह पालटे त्यासी वंदन करितां ॥
परिसें लोहातें ॥ तैसी दिव्य तनू होते ॥ २ ॥

शिवरूपीं तो व्याध होउनी मृगासहित ही बैसे ॥
विमानांतही जाउनि तेव्हां सुरगण ह्मणती कैसें ॥
पुण्यचि व्याधाचें ॥ धन्य धन्य ह्मणाते वाचें ३ ॥

## दिंडी

व्याध नेला मिरवीत शिव पदासीं ॥ अढळपद हो जाहलें प्राप्त त्यासी ॥ हरिण राहति तारका मंडळांत ॥ दिसति लोका नित्यची अंबरांत ॥ ॥ १ ॥ धन्य जन ते शिवरात्र पाळताती ॥ धन्य जन ते जागुनी नाम गाती ॥ धन्य जनते करितात नित्य पाठ ॥ धन्य जन ते साधती स्वर्ग वाट ॥ २ ॥ अभाविक ते खळ असें मनीं जाणा ॥ तया कैसा पावेल आदिराणा ॥ नित्य जरिहो वाचाल एक वार ॥ अंतीं तुह्मीं पावाल स्वर्ग द्वार ॥ ३ ॥

## पद

( कृपाघन भक्तीं आकळिला, ) या चालिवर.

रत मन व्हावें शिव भजनीं ॥ ध्रु० ॥
काय व्रताचा महिमा वर्णू ॥ थकले व्यास मुनी ॥ वर्णितां ॥
नाम तुझें तें मुखीं असावें ॥ इच्छा हीच मनीं ॥ दयाळा ॥
महापापिही उद्धरिलें तूं ॥ कृपा नये कां मनीं ॥ दयाळा ॥
गिरिजारमणा भव भय हरणा ॥ लीन तुझ्या चरणीं ॥ सदोदित ॥ १ ॥

NATIVE GENERAL LIBRARY, KHED. (POONA)
सार्वजनिक वाचनालय
खेड, ( पुणें. )

NATIVE GENERAL LIBRARY
सार्वजनिक वाचनालय
बीड, (पुणे.)

## अध्याय ३ रा.

### कामदा

( या चालीवर. )

पार्वतीवरा त्रिपुरनाशका ॥ अष्टमूर्ति तूं मदनदाहका ॥
भाललोचना धूर्जटी हरा ॥ स्थाणु रुद्र तूं गौरी शंकरा ॥
शंभु शंकरा हे महेश्वरा ॥ वामदेव तूं जान्हवीधरा ॥
स्कंदतात तूं नागभूषणा ॥ चंद्रशेखरा तूं त्रिलोचना ॥ १ ॥

### साकी

यथा मतीनें शिवरात्रीचा महिमा वर्णन केला ॥
गोकर्णाचा महिमा आतां कथन करिन तुह्माला ॥
द्याहो श्रवणाला ॥ करिल दग्ध जो पापाला ॥ १ ॥

### आर्या

इक्ष्वाकूच्या वंशीं मित्रसह नामेंच भूप तो धन्य ॥
वेदशास्त्र तो जाणे होता पंडित जनांत बहु मान्य ॥ १ ॥
शूराहे मोठा होता पृथ्वी सारीच जिंकुनी टाकी ॥
नामेती सारे राजे शोभे तो इंद्र साच भूलोकीं ॥ २ ॥
तो एकदां वनाला संगें घेऊन सर्व सेनेला ॥
गेला घोर वनांतरिं इच्छी मनिं कीं यथेच्छ मृगयेला ॥ ३ ॥
व्याघ्र वृक सिंह मृग गज वानर चातकादि वाधिले हो ॥
मारी नृप जीव बहू सहज वधी त्यांत एक राक्षस हो ॥ ४ ॥

### साकी

मम बंधुला नृपें मारिलें कांहीं दोषचि नसतां ॥
त्याचा बंधू खराच जरि मी घेइन सूडाचें आतां ॥
ऐसें बोलूनी ॥ निघे कपटाची योजूनी ॥ १ ॥

मृगया करुनी नगरा आला राजा सेने साहित ॥
असुर धरूनी मानव वेषाहे आला राज सभेंत ॥
स्कंधीं दर्वीती ॥ पाहुनि कोण असें पुसती ॥ २ ॥
सूप शास्त्रिं मी निपुणचि आहें करिन सुवासिक अन्न ॥
देवादिकही चाखुनि राजा ह्मणती मजला धन्य ॥
राजा ऐकूनी ॥ ठेवी तया पाक सदनीं ॥ ३ ॥

## दिंडी

पितृतिथि ती लक्षुनी भूभुजानें ॥ अमंत्रण तें दीधलें अनंदानें ॥
वशिष्टासी आणि हो भोजनासी ॥ पुढें होणारें काय केळें त्यासी ॥ १ ॥
सूड घेण्याचो वेळ वरी आहे ॥ दुष्ट राक्षस तो कपट युक्ति पाहे ॥
भाजि मध्यें नरमांस अणुनि घाली ॥ वशिष्ठाला वाढिली तये वेळीं ॥ २ ॥
भाजिं मध्यें नरमांस पाहुनीया ॥ शापि मुनि तो राजास कोपुनीया ॥
होइ राक्षस नामिळो अहारातें ॥ राव बोलें ठाउकें नसें मातें ॥ ३ ॥
सूप शास्त्री त्वरितची अणा येथें ॥ पाहाति परितो न मिळे त्यास तेथें ॥
दोषि नसतां कां मशी शापिले हो ॥ मीहि शापिन तो शाप आतां घ्याहो ॥ ४ ॥

## साकी

ऐसें बोलुनि नृपोत्तमानें उदक घेतलें हातीं ॥
शाप द्यावया सिद्ध जाहला तो आली मदयंती ॥
त्याची कांता ती ॥ फार गुणवती होती ॥ १ ॥

## अंजनी गीत

प्राणसखया अपणा स्ताविते ॥ शाप कुणाला देतां तरिते ॥
वशिष्ट मुनि हा गुरु अपणाते ॥ विचार तरि कांहीं ॥ १ ॥
गुरुसि शापेतां जाइल राया ॥ नरकामध्यें तुझि ही काया ॥
रागानें हो जाइल वाया ॥ विचार करि कांहीं ॥ २ ॥

## पद.

( रामचंद्र नाहिं घरीं काय मी करूं,) या चालीवर.

वचन तुझें सत्य सखे बोललीस गे ॥ धृ० ॥ अधिकारहि नाहिं मला शाप ण्यास गे ॥ टाकुं कुठें उदक तरी स्थल न दिसें गे ॥ टाकिन जरि मही वरी होइल दग्ध गे ॥ अन्न कसें मिळेल जना सांग सखे गे ॥ १ ॥

## साकी.

ऐसें बोलुनि जीवन टाकी अपल्या पाया वरती ॥
भाजुनि पद ते कृष्ण होऊनी कुष्ठाचि भरला वरती ॥
कल्माषपाद तया ॥ ह्मणती जन ते त्या समया ॥ १ ॥
जाणुनि ऐसें वृत्त मुनीनें उःशापाचि तो वदला ॥
द्वादश वर्षें मुक्त होऊनी येशिल निजसदनाला ॥
ऐसें बोलूनी ॥ गेला गुप्ताचि होऊनी ॥ २ ॥
परम भयानक विशाळदेही मुख विक्राळाचि फार ॥
मुखाबाहेर शुभ्र दंत ते दाढा दिसती थोर ॥
कल्माषपादहि तो ॥ शापें असुर योनि घेतो ॥ ३ ॥
क्षुधेत होउनी वनीं हिंडतां कांहीं न मिळे त्याला ॥
असें हिंडतां सहज विलोकी भूदेव कुमाराला ॥
करित विहाराला ॥ संगें घउनि ललनेला ॥ ४ ॥
पाहुनि ऐसें त्वारेत धावला ओढी धरुनी त्याला ॥
मारुनि त्याते भक्षण करणें ऐसा निश्चय केला ॥
पाहुनि प्रसंगाला ॥ ललना भाकी करुणेला ॥ ५ ॥

## पद

(नकळे होइल गति कैशी,) या चालीवर.

पडतें पाया असुरा तुझिया ॥ मारुनको पतिला ॥ धृ० ॥
मित्रसह तूं राजा थोर ॥ मारुनको रे माझा चकोर ॥
लागेल मजला पाराचे घोर ॥ देइ ओड ही मजला ॥ पडतें ॥

आइ बाप तूं मी तुझे लहान ॥ ठेविलि तुझिया मांडी मान ॥
माझ्या बोला देउनि कान ॥ चुडे दान दे मजला ॥ पडते ॥ १ ॥

## श्लोक

( मालिनी. )

गडबड मग लोळे राक्षसाचेंच पायीं ॥
पसरुने पदराती दीन वाणीच गायीं ॥
झडकरि पाते माझा सोडुनी देइ राया ॥
पुनरपि साते लागे राक्षसांच्याच पायां ॥ १ ॥

## साकी

दुष्ठ राक्षसा माया कैसी सतिच्या वचनें येई ॥
तिच्या पतीला भक्षण करुनी अस्ती टाकुन देई ॥
पाहुनि करणी ती ॥ शोके विव्हळ बहु होती ॥ १ ॥

## दिंडी.

शोक करिती फारची दीनवाणी ॥ शांत करण्या तीस हो नसे कोणी ॥
शाप दिधला मग तिनें राक्षसाला ॥ अलोटचि जो भासला हरिहराला ॥ १ ॥

## साकी.

मदयंतीचा संग करिसे जरि मरणाचि येइल तुजला ॥
कोण्या स्त्रीचा संग तुलारे नमिळो तुज चांडाळा ॥
केल्या कर्माचें ॥ भोगीरे फळ तूं साचें ॥ १ ॥

## श्लोक.

इंद्रवज्रा.

काष्टें जमा ही करुनीच त्याते ॥ लावून अग्नी आपुल्याच हातें ॥
अस्थी पतीच्या जमवी सतीहो ॥ घेऊन हाती उभि राहिली हो ॥ १ ॥

## श्लोक.

( द्रुतविलंबित. )

ढळढळा नयनीं जळ वाहतें ॥ वरि वरी पतिला सति बाहते ॥
प्रियसख्या काशि हो गति जाहली ॥ शिव शिवा ह्मणुनी उडि टाकिली ॥१ ॥

## साकी.

द्वादश वर्षें मुक्त होउनी राजा नगरीं आला ॥
सतिनें त्याला शाप दिला जो सांगी मदयंतीला ॥
सांगुने तो बोले ॥ जन्मा सार्थक नच झालें ॥ १ ॥

## पद.

(अक्रुर हा नेतो श्रीकृष्णाला,) या चालीवर.

हर हर शंभो काय गती ही अमची ॥ खुंटली वाढ वंशाची ॥ धृ० ॥
अहो पति राया अवरुनि इच्छा मनिची ॥ रक्षा तरी, तनू तुमची ॥
आज पासुन ती खदिरांगाराची ॥ शेजचि आपणा साची ॥ चाल ॥
आतां धरुनी ब्रह्मचर्याला ॥ मनिं नका आणु परस्त्रीला ॥ चाल ॥
जसि गति होई दंत हीन भुजगाची ॥ तसि हो गती ही तुमची ॥ हर हर ॥१॥

## दिंडी.

पुढें कैसा चालेल वंश आतां ॥ हीच चिंता लागली नृपा नाथा ॥
शास्त्र शासन पाहुनी वशिष्टानें ॥ मदयंतिला भोगतो दिला त्यानें ॥ १ ॥

## अंजनीगीत.

तेणें करुनी गर्भ राहिला ॥ मदयंतीला पुत्र जाहला ॥
तेणें करुनी वंश चालला ॥ मोठें नवलचि हें ॥ १ ॥
काम गजाला अवरुन धरला ॥ विवेकांकुशें मारुनि त्याला ॥
आणु नयें तें वैधव्य स्त्रीला ॥ विचार राव करी ॥ २ ॥

गृहारण्य तें समान त्याला ॥ मृगया करण्या राव निघाला ॥
परि ब्रह्महत्या न सोडी त्याला ॥ उभी सदां पाठीशी ॥ ३ ॥
जिकडें जिकडें राजा जाई ॥ तिकडें तिकडें हत्या येई ॥
जागृतिं स्वप्नीं सर्व काळही ॥ त्याच्या दृष्टि पुढें ॥ ४ ॥
राजा हिंडे तीर्थे सगळीं ॥ व्रतेंहि बरवीं बहुतचि केलीं ॥
परि हत्या ती मागें लागली ॥ कदापी न सुटे ॥ ५ ॥

## साकी.

ऐसा हिंडत हिंडत राजा मिथिला नगरा आला ॥
वन शोभा ती नयनीं पाहुनि आनंदित तो झाला ॥
परी ब्रह्महत्या ती ॥ राया पाठी उभि होती ॥ १ ॥

## पद.

(चाल साधी.)

आम्र पोफळी रातंजन ते खर्जुरि केळि नारळी ॥
वट पिंपळ ते औदुंबर ही कपित्थ बिल्व ती बकुळी ॥
जाइ जुई मोगरा मोतिया गुलाब हीं फुलें फुललीं ॥
याया परिनें वन श्रीला फारचि शोभा आली ॥ १ ॥

## दिंडी.

क्षुधित प्राण्या क्षीराब्धि प्राप्त जैसा ॥ अमृताचा लाभ कीं मृता जैसा ॥
दरिद्याला सांपडे मणी जैसा ॥ मुनी गौतम पातला तिथें तैसा ॥
घालि लोटांगण मुनीच्याच पायीं ॥ अष्ट भावें सद्गदित राव होई ॥
करद्वय तें जोडुनी उभा राहे ॥ अश्रुजळ तें नयनींच फार वाहे ॥ २ ॥
कुशल असती कीं? नृपा! मुनी बोले ॥ स्वधर्मानें कीं प्रजा तुझी चाले ॥
कुशल असती सर्व ही मुनी राया ॥ कथन करि मग पुर्वींचें कर्म राया ॥ ३ ॥

## साकी.

गोकर्णाला जाउनि तूं रे पूजी त्रिंबक राजा ॥
परम पूत तें भूकैलासाचि मुक्तचि होशिल राजा ॥
महिमा मी वदतों ॥ जो सकल पापची हरितो ॥ १ ॥

## पद.

(भला जन्म हा,) या चालीवर

कैलास पती भोला शंकर ओंकार रूपीं दिसे ॥ भवानी सहितचि तेथें वसे ॥ ध्रु० ॥ अर्ध मात्र जें पीठचि भासें सुरासुर हि सेविती ॥ कोटि सूर्य तेजें कामि भासती ॥ ब्रह्मादिकांही दुर्लभ जाणा शिव दर्शन तें तरी ॥ जनार्दन तेथें तप ही करी ॥ वशिष्ट भृगु तो जमदग्नीही इतरहि सगळे ऋषी ॥ वसती तेथें ते अर्हनिशीं ॥ चाल ॥ मृडानी सहित तो शंकर तेथें वसे ॥ कैवल्य गर्भिचा पूर्णाचि गाभा दिसे ॥ सनकसनंदन नित्यचि तेथें वसे ॥ चाल ॥ पाषाण तरू तेथिल सारे दुसरे कोणी नसे ॥ निर्जरचि ते अवतरले असे ॥ १ ॥ मृडानिनायक पाहण्यासाठीं मंडप वसणि होतसे ॥ नारद तो शिवलीला गातसे ॥ गोकर्णाचे चोहुं बाजूला सारे देवचि उभे ॥ आनंदित पाहुनि त्या शिवप्रभें ॥ वेदघोष ते ऋषिजन करिती नृत्य करुनि नायिका ॥ तोषविती त्या गौरिनायका ॥ पूर्व दक्षिण पश्चिम उत्तर या दिशेस तिष्टति ॥ इंद्र यम वरुण वैश्रवण राखिती ॥ चाल ॥ घवघवित तेज तें पसरें चहुं बाजुला ॥ भवानी साहित तो शंकर मधिं बैसला ॥ कर्पुर गौर तो ध्यानीं आणि चांगला ॥ चाल ॥ त्या भोंवतें महासिद्धिचें पूजन तें कीं असें ॥ मागुती कात्यायनि करितसें ॥ २ द्वादश मित्रहि अकरा रुद्र ते पूजिति जान्हविधरा ॥ अष्टवसू दिग्पाल जोडिति करा ॥ वरकड क्षेत्रीं लक्ष वर्षें हि तपाचारिलें जरी ॥ एक दिनीं पुण्यचि तेथें तरी ॥ प्रदोषकाळीं शिव-वासरीं समुद्र स्नान जो करी ॥ त्यापाशीं सगळीं तीर्थें तरी ॥ चाल ॥ निर्वाण लिंग तें दशाननें आणिलें ॥ उग्र तप पाहुनी शंकरें त्या दीधलें ॥ गजाननानें तें गोकर्णीं स्थापिलें ॥ चाल ॥ सूतांनीं जी ऋषीजनांला कथा कथिली असे ॥ तीच मी तुज प्रति सांगत असे ॥ ३ ॥

## पद

(चाल सदर.)

कैकसि नामें रावण माता लिंगार्चन हो करी ॥ व्हावी शिवकृपा पुत्रा वरी ॥ धृ०॥ पांच धान्यें पिष्ट करूनी लिंग तिनें करविलें ॥ इंद्रें फेकुन तें हो दिलें ॥ रावण माता अन्न न घेई कष्टी पाहुनि तिला ॥ रावण कैलासा कडे चालला ॥ आत्मलिंग तें आणण्यासाठीं गेला तो गिरि वरी ॥ जाऊनी गहन तपाते करी ॥ चाल ॥ दशाननानें मग गायन आरंभिलें ॥ स्वहस्तेंचि त्यानें शिर अपलें कापिलें ॥ स्वशिराच्या त्यानें तातीं करुन गायिलें ॥ चाल ॥ राग उपराग भार्या सहितचि गायन तें तो करी ॥ तोषला शंभू मग अंतरीं ॥ १ ॥ प्रसन्न झालों तुला रावणा अपेक्षित जें मनीं ॥ माग तें देतों तुज लागुनी ॥ आत्म लिंग तें देउनि मजला त्रिभुवनीं रूपवती ॥ ऐशी ललना दे मज प्रती ॥ कोटि सूर्यही कमीच तेजें ऐसें लिंग काढिलें ॥ शंकरें रावणा प्रति तें दिलें ॥ लिंग काढिलें तेज फाकलें दिशा मंडळांतरीं ॥ ज्याचें श्री विष्णू ध्यानचि करी ॥ ब्रह्मादिकांहीं अगम्य जाणा मुनिजन जें सेविती ॥ ज्याकरितां वेद शास्त्र भांडती ॥ चाल ॥ तें लिंग रावणें हातीं मग घेऊनी ॥ त्रिलोचना प्रति तो बोले मग प्रार्थुनी ॥ पार्वतिचिच प्रतिमा दे स्त्री मज लागुनी ॥ चाल ॥ हिची प्रतिमा निर्मु शकेना ब्रह्मदेव ही करीं ॥ घेउन जा हीच मग तूं तरी ॥२॥ अवश्य ह्मणुनी स्कांदिं घेतली स्कंदजननी तरी ॥ चाले घेउनि लिंगाचि करीं ॥ दक्षिण पंथें सत्वर जातां भ्याले सुर अंतरीं ॥ ह्मणती किति भोळा देव तरी ॥ गजानन स्कंद विरभद्र ही नंदी-सह तळमळती ॥ कैसें उदारपण हें ह्मणती ॥ पंचवदन तो हंसून बोले धांवेल लक्ष्मीपती ॥ तियेचा कैवारी तो वदती ॥ चाल ॥ इकडे भवानी स्तवित इंदिरावरा ॥ वारिजनयना तूं धांव धांव श्रीधरा ॥ हें स्तवन ऐ-कुनी धांवें तो सत्वरा ॥ चाल ॥ विप्ररुपानें अडवा येउनी बोले मग ता तरी ॥ कोठें ही स्त्री मिळविली परी ॥ ३ ॥

## पद.

(शिवाज्ञेचि वाट न पाहतां,) या चालीवर.

रावण बोले सदाशिवानें अपर्णा हीं दिली ॥

विप्र ह्मणाला वदनाचि पाहें उतरुन ती खाली ॥
वदन पाहिलें कुरुप दिसलें वर जरा आली ॥
गदगद हांसे विप्र पाहुनी त्यानें ती टाकिली ॥
भद्रकालि हें नाम देउनी रमावरें स्थापिली ॥ १ ॥

## पद.

( बघुनि उपवना विरहाग्नीची.) या चालीवर.

शंभू जवळी जाऊन बोले ओंगळ स्त्री कां दिली ॥
इच्छा मात्रें जग मोडी जी तुला नसे पचली ॥
आगांचीहो मळी काढूनी शंकरें मुर्ति ओतली ॥
भूलोकीं ती मयासुराची कंन्या हो जाहली ॥
मयासूर हा देइल तुजला मंदोदरि ती भली ॥
संगें तिच्या तुजला देइल शक्ति एक चांगली ॥
निर्वाणीच्या समयिं तुला ती उपयोगी एकली ॥ १ ॥

NATIVE GENERAL LIBRARY, KHED.
सार्वजनिक वाचनालय खेड, (पुणे)

## साकी.

ऐसें ऐकुनि रावण मागुति पूर्व स्थळास आला ॥
एकदंत तो तेथें होता राखीताचि गाईला ॥
सुर ह्मणती त्याला ॥ स्थापी अक्षय लिंगाला ॥ १ ॥
रावण तेव्हां लघुशंकेनें फाराचि व्याकुळ झाला ॥
ठेवु नये तें लिंग भूमिला ऐशी आज्ञा त्याला ॥
घेउनि लिंगाला ॥ नच करणें लघुशंकेला ॥ २ ॥
ब्राह्मण वेषें गजाननाला पाहुनि त्यातें वदला ॥
लघुशंकेला जाउनी येतों तोंवरि धरि लिंगाला ॥
होइल वेळ मला ॥ उशीर तुझ्या लघुशंकेला ॥ ३ ॥
क्षण न लागतां परतुनि येतों कृपा करी वा तूं रे ॥
विप्र ह्मणाला तिन वेळची बाहिन तुजला मीरे ॥
न येसी तोंवरी ॥ ठेविन लींग मी भुवरीं ॥ ४ ॥

अवश्य ह्मणुनी विप्रा हातीं आत्म लिंग तें दिधलें ॥
लघुशंका मग करण्यासाठीं दूर गमनची केलें ॥
अघटित हो झालें ॥ गजाननानें तें केलें ॥ ५ ॥

## पद.

(भोमक बाळा ह्मणे नृपाळा ) या चालीवर.

इंदिरावरचि अवतरलासे गजाननाचे रूपानें ॥ शिवोपासना कांहिं घडावी मजला तरि या हातानें ॥ धृ० ॥ त्यानें मोठें नवलचि केलें मूत्र रावणा बहु आलें ॥ पाखांड्याचें कुमत सरेना उपदेश जरी बहु केले ॥ कांहीं केल्या मूत्र सरेना वरिवरि तरि तो पुर चाले ॥ इभवक्र तया हाक मारुनी घे लिंग हें असें बोले ॥ हातांनीं तो खूण करूनी रावण त्याते थांब ह्मणें ॥ दुसरी तिसरी घटका झाली हाक मारितो मोठ्यानें ॥ इंदिरावर ॥ १ ॥ सांभाळी हें लिंग रावणा ठेवि मग तो भूमंडळीं ॥ अक्षय स्थापित असेंच झालें स्तविला देवीं त्या वेळीं ॥ गाईसह तो गुप्त जाहला रावण धांवत ये जवळी ॥ क्रोधभरें तो उपडूं पाहे लिंग हलेना स्थीर स्थळीं ॥ डळमळुं लागे कुंभिनि तेव्हां उपडेना तें लिंग मुळी ॥ धांवत धांवत रावण गेला गाईचा तो कर्ण पिळी ॥ तोहि तयाला नाहिं उपडला लिंग पुजी मग त्याच स्थळीं ॥ तेच गोकर्ण महाबळेश्वर गजा हर हर मोठ्यानें ॥ इंदिरावर ॥ २ ॥

## पद.

(नाहिं झाले षण्मास मला ) या चालीवर.

पूजी लिंगा नित्य तियें कैकसोच ती ॥ रावण कुंभकर्ण बिभीषणादि पूजिती ॥ धृ० ॥ त्याच बळेंहि रावणानें देव जिंकिले ॥ मंदोदरी ऐसें रत्न प्राप्त जाहलें ॥ लक्ष पुत्र लक्ष पौत्र त्यास लाभले ॥ शिव महिमा वर्णितां सुरासुरहि भागले ॥ महिमा सांगु किती ॥ पूजी लिंगा नित्य० ॥ १ ॥

## साकी

मिथिलेश्वरास यागा साठीं आह्मीं जातचि असतां ॥
अपूर्व नवल जें दृष्टिस पडलें तुला सांगतों आतां ॥
करुनी शांत मना ॥ भक्तीनें दे तूं श्रवणा ॥ १ ॥

## दिंडी

एक चांडाळी अह्मीं पाहिलीरे ॥ सर्व देहीं रोग तो वेष्टिलारे ॥
जन्मांध ती कुष्ट तें सर्व देहीं ॥ किडे पडुनी दुर्गंधि फार येई ॥ १ ॥
अशी लोळे कर्दमीं वस्त्र हीन ॥ मरण जवळी आलच तिचें जाण ॥
वराति आह्मीं पाहिलें विलोकून ॥ तिला न्याया येतसें दिव्ययान ॥ २ ॥
पंचवदन ते दशभूज शंभुदूत ॥ चार असती बैसले विमानांत ॥
कोटि सूर्याचें तेज विराजीत ॥ यान तें बा फारची लखलखीत ॥ ३ ॥
अग्निसम तें तेजची तया होतें ॥ गाति लीला ही वरि वरी मुखीं ते ॥
ऐक राया मग तया प्रश्न केला ॥ कोण प्राणी तो शिवें उद्धरीला ॥ ४ ॥

## साकी

चांडाळीला निज पदिं नेले, काय पुण्य तें केलें ? ॥
प्रश्न ऐकुनी चरित तियेचें मजला त्यांनीं कथिलें ॥
कळविन तेंच तरी ॥ जें पापाते संहारी ॥
कैकेयू नामें विप्र तयाला सुमित्रि नामें कन्या ॥
सौंदर्याते तिच्या पाहुनी ह्मणती तिजला धन्या ॥
परि बाळपणीं तें ॥ वैधव्यचि आलें होतें ॥ २ ॥
तारुण्य मदें स्वधर्म विसरुनि जार कर्म करुं लागे ॥
पिता शिकवि बहु नायकेच ती लज्जा सोडुनि वागे ॥
झाली गर्भवती ॥ जन सारे निंदा करिती ॥ ३ ॥
कुलांगारे चांडाळचि तूं कैशी आलिस जन्मा ॥
पूर्वज सारे दुःख पावतिल पाहुनि तुझिया कर्मा ॥
दुष्टे चांडाळे ॥ सोडी घर तूं या वेळें ॥ ४ ॥
लत्ता प्रहार करुनी तिजला केश धरुनि तो ओढी ॥
फर फर फर फर ओढुनि तिजला गृहा बाहेरी काढी ॥
मग ती हो गेली ॥ देशांतरा त्या काळीं ॥ ५ ॥

NATIVE GENERAL LIBRARY, KHED.
सार्वजनिक वाचनालय खेड (पुणें)

## पद

( जल भरन जात,) या चालीवर.

ऐसें हिंडत हिंडत जातां ॥ तिचि ती झाली दूरचि चिंता ॥ धृ० ॥
धनिक सभाग्य शूद्र भेटला ॥ त्यानें इजला केली कांता ॥
सर्वहि धन तें तिजला देउनी ॥ करि तो तिजवर फारचि ममता ॥
दास दासिते संगें घेउनी ॥ कृषिकर्मा तो गेला असतां ॥
मागे ती स्त्री क्षुधित होउनी ॥ घेउन चाले शस्त्रचि हातां ॥
मद्य सेवुनी धुंद होउनी ॥ गोवत्स कां बस्त न पाहतां ॥
गोवत्साचा कंठ छेदिला ॥ कोठुन येइल हृदयीं ममता ॥
डोळे उघडुनि पाहि पापिणी ॥ शांकित झाली वत्सा बघतां ॥
शिव शिव शिव शिव मुखीं ह्मणोनी ॥ करणी केली ह्मणे नकळतां ॥
व्याघ्रानें तें वत्स मारिलें ॥ प्रगटचि केली ऐसी वार्ता ॥ १ ॥

## साकी

कांहीं काळें मृत्यु पावली दूतांनीं ती नेली ॥
कुंभीपाकीं घालुनि तिजला असिपत्रीं हिंडविली ॥
तप्त भूमि वरती ॥ तिजला मग ते लोळविती ॥ १ ॥
दक्षिणपति तो पुसूं लागला चित्रगुप्तास मग तें ॥
कांहीं ईचें पुण्य अहे कां सांगा आतां मज तें ॥
तेव्हां ते ह्मणती ॥ थोडें पुण्य इचे खातीं ॥ २ ॥
शिव शिव नामा मुखीं घेउनी गोवत्सकंठ चिरला ॥
यमधर्मानें चांडाळाची योनी दिधली तिजला ॥
गर्भांध ती झाली ॥ विष्टा मुत्रें सदां भरली ॥ ३ ॥

## दिंडी

जनक जननी सोडुनी तीस जाती ॥ फिरे मग ती घेउनी यष्टि हातीं ॥
शिवदिन तो तरी बहू जवळ आला ॥ ह्मणुनि गोकर्णा जात भक्त मेळा ॥ १ ॥
तया संगें चालली पापिणी हो ॥ भद्रकाळी देवळा जवळि ती हो ॥
पडुनि तेथें अन्न द्या असें बोले ॥ परी नाहीं तें तिला प्राप्त झालें ॥ २ ॥

भक्त जे जे घालाति प्रदक्षणेला ॥ हाक जेव्हां ऐकिती तयें वेळा ॥
बिल्व दळ तें टाकिती तिच्या हातीं ॥ देइ फेकूनी वरि वरी तरी ती ॥ ३ ॥

## पद

( प्रिये पहा रात्रीचा, ) या चालीवर.

पाहि पाहि समय कसा सहज तिला तो प्राप्त जाहला ॥ धृ० ॥
बिल्व दळ फेकुनि देत ॥ लिंगावरि सहज पडत ॥
शिव दिनि ती उपोषीत ॥ जागर घडे सहज तिला ॥ १ ॥
शिव नामें गर्जति जन ॥ तीहि करी शिव स्मरण ॥
तीच ही चांडाळीण ॥ नेलें निज पदीं इला ॥ २ ॥
दिव्य देह तिचा होत ॥ शिवलीला मुखीं गात ॥
बसविलि मग विमानांत ॥ मिरवित मग नेति तिला ॥ ३ ॥

## साकी.

शिवरात्रीचें पर्व साधुनी गोकर्णा तूं जावें ॥
परमेश्वर तो पुजून तेथें मुक्त होउनी जावें ॥
सांगुनि राजाला ॥ जात मुनि जनक यागाला ॥ १ ॥
ऐसें ऐकुनि कल्माषपदही गोकर्णासी गेला ॥
प्रेम पुरस्सर भक्ति युक्तची पूजी मग लिंगाला ॥
होई सद्गद मनीं ॥ अश्रु वाहती ते नयनीं ॥ २ ॥
उमारमण तो तोष पावुनी राजा दर्शन दिधलें ॥
ब्रह्महत्यादि पातक सारें दग्धचि होउन गेलें ॥
विमान तें आलें ॥ शिवगण आंतचि ते बसले ॥ ३ ॥
अनंत वाद्यें वाजुं लागलीं सुर गण वर्षति सुमनें ॥
दिव्य देह तो राजा पावुनि गायी नामा शांतमनें ॥
स्वर्गीं पद सारी ॥ मिरवित नेला त्यास तरी ॥ ४ ॥
सरूपता ती मुक्ति मिळूनी शिवरूपीं तो झाला ॥
धन्य गोकर्ण धन्यचि व्रत तें धन्य जन भजति त्याला ॥
धन्य मुनी झाला ॥ धन्य तुझि श्रवणीं बसला ॥ ५ ॥

## अंजनीगीत

मानससरसीं मराळ जैसें ॥ निधना भवतें साधक जैसें ॥
अवधानाचि अलंकार तैसें ॥ द्या तुह्मी शंकरा ॥ १ ॥
श्रीमद्भीमातटीं विलासा ॥ ब्रह्मानंदा अनादि पुरुषा ॥
देउनि मति कैलासविलासा ॥ कथा वदवी पुढें ॥ २ ॥

## पद.

( सदाशिव धुंदि, ) या चालीवर.

सदां शिव वंदि ॥ व्याल अंगीं भस्म चार्चि वहन जया नंदि ॥ ध्रु० ॥
इंदुशेखर कालांतक जो ॥ भजण्या नर तनु सांधि ॥ १ ॥
चिन्मय सुख तें राहे तेथें ॥ योगि होति आनंदि ॥ २ ॥
अर्भक स्तवाहि लिंगीं प्रगटुनि ॥ कालसहि तो दंडि ॥ ३ ॥

NATIVE GENERAL LIBRARY

# अध्याय ४ था.

## कामदा

( या चालीवर. )

शंभु भर्ग श्रीकंठ शंकरा ॥ जान्हवीधरा हे महेश्वरा ॥
अष्टमूर्ति तूं धूर्जटी हरा ॥ ईश्वरा मृडा चंद्रशेखरा ॥ १ ॥

## साकी

मूळ मध्य वा अंत तुझा तो नसेंचि ठावा कवणा ॥
भक्तासाठीं प्रगट होउनी रक्षण करिसी त्यांना ॥
सूत कथा वदती ॥ शौनकते श्रवणाचि करिती ॥ १ ॥
किरात देशीं भूप विमर्शन परम प्रतापी होता ॥
मृगया करूनी हिंसा कारि बहु हृदयीं नव्हती ममता ॥
भोगी बहुत स्त्रिया ॥ होय मत्त सेवुनी मद्या ॥ २ ॥
परि शिव भजनीं फार भक्ति बा होती त्याला पाही ॥
विधिनें पूजी नित्य शिवासी न्यून न साहे कांहीं ॥
त्याची कांता ती ॥ कुमुद्वाते पुसें एकांती ॥ ३ ॥
शिवव्रतें तीं बहु आचारतां शिवलीला ही गातां ॥
इकडे दोषहि बहुत करूनी अधर्मि रत कां असतां ॥
विमर्शन मग बोले ॥ पूर्व वृत्त तें अपुलें ॥ ४ ॥

## आर्या

पूर्वीं पंपा नगरीं होतों मी सारमेय योनींत ॥
तों शिवरात्र दिनीं मी सहजचि शिव मंदिरा पुढें येत ॥ १ ॥
शिवपूजा पाहुनि मग पिंड प्राप्त्यर्थ यत्न बहु केला ॥
द्वारीं जे दूत उभे त्यांनीं दंडेंचि मारिलें मजला ॥ २ ॥
करुनें सव्य प्रदक्षिणा आलों परतून देवळा पुढती ॥
पुनरपि मारीति मजला मानें रागानेंच फार ते कढती ॥ ३ ॥

...IVE GENERAL LIBRARY, KHED. (POONA)

पुनरपि सव्य फिरूनी घालित होतों प्रदक्षिणा सदना ॥
मागुते मजला पाहुनि बहु क्रोधानेंच मारिती बाणा ॥ ४ ॥
शिव लिंग पुढें लक्षुनि सखये तेथें च सोडिला प्राण ॥
त्या पुण्यें करुनि मला प्राप्त असें राज देह हा जाण ॥ ५ ॥
दुष्ट गुण श्वानाचें माझें आंगींच ते परी वसती ॥
त्या योगें या जन्मीं माझें हातून दोष हे घडती ॥ ६ ॥
मग ती रायास ह्मणें तुह्मा जरि पूर्व ज्ञान तें आहे ॥
तरि मजला सांगा हो मी पूर्व जन्मीं कोण होतें हें ॥ ७ ॥

## दिंडी

कपोती तूं होतीस पूर्व जन्मीं ॥ धरुनि मांसातें चाललीस धार्मीं ॥
श्येन पक्षी तो तुझ्या पाठि लागे ॥ श्रमुनि शिखरी मग बैसलीस तूं गे ॥ १
प्रदक्षिणाहि शिखरास करुनि कांते ॥ श्रमुनि बसलिस तों पक्षि येत तेथें ॥
दुष्ट पक्षानें तुला मारिलें गे ॥ तुझें धड मग खालती येइ वेगें ॥ २ ॥
दैव योगें शिव लिंग तिथें होतें ॥ देह तूझा सहजची पडे तेथें ॥
त्याच पुण्यें झालीस राणि तूं गे ॥ शिव महिमा वर्णु मी किती सांगे ॥ ३ ॥
कुमद्वतिनें रायास प्रश्न केला ॥ त्रिकाळाचें जारि ज्ञान हें तुह्माला ॥
पुढिल जन्मीं कोणत्या कुळीं जाऊं ॥ तुह्मी आह्मी जन्म तो कुठें घेऊं ॥ ४ ॥

## साकी.

सिंधु देशिचा नृप मी होइन जया नाम तें तुजला ॥
राजकुळीं तूं जन्मा येउनि तेथें वरशिल मजला ॥
तिसऱ्या त्या जन्मीं ॥ सौराष्ट्राधिप होइन मी ॥ १ ॥
कालिंग कन्या होउनि तूं गे मजला तेथें वरशी ॥
चौथ्यानें मी गांधर नृप तूं मागध दुहिता होशी ॥
अवंति राजा मी ॥ होइन पांचवे जन्मीं ॥ २ ॥
दाशार्ह कन्या होउनि मजला वरशिल सखये पाही ॥
साहवे जन्मीं अनर्त पति मी ययाति कन्या तूं ही ॥
पांड्य राजा मी ॥ होइन सातवे जन्मीं ॥ ३ ॥

सुमती नामें होशिल सखये पद्म नृपाची तनया ॥
त्याही जन्मीं मजला वरुनी होशिल तू गे धन्या ॥
होइन रत भजनीं ॥ पुत्रास राज्य देऊनी ॥ ४ ॥

## अंजनीगीत

शरण रिघेन मग अगस्तीला ॥ घेइन तेथें शिवदिक्षेला ॥
जाइन तुज सह कैलासाला ॥ उद्धरून तेव्हां ॥ १ ॥
तितुके जन्महि घेउनि नृपती ॥ ब्रह्मवेत्ता होउनि अंतीं ॥
झाली त्याला शिव पद प्राप्ती ॥ सूत सांगतसें ॥ २ ॥
शिव भजनाचा ऐसा महिमा ॥ वेदा शास्त्रा नकळे सीमा ॥
वर्णु न शके द्रुहिण सुत्रामा ॥ मी तर मंद मती ॥ ३ ॥
ऐकुनि शिव गुण किर्तन श्रवणीं ॥ अश्रुधारा वाहति न नयनीं ॥
धिग्धिक् तो कीं जन्मा येउनी ॥ महिला भारच तो ॥ ४ ॥

## साकी.

उज्जनि नगरीं चंद्रसेन नृप परम प्रतापी होता ॥
याचक सारे तृप्त करी तो मोठा होता दाता ॥
मणिभद्र नांवाचा ॥ होता मित्राचि रायाचा ॥ १ ॥

## श्लोक

(शिखरिणी.)

दया माया पोटीं आति चतुर तो मित्रचि खरा ॥
सदां ठेवी माथा गुरु चरणिं तो शिष्यचि खरा ॥
भजे आई बापा निशिदिनिंहि तो पुत्रचि खरा ॥
पती आज्ञा पाळी कुलवतिच ती शोभवि घरा ॥ १ ॥

## श्लोक.

कांहीं असे हो पदरींहि अंश ॥ ऐशींच रत्नें मिळतीं तशास ॥
नाहीं तरी ते बहु दुःख देती ॥ पाहूनि बारे मग कष्ट होती ॥ १ ॥

NATIVE GENERAL LIBRARY, REGD. (POONA) नेटिव्ह जनरल लायब्ररी (पुणें.)

## आर्या

दिव्य हिरा परिस तसा मुक्ता फळ तें सुढाळ तेजस्वी ॥
ज्ञानी पिता गुराचि तो अपूर्व हें त्रिभुवनांत सर्वस्वी ॥ १ ॥
मणिभद्रानें दिधला एक मणी आणनी नृपाला हो ॥
भासे सूर्याचि दुसरा तत्तेज न वर्णवेचि मजला हो ॥ २ ॥

## पद

( जाउ नकारे विषया, ) या चालीवर.

अष्ट धातुला स्पर्श मण्याचा सुवर्ण तें होई ॥
व्याघ्र सर्पही चोर न राहती दुर्भिक्ष तें जाई ॥
रोग सर्वही भस्माचि होती दरिद्री सुखि होई ॥
जेथें जेथें मणि तो जाई तेथें सुख होई ॥ १ ॥

## पद

( चाल सदर. )

कंठिं बांधितां राजा शोभे इंद्रचकीं दुसरा ॥ समरांगणिं तो विजयि होतसे अपेश ये इतरा ॥ ऐश्वर्यहि तें वाढुं लागलें त्यायोगें झरझरा ॥ महाकालेश्वर भजनीं रत तो मानीना इतरा ॥ १ ॥

## पद

( गंगा नदि ती सागर सोडुनि, ) या चालीवर.

ऐश्वर्य ऐसें चढताचि गेलें इतरा तें दुःसह झालें ॥ सारे राजे एक होउनी मणि मागो आले ॥ अपार दळ तें संगें घेउनी युद्ध कराया मग गेले ॥ चंद्रमौळि सम मणि जो आहे मागति ते त्या वेळें ॥ पाहुनि ऐसा अनर्थ नृपति तो काय मनीं मग बोले ॥ १ ॥

## पद

( प्रतिकुल होईल कैसा ) या चालीवर.

सुखकर हा मणिच झाला दुःखद कीं माते ॥ भूषण ज्या कारणें जें तें दूषण होतें ॥ ध्रु० ॥ अति रूप अति धन तैशी अति विद्या प्रीती ॥ अति भोग अति दुषण हें हीं दुःखाचि तें देतीं ॥ मणि जरि देईन आतां क्षात्रपणाचि जातें ॥ १ ॥

## साकी

करुणासिंधू कर्पुरगौरा रक्षण करि तूं आतां
सेवक तुमचा संकटिं पडला कोण दुजा रे त्राता ॥
तुजविण कोणि नसे ॥ तव चरणीं मी लीन असे ॥ १ ॥
महाकालेश्वर सदनिं जाउनी चिंता रहिताचि बैसे ॥
यथासांग तें पूजन करुनी भक्तीनें प्रार्थितसे ॥
चिंता दूर करी ॥ त्रिपुरांतक हर मदनारी ॥ २ ॥
शिव पूजा ती बघण्यासाठीं जन येती शिवसदनीं ॥
त्यांत एक ती गोप गृहिणी पाही पूजा नयनीं ॥
संगें बाळ तिचा ॥ होता तो सहा वर्षांचा ॥ ३ ॥
बाळासह मग पूजा पाहुनी गोपी गृहास आली ॥
गृहकृत्य तें करण्या साठीं मुलास उतरी खालीं ॥
तव तो जाऊनी ॥ बैसे नजिकचि तृणसदनीं ॥ ४ ॥

NATIVE GENERAL LIBRARY, KHED. (POONA) सार्वजनिक वाचनालय खेड, (पुणें)

## पद

( देव स्त्री मेनका ) या चालीवर.

लिंगाकृतिच्या पाषाणाते शिव लिंगाचि मानी ॥ मृत्तिकेचि ती करुनि वेदिका स्थापी त्या स्थानीं ॥ धृ० ॥ लघु पाषाणा पुष्पें समजुनि वाही लिंगाला ॥ धूप दीप नैवेद्य करी तो वाहुनि दगडाला ॥ मंत्र ध्यान तें ठाउक नाहीं अज्ञाचे बाळाला ॥ परिमळ द्रव्यें समजुनि लावी धूळचि लिंगाला ॥ चाल ॥ मानस पूजा करि मग प्रेमानें ॥ शंकर हर हर ह्मणे मग वदनानें ॥ नाचे डोले तो आनंदानें ॥ चाल ॥ पुष्पांजुलि ती अर्पण केली धूळचि वाहूनी ॥ रायासमतें पूजन करूनी आणी शिव ध्यानीं ॥ १ ॥

## श्लोक.

इंद्रवज्रा.

माता करूनी स्वयपाक पाही ॥ बाहेर येऊनि मुलास बाही ॥
ये बा करी सत्वर भोजनाला ॥ नाहींच तो कीं परि शीघ्र आला ॥ १ ॥

## कामदा

( या चालीवर. )

क्रोध तो तिला फार येउनी ॥ सर्व ती पुजा टाकि मोडुनी ॥
दगड सर्वही फेकुनी दिले ॥ धरुनि हस्त तो त्यास ओढिलें ॥ १ ॥
बाळ पाहि तों नेत्र उघडुनी ॥ शिवपुजा दिसे गोलि मंगुनी ॥
गौरिशंकरा काय हें तरी ॥ घेत बडवुनी आपुल्या उरी ॥ २ ॥
पडत भूमिसी ग्लानि येउन ॥ ह्मणतसे मुखीं प्राण देइन ॥
श्रीमुखांत ती त्यास देउन ॥ जनाने जाउनी करित भोजन ॥ ३ ॥
जीर्ण वस्त्र तें घेउनी करीं ॥ तृणगृहींच ती शयन हो करी ॥
नाम तें मुखीं घेउनी रडे ॥ बाळ धरणिला वरिवरी पडे ॥ ४ ॥

## पद

( दो दिवसाची तनु ही साची, ) या चालीवर.

उमारमण तो तोष पावला भक्ती त्याची पाहोनी ॥
तृणगृहाचें मंदिर झालें स्तंभ मढविलें रत्नांनीं ॥
चारी द्वारें रत्नखचित ती दिव्य लिंग तें त्या स्थानीं ॥
लिंगाची ती प्रभा पाहुनी चंद्राहे जाई लाजूनी ॥ १ ॥
दिव्य शिखर तें तया मंदिरा वाटें गेलें हो गगनीं ॥
राजोपच्यार पूजन करण्या सर्व तयारी पाहूनी ॥ २ ॥
ब्रह्मानंदें नाचुं लागला यथा सांग त्या पूजूनी ॥
नामावलि तो गाउं लागला कीर्तन रंगीं नाचूनी ॥ ३ ॥
ह्मणे बालका प्रसन्न तूंते इच्छित घेई मागोनी ॥ ४ ॥

## अंजनीगीत

मम मातेनें पुजा भंगिली ॥ अन्याय तो बा पोटीं घालीं ॥
हेंच मागणें पाया जवळी ॥ बालक तो बोले ॥ १ ॥

## दिंडी.

आणिन मातेला तुझे दर्शनाला ॥ वदुनि ऐसें तो गृहांतरीं गेला ॥
रत्नखचित तें जाहलें सदन पाही ॥ दिव्य मंचाकें माताहि निजुन राही ॥ १ ॥

रूप पूर्वींचें सर्व लया गेलें ॥ पद्मिणीचें तें रूप प्राप्त झालें ॥
अलंकारें भूषीत तनू झाली ॥ बालकानें जाऊन जागि केली ॥ २ ॥
शंभुदर्शन घ्यावया शीघ्र चाले ॥ जननि पाही तों नवल दृष्टि आलें ॥
हृदायें धरिलें दृढ तिनें बालकाला ॥ ह्मणे बाळा चल जाउं दर्शनाला ॥ ३ ॥
ह्मणे माता धन्य तूं शिव दयाळा ॥ धन्य बाळक हा तुझा भक्त झाला ॥
गेलि सांगाया धांवुनी नृपाला ॥ राव धांवे भेटण्या बाळकाला ॥ ४ ॥
शंकराची अद्भूत करणि ही हो ॥ फार आश्चर्यचि होय नृपालाहो ॥
पौरजन ते पाहण्या धांव घेती ॥ कीर्ति ऐकुनि दूरचे लोक येती ॥ ५ ॥

## साकी.

उमारमण हा प्रसन्न तूंते धन्य तुझी वा भक्ती ॥
दुष्ट बुद्धि ती लयास गेली नाहीं युद्धा शक्ती ॥
बा चंद्रसेना ॥ आह्मी भेटिस यावेना ? ॥ १ ॥
निरोप ऐकुनि राव निघाला प्रधान घेउनि संगें ॥
सकळ नृपाला भेटुनि त्यासीं मिरवित आणी वेगें ॥
अवंति नगरी ती ॥ पाहुनि चकिताचि ते होती ॥ २ ॥
सप्तपुरिंमधें श्रेष्ट उज्जनी रचना दिव्यचि होती ॥
वंदुनि बाळा सदना पुढती लोटांगण ते घेती ॥
शंभू प्रसन्न जरी ॥ काय एक नच होय तरी ॥ ३ ॥
पर्णकुटी ती सुवर्ण होई शत्रू मित्राचि होती ॥
अजिरी तरु ते कल्पवृक्षची होउन इच्छित देती ॥
मूकहि पंडित तो ॥ पंगू तो गिरिवरी चढतो ॥ ४ ॥
जन्मांधहि तो रत्न पारखी मूकहि वक्ता होई ॥
रंकालाही भाग्य येउनी राज्यपदीं तो जाई ॥
सायास न करितां ॥ चिंतामणि तो ये हातां ॥ ५ ॥
वेदाचाही सार सापडे अध्ययन तें नच करितां ॥
उमारमण तो भेटे जेव्हां सकळ कला ये हातां ॥
सारे त्या नमिती ॥ त्रिभुवनें कीर्ती ती जाती ॥ ६ ॥

गोवाहन तो प्रसन्न झाला गोरसबाळा तुजला ॥
गोविप्रातें स्नेहें पाळी धन्याचि होशिल बाळा ॥
गोपति ते ह्मणती ॥ वरिवरि बाळाते नमिती ॥ ७ ॥

## अभंग

राघव चरणीं सदां असे लीन ॥ मुखीं करी स्मरण सदोदीत ॥
उर्मिळाजीवन पडे धरणीला ॥ आणी द्रोणाचला जाऊनीया ॥
सीताशुद्धी साठीं उदधी लंघीला ॥ शोध तो लावीला लंकेमधें ॥
ऐसा वायूसूत तेथें प्रगटला ॥ लागती चरणाला क्षोणीपाळ ॥ १ ॥

## अभंग.

साक्षांत् रुद्राचा अवतार पाही ॥ उपदेश देई बाळकाला ॥
शिवपंचाक्षरी मंत्र उपदेशी ॥ सांगे मग त्यासी सर्व विधी ॥
मस्तकीं तयाच्या ठेवित तो हस्त ॥ झाला विद्यावंत बालक तो ॥
बाळकाचें नाम ठेवी तो श्रीकर ॥ पुष्पें सुरवर वर्षतातीं ॥ १ ॥
आठवे पिढीं तुझ्या नंद तो जन्मेल ॥ त्याचा पुत्र होईल शेषशायी ॥
जन्मुनीया तेथें मारिल कंसाला ॥ रक्षी पांडवाला गोविंद तो ॥
माणि माळेचें तें परतून येती ॥ अवताराची स्थिती तैशी आहे ॥
बोलुनीया ऐसें हरिकुलभूषण ॥ पावे अंतर्धान तेथेंची हो ॥ २ ॥

## अंजनीगीत.

रामदूत हा गुरू तुझारे ॥ धन्य धन्य तें भाग्य तुझेंरे ॥
काय तुला वा न्यून तरीरे ॥ तूंचि जगीं धन्य ॥ १ ॥

## दिंडी

चंद्रसेनानें सकळ भूभुजाला ॥ वस्त्र अर्पुनि देत तो निरोपाला ॥
श्रीकरासह मग करी प्रदोषाते ॥ नित्य भक्तीनें गायि शिवकथेते ॥ १ ॥
शिवव्रताचा उत्साह करिति नित्य ॥ अंतीं जाती शिवपदा तरी सत्य ॥
श्रीकरासह मग राव उद्धरूनी ॥ अंतीं जाती ते शिवपदा मिळूनी ॥ २ ॥

नित्य जरि हें वाचाल भक्तियुक्त ॥ काळ कैचा न्यायास तुह्मा शक्त ॥
नित्य तुह्मा रक्षील शूलपाणी ॥ ह्मणुाने आणाहो तुह्मी तया ध्यानीं ॥ ३ ॥

## पद

( जाउं नकारे विषया, ) या चालीवर.

सदां सर्वदां शिवार्चनींही रतलें मन ज्याचें ॥
संतति संपत्ति आयुष्यवर्धन होय तरी त्याचें ॥ धृ० ॥
शिवलीलामृत वासरमणि हा पाहुनि सज्जन ते ॥
कमलासमते विकसित होती पाहुनि तेजाते ॥
जिव शिव दोन्ही चक्रवाकची एकचि होती ते ॥
निंदक दुर्जन दिवाभितासम जाती नरकीं ते ॥
विष्णु निंदका कुंभीं पाकीं घालिति नेउनि ते ॥
हरिहर निंदा सोडुनि देउन करा स्मरण त्याचें ॥
नाम फुकाचें मुखीं घ्यावया काय तरी वेंचें ॥ १ ॥

## अंजनीगीत

ब्रह्मानंदा उमाविलासा ॥ भव भय हरणा गिरी निवासा ॥
देउनि सन्मति मज अविनाशा ॥ लीला वदवि पुढें ॥ १ ॥

## पद.

( वद नामचि तें सार ) या चालीवर.

शिवनामाचि आराम ॥ मनुजा ॥ धृ० ॥ निशिदिनीं स्मरतां त्यासिरे मनुजा ॥ दाविल तो निज धाम ॥ मनुजा ॥ १ ॥ अमोल आयू जाइल निघुनी ॥ करतां तें गृह काम ॥ मनुजा ॥ २ ॥ शंभु कृपाघन दाविल निजपद ॥ घेतां निसाचि नाम ॥ मनुजा ॥ ३ ॥

NATIVE GENERAL LIBRARY, KHED (POONA)
सार्वजनिक वाचनालय खेड, ( पुणें. )

# अध्याय ५ वा.

## श्लोक

( पृथ्वीवृत्त. )

उमापति नगाधिशा स्मर हरा प्रभो ईश्वरा ॥
पिनाकि प्रमथाधिपा गिरिशस्थाणु शंभू हरा ॥
त्रिलोचन महेश्वरा शिवगणाधिपा शंकरा ॥
शिवा शशिधरा तुझा शरण मी मला उद्धरा ॥ १ ॥

## साकी

सदाशिव अशी चार अक्षरें नित्य पठण जो करितो ॥
शिवार्चन जो करी नित्य तो बहुत जिवा उद्धरितो ॥
प्रायश्चित्तचि तें ॥ सकळ दोष लया नेतें ॥ १ ॥
प्रदोष व्रत तें अचरण करितां सकळ सिद्धिही होते ॥
तुष्टि पुष्टि ती अयुष्य वर्धन संपत्तीही येतें ॥
षण्मासा अंतीं ॥ मरुव्द्यथा सकळाहि जाती ॥ २ ॥
वर्षा अंतीं ज्ञान होतसें द्वादश वर्षा भाग्य ॥
व्यास वचन हें असत्य मानिल बंधनास तो योग्य ॥
त्याचा गुरु लाटेका ॥ कैचें ज्ञान त्या दांभिका ॥ ३ ॥
प्रदोष व्रत हें मृत्यु टाळुनी गंडांतरही निरसी ॥
भक्ती भावें पाळुनि व्रत हें अनुभव कां नच घेसी ॥
इतिहासाचे ऐका ॥ सांगे सूत जो शौनका ॥ ४ ॥
विदर्भ देशीं भूप सत्यरथ तेजःपुंजाचि होता ॥
शौर्या पाहुनि वंदी जनते थकले कीर्ती गातां ॥
परि शिव भजनीं ॥ नव्हता रत तो एक दिनीं ॥ ५ ॥
शाल्व देशिच्या राजाला ते अगणित राजे मिळती ॥
एक होउनी सत्यरथासी युद्ध कराया येती ॥
सप्त दिवस लढले ॥ अद्भुत युद्धचि तें झालें ॥ १ ॥

## आर्या

हा एक ते बहूतचि, ळढला परि ये प्रसंग तो कठिण ॥
होउनि हतवीर्य तरी, धारातीर्थीच पावला मरण ॥ १ ॥
नृप पत्नि गरोदर ती, झाले नवमास पूर्ण ते पाही ॥
शत्रू आतां धरतिल, ह्मणुनि वनीं पळत गोलि हो पायीं ॥ २ ॥
सुकुमार फार होती, कंटक रुततीच ते तिचे चरणीं ॥
दुःसह होउनि ती हो, मूर्च्छा येऊनि पडतसे धरणीं ॥ ३ ॥
रिपु मागे येतिल या, भीतीनें पळतसेच वरवर ती ॥
तेंव्हां मज भासे कीं, ही विद्युल्लताच भूवरी फिरती ॥ ४ ॥
वस्त्राभरणे मंडित, हिऱ्या समचि दंत झळकती वदनीं ॥
रतिपति लज्जित होई, पाहुनि मुखेंदु तो तिचा नयनीं ॥ ५ ॥
कर्म गति पहा बुधहो, नृपपत्नि गरोदर हिंडते विपिन ॥
जीच्या अंगुष्टि कधीं, नच पडलें उष्णरश्मिचें किरण ॥ ६ ॥
वनिं हिंडे भासें मज, नैषध पत्नीच काय दमयंती ॥
कीं भिल्लिरुपें हिंडे, पतिच्या शोधार्थ काय हैमवती ॥ ७ ॥
एका वृक्षाखालीं, व्याकुळ होऊनि ती पडे धरणीं ॥
कर्मनदी माधें पडली, त्यांतुनि वर काढण्या नसे कोणी ॥ ८ ॥
शत संख्य दास दासी, सदैव असती जिच्याचि सेवेला ॥
तीही इंदुमती हो, भूवरिं लोळूनि सोसि दुःखाला ॥ ९ ॥
तत्क्षणिं प्रसूत होउनि, दिव्य पुत्र पोटिं तो तिच्या झाला ॥
झाली तृषार्त परि हो, कोणि नसे जवळ उदक देण्याला ॥ १० ॥
टाकुनि बाळास तिथें, उदक शोधार्थ दूर ती गेली ॥
शिरली एक सरोवरिं, तों ग्राहें ओढुनी तिला नेली ॥ ११ ॥

## कामदा.

( या चालीवर. )

बाळ तें रडे एकलें वनीं ॥ पातली तिथें एक कामिनी ॥
नाम तें उमा विप्रपत्नि ती ॥ विगतधव अशी पातलीच ती ॥ १ ॥

जनक जननि ना बंधु ना तिला ॥ फक्त एकची पुत्र हो जिला ॥
घेउनी कडे मार्गे चालली ॥ बाळ पाहुनी त्वरित धांवली ॥ २ ॥

## दिंडी

नाहीं केलें हो नाल छेदनाला ॥ कोणि त्यजिलें हो वनीं बाळकाला ॥
कोण याती धर्म हा कोण याते ॥ नेउं किंवा टाकुं या बाळकातें ॥ १ ॥
जाउं कैसे टाकुनी बाळकाला ॥ वृक व्याघ्रादिक भक्षितील याला ॥
स्तनीं पान्हा दाटुनी फार येई ॥ अश्रु ढाळुनि बाळ तें पुढें घेई ॥ २ ॥
यति रुपानें शंभु तो तिथें येई ॥ ह्मणे बाई बाळ हा घरीं नेई ॥
महद्भाग्यचि तें तुझें पदरिं होतें ॥ ह्मणुनि क्षत्रिय पुत्र हा प्राप्त तूं ते ॥ ३ ॥
भणंगासी परिसची प्राप्त जैसा ॥ सुधा बिंदू तो मृता मुखीं जैसा ॥
बाळ तैसा प्राप्त हा तुला झाला ॥ असें बोलुनि त्रिपुरारि गुप्त झाला ॥ ४ ॥
शुचिव्रत हें नाम त्या ब्रह्म पुत्रा ॥ धर्मगुप्तचि ठेविलें राज पुत्रा ॥
कडीं खांदीं घेउनी भीक मागे ॥ कोणि पुसतां मत्सुताचि असें सांगें ॥ ५ ॥

## साकी

ऐसें हिंडत हिंडत गेली एकचक्र नगरीला ॥
नगरीं मध्यें हिंडत असतां पाही शिव सदनाला ॥
तेथें द्विज होते ॥ शांडिल्य पुजि शंकरातें ॥ १ ॥
शिवालयीं ती उमा जाउनी शिव पूजा ती पाही ॥
पूजा पाहुनि तन्मय होई हर्ष मायिना देहीं ॥
पाहुनि पुत्राला ॥ काय ऋषी वदतां झाला ॥ २ ॥
राजकुळीं हा जन्म पावुनी रंका परि कीं भासे ॥
दीन होउनी हिंडत आहे पहा कर्म हें कैसें ॥
ऐकुनि त्या वचना ॥ लागे उमा ऋषी चरणा ॥ ३ ॥
भूत भविष्यचि ज्ञान तुह्माला याची माता कोण ॥
पिता कोणहो ? आहे किंवा पावलाचि तो निधन ॥
सांगा तें मजला ॥ ह्मणुनि प्रार्थितसें ऋषिला ॥ ४ ॥

## पद.

( शंकित कां होसि ) या चालीवर.

ऐके तूं आतां ।। बाइगे ।। धृ०।। सत्यरथ नामें जनकचि याचा पूर्वी तो नृप होता ।। प्रदोष समयीं स्नान करूनी पूजी त्या गुह ताता ।। शत्रूनें तें नगर वेढिलें आली ऐशी वार्ता ।। प्रधान पुढती धांवुन गेला झाला तो त्या हंता ।। नृपा जवळि तो शत्रु आणला जाहल्या शिर छेदितां ।। मत्त होऊनी भोजन करि तो पूजा परि नच करितां ।। त्या दोषानें अल्प वयामधिं गेला सोडुनि जगतां ।। शिव पूजन तें नच सोडावें अंतीं तुह्मा तो त्राता ।। १ ।।

## अंजनीगीत.

मातेनें ती सवत मारिली ।। जळीं सवत ती विशी जाहली ।।
पूर्व वैरें ओढुनी नेली ।। भक्षी ती तिजला ।। १ ।।
धर्म गुप्त हा यानें कधिंही ।। शिव व्रताते केलें नाहीं ।।
जनक जननी रहितची पाही ।। होउनि तो पडला ।। २ ।।
उमा बोलली तेव्हां ऋषिला ।। मम सुत कांहो निर्धन झाला ।।
काय पाप तें सांगा मजला ।। ह्मणुनि विनवितसे ।। ३ ।।
पूर्व जान्मिया तुझ्या सुतानें ।। अमित घेतलीं दुष्टचि दानें ।।
स्त्रिया भोगिल्या फाराचि यानें ।। न पूजि शंकरा ।। ४ ।।
परान्नें तरी जिव्हा दग्धची ।। दुष्ट दान तें जाळी हस्तची ।।
मंत्रासी मग शक्ती कैंची ।। ब्रह्मपण व्यर्थ तें ।। १ ।।
याच कारणें तुझ्या सुताला ।। द्रव्य नसें गे कांहीं याला ।।
ह्मणुनि कदाहि शिव पुजनाला ।। नच सोडावें ।। ५ ।।
उमा मग ती बाळक दोन्ही ।। नेउनि घाली ऋषिचे चरणीं ।।
पंचाक्षर मंत्र उपदेशूनी ।। प्रदोष व्रत सांगे ।। ६ ।।

## पद

(संग घडो मज दंग असो ) या चालीवर.

प्रदोषकाळीं इंदू मौळी बसवुनि अंबा नृत्य करी तो ।। ध्रु० ।।
वाग्देवी ती विणा वाजवी वेणू पुरुहुत वाजवि तरी तो ।।

भार्गवि गायी मधुर स्वरानें अंबुज संभव ताल धरी तो ॥
नृत्य गती ती पाहुनि नयनीं मृदंग वाजवि जनार्दन तो ॥
प्राणमित्र जो कुबेर तोही हस्त जोडुनी उभा राहतो ॥
प्रदोषकाळिचा ऐसा महिमा निगमागमाहि अगोचर तो ॥ १ ॥

## पद

(ऐकुनि तव मधुरगान ) या चालीवर.

पक्षशनी प्रदोष असे दोन हो तरी ॥ ध्रु०॥
त्रयोदशीं दिनीं तरी व्रतचि आचरी ॥
निराहार असुनि दिनीं सुकर्म तें करी ॥
तीन घडी रजनि तरी जाहल्यावरी ॥
करि आरंभ पूजनास भक्ति अंतरीं ॥ १ ॥

## पद

( घेउनि मुशाफर वेश, ) या चालीवर.

गोमय घेउनि भूमि सारवी मंडप उभवी वरी ॥ धृ०॥
कर्दळि स्तंभहि इक्षुदंड ते आणुनि लावी वरी ॥
रंगित माळा वरी सोडुनी शोभवि नानापरीं ॥
शुभ्रवस्त्र तें आपण नेसुनि भस्म चर्चि तें शिरीं ॥
लिंग स्थापना मधें करूनी पूजन मग तें करी ॥
प्राणायामहि करुनि मागुती न्यासमातृका तरी ॥
दक्षिण भागीं स्थापि पुरांतक अग्नी सव्या वरी ॥
वीरभद्रतो गजाननही अष्टसिद्धि त्या तरी ॥
अष्ट भैरव अष्टदिक्पालही स्थापी मग झडकरी ॥ चाल ॥
सप्तावरणी ती शिवपूजा मग करी ॥
राजोपच्यार ते अर्पी लिंगावरी ॥
करि ध्यान शिवाचें भक्तीनें अंतरीं ॥ चाल ॥
जय जय गौरीनाथ निर्मळा पूर्ण ब्रह्म तूं तरी ॥
सच्चिदानंदा जगद्गुरू तूं कृपा दिनावर करी ॥ गोमय ॥ १ ॥

## साकी

शिव पूजा ती घेउं नये बा नच घ्यावें त्या तीर्था ॥
प्रसाद घेतां ब्रह्म वधाचें पापचि येई माथा ॥
महत्पापचि तें ॥ शिव पुजा भंगितां होतें ॥ १ ॥
प्रदोष महिमा सांगुनि ऐसा उपदेशी मग त्यांना ॥
उमे सहित ते राहुनि तेथें पूजिति गिरिजा रमणा ॥
गुरुनें जें कथिलें ॥ तसेंच पूजन तें केलें ॥ २ ॥
चार मास ते प्रदोष व्रत हें प्रेमें अचरण करिती ॥
कुदीन सारे लया जाउनी सुदीन तरि ते येती ॥
व्रत महिमा तोही ॥ त्वरित फळ देतसे पाही ॥ ३ ॥
शुचिव्रत् नामें ब्रह्म पुत्र जो एक दिनीं तो गेला ॥
नदिचे तीरीं खेळायाला तेथें लाभचि झाला ॥
दरडी ढासळतां ॥ द्रव्यघट होय सांपडतां ॥ ४ ॥
गृहासि आला घेउनि घट तो माता पाहुनि बोले ॥
प्रदोष व्रताचा महिमा हा कीं ऐश्वर्यचि तें चढलें ॥
धर्मगुप्त तूं ही ॥ अर्ध भाग घे या समयीं ॥ ५ ॥
नच घेई मी विभाग बंधो धन जें सारें आहे ॥
अवनीमध्यें माझे तरि ते विचार करुनी पाहे ॥
शिव ध्यानाचि करिती ॥ नामावळि ते मुखिं गाती ॥ ६ ॥
बन विहार तो करण्यासाठीं एकवार ते गेले ॥
गायक कन्या येउनि तेथें सख्यासहित ती खेळे ॥
पाहुनि ती नयनीं ॥ धर्म गुप्त गेला भुलुनी ॥ ७ ॥

## पद.

( हरिण किशोर चंचल, ) या चालीवर.

परदारा ती नयनिं न पाही ॥ दर्शन घेतां भ्रांती देही ॥ धृ० ॥ करितां स्पर्शचि बल तें जाई ॥ नरक साधना मार्गचि होई ॥ विचार करुनी तिकडे पाही ॥ पर० ॥ १ ॥

NATIVE GENERAL LIBRARY, KHED. (POONA)
सार्वजनिक वाचनालय खेड, (पुणें)

## दिंडी

ब्रह्म सुताते ठेवुनी पुढें चाले ॥ स्वरुप सुंदर पाहुनी मनीं डोले ॥
पुढें होउनि प्रश्न तो तिला केला ॥ धन्य वंशाचि तव जन्म ज्यांत झाला ॥ १ ॥
राजपुत्रा विनत्रानें दासि बोले ॥ अंशुमाति हें नामची ठेवियेलें ॥
कोद्रविण तो गंधर्व पती पाहीं ॥ त्याचि कन्या जाहली सुंदरी ही ॥ २ ॥

## साकी

तव मुख कमला नेत्र मिलिंदाचें रुंजी घालिति पाही ॥
तव वचनांबू प्राशन करण्या कर्णाचि चातक हेही ॥
तो जागीं धन्य खरा ॥ जो वारे ह्या स्वरुप सुंदरा ॥ १ ॥
गंधर्व पती पुसूं लागला जाउनि कैलासाला ॥
अंशुमती ही माझी कन्या अर्पू मी कवणाला ॥
महेश मग बोले ॥ ऐका काय तरी कथिलें ॥ २ ॥
सत्यरथाचा सुपुत्र माझा परम भक्तची पाही ॥
धर्मगुप्त तो अंशुमती ही त्याला नेउनिं वाही ॥
वचन आठवुनि हें ॥ अंशुमती दुरुनचिं पाहे ॥ ३ ॥

## पद

( कारे इतुकी बळजोरी, ) या चालीवर.

भासे मदनचि हा बाई ॥ अस्थिर मन होई ॥ धृ०॥
स्वर्गीतिल हा चंद्राचे आला कलंक धुवोनि काई ॥
बत्तिस लक्षणि अजानुबाहू चाप शर करिं घेई ॥
वक्षस्थळ तें विशाळ बाई कारिनायक तो पाही ॥
सखये आतां दुज्यावनाला पुष्पें आणण्या जाई ॥ भासे० ॥ १ ॥

## साकी.

अवश्य ह्मणुनी ललना गेल्या दुजा वनाला जेव्हां ॥
राजसुताला अंशुमती ती खुणावितसे तेव्हां ॥
भुरुह पल्लवाला ॥ पसरुन करी आसनाला ॥ १ ॥

## पद.

( गड्यानो घ्या हरिच्या नामा ) या चालीवर.

बैसला आसानें तो पाही ॥ अंशुमती मस्तक पदिं वाही ॥ धृ०॥
सुहास्य वदन तुझें हें फार ॥ आरक्त ओष्ट सुकुमार ॥
मूर्ति पाहुनि झाले गार ॥ ठेविला तव चरणीं भार ॥
तुजविण कोणि मला नाहीं ॥ अंशुमती मस्तक० ॥ १ ॥
मानससर हा तूं तरि मला ॥ राजहंसी सेविन तुजला ॥
देखुनिया तव मुख कमला ॥ नेत्रमिलिंद तेथें जडला ॥
छळितो मदन ह्या मम देहीं ॥ अंशुमती मस्तक० ॥ २ ॥
काढुनि कंठांतिल ती माळ ॥ घाली नृप कंठीं तात्काळ ॥
ललना झाले मी भूपाळ ॥ ध्या पदरीं करा प्रतिपाळ ॥
इच्छा पूर्ण करावी ही ॥ अंशुमती मस्तक० ॥ ३ ॥

## पद.

( गजानना दे दर्शन सत्वर, ) या चालीवर.

धर्मगुप्त तो तेव्हां बोले ॥ जनक जननि मम स्वर्गी गेलें ॥
राजभ्रष्ट मी दरिद्र आलें ॥ केविं घडे नकळे गे ॥ १ ॥
अंशुमती ती तया बोलली ॥ तिसरे दिवशीं परतुनि या स्थळीं ॥
लग्न सिद्धि ती साधा वेळीं ॥ विसर न व्हावा हो ॥ २ ॥
पित्याला ती सांगे सुंदर ॥ ऐकुनि होई हर्षित सत्वर ॥
ह्मणे पावला मज तो शंकर ॥ इच्छा पूर्ण हो ॥ ३ ॥

## कामदा.

( या चालीवर. )

राजपुत्र तो परत येउनी ॥ आग्रजासि तें सर्व सांगुनी ॥
गुरुकृपा ह्मणे फळत चालली ॥ उदयकाळिची वेळ रे आली ॥ १ ॥
तीन दीन ते जाहल्यावरी ॥ जाति सर्वही त्या वनांतरीं ॥
कोद्रवीण तो तेथं पातला ॥ पाहुनी तया तोष जाहला ॥ २ ॥
धाडि छत्र सेना सुखासना ॥ त्वरित आणवी विप्र अंगना ॥
चार दीन तें लग्न जाहलें ॥ कांहिं न्यून हो नाहिं देखिलें ॥ ३ ॥

## पद.

( देव स्त्री मेनका ) या चालीवर.

स्वर्गीच्या त्या अमोल वस्तू विहिणिस देई तो ॥ धृ०॥
लक्ष रथ दश सहस्र गजही वाजीसह देतो ॥
अक्षय भाते दास दासिही अक्षय कोशाचि तो ॥
दिव्य चापही अपार सेना शक्ती वरी देतो ॥
बलिष्ट सेनापति ही दिधला त्याच्या संगें तो ॥
मत्कन्याही सांभाळावी सांगुनि जाई तो ॥ १ ॥

## साकी.

सुखासनीं ती अंशुमती ही पतिसह बैसे जेव्हां ॥
सुवर्ण दंड ते घेउनि सेवक पुढें धांवती तेव्हां ॥
वाद्यें वाजविती ॥ सेवक जयघोषाचि करिती ॥ १ ॥
विदर्भ नगरा वेढा दिधला जाउनि गंधर्वांनीं ॥
सत्यरथाला ज्यानें वधिलें दमला फाराचि लढुनी ॥
परि तो नच टिकला ॥ शेंवटि जो शरणाचि आला ॥ २ ॥
दुर्मर्षण तो जिताचि धरुनी आणाति राया पुढती ॥
सत्यरथाला यानें वधिलें सूडाचि घ्यावा ह्मणती ॥
धर्मगुप्त वदला ॥ शरणागत योग्य अभयाला ॥ ३ ॥
सुदीन पाहुनि धर्मगुप्त तो राज्यासनिं मग बैसे ॥
शांडिल्य गुरुची पूजा करुनी शत पद्में अर्पितसे ॥
दुर्भिक्ष तें पाही ॥ राज्यांत कोठें मग नाहीं ॥ ४ ॥
देश देशिचे नृपती येती घेउनि करभाराते ॥
उचितादर तो त्यांचा करुनी अर्पी वस्त्रें त्याते ॥
याचक सारे ते ॥ देती आशिर्वाद त्याते ॥ ५ ॥
यौवराज्य तें शुचिव्रताला देउनि राज्याचि केलें ॥
अंशुमतीसह पाहुनि त्याला जन आनंदित झाले ॥
दुःखित कोणि नसे ॥ आनंदित जन सर्व दिसे ॥ ६ ॥

दहासहस्त्राचि वर्षे केलें राज्य सुखानें पाही ॥
सुदत्त पुत्रा राज्य देउनी शिव पद सेवित राही ॥
विमान तों आलें ॥ शिवपदिं सर्वचि ते गेले ॥ ७ ॥

## अंजनीगीत.

दिव्य देह तो त्यांना येई ॥ शिव नामातें ध्याती ह्रदयीं ॥
लोटांगण ते घालति पायीं ॥ पतित पावनाच्या ॥ १ ॥

## पद.

(भला जन्म हा,) या चालीवर

धर्मगुप्ताचें आख्यानातें नित्यचि जे वाचिती ॥ त्या रक्षिल तो जगत्पती ॥धृ०॥ सकल पापही नाश पावुनी विजयी तो दिसतसे ॥ धनधान्या वृद्धी ही होतसे ॥ प्रदोष महिमा अद्भुत मोठा प्रेमें जो आचरी ॥ मृत्युचें भय मग कोठुनि तरी ॥ शिवलीलामृत ग्रंथ ठेवि जो नित्यचि अपुलें घरीं ॥ शिवपद प्राप्तच होइल तरी ॥ चाल ॥ हा ग्रंथचि जाणा आम्रवृक्षापरी ॥ पद रचना त्याचीं फळें समजा अंतरीं ॥ कुतर्क वादि ते जाणा वायस तरी ॥ चाल ॥ आम्रफळतें तया नावडे विष्टा ते भक्षिती ॥ तयाला कशी मिळावी गती ॥ १ ॥

## अंजनीगीत.

श्रीमद्भिमातटीं राहुनी ॥ भक्त रक्षणा जासि धांवुनी ॥
मंदमती मी बुद्धी देउनी ॥ लीला वदवी पुढें ॥ १ ॥

## पद.

( तें मन निष्टुर कां केलें ) या चालीवर.

निज पद सत्वर मज दावी ॥ भव भय सारें जें पळवी ॥ धृ०॥
चांडाळीला निज पादिं नेलें ॥ ती कृपा मज दावी ॥
व्याधासम मी पातकि आहे ॥ कृपा मनीं ठेवी ॥
रात्रंदिन हा दास विनवितो ॥ कृपा न कां यावी ॥
चरण रजाचा दास तुझा मी ॥ आतां कृपा व्हावी ॥ निज० ॥ १ ॥

# अध्याय ६ वा.

## श्लोक.

कृपा करि दिना वरी शरण मी तुला ईश्वरा ॥
सदां करितसें तुझें स्मरण मी शिवा शंकरा ॥
नयेत श्रवणीं कसें अजुन तें तुझ्या हे हरा ॥
दया करुनि बा मनीं झडकरी मला उद्धरा ॥ १ ॥

## पद.

(भला जन्म हा तुला,) या चालीवर.

जय जय मदनांतक मनमोहन मद मत्सर दहना ॥ हे भवभयपाश निकृं-तना ॥ धृ० ॥ भवानिरंजन भवहारक तूं मस्तकिं गंगाधरा ॥ कर्पुरगौर हे त्रिपुर हरा ॥ नीलग्रीवा सुहास्य वदना नंदीवहनेश्वरा ॥ असमी अमित भक्त प्रियकरा ॥ दानवदमना दयानिधे बा त्रिताप दूर करी ॥ सदोदित आहे लीन तरी ॥ चाल ॥ नित्य शांत असमी गुण वदवेना तरी ॥ दशशत-वक्र तो चकित हो अंतरीं ॥ एकवार घ्याहो नाम नको दिन भरी ॥ चाल ॥ जें जें इच्छित असेल मानसिं पुरविल तो कामना ॥ जरि भजाल नित्याचे त्रिलोचना ॥ १ ॥

## साकी.

सोमवार शिवरात्र प्रदोषहि आचरती जे प्राणी ॥
अंतीं ते हो शिवपदिं मिळती पाळा प्रेमें करुनी ॥
कोण असा तरला ॥ सांगे सुत शौनकाला ॥ १ ॥
जैसे पूर्वी नल हरिश्चंद्र तैसा आर्यावर्तीं ॥
चित्रवर्म या नामें करुनी होता प्रतापि नृपती ॥
प्रजा जना वरती ॥ पुत्रवत करितसे प्रीती ॥ १ ॥
दुष्ट दुर्जना काळा सम तो प्रयत्नें भगीरथ जैसा ॥
वायुसुता सम शक्ती अंगीं समरीं भार्गव परिसा ॥
कर्णासम दाता ॥ थकले याचक धन नेतां ॥ ३ ॥

हरि हर भजनीं सदां सर्वदां होता तत्पर फार ॥
बहुत पुत्रही तया जाहले पितया सम जे शूर ॥
नवसचि बहु करितां ॥ झाली त्यास एक दुहिता ॥ ४ ॥

## पद

( श्रीहरिच्या वेणु नादें ) या चालीवर.

स्वरुपाची खाण होती किति वर्णू मी तरी ॥ मुखकमला पाहुनीया शशि लाजे अंतरीं ॥ स्वर्गीचें तेज वाटे आलें या भूवरीं ॥ सुरगणही भुलुन जाती पाहुनि ती सुंदरी ॥ १ ॥

## दिंडी.

आलि जन्मासी सुंदरीहि जेव्हां ॥ जातकाते वर्णिती विप्र तेव्हां ॥
दहा सहस्त्र वर्षेचि कामिनी ही ॥ करी तनयाही तुझी राज्य पाही ॥ १ ॥
बोल ऐकुनि रायास तोष झाला ॥ धनें वसनें दीधलीं त्या द्विजाला ॥
सिमंतिनि हें ठेविलें तिचें नाम ॥ तिचे रूपा पाहुनी भुले काम ॥ २ ॥
जेंवि विषबिंदू पडे अमृतांत ॥ तेवि वदला विप्र तो अकस्मात ॥
वार्षे चवदा वैधव्य ईस येई ॥ राव ऐकुनि उद्विग्न फार होई ॥ ३ ॥
गमें पडलें वज्रची काय देहीं ॥ कींहि कडकडली वीज शिरीं पाही ॥
वदे मागुति विप्र तो तरी काई ॥ शिव दयेनें सौभाग्य वृद्धि होई ॥ ४ ॥
असें बोलुनि विप्र तो गृहीं गेला ॥ जडलि चिंता रायास तये वेळां ॥
हळू हळुं ती वाढली राजबाळी ॥ झालि उपवर कन्यका तये वेळीं ॥ ५ ॥

## पद.

( ठुंबरी )

परिसुनी गान तियेचें ॥ कोकिळ धरि हो मौनचि वाचें ॥ धृ०॥
सुवास अंगीं पाहुनि धांवती ॥ कस्तुरि मृग ते रानचि घेती ॥
तिजवर जडले पंचप्राण पित्याचे ॥ परिसुनी ॥ १ ॥

## पद.

( पिवळि पैठणी ) या चालीवर.

वदन तियेचें नयनीं पाहुनि रति पति तो लाजतो ॥ देखुनि कटी, हरी वनीं धांवतो ॥ धृ०॥ गमन देखुनी मराळ लपती जाउनि त्या मानसीं ॥ गजगती चाले क्षणभर अशी ॥ कुरळ केश ते पाहुनि नयनीं रुंजि घालिती वरी ॥ भ्रमर पंक्ति त्या, वर वर तरी ॥ नयनींचें तें पाणी पाहुनि हरिण मनीं लाजती जाउन वनीं लपुन बैसती ॥ वेणीची ती आकृति पाहुनि भुजंग विवरांतरीं ॥ जाती होउन खिन्नांतरीं ॥ नासिकाग्र तें शुकास लाजवि अधर तो बिंब-फला ॥ दंत तेज लाजवि डाळिंबिला ॥ चाल ॥ कमंडलू तोही भ्रमला कुच पाहुनी ॥ तनु सुवास जाई दूरचि दश योजनीं ॥ सूर्यप्रभा होई परती मग लाजुनी ॥ चाल ॥ सुंदरिच्या त्या रूपा पाहुनि भुलतसे सुरगण तो ॥ किति ह्मणावा धन्य तरी विधि तो ॥ १ ॥

## श्लोक.

इंद्रवज्रा.

वैधव्य येई कथिलें ऋषिनें ॥ वृत्तांत ऐके सखिच्या मुखानें ॥
ऐकून होई बहु दीन वाणी ॥ वाही सदां हो नयनींच पाणी ॥ १ ॥
पूर्वीं असें मी अघ काय केलें ॥ वैधव्य दैवीं तरि नेमियेलें ॥
मैत्रेयिच्या जाउनि आश्रमाला ॥ वृत्तांत सारा कळवी तियेला ॥ १ ॥

## पद

( वद जाऊ कुणाला शरण ) या चालीवर.

सांगा तरि मी जाउ कुणाला शरणाचि या समयाला ॥ जो वारिल संकटाला ॥ अहो बाई ॥ जो वारिल ॥ धृ०॥ सौभाग्याचें वर्धन होण्या पूजूं मी कवणा-ला ॥ सांगा तें दासीला ॥ अहो बाई ॥ सांगा तें ॥ १ ॥ मम तात जननी झुरझुरती मनीं पाहुन मम दैवाला ॥ कैसा जन्माचि आला ॥ अहो बाई ॥ कैसा जन्माचि ॥ २ ॥

## कामदा.

( या चालीवर.)

पंच अक्षरी मंत्र तो दिला ॥ सांगि हो क्रिया सर्व तीजला ॥
सोमवार हें व्रतचि तूं धरी ॥ झालिया निशीं पुजन तें करी ॥ १ ॥
दुःख तूजला प्राप्त जाहलें ॥ सोडुं तूं नको व्रतचि आपुलें ॥
काय व्रत असें बोल ठेउनी ॥ उगव्र तूं नको आणुं हो मनीं ॥ २ ॥
ब्राह्मणास तूं घालि भोजना ॥ दंपती करी नित्य पूजना ॥
नाम तें मुखीं नित्य घेइगे ॥ शेवटीं तुला सुखद होइगे ॥ ३ ॥

## साकी.

पृथ्वी सारी शोधुनि तेव्हां नैषध देशीं जाणा ॥
नळ राजाचा इंद्रसेन तो होता तेथें राणा ॥
चित्रांगद त्याला ॥ होता पुत्रचि राजाला ॥ १ ॥
सर्व लक्षणीं मंडित होता लाजवि तो मदनाला ॥
सिमंतिनीला वर येोजियला पाहुनि नक्षत्राला ॥
इकडे सिमंतिनी ॥ आचरि व्रत प्रेमें करुनी ॥ २ ॥

## पद

( लक्ष्मी गर्वें निंदा बोलुनि ) या चालीवर.

आठ दिनीं ती अकरा शतही दंपत्यें पूजी ॥
वस्त्राभरणा अर्पी त्यांना होई लीनचि जी ॥ धृ० ॥
शिव पूजन तें सांग करूनी रात्रीं जागर करी ॥
मणिमय सदनीं पंच सूत्रितें लिंगचि स्थापी तरी ॥
न्यून प्रसंग हि नाहीं आणला भक्ति युक्त अंतरीं ॥
अभिषेकाचि तो नित्य शिवासी पापहि संहारी ॥
शिव पूजन तें राज्याचि देई अनुभव घ्या झडकरी ॥
गंध अक्षता वाहतां होई सौभाग्य वृद्धी तरी ॥
धूप जाळितां सुगंध देहीं दीपवंश विस्तरी ॥

NATIVE GENERAL LIBRARY, KIRKEE (POONA)

कांती देहीं येउनि होते आयुष्य वृद्धी तरी ॥
नैवेद्यानें भाग्य येतसें लक्ष्मी वाढे वरी ॥
तांबुल दानें सिद्धि होतसें पुरुषार्थाचि चारी ॥
वंदन देई आरोग्याचि तें नित्य नमावें तरी ॥
श्रम नासाया सामर्थ्य असें बा प्रदक्षणें माजों ॥ आठ० ॥ १ ॥

## साकी.

जपतां साधे महासिद्धि ती होम हवन तें पाही ॥
कोशाची ती वृद्धि करितसे संशय यांत न कांहीं ॥
किर्तन करितां तो ॥ सांब पुढे उभा राहतो ॥ १ ॥
ध्यानें होतें महा ज्ञान तें श्रवणें व्याधी हरते ॥
नृत्याचे करितां जन्म मरण तें दूराचि होउन जाते ॥
गातां सुस्वर तें ॥ कीर्ती दूरवरी जाते ॥ २ ॥
जय लाभाचि तो नित्य होतसे रत्नें अर्पण करितां ॥
ब्राह्मण भोजन इच्छित देई महिमा नच ये गातां ॥
ऐसें सिमंतिनी ॥ करि पूजन प्रेमें करुनी ॥ ३ ॥

## आर्या

त्यावरि सुदीन पाहुनि, चित्रांगदास सिमंतिनी दिधली ॥
शोभा अपूर्व केली, वर्णन करण्या मती नसे शकली ॥ १ ॥
कुठवर वर्णू तरि मी, होइल उदधी समान तो ग्रंथ ॥
समारंभ तो ऐसा, झाला जो चार दीन पर्यंत ॥ २ ॥
वर दक्षिणा किति दिली, सहस्र अर्बुद असें मनीं जाणा ॥
अगणित रत्नें दिधलीं, गणना त्यांची न होय ती कवणा ॥ ३ ॥
वाजी गज शाळा ही, रत्न खचित यान चित्र शाळा ती ॥
प्रेमें अंदण दिधल्या, रायाच्या तोष माइना चित्तीं ॥ ४ ॥
याचक मुखिं पुरे पुरे, किति न्यावें धन आह्मास जाईना ॥
कंटाळति द्विज नेतां, कुठवर नेतिल गृहांत माईना ॥ ५ ॥

औदार्य हुताशन तो, दरिद्र काननचि टाकि जाळून ॥
धन मेघ वर्षतांचि, दरिद्र धुरोळाच जाइ बैसोन ॥ ६ ॥
नैषध पुरिचे जन ते, सिमंतिनी वदन पाहती जेव्हां ॥
चंद्रकळा चिरुनि जणू, दंत ओतिलेच वाटले तेव्हां ॥ ७ ॥
कलंक काढुनि भरल्या, द्विज संधी काय त्या तरी गमल्या ॥
मुखिंचा श्वास मज गमे, पुष्पाचा तो सुगंध फुललेल्या ॥ ८ ॥

## साकी.

साडे होउनि नैषध देशीं इंद्रसेन तो गेला ॥
सकळ वऱ्हाडी अनुदिनिं गाती वधुच्या सौंदर्याला ॥
अनुपम तेजाचि तें ॥ रूपा न वर्णवें माते ॥ १ ॥
विजया दशमी दिपवाळी ही आली आहे जवळी ॥
जामाताला ठेवुनि जावें प्रार्थी नृप त्या वेळीं ॥
चित्रांगद राही ॥ इंद्रसेन निघुनिच जाई ॥ २ ॥
श्रीरंग आणि लक्ष्मी समची जोडा सकळां गमला ॥
समयोचित बहु करि उपचारा चित्रवर्म समयाला ॥
चित्रांगद तोही ॥ एक दिनीं मृगये जाई ॥ ३ ॥
मृगया करुनी श्रमला बहुतचि घर्म येतसे देहीं ॥
नौका सुंदर आणुन तेव्हां लोटवि यमुना डोहीं ॥
घेउनि दासाला ॥ चित्रांगद जाउन बसला ॥ ४ ॥
कालिंदीचें जीवन काळें परम भयानक पाही ॥
त्या उदकाचा अंत कोणिही कधीं घेतला नाहीं ॥
नदीं मधें फिरती ॥ वल्ही सेवक आवलिती ॥ ५ ॥
प्रभंजन बहू सुटुनी तेव्हां नौका डळमळुं लागे ॥
आक्रोशें ते सेवक वदती देवा धांवा वेगें ॥
कठिण गती आली ॥ कोण पावेल या वेळीं ॥ ६ ॥
भयाभीत ते होउनि तेव्हां इकडे तिकडे बघती ॥
अकस्मात तों बुडोनि गेली तरणी खालीं हो ती ॥
आक्रांताचे झाला ॥ अंत नसे त्या दुःखाला ॥ ७ ॥

सेवक जन ते हाक फोडुनी सैरा वैरा पळती ॥
धांवत जाउनि राजाला ते वर्तमान जाणविती ॥
ऐकुनि तो पडला ॥ मूर्च्छा येउनि धरणीला ॥ ८ ॥

## पद

( नको नको स्त्री संग ) या चालीवर.

कैशि वेळ कठिण तरी येइ नृपतिला ॥ पाहण्यास नदी तीर पळत चालला ॥ धृ०॥ सिमंतिनी दुःख भरें शोक हो करी ॥ मूर्च्छनाहे आलि तिला पडलि भूवरी ॥ श्वास रोध होय तिचा पति भयें तरी ॥ ऐसि तिची बघुनि स्थिति जननी घाबरी ॥ सुखासनीं बसवि तिला उचलुनी करीं ॥ नादि तीरा सर्व येते धांवुनी तरी ॥ सिमंतिनी शोक करी पडत भूमिला ॥ १ ॥ कैशी वेळ० ॥

## साकी

पिता येउनी सांवरि तिजला माता धांवुनि आली ॥
दुःखार्णवीं ती सर्व बुडाली शोकें विव्हळ झाली ॥
पार न शोकाला ॥ कोण सावरी कोणाला ॥ १ ॥
सिमंतिनीचें रुदन ऐकुनि पशू पक्षिही रडती ॥
डळमळुं लागे कुंभिनि तेव्हां पाहुनि शोकाकुल ती ॥
येती ऐकूनी ॥ सासू स्वशुरचि धांवूनी ॥ २ ॥
चित्रांगदाचि जननी तेव्हां शोकें विव्हळ झाली ॥
सिमंतिनींचें पाहुनि मुख तें मूर्च्छा तिजला आली ॥
लावण्यवती ती ॥ सकळहि तिजला सांवरती ॥ ३ ॥
मृत्तिकाच हो मुखीं घालुनी गडबड धरणीं लोळे ॥
काय पाप हो मी तरि केलें त्यानें बालक गेलें ॥
यमुना नदि झाली ॥ काळाचे आह्मा या वेळीं ॥ ४ ॥

## दिंडी

माझि अंधाची यष्टि कशी गेली ॥ मला सोडूनी डोहिं कुणी नेली ॥
दाखवा त्या बाळास एकदां हो ॥ कोणि नेलें चोरून बाळ तें हो ॥ १ ॥

पूर्वे जन्मीं काय हो पाप केलें ॥ प्रदोषाते मध्येंच टाकियेले ॥
शिवदिनीं मीं अन्न कां ग्रहण केलें ॥ सोमवाराचें व्रतचि मोडियेलें ॥ २ ॥
कीं हरिहराचा भेद मनीं केला ॥ कीर्तनाचा कीं रंग भंगियेला ॥
पंक्ति भेदचि काय हो तरी केला ॥ साधु संताला दोष लावियेला ॥ ३ ॥
काय केला अभिलाष परधनाचा ॥ काय केला अपमान ब्राह्मणाचा ॥
दान देतां दात्यास विघ्न केलें ॥ ह्मणुनि माझ्या बाळास काय नेलें ॥ ४ ॥

## अंजनीगीत.

कोणा मुखिचा ग्रास काढिला ॥ गुरु द्रोह मज पूर्वी घडला ॥
पात्रीं ब्राह्मण जेवित बसला ॥ उठवुनि लावियला ॥ १ ॥
हरिण पाडसा विघडाचि केला ॥ परिव्राजका दोष लाविला ॥
ह्मणुनि माझें निधान मजला ॥ गेलें सोडूनी ॥ २ ॥

## पद.

( व्यर्थ मी जन्मलें, ) या चालीवर.

काय तो कोपला शंभु तरी ॥ धांवगा पावगा कृपा करी ॥ ध्रु० ॥
राजहंस तो दाखिव मजला ॥ देवा तूं झडकरी ॥ १ ॥
जाऊं पाहती प्राणची माझे ॥ चैन नसे क्षणभरी ॥ २ ॥
तुजाविण दुबळी भणंग झाले ॥ राजसा धांव तरी ॥ ३ ॥
शिव शिव शंभो अनाथ नाथा ॥ दीन मी कृपा करी ॥ ४ ॥

## साकी.

नदी तीर तें सोडुनि आले सर्वांचे ते सदनाला ॥
लावण्यवतिसह इंद्रसेन तो शोक करीताचे गेला ॥
अपुल्या देशाला ॥ रातंदिन करी शोकाला ॥ १ ॥
संधी पाहुनि शत्रू येती राज्य हिरावुन घेती ॥
घोर भयंकर प्रसंग पाहुनि दोघे पळुनाचे जाती ॥
धरून त्या आणती ॥ बांदिवान त्या मग करिती ॥ २ ॥

घोर भयंकर संकट जरि हें सिमांतिनीवर पडलें ॥
सोमवार व्रत परी कधीं ही नाहिं तिनें हो त्यजिलें ॥
वर्षें तीन झाली ॥ पुढची गोष्ट कशी घडली ॥ ३ ॥

## पद.

( जाउं नकारे विषया, ) या चालीवर.

चित्रांगद जैं डोहिं बुडाला कालिंदीच्या त्या ॥ नाग कन्यका येउनि तेथें खेळत त्या होत्या ॥ ध्रु० ॥ पाताळीं तो त्यांनीं नेला अपुल्या सदनाला ॥ नागलोकिंची शोभा पाहुनि तटस्थ तो झाला ॥ नागिणि पद्मिनि हस्तिनि चित्रिनि शंखिनि नारीला ॥ पाहुनि झाला तल्लिन मनिं तो त्यांच्या रूपाला ॥ आंगीचा तो सुवास ज्याच्या जाई गगनाला ॥ तपस्वि जन ते गुंगुनि जाती पाहुनि वदनाला ॥ पद नखिं रुंजी भ्रमर घालिती पाहुनि तेजाला ॥ नवरत्नाचे खडे पसरले चारी बाजूला ॥ स्वर्गाहुनि बहु पाताळींचें होई सुख त्याला ॥ नागराज तो नयनिं पाहुनी चित्रांगद नमि त्या ॥ १ ॥

## दिंडी.

कोण तूं गा कोठील सांग माते ॥ प्रश्न ऐकुनि सर्व ही सांगि त्याते ॥
मागुती तो प्रश्नची तया केला ॥ तुह्मि भजतां कोणत्या दैवताला ॥ १ ॥

## पद.

( आम्ही नमुं त्याला, ) या चालीवर.

तो शिव आह्मि भजतो आह्मि भजतो ॥ जो भक्ता सुख देतो ॥ धृ० ॥
इच्छेनेंच निर्मितो ॥ प्रकृति पुरुष दोघे जण तो ॥
अनंत ब्रह्मांडे ही ॥ इच्छा मात्रें निर्मी पाही ॥
इच्छा परततां मनीं ॥ टाकी ब्रह्मांडे मोडुनी ॥
प्रकृति पुरुषा मिळती ॥ जाउनी सारीं पंच भुतें तीं ॥
मग दोघे ही प्रीतीं ॥ आदि पुरुष मिळण्या येती ॥
जो भक्ता सुख देतो ॥ तो सदाशिव आह्मि भजतो ॥ १ ॥

६४६६

## पद.

( भला जन्म हा तुला लाधला, ) या चालीवर.

त्याच्या माये पासुनि झाले हे त्रिमुर्ति गुण तरी ॥
सत्वांशें विष्णु निर्मिलावरी ॥ धृ० ॥
रज तम अंशें विरंचि रुद्रहि निर्माणाचि तो करी ॥
तो शिव आह्मी भजतो तरी ॥
दाहिदिशा ही त्रिभुवन सारे स्वर्गहि पाताळही ॥
पंच तत्व सरितां सह ही मही ॥
भस्म लोष्ट तें अष्ट धातु ही व्यापुनि जो राहिला ॥
भजतो आह्मी शिव तो भला ॥
अष्टादश ही वनस्पतींचीं बीजें ही व्यापुनी ॥
राही तो स्मरतो आह्मी मनीं ॥
शिवनेत्र ते सूर्यचि जाणा ज्याचें मन निशिपती ॥
अंतःकरण तें लक्ष्मीपती ॥
द्रुहीण भासे बुद्धि जयाची अहंकार रुद्र तो ॥
हस्त ही भासे पुरंदर तो ॥
ज्याचा दाढा कृतांतची त्या विराट पुरुषचि तो ॥
ऐसा तो शिव आह्मी भजतो ॥ चाल ॥
शिवावयव सारे देवचि दिसती मला ॥
एकादशरुद्र ही भजती त्या शंभुला ॥
द्वादश भास्कर ही गाती त्या कीर्तिला ॥ चाल ॥
दासाचा मी दास असे वा कुठवर वर्णू तरी ॥
असा शिव स्मरतों मी अंतरीं ॥ त्याच्या माये० ॥ ॥ १ ॥

## साकी.

कद्रुतनुज तो तोष पावला ऐकुनि त्याच्या बोला ॥
क्षेमालिंगन देऊनि त्याला संगें घेउन गेला ॥
दाखवि पुत्राला ॥ पाताळांतिल वस्तूला ॥ १ ॥

देवासहि जी दुर्लभ वस्तू ऐशी येथें आहे ॥
आवडसी तूं मला बहुतची स्वस्थ मानसें राहे ॥
ऐकुनि वचनाला ॥ चित्रांगद वदतां झाला ॥ २ ॥
जननी जनका असेल माझा वेध लागला फार ॥
एकलाच मी त्यांचे पोटीं मजवर सारा भार ॥
त्यांचे चरणांची ॥ दर्शनेच्छा मनीं साची ॥ ३ ॥
मद्भार्या ती सिमंतिनी हो लावण्याची खाणी ॥
वृत्त असें हें परिसुनि माझें जाइल जग सोडूनी ॥
दंदशूक राजा ॥ लीनचि चरणीं दास तुझा ॥ ४ ॥
मम विरहानें जननी माझी करिल फार शोकाला ॥
मज करितां तो प्राण जननिचा असेल नेत्रीं उरला ॥
प्रसन्न होऊनी ॥ पोंहचवी मज नेऊनी ॥ ५ ॥

## दिंडी.

बोल ऐकुनि संतोष तया झाला ॥ दिव्य वस्तू ही अमित देइ त्याला ॥
नाग संख्या द्वादशसहस्र पाहीं ॥ शक्ति त्यांची येइरे तुझे देहीं ॥ १ ॥
जयीं बाळा पाहसी संकटातें ॥ हाक मारी पावेन तरी तूंते ॥
मनो वेगें जाणार वारु देई ॥ सर्वे देई तो एक मणी पाही ॥ २ ॥
दिव्य वस्त्रें रत्नेंहि अमित देई ॥ वर्णवेना त्त्तेज मला कांहीं ॥
पर्वता सम मोट ती बांधली हो ॥ राक्षसाच्या दीधली शिरीं ती हो ॥ ३ ॥
एक फणिवर संगेंहि दिला त्याच्या ॥ क्रमुनि येती बाहेर यमूनेच्या ॥
तीन वर्षे पुर्ण तीं तयें वेळीं ॥ सिमंतिनि ती स्नानास तिथें आली ॥ ४ ॥
एकमेका पाहुनी स्तब्ध होती ॥ परि न ओळख ती एकमेक देती ॥
दिव्य रत्नें मंडीत असा पाही ॥ सिमंतिनिच्या येइ हो भ्रांति देहीं ॥ ५ ॥

## पद.

( जाउं नकारे विषया, ) या चालीवर.

बहु तेजस्वी फणि शिरीची मोती होती ती ॥ अवतंसचि तो डोलत राहे त्या भुजे खालती ॥ गजमुक्तांच्या माळा त्याच्या गळा बहु शोभती ॥

कटीं मेखळा पाचमण्याची शोभे बहुतचि ती ॥ तेणें झाली धरित्रि हिरवी मृग पशू धांवती ॥ मुक्ताफळ तीं पाहुनि धांवें मराळ खाग्या तीं ॥ रत्न रंग तो कीर पाहुनी भक्षाया येती ॥ चंदन उटि ती आंगिं लाविली बहू सुगंधित ती ॥ देहीचा तो सुगंध घ्याया मिलिंदहि धांवती ॥ सुगंध घेउनि घ्राण देवता तृप्त बहू होती ॥ १ ॥

## आर्या.

नयनीं पाहुनि त्याला, विस्मित बहु ती सिमंतिनी झाली ॥
कांहिं सुचेना तिजला, भ्रमचक्रीं जाण ती सती पडली ॥ १ ॥
तटस्थ होउनि पाही, चित्रांगद तो वरी वरी मुख तें ॥
मंगळसूत्र दिसेना, सतिच्या कंठा सदैव भूषवितें ॥ २ ॥

## साकी.

हरिद्रा कुंकु नसें कपाळीं नेत्रिं नसें अंजन तें ॥
रत्न भूषणें आंगिं न दिसतीं तेज रहित ही मुख तें ॥
परि ती शोभतसे ॥ देखुनि रंभा लाजतसे ॥ १ ॥
चंद्रकळा ती ग्रहणा समयीं जाते झांकुन जैशी ॥
चिताग्निनें तनू तियेची कृशची झाली तैशी ॥
जाउनि तो जवळीं ॥ पुसतां झाला त्यावेळीं ॥ २ ॥
कोणाची तूं कोण असासिगे मुळीहुनी तें सांग ॥
जन्मा पासुनि वृत्त कळवुनी सांगी आपला भोग ॥
गहिंवर तो येई ॥ वदतां नयनीं जळ वाही ॥ ३ ॥
अश्रुधारा श्रवती खालीं वाटे गळती धरली ॥
पयोधर तरी लिंग समजुनी भासें मज त्या वेळीं ॥
दंत पंक्ती ती ॥ वदतां रत्ना सम दिसती ॥ ४ ॥
सिमंतिनीच्या सख्या सांगती समाचार तो त्याला ॥
तीनचि वर्षें झाले सखीचा भ्रतार बुडुनी गेला ॥
सासु श्वशुर दोनी ॥ बंदिं घातले शत्रूंनीं ॥ ५ ॥

दासि मुखें ती वार्ता ऐकुनि कंठ सद्गदित झाला ॥
चित्रांगद तो खालीं पाही अश्रु वाहती डोळां ॥
पाहुनि संधी ती ॥ दासि तयाला मग पुसती ॥ ६ ॥

## दिंडी.

आगमन हें कोठून तरी झालें ॥ वृत्त ऐकाया कर्ण हे तृषेले ॥
हेंच ऐकाया इच्छिते शुभांगी ॥ सकळ संशय टाकुनी तिला सांगी ॥ १ ॥

## पद.

( होइल कलह म्हणोनी, ) या चालीवर.

श्रवण करीं हो बाई ॥ सिद्ध मी पुरुष माझें काई ॥ धृ० ॥
तीन लोकिं तें पाहीं ॥ इच्छित ठायीं गमनचि होई ॥
ऐके मम वचनाला ॥ भूत भविष्य ही कळतें मजला ॥
पती तुझा तो अर्जुनी ॥ जिवंत असें हें सत्यचि मानी ॥
तीनचि दिवसा त्याला ॥ आणिन येथें तव भेटीला ॥
सांगु नको कोणाला ॥ ध्यानीं ठेवीं मम वचनाला ॥
सौभाग्याचे गंगे ॥ तेथुन संकट सर्वहि भंगे ॥
शिवकृपेनें पाही ॥ सत्यताच मम वचना येई ॥ १ ॥

## अंजनीगीत.

ऐसें ऐकुनि परम प्रीतिनें ॥ पाहें वदन तें चोर दृष्टिनें ॥
खरें होइ कां कथिलें यानें ॥ केवि घडे हो ॥ १ ॥
मृत्यु पावला येइल कैसा ॥ आठवि मग ती मनीं महेशा ॥
करुणाकर तूं पुराण पुरुषा ॥ नकळे तव लीला ॥ २ ॥
परपुरुष कां जरि तो असतां ॥ तरि मजला कां हातीं धरितां ॥
स्नेह उपजला माझे चित्ता ॥ परम आप्त वाटे तो ॥ ३ ॥
वाटे अमृत प्राशुन आला ॥ काळें गिळिला पुन्हां वमिला ॥
षडास्यताता तुमची लिला ॥ नकळे कोणाला ॥ ४ ॥
सत्य जरी हें करशिल देवा ॥ अकरा लक्षहि दंपति सेवा ॥
पूजिन त्यांतें धरुनी भावा ॥ लाविन वाती त्या ॥ ५ ॥

## साकी.

चित्रांगद तो मागुति वदला सकुमारे जा सदना ॥
सासु श्वशुर जे बंदीं पडले जाउन सांगिन त्यांना ॥
ऐकुनि त्या वचना ॥ सिमंतिनी गेली सदना ॥ १ ॥
सख्या बोलती आण वाहुनी सत्य पती तो आपला ॥
कोण असा हो पुरुष जगीं या तव हात धरूं शकला ॥
ऐकुनि तव बोला ॥ सद्गद बहु तो मनिं झाला ॥ २ ॥

## पद.

( सखे अनुसये, ) या चालीवर.

थांबा थांबा तुह्मी आतां ॥ फोडुं नका हो कळली वार्ता ॥
माझे गळ्याची शपथचि आतां ॥ मौन धरावें सदना जातां ॥
सिमंतिनीच्या त्या मुख कमळीं ॥ सौभाग्य कळा फारचि आली ॥
आनंदानें सदना गेली ॥ कोणा नाहीं वार्ता कळली ॥ १ ॥

## पद.

( सुवर्ण केतकी परि जो, ) या चालीवर.

मनो वेगिचा वारु आणुनी शृंगारचि त्या केला ॥ सिमंतिनीचा पति वर बसला गेला मग निजनगराला ॥ धृ० ॥ जाउनि तेथें उपवनीं राहे प्रेषी मग तो नागाला ॥ मानवरूपें नाग निघाला जाई शत्रूसदनाला ॥ द्वादशसहस्र वळ नागाचें घेऊनि चित्रांगद आला ॥ बाचाल कसें तुह्मी आतां शरणाचि जावें तरि त्याला ॥ भयाभीत तो शत्रू झाला कांहिं सुचेना त्या रिपूला ॥ लावण्यवति सह इंद्रसेन तो आणुन स्थापा तरि त्याला ॥ हस्त जोडुनी दायाद उभे ह्मणती रक्षा आह्माला ॥ माता पित्यास तोष जाहला जेव्हां ऐकाति वार्तेला ॥ १ ॥

## कामदा.

( या चालीवर. )

घेउनी सर्व सैन्य भार तो ॥ भेटण्या निघे इंद्रसेन तो ॥
वाद्य नाद तो भरानें चालला ॥ पुत्र पाहण्या वेध लागला ॥ १ ॥

जनक जनानि तो नयनिं देखुनी ॥ धांव घेत तो तोष पावुनी ॥
धांवुनी धरी चरण मागुती ॥ नयनिं अश्रु ते फार वाहती ॥ २ ॥
जननि धांवली पुत्र पाहुनी ॥ मिठि गळा तरी घालि जाऊनी ॥
तोष जो तिला जाहला असं ॥ वर्णण्यास ता शक्ति ती नसे ॥ ३ ॥

## आर्या.

कौसल्या मातेला, श्रीरामचि काय भेटिला आला ॥
किंवा रत्न मिळालें, गेलें हरपून तेंचि लोभ्याला ॥ १ ॥
कीं जन्मांधास जसें, देव दयेनेंच नेत्र ते यावे ॥
कीं प्राणांता समयीं, अमृत जसें हो मुखांत ओतावें ॥ २ ॥
चित्रांगद पाहुनि तो, लावण्यवतिची स्थिती तशी झाली ॥
शिव महिमा मुखिं गाई, वर्णन करण्यास मति नसे शकला ॥ ३ ॥
करभार घेऊनि नृप, धांवति चित्रांगदास भेटाया ॥
तैसेच पौर जन ते, भेटति त्याला समीप जाउनीया ॥ ४ ॥
द्रोणागिरि आणुन जसे, वायुसुतें लक्ष्मणास वांचावलें ॥
तैसें वाटें लोकां, त्रिभुवन सारें आनंदमय झालें ॥ ५ ॥
माता पित्यांस घेउनि, स्वनगरास जावया पुढें चालें ॥
नैषधपुर तेव्हां तें, शृंगारुन शोभिवंत बहु केलें ॥ ६ ॥

## अभंग.

आनंदाची वार्ता सांगण्या धांवती ॥ चित्रवर्म्या प्रती सेवक ते ॥
महाद्वारीं येतां मात ती फुटली ॥ चहुं कडे झाली वार्ता तीच ॥ १ ॥
चार जाऊनीया रायास सांगती ॥ जामात ते येती तुमचे हो ॥
सेवक जनाची ऐकुनीया वाणी ॥ वाहे नेत्रीं पाणी राजाच्याहो ॥ २ ॥
समाचार आणिला आलिंगीत त्यासी ॥ अमित धनासी देई त्याते ॥
रथीं भरोनीया शर्करा वाटती ॥ तोरणें लावीतीं चहूंकडे ॥ ३ ॥
कोशगृह केलें मोकळें रायानें ॥ बोलत वाणीनें ब्राह्मणासी ॥
नेववेल तुह्मां तितकें धन न्याहो ॥ सुखापार नाहिं हो माझ्या आतां ॥ ४ ॥

## श्लोक

गौरीहरा ह्मणुनि तो नृप नाचुं लागे ॥
सीमंतिनीस मग तो नृप बाहि वेगें ॥
कंठीं तिच्या नृपति मंगळसूत्र बांधी ॥
सांगें तिला स्मरत जा शिवनाम आधी ॥ १ ॥

## पद.

( बघुनि उपवना विरहाग्नीची,) या चालीवर.

आलंकार हि तिला लेवविती सुमन हार घालती ॥
कुंकू भाळीं नेत्रीं अंजन हळद मुखा लाविती ॥ धृ० ॥
नगरनारि त्या सकळ मिळूनी जयजयकार करिती ॥
त्रयोदश गुणी विडे करूनी वदनीं तिच्या घालती ॥
शृंगाराते एक सांवरी एक पुढें धांवती ॥ चाल ॥
जननि ती धांवली प्रेम भरित अंतरीं ॥
सिमंतिनीस प्रेमें ह्रदयीं मग ती धरी ॥
तव सौभाग्याचा पर्वत आला वरी ॥ चाल ॥
सौभाग्य गंगा तुझी भरोनी जाइल बहुताचे ती ॥
ऐश्वर्यद्रुम हि वाढुं लागला जाइल तो वरती ॥ १ ॥

NATIVE GENERAL LIBRARY ... (POONA)
सार्वजनिक वाचनालय पुणे

## साकी.

सोमवार हें धन्य व्रत तरी दंपत्ति पूजा धन्य ॥
जामातातें सजिव कराया शक्य नसे हो अन्य ॥
भक्ती धन्य तुझी ॥ गातां थकली मति माझी ॥ १ ॥

## श्लोक.

माता पित्याच्या समवेत येई ॥ सिमंतिनीचा पतिराज धाई ॥
ऐकून धांवे नृप भेटण्याला ॥ जाऊन घाली मिठि हो गळ्याला ॥ १ ॥

## साकी.

ब्रह्मानंदें भरली सृष्टी सुमन वृष्टि सुर करिती ॥
नगरामाजीं जामायाला मिरवित मग ते नेती ॥
विवाह तो केला ॥ देवा अद्भुत तुझि लीला ॥ १ ॥
चित्रांगद तो सिमंतिनीला एकांतीं मग वाही ॥
पाताळांतिल अद्भुत रत्नें घालीं तिच्या हो देहीं ॥
सुगंध तैलें ही ॥ लावि तिच्या सुंदर देहीं ॥ २ ॥
मृत्युलोकिं ज्या अपूर्व वस्तू ऐशा दिधल्या श्वशुरा ॥
देवासहि जी दुर्लभ वस्तू काय मिळे इतराला ॥
चित्रवर्म नृपती ॥ झाला आनंदित चित्तीं ॥ ३ ॥
सासु श्वशुरा चरणीं माथा सिमंतिनी मग ठेवी ॥
सौभाग्योदधि भरुन चालला करी शुभचि ती देवी ॥
सून सुनू घेई ॥ देशा इंद्रसेन जाई ॥ ४ ॥
अवनींचे ते नृपति मिळूनी छत्र देति पुत्राला ॥
राज्यभार तो पुत्रा अर्पुनि इंद्रसेन मग गेला ॥
जप तप करण्याला ॥ अंतिं शिवपदास तो गेला ॥ ५ ॥
सिमंतिनीला आठ पुत्र ही पितया समान झाले ॥
दहासहस्त्रचि वर्षं पाही निर्विघ्न राज्य केलें ॥
नळा समचि भासे ॥ न्यायानें तो वर्ततसे ॥ ६ ॥
सोमवार ही प्रदोष व्रत तें आचरि प्रेमें करुनी ॥
दंपत्य पुजा नित्य करितसे होइ लीन शिवचरणीं ॥
सूत सांगताती ॥ शौनक ते श्रवणचि करिती ॥ ७ ॥

## पद.

( झाली ज्याची उपवर. ) या चालीवर.

सिमंतिनीची कथा तरी ही ॥ श्रवण करूनी प्रचिती पाही ॥ धृ० ॥
नियमानें ज्या स्त्रिया ऐकिती ॥ वृद्धी होइल सौभाग्या ही ॥
अंतरला पती येडानि भेटे ॥ विगत धवा ती सधवा होई ॥

पुत्र जरी तो दूर भडकला ॥ येउनि भेटे मागुति तो ही ॥
अयुरारोग्य ऐश्वर्याचि तें ॥ सदां येऊनी जवळिच राही ॥
गंडांतर ही मृत्यु निरसुनी ॥ गत धन सारे प्राप्तचि होई ॥ १ ॥

## दिंडी.

प्रयाग समचि ही कथा मनीं जाण ॥
माघ महिमा हा भक्ती असे मान ॥
श्रवण पठणाचि हें करा तरी स्नान ॥
त्रिविध दोषचि जातील कीं जळोन ॥ १ ॥

## अंजनीगीत

सिमंतिनीची कथा सुधा ही ॥ प्राशन करती सज्जन बुध ही ॥
निंदक ते तरि असुराचि पाही ॥ तया नावडे ॥ १ ॥
पार्वतिहृदया सुखकर ताता ॥ ब्रह्मानंदा अनाथनाथा ॥
सुमती माझी करुनी आतां ॥ कथा वदवि पुढें ॥ २ ॥

## पद.

( संत पदाची जोड, ) या चालीवर.

शंभु पदाची आस ॥ मला ती शंभु पदाची आस ॥ धृ० ॥
चरण रजानें तरले पापी ॥ महिमा गातो व्यास ॥
तन मन माझें गुंतुन गेलें ॥ नाहीं दुसरी आस ॥
असतें धन जरि माझे जवळीं ॥ अर्पण करितो खास ॥
इच्छा माझी पूर्ण करूनी ॥ देई निजपदीं वास ॥ १ ॥

NATIVE GENERAL LIBRARY
सार्वजनिक वाचनालय
खेड, ( पुणे. )

## अध्याय ७ था.

### श्लोक

किशोर शशिशेखरा परम पावना मंगळा ॥
भुजंग धरशी हरा वसति रुंडमाळा गळा ॥
रमाधव सदां तुला स्मरतसे भुताधीपते ॥
अविद्य वन जाळिरे जयजया जगाच्या पते ॥ १ ॥

### साकी

षष्ठाध्यायीं अति निरमळ जी सिमंतिनीची लीला ॥
यथा मतीनें वर्णन केली होवो प्रिय ती सकळां ॥
शंभू प्रसन्न जरी ॥ काय एक नच होय तरी ॥ १ ॥
विदर्भ नगरीं वेदमित्र या नामें ब्राह्मण होता ॥
सारस्वतही मित्र तयाचा जाणति साऱ्या ग्रंथा ॥
दोघांसहि होते ॥ दोन पुत्र बहू जाणते ॥ २ ॥

### दिंडी.

वेदमित्राचा तनय सुमेधा हो ॥ तया मित्राचा सोमवंत कीं हो ॥
उभयतांचा स्नेहही फार होता ॥ पढति दोघेही साग्र दशग्रंथा ॥
छंद शिक्षा ती अरण संहिताही ॥ पद क्रम निघंट कल्प ब्राह्मणेंहो ॥
शिकति मागुति ज्योतीष साग्र ग्रंथा ॥ ह्मणति व्याकरणाहि पूर्ण दशग्रंथा ॥

### साकी.

दोघांची ही विद्या बघुनी वडिल ह्मणाति ते आतां ॥
विदर्भ देशीं जाउनि तुह्मीं भेटावें नृपनाथा ॥
विद्या ती दावा ॥ अमित धना तरी मिळवा ॥ १ ॥
ब्रह्मपुत्र ते नृपा भेटती जाउनि विदर्भ देशीं ॥
उघडें करुनी विद्या धन तें दाविति सारें त्यासी ॥
आनंद भूपाला ॥ पाहुनि त्यांच्या विद्येला ॥ २ ॥

माझे मनिचा एक भाव तो तुह्मी पूर्ण करावा ॥
नैषध देशीं जाउनि तुह्मी चित्रांगदाचे पहावा ॥
पत्नी त्याची ती ॥ आहे विख्यात त्रीजगतीं ॥ ३ ॥
शंकर पार्वति स्थापुनि नित्यचि दंपति पूजिति भावें ॥
एक पुरुष तो एक नारि तरि होउनि तुह्मी जावे ॥
तुह्मां पुजिल ती ॥ देइल अलंकार वरती ॥ ४ ॥
तेथुन यावें परतुन मग मी देइन यथेष्ट धन तें ॥
जनक जननिचे तसें गुरूचे मानावें वचनाते ॥
तेव्हां द्विज सुत ते ॥ झाले नृपासि हो वदते ॥ ५ ॥

## पद

( यक्ष वदे हा देव कशाचा, ) या चालीवर.

काय नृपा तूं हें वदतोसी निंद्य कर्म तें करण्याला ॥
स्त्री वेष तरी पुरुषा देतां सचैल करिती स्नानाला ॥
जन्मो जन्मीं तो स्त्री होई जो घेई त्या वेषाला ॥
ऐशा वेषा पाहति नर जे जाती ते तरि नरकाला ॥
दश ग्रंथ ते आह्मी पढलों ना करुं ऐशा कर्माला ॥
विद्या लक्ष्मी सतेज आहे तोषवुं साऱ्या भूपाला ॥
चरणांबुज तें आमुचें नमुनी देतिल धन बहु आह्मांला ॥
विद्वानांची विद्या जननी देते इच्छित वस्तूला ॥
जनक जननिहुनि विद्या मोठी संकटीं रक्षी ती त्याला ॥
विद्याहिन तो पशुसम जाणा जिवंत असुनी तो मेला ॥
न पाहवें तें मुख तरि त्यांचें दिधला श्रम कां जननीला ॥ १ ॥

## पद.

( शंकित कां होसि ) या चालीवर.

मान्य करा वचना ॥ द्विजांनो ॥ धृ० ॥ गुरु वचनाते मान्य करावें करुं नये अवहेलना ॥ जरि कराल मम इच्छा पूर्णहि देइन धन ना गणना ॥ स्तब्ध असें कां बसला तुह्मी होय कां तरि ह्मणाना ॥ संकट जाणुनि द्विज सुत ह्मणती मान्य करूं तव वचना ॥ १ ॥

## साकी.

द्विज वचनाते परिसुनि राजा वस्त्र भूषणें आणवी ॥
स्त्री वेष तरी देउनि एका त्यांते जाण्या सुचवी ॥
दंपत्य तें जाई ॥ सोमवारीं निशीं समयीं ॥ १ ॥

## दिंडी

सकळ प्रमदाची ईश्वरीच पाही ॥ जिची प्रतिमा ह्या महीवरी नाहीं ॥
उर्वशी ही पाहुनी मनीं लाजे ॥ रेणुकेची ती कीर्ति तिला साजे ॥ १ ॥
तिला पाहुनि तो मदन होइ वेडा ॥ मनीं हांसे ती बघुनि असा जोडा ॥
हर भवानी तैं असें मनीं भावी ॥ पुजुनि त्याते ती शीर पदीं ठेवी ॥ २ ॥
पंच पक्वान्नें देइ भोजनासी ॥ वस्त्र भूषण तें अमुप दिलें त्यांसी ॥
गौरिशंकर मानुनी नमी त्यांते ॥ पुढें होऊनी तया बोळवीते ॥ ३ ॥

## श्लोक.

(शिखरिणी.)

पथीं कांता मागें पति पुढति चाले परतुनी ॥
वदे कांता तेव्हां मदन शर हा त्रासवि मनीं ॥
प्रिया आतां वर्षी सुरत घन तूं काय बघसी ॥
खरी कांता झाले पुरुषपण तें नाहिं मजसी ॥ १ ॥

## श्लोक.

चेष्टा अशा कां करितोस मित्रा ॥ ठावें नसें कां तुज ब्रह्मपुत्रा ॥
स्त्री वेष सारा करि दूर आतां ॥ चेष्टा नको तूं करुं मार्गि जातां ॥ १ ॥

## साकी

पतिच्या बोला ऐकुनि झाली मूर्च्छित तेव्हां कांता ॥
महीवराते तें अंग टाकुनी बोले धांवा नाथा ॥
कामज्वर भाजी ॥ युक्ती कांहिं तरी योजी ॥ १ ॥

धांवत धांवत येउनि वदला काय मांडिलें सोंग ॥
तुह्मी आह्मी गुरु बंधु ना? हें तरि मजला सांग ॥
ऐसें कां वदसी ॥ माझा अंत कां पाहसी ॥ २ ॥

## अंजनीगीत.

कामिनि तेव्हां तया बोलली ॥ मम अवयव हें बघ या वेळीं ॥
पुरुषत्वाचीं चिन्हें गेलीं ॥ आतां मज भोगी ॥ १ ॥
हस्त तयाचा धरुनी चाले ॥ एकांतासी त्याला नेलें ॥
वृक्ष जेथिंचे गगना गेले ॥ पल्लव पसरले ॥ २ ॥
ह्मणे शंका सांडी आतां ॥ भ्रतार तूं रे तुझि मी कांता ॥
विचार आतां कसला करितां ॥ रतिसुख तें द्यावें ॥ ३ ॥

## दिंडी

शास्त्र पढलासी सकळ काय त्याचें ॥ हेंच फळ तूं करणार काय साचें ॥
विचार करी तूं कांहिं मनीं याचा ॥ कां करितोस तूं भाग अनर्थाचा ॥ १ ॥

## साकी.

मन्मथ अंगीं फार चेतला नाहिं तिला तें रुचलें ॥
बळेंच चुंबन घेउन प्रेमें त्यास अलिंगन दिधलें ॥
कर धरून हातीं ॥ झालि पयोधर दाखविती ॥ १ ॥

## श्लोक.

लोटी तिला तोहि बळेंच मागें ॥ सारी तीचा तो कर दूर रागें ॥
ह्माल्या असें कां करितोसि पाही ॥ विचार याचा करि तूंच कांहीं ॥ १ ॥

## पद

( ज्याचें सुख त्याला, ) या चालीवर.

तो नर शंकर रे शंकर रे ॥ नाहीं वृत्तिस चळ रे ॥ धृ० ॥
पर योषितां एकांतीं रे ॥ सभाग्य वा तरुणी रे ॥
विनवी संग कराया रे ॥ परि नाहीं वृत्तिस चळ रे ॥

दानिं द्रव्य घट पाहुनि रे ॥ वोसंडुनि जाई दुर रे ॥
वचनीं सत्य सदां जो रे ॥ अवघी विद्या मुखोद्गत रे ॥
गर्व ठाउका नसे ज्या रे ॥ भूत दया मनिं ज्याच्या रे ॥
निंदक करिती निंदा रे ॥ परि जो मनीं खेद रहित रे ॥
जरि ठाउकें परगुह्या रे ॥ वाचेस कधीं नाणी रे ॥
स्त्री पुरुष ज्या भान नसें रे ॥ सुकृत तप दान न सांगे रे ॥
पैल मुर्ख हा पंडित रे ॥ न ह्मणें समान पाही रे ॥
अर्थ बुडाला नच खंती रे ॥ परमहंस ज्याची वृत्ती रे ॥ १ ॥

## दिंडी.

वेद मित्राचा पुत्र असा तोही ॥ धैर्य शस्त्रानें मदन जाळि देहीं ॥
ह्मणें मित्रा ग्रामास जाउं आतां ॥ निवेदन ही गोष्ट रे करूं ताता ॥ १ ॥

## साकी.

सारस्वत सुत आला तेव्हां स्त्रीरूपें सदनाला ॥
गतवर्तमान जें जें घडलें केलें श्रुत ताताला ॥
सारस्वत बोले ॥ पहा कर्म कसें फिरलें ॥ १ ॥
सारस्वत तो रडूं लागला वक्षस्थळ तें बडवी ॥
राजा जवळीं येऊन बोले केली गोष्ट न बरवी ॥
दुष्टा चांडाळा ॥ कैसा घात तुवा केला ॥ २ ॥
एकाचि होता बालक मजला निर्वंश कसा केला ॥
करितों तुजवर हत्या आतां ऐकुनि नृप तो भ्याला ॥
अधोवदन पाही ॥ राजास सुचेना कांहीं ॥ ३ ॥

## पद.

( उरला भेद न ज्या कांहीं, ) या चालीवर.

कृत्रिम सत्य कसें झालें ॥ देवा कैसें तरि केलें ॥ धृ० ॥
बाही सकळ ब्राह्मणांना ॥ जोडुनि हस्त वदे त्यांना ॥
करा सतेज अनुष्टाना ॥ याला पुरुषत्वाचें आणा ॥

तरिच मी धन्य असे जाणा ॥ विप्र ह्मणति ते राजाला ॥
मायेनें केलें ॥ तें कधीं असें कां फिरलें ॥ १ ॥

## साकी.

विप्रवचन तें असें परिसुनी दुर्धर मांडी हवना ॥
सप्तदीन ही निराहारि तो करितसे अनुष्टाना ॥
प्रगटुनि देवी ती ॥ ह्मणे प्रसन्न मी नृपती ॥ १ ॥
स्त्रीविषी हा सोमवंतची करी पुरुष गे यास ॥
देवि ह्मणे ही गोष्ट कधीं ही नाहीं घडणें खास ॥
सिमंतिनी वचना ॥ अमान्य मज तें करवेना ॥ २ ॥
वेद मित्र सुत नाम सुमेधा होइल वर तो इजला ॥
देई वरि लग्न करूनी दुजा मार्ग नच उरला ॥
होइल पुत्र इला ॥ लाजविल तो ज्ञात्याला ॥ ३ ॥

## अंजनीगीत

देवीच्या त्या आज्ञें वरूनी ॥ त्यांचें दिधलें लग्न करूनी ॥
देवीची ती सत्यचि वाणी ॥ सुपुत्र मग झाला ॥ १ ॥
सिमंतिनीची भक्ति धन्य ती ॥ उपमा नाहीं त्याला जगतीं ॥
कर्तृत्व तिचें हैमवती ती ॥ मोडूं न शके ॥ २ ॥

## पद.

( दो दिवसाची तनु ही साची, ) या चालीवर.

अवंति नगरीं विप्र मदन तो होता विषयीं फार तरी ॥
सुंदर वेश्या नाम पिंगला राहत होती त्या नगरीं ॥
झाला लंपट तिला विप्र तो सोडि कर्म ही सर्व परीं ॥
जनक जननिला धर्म पत्निला देई सोडूनी दूरवरी ॥
गणिका सदनीं नित्य राहुनी मद्य सेवितो दिवसभरी ॥
अनंत रूपें घेउनि शंकर सदां विचरे महीवरी ॥
तोच होउनी ऋषभ योगि हो येतां झाला त्या द्वारीं ॥

काय पुण्य तें पूर्व जन्मिचें होतें गणिकेच्या पदरीं ॥
शिवयोगी तो दृष्टि देखुनी धांवुनि त्याचे चरण धरी ॥ १ ॥

## साकी

होउनि सद्गद अंतरिं तेव्हां त्याचें पूजन करिती ॥
बहुविध अन्नें तयार करुनी ऋषीस अर्पण करिती ॥
शेज करुन हातीं ॥ निजविति योगी तो वरती ॥ १ ॥
ऋषि चरणांबुज तळहातें ते दोघे मर्दिति भावें ॥
एक निशीं तो क्रमुनी तेथें अंतरधानचि पावे ॥
उमारमण गेला ॥ दर्शन देउनि आह्मांला ॥ २ ॥
मदन पिंगला मृत्यु पावली कांहीं दिवसांनीं हो ॥
शिव योग्याचें पूजन घडलें पदरीं पुण्यचि तें हो ॥
ह्मणुनी दोघाला ॥ उत्तम कुळीं जन्म झाला ॥ १ ॥

## दिंडी

पिंगला ही भूवरी जन्म घेई ॥ सिमंतिनिची कन्यका तरी होई ॥
कीर्ति मालिनि ठेविलें तिचें नांव ॥ तीच झाली तारण्या कुला नांव ॥ १ ॥
वज्रबाहू नामेंच नृपति होता ॥ सुमती नामें होति हो तया कांता ॥
तिच्या गर्भीं जाउनी मदन राही ॥ पुढें कैसी जाहली गोष्ट पाही ॥ २ ॥
दशार्ण देशिचा वज्रबाहु राणा ॥ सुमति त्याची ती पट्टराणि जाणा ॥
सवति होत्या हो तिला फार दुष्ट ॥ गर्भ पाहुनि योजती मनीं क्लिष्ट ॥ ३ ॥

## कामदा

( या चालीवर. )

सुमति गर्भिणी ह्मणुनि ऐकिलें ॥ कपट सवतिंनीं करुनि दीधलें ॥
वीष तें तिला देति प्यावया ॥ इच्छिती मनीं मृत्यु यावया ॥ १ ॥
वेळ चांगली मृत्यु ना तिला ॥ प्रसुत जाहली रोग लागला ॥
देहिं तें तिच्या वीष फूटलें ॥ बाळकास ही तेंच भोंवलें ॥ २ ॥

## दिंडी.

वीष अंगीं तें फार भिनुन गेलें ॥ क्षतें पडलीं त्या देहिं व्रणहि आले ॥
बहू उपाय ही करी राय त्यास ॥ नाहिं आला परि एक ही गुणास ॥ १ ॥

## साकी

असह्य पीडा होउनि सुमती शोक करितसे भारी ॥
तिचें बाळ तें सदां रडतसे नृपती तो त्रास करी ॥
रथीं तिला घालीं ॥ सोडी दूराचें त्यावेळीं ॥ १ ॥
मनुष्य दर्शन नाहीं जेथें व्याघ्र सर्प हे वसती ॥
बाळ कडेवर घेउन हिंडे राणी ती हो सुमती ॥
कंटक ते रुतती ॥ वरि वरि मुर्च्छित हो पडती ॥ २ ॥
तृषा लागली उदक मिळेना शरीर सारें तिडके ॥
कैलास पती अंतारें ध्याउनि सुमती करुणा भाके ॥
देवा पाव आतां ॥ तुजविण कोणि नसे त्राता ॥ ३ ॥

## पद.

( देव स्त्री मेनका ) या चालीवर.

जगदात्मा तूं जगद्वंद्य तूं प्रार्थि तुला दासी ॥
जयजय शंकर त्रिदोष शमना वससी कैलासी ॥
जगदांकुर तूं कंद तरी तूं भक्तअघां वारिसी ॥
अनादि सिद्धा अमरनुता तूं माया तुजपाशीं ॥
भक्तजन ते संकटिं पाहुनि धांवुनि तूं येशी ॥
विश्वव्यापका जगद्गुरू तूं पाव तरी मजसी ॥ १ ॥

## श्लोक.

वारि वरी सुमतिं कारिं रूदना ॥ पडतसे धरणी वारि अंगना ॥
स्वतनया सुमती कारिं सांवरी ॥ पुनरपी सातिं मूर्छित हो तरी ॥ १ ॥

## कामदा.

( या चालीवर. )

शोक ऐकुनी सुमतिचा तरी ॥ पक्षिगणाहि तो शोक हो करी ॥
धरार्णी जैं पडे ग्लानि येउनी ॥ करिति सावली पंख पसरुनी ॥ १ ॥
चंचु भरुनि तें पाणि आणती ॥ थंड व्हावया देहिं शिंपती ॥
बाळकास ते बहुत सुखविती ॥ मधुरसास ते अणुनि पाजिती ॥ २ ॥

## साकी.

वन गाई त्या निज पुच्छानें वारा घालिति रजनीं ॥
अपूर्व नवलहि घडून आलें हिंडत असतां रानीं ॥
कांहीं ग्रह फिरले ॥ ह्मणुनी नवलचि तें घडलें ॥ १ ॥
वृषभ भार तो बणिक घेउनी मार्गीं जातां पाही ॥
त्यांच्या संगें वैश्य पत्तना जाती झाली ती ही ॥
तेथें नृप होता ॥ पद्माकर तो बहु ज्ञाता ॥ २ ॥

## दिंडी.

कोण तूंगे आलीस कशी येथें ॥ विदित कर तें सर्व ही तूंचि मातें ॥
मुळापासुन सर्व ही सांगि त्यातें ॥ अश्रु नेत्रीं वाहती ऐकुनी तें ॥ १ ॥

## साकी.

पहा कर्म हें कसें हिंडवी अनाथ पारि हो इजला ॥
वज्रबाहुची पट्टराणि ही यावी कां ह्या गतिला ॥
होउनि दीन तरी ॥ यावी कां ! मम मंदिरीं ॥ १ ॥
धर्माची तूं भगिनी माझी ऐके सुमती बाई ॥
मजला कांहीं न्यून नसें गे स्वस्थ मानसें राही ॥
घेउनि पुत्राला ॥ मी सादर तव सेवेला ॥ २ ॥
अगणित वैद्यहि आणुनि नृपती औषध त्यांना देई ॥
दुसरे तिसरे प्रयत्न केले गूण न कांहीं येई ॥
सुमति ह्मणे ताता ॥ श्रीशंकर त्राता आतां ॥ ३ ॥

## आर्या

ऐसें होतां होतां, होइ व्यथा तीच फार हो कठिण ॥
सुमति तनय तो तेंव्हां, व्याकुळ होऊनि पावला निधन ॥ १ ॥
सुमती शोक करी बहु, त्या शोकास कोठुनी असे पार ॥
ह्मणे मम रत्न गेलें, पद्माकर शांतवी तिला फार ॥ २ ॥
निशांतिं गभस्ति उगवे, तैसा शिव योगि तो तिथें प्रगटे ॥
जैसें कीं भणगाला, चिंतामणि साच तो तरी वाटे ॥ ३ ॥
धांवत धांवत जाऊनि, पद्माकर धरि चरण शिवाचे हो ॥
दिव्यासनिं मग बसवी, पूजुनि शिव नाम घेत वाचें हो ॥ ४ ॥
त्यावरि शिव योगी तो, सुमति प्रति सांगि हो निरूपण तें ॥
निरूपण तें तरि तुह्मी, ऐका देऊनि आवधानातें ॥ ५ ॥

## पद.

( शिवाज्ञेचि वाट न पाहतां,) या चालीवर.

ऐके सुमती कांहो रडसी सांग तरी मजला ॥
पूर्व जन्मिं ते पती पुत्र ही होते कां तुजला ॥
तूं तरि कोठें ते तरि कोठें गेले जन्माला ॥
चौऱ्यांशी लक्ष योनीं मध्यें पाहसि आपाला ॥
मूल कुणाचें कां तरि रडशी करी विचाराला ॥
ज्या ज्या वर्णी शरिरा धरिती करिती गर्वाला ॥
उत्पत्ती ही कसी जाहली देह कसा झाला ॥
न पाहतीं ते विचार करूनी भ्रमती मायेला ॥
त्वां पुत्र हा कोठुनि आणिला कोठें तरि गेला ॥
अवघे जन हे जातिल कोठें पुनरपि जन्माला ॥
आत्मा शिव हा शाश्वत आहे नाश नसे त्याला ॥ चाल ॥
शरीर हें समजें क्षणभंगुर अंतरीं ॥
शोक तूं कशाला करसी मग सुंदरी ॥
आत्मा अविनाशी नव्हे कुणाचा तरी ॥ चाल ॥

देहा करितां शोक करिसि तूं आहे हा पडला ॥
बंधुसुतादिक नातें कांहीं नाहीं आत्म्याला ॥ १ ॥

## पद.

( दिसली पुनरपि, ) या चालीवर.

सुमती ऐके अवघे जन हे माया मोहें बहु फसती ॥
जळीं उठति बहु तरंग बाई क्षणभंगुर ते पारि असती ॥
मृगजल सारें मिथ्या असुनी बुद्बुद सत्य कसे होती ॥
चित्रीं तरुची छाया पाहुनि तेथें कोणी नच वसती ॥
चिताग्नीनें सदन जाळिलें ऐसें होइल कां सुमती ॥
चित्रांतिल त्या गंगेमधुनी वाहुन कोणी नच जाती ॥
वंध्या सुत तो द्रव्य आणुनी मारुतिला दे भीष्म सुता ती ॥
गंधर्वाच्या नगरींहुनि कां लग्न कराया जन येती ॥
वाऱ्याचा तो मंडप सजवुनी सिकता दोरें कां कसती ॥
सत्यत्वाचा लेश न या मार्धिं तैसा प्रपंच गे सुमती ॥ १ ॥

## पद.

(संग घड़ो मज दंग असो ) या चालीवर

शुक्ति रूप्याचें पात्र करूनी खपुष्प कोणी नच भरिती गे ॥ धृ० ॥
कांसविचें घृत घालुनि वाती मृगजालें मीन न पाजळती गे ॥
रंभेचा तो नाच पहाया जन्मांध कशाला जाई गे ॥
अही कर्णिचीं कुंडल सारीं चित्रीं चोर नच आणती गे ॥
सुमती सांगे यांत खरें किती तैसा प्रपंच तारि जाणी गे ॥ १ ॥

## पद.

( अशाश्वत संग्रह कोण करी, ) या चालीवर.

अशाश्वत सर्व हि जाण तरी ॥ धृ० ॥
त्याचा मग कां शोक करशी तूं ॥ विचार कारे क्षणभरी ॥
क्लेश तरूचें स्थान शरीर हें ॥ रोग सकळ त्यावरीं ॥
क्रामि कीटक ते गृहची करिती ॥ सदोदित या शरिरीं ॥

पापाचा हा समुद्र सुमती ॥ भ्रांती अंबर तरी ॥
मुत्र श्लेष्म हाडें मास रक्तची ॥ चर्म वेष्टित वरी ॥
मातृ विटाळ वा पितृ रेतची ॥ वसती या शरिरीं ॥
अपवित्र असें शारिर मुळीं हें ॥ पशुमुत्र शुद्ध करी ॥
क्षुरें जरि तें मुंडन केलें ॥ पावन कां हो तरी ॥ १ ॥

## साकी.

देशिका प्रती शरण न रिघतां कैसे प्राणी तरती ॥
कल्प कोटि ते फेरे घेती मुक्त कधीं नच होती ॥
ह्मणुनि शरण जावें ॥ सुंदरी तूं मनोभावें ॥ १ ॥
जन्म जन्मीचे पती तुझे ते कोठें वसती सांगे ॥
अवघा हा गे माया पुर तरी सावध होई वेगें ॥
ज्याचें हें लेणें ॥ देत घेत लाजिरवाणें ॥ २ ॥
तनुघर केलें त्रिगुणें सुमती पांच वासे आणुनी ॥
याचा कांहीं नसे भरवसा केव्हां जाइल जळुनी ॥
जीर्ण वस्त्रचि तें ॥ ऋणानुबंध तोंवरि टिकतें ॥ ३ ॥
जैसें मृगजळ मिथ्या किंवा राज्य स्वप्निचें मिथ्या ॥
तैसा प्रपंच असुनी प्राणी मनिं नच जाणाति तथ्या ॥
पापी प्राणी ते ॥ धन धान्य इच्छिति हो, ते ॥ ४ ॥

## दिंडी.

नदीं मध्यें काष्टेंहि एक होतीं ॥ मागुती तीं वाहुनी दूर जातीं ॥
स्त्री पुरुष तरी तसे जाण बाई ॥ प्रपंचाचा खेळ हा तसा होई ॥ १ ॥
तरू वरती ते पाक्षि बैसताती ॥ किती बसती गे किती उडुन जाती ॥
दुज्या तरुवर मागुती बैसताती ॥ अपत्यें हीं तैशीच जाण चित्तीं ॥ २ ॥
वृक्ष छाये बैसती प्रवासी गे ॥ उष्ण सरलिया जाति मार्गि ते गे ॥
आप्त बंधू सोयरे तसे जाणी ॥ आण सुमती हें सर्व तरी ध्यानीं ॥ ३ ॥

## पद.

( भला जन्म हा तुला लाधला, ) या चालीवर.

मायामय ह्या प्रपंच वृक्षीं जिव शिव द्विज बैसती ॥
पहा गे कसी तयाची रिती ॥
शिव सावधान सर्व साक्षि तो जिव भाक्षि विषय फळें ॥
त्यांतच मग मन तें गुंतलें ॥
आपण आपणा विसरुनि गेला भ्रमला मग अंतरीं ॥
जन्म मरण भोगितसे वर वरी ॥
एखादा जो पुण्यवान् तो शरण जाइ गुरु प्रती ॥
त्याचे गर्भवास मग चुकती ॥
शिवरूपी तो होउनि राही जा शरण गुरु प्रती ॥
तोच गे देइल तुज ती गती ॥ १ ॥

## साकी.

एकतांच तें दिव्य निरूपण पद्माकर वा सुमती ॥
सद्गदीत ते होउनि उठती चरण तयाचे नमिती ॥
कोण गुरू दुसरा ॥ पाहूं तरी मी ईश्वरा ॥ १ ॥
देवा ! दासी संकटिं पाहुनि धांव घेतली तुह्मीं ॥
संकट माझें दूर करावें चरणीं लीनचि आह्मीं ॥
नयनीं जळ ढाळी ॥ चरण नमी वेळोवेळीं ॥ २ ॥

## आर्या

मृत्युंजय मंत्राचा, केला उपदेश तो तिच्या कानीं ॥
भस्म चर्चितां अंगीं, झाली हो दिव्य रूप ती राणी ॥ १ ॥
मंत्रित भस्म करूनी, बाळक शरिरास लावि सुमती ती ॥
ते क्षणीं बाळक उठलें, बाळाची झालि फार सुमती ती ॥ २ ॥

## साकी.

व्रण व्यथा ती निरसुनि जाउनि बत्तिस लक्षणि झाला ॥
सुमतीचा तो बाळक तेव्हां विस्मय वाटे सकळां ॥
परिसें त्या लोहा ॥ तैसें तेजचि त्या देहा ॥ १ ॥
धन्य गुरू तूं धन्य मंत्र हा पद्माकर तो बोले ॥
काळ मृत्युच्या भया पासुनी दूर तुवां बा केलें ॥
रत जे गुरु चरणीं ॥ काळहि जिंकिला त्यांणीं ॥ २ ॥
गुरू पदांबुजिं बाळ घालुनी सुमती लागे चरणीं ॥
सद्गुरु राया शरीर मम हें ओवाळिन तुज वरुनी ॥
धन्य तुवां केलें ॥ निपुत्रिक नांव हें गेलें ॥ ३ ॥
या शरिराच्या करुनि पादुका जरि घालिन या चरणीं ॥
उपकाराची फेड तरी बा नच होई मज कडुनी ॥
थोर तुह्मी देवा ॥ दासीनें किति गुण गावा ॥ ४ ॥

## दिंडी

बहुत दिन हा वांचेल तनय बाई ॥ रोग नासुनि ऐश्वर्य फार येई ॥
सकळ पृथ्वीचें करिल राज्य बाळ ॥ प्रतापाला दचकेल बघुनि काळ ॥ १ ॥

## पद.

( शंकित कां होशी, ) या चालीवर.

पावे राज्याला ॥ पुढती हा ॥ धृ० ॥
भद्रायू हें नाम ठेविलें सुमती तव बाळाला ॥
भद्रायू हा थोर होइ तव येथें क्रमि काळाला ॥
मंत्र जपाचा विसर न व्हावा करि धरुनी निष्ठेला ॥
राजपुत्र हा कळवुं नको तूं इतक्यांतचि लोकाला ॥
चवदा विद्या सर्व कला ही येतिल तव पुत्राला ॥
आशिर्वाद तो देउनि ऐसा योगी गुप्तचि झाला ॥ १ ॥

## श्लोक

पद्माकराला सुख होय भारी ॥ बाई तुझी मी किति सांगु थोरी ॥
तुझे प्रतापें मज लाभ झाला ॥ प्रत्यक्ष योगीजन देखियेला ॥ १ ॥

## आर्या

पद्माकरास झालें, बहु सुख पाहूनि सुमतिच्या बाळा ॥
स्वसुत सुनयाहुनि ही, भद्रायू फार आवडे त्याला ॥ १ ॥

## श्लोक

दोघाला ही करित मग तो मेखला बंधनाते ॥
वेचूनी ही अमित धन तें भूषणें घेइ त्यातें ॥
केले दोघा निपुण मग हो सर्व विद्येत त्यानें ॥
दोघे होते सम समचि ते बुद्धिनें वा वयानें ॥ १ ॥
भद्रायूते सरलिं मग तीं वर्ष बाराहि पूर्ण ॥
मातेची हो बहुताचि तरी नित्य सेवा जपून ॥
दोघांनींही किति तरि ह्मणूं पुण्य हो पूर्वि केलें ॥
आला योगी पुनरपि तिथें पाहतां नम्र झाले ॥ २ ॥

## साकी

नयनाश्रूनें चरण क्षालुनी केशावसनें पुसिलें ॥
स्नेह सुगंधित अंगा लावुनि योगी पूजन केलें ॥
वारंवार नमिती ॥ शिव शिव शिव शिव मुखि ह्मणती ॥ १ ॥
तुझ्या प्रतापें करुनी देवा पुत्रवती मी झालें ॥
दीना नाथा पदरिं घेउनी धन्य तुवा रे केलें ॥
त्यावरि तो योगी ॥ नीती बाळा प्रति सांगी ॥ २ ॥

## कटाव

श्रुतिस्मृति पुराणोक्त पाही ॥ धर्मनीति तूं वर्तत जाई ॥ माता पिताही गुरु-च्या पायीं ॥ सदा ठेवि निष्ठा हृदयीं ॥ गोब्राह्मण प्रजाजनाही ॥ प्रेमेंकरु-

नी पाळित जाई ॥ सर्वांभूतीं शिव तो पाही ॥ स्वधर्म आपुला तूं सहसाही ॥ सोडुं नको बा संकट समयीं ॥ तोच तुझा रे बंधु सखाही ॥ विचार केल्या वांचुनि तूंरे ॥ आणाक्रिया ती करूं नकोरे ॥ मागें पुढेंही पाहुनि बारे ॥ शद्ब बोल तूं कुशलपणें रे ॥ काळ कोण हा मित्र कितीरे ॥ कोण द्वेषी शत्रु कितिरे ॥ आय काय तो खर्च कितीरे ॥ स्वबळ किती हें आधिं पाहिरे ॥ कसें वर्तती सेवक सारे ॥ देतिल यश वा अपेश ते रे ॥ याचा मानें तूं विचार करिरे ॥ देव अतिथी वेद मित्र ते ॥ स्वामी विद्या अग्निहोत्र तें ॥ पशू कृषि धन आप्त बंधु ते ॥ पत्नी बालक अरि दासाते ॥ गृह वार्ताही दुष्ट रोग ते ॥ उपेक्षूं नको बा इतक्यांतें ॥ करतिल ते बा हानी तूंते ॥ साधू संता भोजन देई ॥ अशिर्वाद बा त्यांचा घेई ॥ १ ॥

## पद.

(भला जन्म हा,) या चालीवर

ज्या पंथें ते बुधजन गेले तोंच मार्गरे खरा ॥
माता पिता यतिनिंदा न करा ॥
वैश्वदेवही करतांना जर अतिथी येई घरा ॥
नको पुसूं याती त्या नरावरा ॥
अन्नवस्त्र तें सर्वाभूतीं देउनि साधी हरा ॥
आत्मा शिव मनीं समज धरा ॥
परोपकार तो नित्य करावा परपीडा नच करा ॥
गोब्राह्मण रक्षण मानें धरा ॥
निंदा वाद तो करूं नकोबा शिवहरा नित्य स्मरा ॥
तो तुह्मां नेइल पैल तिरा ॥
परधन दारा वमन समजुनी पाहुनको चातुरा ॥
शास्त्रश्रवण विचार तो तारे करा ॥
स्नान होम जप अध्ययनाचे पंच यज्ञ नित्य करा ॥
तेथें आळस नको बा जरा ॥
सूरत निद्रा भोजन करण्या नियमित पण तें धरा ॥
दान कराया उशीर नच करा ॥ चाल ॥

NATIVE GENERAL LIBRARY, KHED, (POONA) सार्वजनिक वाचनालय खेड, (पुणे)

काम पूर्ण तो वा धर्मपत्निशीं करी ॥
परयोषितेशीं निषिद्ध जाणे तरी ॥
शत्रूला दंडी घेउनि शस्त्राचि करीं ॥ चाल ॥
साधू मित्र सदां नमावें द्वेषिया दंड बरा ॥
नको मनिं आणूं परि मत्सरा ॥
निरहंकारें द्विज सेवावे अहंकार तो जरा ॥
दावुनि पृथ्वी जिंकी नरा ॥ १ ॥

## पद.

( निरक्षीरा लिंगन रूपी, ) या चालीवर.

वाणि सदां ती तुझी असावी सावध ती वा शिव स्मरणीं ॥
पाणी सार्थक दानें करुनी पाद योजि यात्रा गमनीं ॥
कर्ण लावि तूं पुराण श्रवणीं नेत्र लावि तूं शिव ध्यानीं ॥
जिव्हेनें तें स्तोत्र वर्णि तूं निर्माल्य वास घे घ्राणीं ॥
संत जनाला आलिंगी तूं ये रितीं लागे तूं भजनीं ॥
मनीं कृपा ती सदां असावी दीनानाथा देखूनी ॥
संत जनासी नम्र असावें देव द्वेष दे सोडूनी ॥
भोजन निद्रा युक्त असावी मृगया करि तूं बहु जपुनी ॥
विद्या मैत्री पुण्य स्मृती ती धैर्य असावें फार मनीं ॥
आयुष्य गृह छिद्र मंत्र तो मैथुन औषध तव करणी ॥
दानमान अपमान सर्वहीं गुप्त ठेवि तूं हें जाणी ॥
पाखांडी शठ धूर्त नष्ट ही अनृत वदती जे वाणीं ॥
चंचल कपटी नास्तिक जारही ग्राम्य सभेसी नच आणी ॥
शिवनिंदक वा भक्ती छेदक पीडिति जना जे मार्गानीं ॥
मद्यपानिही गुरुतल्पक जे पाहुं नको ते तूं नयनीं ॥ १ ॥

## कामदा.

( या चालीवर. )

पलि द्रव्य तें पुत्र पाहुनी ॥ भुलुनकोस तूं आपले मनीं ॥
वसुनि दूर संसार तूं करी ॥ सक्तता नको फार अंतरीं ॥

बंधु सोयरे श्वशुर आप्तही ॥ यास मिताचि तूं दावि स्नेहही ॥
दृष्टि जें पडें लोभ त्यावरी ॥ दाखवूं नको फार तूं तरी ॥ १ ॥

## दिंडी.

कंठि घाली रुद्राक्ष सदोदीत ॥ नको सोडूं शिव भजन संकटांत ॥
शिवकवच तें सर्वही त्यास सांगे ॥ भस्म मंत्रुनि बालास लावि वेगें ॥ १ ॥
नित्य जप हा मंत्र तूं मुखीं बाळा ॥ तुला पाहुनि भीति ये कळीकाळा ॥
आततायी ब्रह्मघ्न यास मारी ॥ दुष्टलोकांना नको देउं थोरी ॥ २ ॥

## साकी.

सोमवार शिवरात्र प्रदोषहि प्रेमें आचरि बाळा ॥
शिवहरि कीर्तन निदोंषाचि तें नको देउं त्या टाळा ॥
श्रवणचि करण्याला ॥ करिल दूर भवपाशाला ॥ १ ॥
महापर्वि वा कुयोगदिनीं वा श्राद्ध दिनीं व्यतिपातीं ॥
संक्रमणीं वा वैधृतीला मैथुन जे जे करिती ॥
जाती नरकाला ॥ नाहीं मुक्ती मग त्याला ॥ २ ॥
सत्पात्रीं तें दानचि द्यावें अपात्रिं नच तूं देई ॥
अपात्रीं तरी दान दिल्यानें दरिद्र खचितचि येई ॥
गुरुमुखें श्रवण करी ॥ शास्त्र पुराण कीर्तन तरी ३ ॥
पूज्यांचा अपमान करूनी अपूज्य त्यांचा मान ॥
ऐसें करितां दुर्भिक्ष भयहि अथवा येइल मरण ॥
स्पर्धा बलवंता ॥ करतां तें द्वार अनर्था ॥ ४ ॥
दानें शोभे हस्त सदा तो कंकण मुद्रा भार ॥
पुराण श्रवणें श्रोत्र धन्यचि नलगे कुंडल थोर ॥
देइन वा नाहीं ॥ एक बोल असो सदांही ॥ ५ ॥

## अंजनीगीत.

प्रेमळ वाणी सदां जयाची ॥ भार्या सुंदर कुलिन चालिची ॥
वसते इच्छा औदार्याची ॥ तोच जगीं धन्य ॥ १ ॥

आपत्कालीं धैर्य धरीरे ॥ वादी जयवंत वैखरीरे ॥
युद्धीं दाखिव शूरपणारे ॥ याचक तृप्त करी ॥ २ ॥

## पद.

( गजानना दे दर्शन सत्वर, ) या चालीवर.

आप्तजनासह भोजन करणें ॥ उत्तम भोजन त्यासचि ह्मणणें ॥
वाजि गजासह वाट चालणें ॥ श्रेष्ठ पंथ तो होय ॥
ज्या लिंगाचें नाहीं पूजन ॥ पूजी त्याला तेथें जाउन ॥
अनाथ प्रेता नयनीं पाहून ॥ संस्कार त्या देणें ॥
ब्रह्मद्वेष तो करूं नको बा ॥ काळकूट तें वीष असें बा ॥
सत्समागम नित्य करी बा ॥ सुधारस तुच्छ तो ॥ १ ॥

## अभंग

प्रताप तुझा तो गेला दूर जरी ॥ गर्व नको तरी मनीं आणूं ॥
आनंद मनीं तो सदां वसो तुझ्या ॥ चित्त बोला माझ्या तुवां द्यावें ॥
पराची सुवार्ता ऐकुनि जो सुखी ॥ सर्वांच्या तो मुखीं भला भला ॥
पाषाणाचीं रत्नें व्यर्थ तीं रे बाळा ॥ कारण कलहाला कलीं मध्यें ॥
अन्नोदक दोन सुभाषित एक ॥ औदार्य तें चोख रत्न जाणी ॥
कोणाचेंही वर्म न यावें वदनीं ॥ सदा शिवभजनीं काळ जावा ॥
जरी भाग्य आलें अमूप तुजला ॥ स्वधर्म आपला सोडूं नको ॥
मनीं नको आणूं विरोधी पूर्वींचा ॥ पारे विश्वास तयाचा धरूं नको ॥
गर्भिणी जशीरे पाळि ती गर्भाला ॥ तेंवी तूं प्रजेला सदां रक्षी ॥
गुरू आणि शंभू असे एक मानी ॥ भेद नको मनीं आणूं दुजा ॥
उत्तम स्वरूप नराची ती शोभा ॥ स्वरूपाची शोभा सद्गुण तो ॥
अलंकार गुणाचा असें तो रे ज्ञान ॥ ज्ञानाचें भूषण क्षमा शांती ॥
कूल शिल विद्या धन राज्य तप ॥ यौवन वा रूप मद आठ ॥
अष्टमदें तूं बा भुलो नको मनीं ॥ बलवंत करणी मनीं ठेवी ॥ १ ॥

## साकी.

या या परिनें शिव योगी तो बोधचि करितां झाला ॥
हा बोध जे नित्य ऐकती तेच जिंकिती कलिला ॥
तया न्यून न कांहीं ॥ सदां शंभू उभा राही ॥ १ ॥
हा अध्याय गिरि कैलासचि यावरि शंभू राहे ॥
पारायण तरि नित्य करूनी प्रचीत याची पाहे ॥
चिंतित तें पुरती ॥ सकळ जगीं धन्यचि होती ॥ २ ॥
अध्याय तरी हिमाचलचि हा भक्ति भवानी कन्या ॥
पयःफेन तो वरूनि तिजला करितां झाला धन्या ॥
श्वशुर गृहीं राही ॥ भक्तीनें अनुभव पाही ॥ ३ ॥

## अंजनीगीत.

पंढरिनाथा भवभय भंगा ॥ तूं तरि धरशी मस्तकिं लिंगा ॥
कुमती माझी जाउनि भंगा ॥ सुमती ती व्हावी ॥ १ ॥

## पद.

( कृपाघन भक्तीं आकळिला, ) या चालीवर.

महेश्वरा कोठें तरी रमला ॥ अहर्निशीं मी ध्यातों तुजला ॥ धृ० ॥
भवनदि मजला बुडवूं पाहे ॥ तारू होउनि तारी मजला ॥
धांव धांव तूं गिरिजारमणा ॥ दास तुझा हा संकटिं बुडला ॥
हीन दीन मी भक्त तुझारे ॥ ह्मणुनी कां तूं त्यागिसि मजला ॥
हीनपणा हा काढुनि टाकी ॥ बलवंता मी शरणचि तुजला ॥ १ ॥

NATIVE GENERAL LIBRARY, KHED, POONA
सार्वजनिक वाचनालय
खेड, (पुणें.)

## अध्याय ८ वा.

### श्लोक

( पृथ्वीवृत्त. )

उमापति शशीधरा किति तरी तुझा प्रार्थु मी ॥
दयोदधि तुझा कसा सकळ जाहला तो कमी ॥
तुझे चरण पाहण्या बहुत मी असे घाबरा ॥
कृपा करुनि शंकरा झडकरी मला उद्धरा ॥ १ ॥

### साकी.

षष्ठाध्यायीं शिव कवचचि तें लेऊं शिकवी बाळा ॥
मृत्युंजयाचि तो मंत्र ह्मणूनी भस्म चर्चि अंगाला ॥
त्यावरि शिवयोगी ॥ दे वस्तू बाळालागी ॥ १ ॥
एक शंख मग दिधला त्यानें मूर्च्छित शत्रू नादें ॥
त्रिभुवनांतही ज्या सम नाहीं ऐसें खड्गचि तो दें ॥
पाहुनि खड्गाला ॥ शत्रू पडतिल धरणीला ॥ २ ॥
द्वादश सहस्र इभबळ बाळा होइल प्राप्तचि तुजला ॥
आयुरारोग्य होउनि तुजला विजयी होशिल बाळा ॥
पाळी मेदिनि ही ॥ जाइल किर्ती त्रिभुवनिं ही ॥ ३ ॥
भाग्यलक्ष्मि तव सदनिं वसावी मायालक्ष्मी हृदयीं ॥
दानलक्ष्मि करकमळीं राहो सौम्यलक्ष्मी ही देहीं ॥
वीरश्री दंडीं ॥ शत्रुस काळासम दंडी ॥ ४ ॥
शत्रूलक्ष्मी खड्गिं वसो ती सामराज्य तें विलसो ॥
विद्यालक्ष्मी सर्व काळ ही कमळासम ती विकसो ॥
सांगुनि त्या ऐसें ॥ योगी गुप्तचि झालासे ॥ ५ ॥

### आर्या.

भद्रायु पिता होता, वज्रबाहु दशार्ण देशिचा राणा ॥
ज्यानें कांता त्यजिली, घोर वनीं तोच हा तरी जाणा ॥ १ ॥

मागधेश हेमरथ हि, तेव्हां युद्धार्थ पातला वेगें ॥
नागवि देशाहि सगळा, आला राजास जिंकण्या रागें ॥ २ ॥
वज्रबाहु ते समयीं, वार्ता ऐकूनि शीघ्र धांवे तो ॥
दशदीन भूप लढले, झाला विपरीत फार शेवट तो ॥ ३ ॥
जित धरुनि वज्रबाहू, शत्रू नेतीच बांधुनी त्याला ॥
राजस्त्रियाहि धरिल्या, शत्रूला तोष तो बहू झाला ॥ ४ ॥

## साकी.

जिवंत धरिला वज्रबाहु तो रथीं घालुनी चाले ॥
राजस्त्रियाही प्रधान सारे बंदिवान ते केले ॥
वज्रबाहु बोले ॥ कैसें संकट हें आलें ॥ १ ॥

## दिंडी.

पुत्र बंधू वा कोणि नसे त्राता ॥ कोण मजला हो सोडवील आतां ॥
वाट कोणाची पाहुं तरी देवा ॥ दास तुमचा संकटीं त्वरित धांवा ॥ १ ॥

## पद.

( झाली ज्याची उपवर, ) या चालीवर.

वार्ता कळली भद्रायूला ॥ शत्रू नेती धरुनि पित्याला ॥ धृ० ॥
स्मरुनि मनीं मग गुरु चरणाला ॥ अंगीं लेई शिव कवचाला ॥
भस्म मंत्रुनी अंगाला तें ॥ लावुनि घेई कारें खड्गाला ॥
जननी चरणीं मस्तक ठेवी ॥ बोले शत्रू नेति पित्याला ॥
गुरू दास मी तूझा सुत जरि ॥ जिंकिन साऱ्या अरि वर्गाला ॥
आणिन ह्या तव चरणा पाशी ॥ आज्ञा देई लवकर मजला ॥
तुझ्या कृपेनें काळासी मी ॥ युद्ध करूनी दंडिन त्याला ॥
शरत्कालिच्या शशि सम माते ॥ मिळविन आतां धवल यशाला ॥
मातेच्या तो चरणीं माथा ॥ ठेवुनि मग तो निघतां झाला ॥ १ ॥

## पद

( धीर समीरे यमुनातीरे, ) या चालीवर.

पद्माकर सुत, सुनय, वीर तो संगें घेउनि मग चाले ॥ धृ० ॥
गरुडा सम ते सर्प शत्रुचा मार्ग काढिती त्या वेळें ॥
तेव्हां भासे जणूं लहु कुश ते राम सहाया कीं आले ॥
पायीं क्रमिती भूमी सत्वर चोज मला तें बहु गमलें ॥
शत्रुभार तो जवळ देखुनी भद्रायू तो त्यांना बोले ॥ १ ॥

## साकी

वज्रबाहु सम वस्तू चोरुनि तस्कर सम कां पळतां ॥
उभे तरीरे क्षणभर आतां क्षात्रपणा कां त्यजितां ॥
मजला जिंकूनी ॥ जावें मग त्या घेऊनी ॥ १ ॥
कर्ण नासिका कर चरणाते छेदिन तुमच्या आतां ॥
तस्करास हा दंड योग्यची नीचानो कां पळतां ॥
चोरुनि वस्तूला ॥ आतां जीवा सांभाळा ॥ २ ॥

## अंजनीगीत

अवघे जव ते मागे बघती ॥ बाळक दोघे तया दीसती ॥
विष्णू शिव कीं दोघे येती ॥ भक्ता करितां ते ॥ १ ॥
एक मृगांकाचि एक मित्र हा ॥ एक वातुकी भोगींद्राचि हा ॥
एक रुद्र तो महा रुद्र हा ॥ त्यांना ते दिसती ॥ १ ॥

## साकी.

बाणा मागें बाण सोडिते वर्षति घन ते जैसें ॥
वीरा अंगीं बाण खिळूनी भासति मयुरा ऐसें ॥
तेव्हां शत्रू ही ॥ सोडिति बाणाते पाही ॥ १ ॥

६४८६

## कामदा.

( या चालीवर.)

जलज वाजवी बाळ तो तरी ॥ नाद ऐकुनी शत्रु अंतरीं ॥
भिउनि जाउनी ह्मणति ते मनीं ॥ कोण नाहिं हो रक्षितां जनीं ॥ १ ॥
डळमळे मही नाद ऐकुनी ॥ फणिपतीसही भीति ये मनीं ॥
दशदिशाहि त्या भरुनि जाति हो ॥ दिग्गजासही कंप येइ हो ॥ २ ॥

## दिंडी.

शंख नादें मूर्छीत शत्रु झाले ॥ भान त्यांचें सर्व ही लया गेलें ॥
रिते रथ ते धांवती दिशा दाहीं ॥ घेइ त्यांतुनि शोधून एक तो ही ॥ १ ॥
रथीं दोघे बैसूनि बाण मार ॥ शत्रुवर ते करतीहि झोड फार ॥
वज्रबाहूचे वीर बघुनि बाळा ॥ ह्मणति कैवारी कोण कसा आला ॥ २ ॥
पाठिराखा देखिला नयनिं जेव्हां ॥ धैर्य आलें फारची त्यास तेव्हां ॥
मिळुनि त्यांनीं छेदिला शत्रु भार ॥ शेष दळ तें पळतसे फार दूर ॥ ३ ॥
प्रधानासह तो वज्रबाहु पाही ॥ मनीं बोले कोण हो अले हे ही ॥
हरीहर हे दीसती तरी माते ॥ बाळवेषें धांवले रक्षणाते ॥ ४ ॥
एक गुरुनें शिकविले दिसे पूर्ण ॥ असे विद्या दोघांत सम समान ॥
राज नंदन पाहुनी प्रेम दाटें ॥ आप्त माझा तो असें मला वाटें ॥ ५ ॥

## साकी.

भद्रायूच्या मारानें ते शत्रू जर्जर झाले ॥
समर भूमि ती थोर माजली अपपर नाहीं कळलें ॥
हेमरथहि आला ॥ धांवत समरचि करण्याला ॥ १ ॥
हेमरथाला जर्जर केलें दोघा बाळांनीं हो ॥
हनुमान भीम समाचि भासले तेव्हां त्याला ते हो ॥
पाहुनि तरि त्यांतें ॥ शत्रू थरथर कांपति ते ॥ २ ॥
भद्रायू तो शेवटिं काढी खड्ग दिले जें गुरुनें ॥
काळाग्नी वा काळ सर्प सम हातीं धरिलें त्यानें ॥
पाहुनि तेजातें ॥ शत्रू भस्मचि होती ते ॥ ३ ॥

हेमरथाला वार्ता कळली शस्त्र नव्हे रे काळ ॥
पवन गती तो पळूं लागला घेउनि दळ तात्काळ ॥
पाहुनि त्या नयनीं ॥ भद्रायू जातचि धांवूनी ॥ ४ ॥

## पद.

( माझ्या मनिंचें हित, ) या चालीवर.

हेमरथाचे केश धरूनी ओढुनि तो नेला ॥
लत्ता प्रहार हृदयीं देतां अशुद्धचि ओकला ॥ धृ० ॥
प्रधान सह तो रथीं बांधुनी वज्रबाहु सोडिला ॥
त्याचे शिरि ते पाट काढिले घेउनि शस्त्राला ॥
अर्धखांड ही अर्ध मिशी ती काढी त्या वेळां ॥
ज्या ज्या वस्तू अणिल्या त्यानें जिंकुनि राज्याला ॥
त्या त्या वस्तू हिरुनि घेउनी सोडी अबलाला ॥
भद्रायू तो धांवत जाउनि वंदी ताताला ॥ १ ॥

## दिंडी.

कोण तूं तें सांगरे मला बाळा ॥ अपेशाचा डाग त्वां दूर केला ॥
शत्रुवन्ही जाळीत मला होता ॥ मेघरूपी झालासि मला त्राता ॥ १ ॥

## श्लोक

आला काय तरी उमा हृदय जो भक्तास तारावया ॥
किंवा येत रमापती झडकरी पाहूनि दुःखास या ॥
दोघे बाळ मला तसेच दिसती कांहीं नसे न्यून हो ॥
धांवूनी धरती कुमारचरणा राजस्त्रिया सर्व हो ॥ १ ॥

## दिंडी.

मुखावरुनी उतरती निंबलोण ॥ जाउं ओवाळुन सर्व तुज वरून ॥
ह्मणे भद्रायू तुह्मी नगरिं जावे ॥ बंदि घालूनी शत्रुते जपावें ॥ १ ॥

## आर्या.

नगरांत पिता नेउनि, बसवी मग नृपपदींच तो त्याते ॥
वाद्यें बहु वाजविती, झाला आनंद फार सर्वांतें ॥ १ ॥
जन धांवति भेटाया, पाहुनि त्या वज्रबाहु तो बोले ॥
त्याला तुह्मी नमावें, ज्यानें मज संकटांत रक्षियलें ॥ २ ॥
भद्रायू मग सांगे, शत्रूते करा बहूत हो जतन ॥
दिवसत्रय होतांची, येइन मी खचित जाण परतून ॥ ३ ॥
कळेल तेव्हां तुह्मा, कोणाचा कोण मी तरी आहे ॥
बोलुनि ऐसें दोघे, रथारूढ जाहलेच ते पाहे ॥ ४ ॥
येउनि गृहास सत्वर, मातेचे चरण वंदितां झाला ॥
पाहुनि दोघा नयनीं, होई आनंद फार मातेला ॥ ५ ॥

## साकी.

शिवरूपीं तो योगी त्यावरि चित्रांगद राजाला ॥
भेटुनि सांगें भद्रायूचें वर्तमान तें त्याला ॥
बाई सिमंतिनी ॥ ऐके प्रताप हो कानीं ॥ १ ॥
जिंकुनि शत्रू पिता सोडिला अकस्मात धांवूनी ॥
थोर प्रतापचि त्यानें केला असुनी लहान अज्ञुनी ॥
शिव भक्तां रत तो ॥ सदां नामावळी गातो ॥ २ ॥
जामात करा अर्पुनि त्याते कीर्तिमालिनी कन्या ॥
जगत्रयीं हो कीर्ति होउनी ह्मणातेल तिजला धन्या ॥
योगी वचनाते ॥ ऐकुनि वंदिति चरणाते ॥ ३ ॥
तुझें वचन तें प्रमाण आम्हा आणा वर तो आतां ॥
सैन्य सर्व तें सिद्ध करूनी झाला मग पाठवितां ॥
वैश्य नगराला ॥ भद्रायूस आणण्याला ॥ ४ ॥

## श्लोक.

ऐकून वार्ता मग तो निघाला ॥ पद्माकराला बहु तोष झाला ॥
देऊनि पुत्रा मग शीघ्र जाई ॥ संपत्ति संगेंहि अपार घेई ॥

चित्रांगदाला बहु तोष झाला ॥ घेऊनि गेला मिरवीत त्याला ॥
जोडा तरी हा बहु योग्य आहे ॥ पाहूनि रूपा जन बोलती हे ॥ १

## दिंडी.

महीपालहि लग्नास सर्व आले ॥ वज्रबाहूही येत तयें वेळें ॥
नयनिं जेव्हां पाहिलें वरातें हो ॥ हाच कैवारी असें जाणिलें हो ॥ १ ॥

## पद.

( बघुनि उपवना विरहाग्नीची ) या चालीवर.

भद्रायूचे चरण नमाया धांवत तो चालला ॥
भद्रायूनें वरचे वरतो उचलुनि त्या कवळिला ॥
दोघांचेही कंठ भरूनी गहिवर तो दाटला ॥
आनंदाचा पूर येउनी नयनांतुन चालला ॥
वज्रबाहु मग वरा पुसतसे देश कोणता मुला ॥
जनक जननि ही गोत्र गुरू तो सर्वचि सांगे मला ॥
एकांतीं मग तया नेउनी चित्रांगद बोलला ॥
शिवोपासना यानें केली शिवयोगी पावला ॥
त्याचा महिमा हा तरि पाही धूर्जटि तो भेटला ॥
पदरीं होतें पुण्य ह्मणोनी प्रसन्न शिव जाहला ॥
मागिल वृत्तहि तया कळवुनी आणी मग भेटिला ॥
सुमती राणी नयनीं पाहुनि अधोवदन बैसला ॥ चाल ॥
ऐसें निधान म्यां घोर वनीं टाकिलें ॥
पदरीं पुण्य जरी असें रत्न नच मिळें ॥
गत गोष्ट आठवुनी नयनीं जल चाललें ॥ चाल ॥
सुमती राणी शोक करी बहु स्मरुनी गत गोष्टिला ॥
मागुति वदली सुदिन आजिचा शंकर मज पावला ॥ १ ॥

## दिंडी.

सिमंतिनिनें मग ऐक्यवाद केला ॥ नको आणूं तूं मनीं पूर्व बोला ॥
सुमति राणीला वज्रबाहु बोले ॥ सर्वपरीं मी अपराध बहू केले ॥ १ ॥

क्षमेला हा पात्र गे नसे कांहीं ॥ क्षमा करुनी परि तूंचि धन्य होई ॥
बिंदुचा तो सिंधूच करुनि त्वांगे ॥ दाखवीला मजलाच सखे तो गे ॥ २ ॥

## साकी.

उद्धार तुवां माझा केला धन्य तुझें गे कृत्य ॥
पुत्र मुखाही तूंचि दाविलें राज्य तुझें हें सत्य ॥
ऐसें बोलोनी ॥ त्वरित निघाला तेथूनी ॥ १ ॥
भद्रायुही त्वरित धांवुनी वंदी पद ताताचे ॥
कुरवाळिति मग परस्परातें दिसती शिव गुह साचे ॥
किंवा कच येतां ॥ होई तोषचि तत्ताता ॥ २ ॥
अवघ्राणुनी मस्तक त्याचें अंकीं घेई त्याला ॥
दक्षिणांकि ती कीर्तिमालिनि पाहुनि सुख हो त्याला ॥
समस्त नृप वदती ॥ धन्य धन्य तूं वा नृपती ॥ ३ ॥

## अंजनीगीत.

पद्माकर मग वज्रबाहुला ॥ सुनय सुतासह त्यास भेटला ॥
बहु आनंद तो त्यास जाहला ॥ न वर्णवे माते ॥ १ ॥
चार दिवस तें लग्न जाहलें ॥ अपार धनही आंदण दिधलें ॥
याचक सारे तृप्तचि केले ॥ चित्रांगद भूपें ॥ २ ॥
सर्व घेउनी कीर्तिमालिनी ॥ पद्माकर सह जात तेथुनी ॥
निज नगराला सर्व तेक्षणीं ॥ जाते झाले हो ॥ ३ ॥

## पद.

( नको कचा निशीं बाहेर जाऊं, ) या चालीवर.

वज्रबाहुचा तोष माइना गगनगर्भि तो त्या काळीं ॥ धृ० ॥
सर्व करूनी अधिन सुमतीच्या पट्टराणि ती मग केली ॥
शत्रु सर्व ही अंकित करुनी सोडुनि दिधले त्यावेळीं ॥
करभार त्यास नेमुन देउनि जिवदानें हो त्या दिधलीं ॥
भद्रायू सम पुत्र व्हावया पुण्य पाहिजे बहु भालीं ॥

जन्मो जन्मीं शिवपूजा ती प्रेमभरें हो जरि घडली ॥
पतिव्रता स्त्री परम सुंदरी पुत्र मान्यता बहु झाली ॥
सर्वज्ञ गुरू उदार मोठा रत्नें दुर्मिळ हीं सगळीं ॥ १ ॥

## साकी

भद्रायूला राज्यीं बसवुनि वज्रबाहु तो गेला ॥
सुमतीसह मग हिमकेदारीं आचरि उग्र तपाला ॥
शेवटिं तो गेला ॥ उद्धरुनी मग स्वर्गाला ॥ १ ॥
भद्रायूनें मग बा केलें राज्य सुखानें पाही ॥
धन्य गुरू तो धन्य शिष्य हा उपमा द्याया नाहीं ॥
धारण भस्माचें ॥ पाठ करी शिवकवचाचे ॥ २ ॥
कीर्तिमालिनी संगें घेउनि एक वार तो गेला ॥
वनविहार तो करण्यासाठीं एका उद्यानाला ॥
पाहि वनश्रीला ॥ होई तोषचि चित्ताला ॥ ३ ॥

## दिंडी

केळि नारळि पोफळी खर्जुरी ती ॥ अशोक चंदनाहे तरू शोभताती ॥
निंब मलयागर आंब्र फणस भारी ॥ जांब पिंपळ डाळिंब उष्ण वारी ॥ १ ॥
अंजिरौदुंबर पारिभद्र ऐसे ॥ गगन भेदिति कीं काय असें भासें ॥
सघन शीतळ पाट ही वाहताती ॥ सूर्य किरणा विश्रांति तिथें होती ॥ २ ॥

## पद.

( गजानना दे दर्शन, ) या चालीवर.

जाइ जुई ती मालति शेवती ॥ गुलाब चंपक बकुळ हि दिसती ॥
द्राक्षाला ते घोंस लोंबती ॥ शोभा देती ते ॥ १ ॥
नागवेलि ही कनकवेलि ती ॥ पोवळवेली जायफळी ती ॥
फळभारें ती फार शोभती ॥ सुवास तो चाले ॥ २ ॥
बदके चातक मयुर कोकिला ॥ चक्रवाक ते बघ त्या नकुला ॥

कस्तूरीमृग वासित शीला ॥ करती त्या वनिच्या ॥ ३ ॥
कीर्तिमालिनी संगें घेउनि ॥ क्रीडत असतां जळीं जाउनी ॥
अपूर्व तें तो देखे नयनीं ॥ दूरवरी तेव्हां ॥ ४ ॥

## साकी

ब्राम्हण पुढती कांता मागें ऐसी धांवत येती ॥
उर्ध्वकराते करुनी तेव्हां दीर्घस्वरें बोभाती ॥
राया रक्षीरे ॥ व्याघ्रें मजला धरिलेरे ॥ १ ॥
परम सकुमार लावण्यवती माझी कांता मागें ॥
राहिलि तिजला व्याघ्र भाक्षितो नृपा धांव वा वेगें ॥
धांव नृपालारे ॥ आणुनि देई कांता रे ॥ २ ॥

## श्लोक.

गजव्रज परिसूनी राव तो धांवला हो ॥
झडकरि तरि लावी चाप संधान तो हो ॥
विजुसम शर सोडी व्याघ्र तो मारण्या हो ॥
नच गणि परि जाई घेऊनी स्त्रीस तो हो ॥ १ ॥

## श्लोक

( अनुष्टुप. )

राया पुढें येउनी तो ॥ आक्रोशें शोक हो करी ॥
राया समक्ष तुझिया ॥ घडली गोष्ट ना बरी ॥ २ ॥

## पद.

( नकळे होइल गति कैशी. ) या चालीवर.

कांते सोडुनि तूं मजला ॥ गेलिस काय तरी ॥ धृ० ॥
तुजविण मजला गृह हें शून्य ॥ सखे भासतें जेवि अरण्य ॥
तोषित करण्या कोणि न अन्य ॥ कैसा धन्य हो तरी ॥
तुजविण आतां काय जगून ॥ व्यर्थ भासतें तुज वाचून ॥

जातों आतां जग सोडून ॥ मी वांचुन काय करूं ॥
देखुनि राया तुजला फार ॥ केला शोकाचि तो अनिवार ॥
राया धांवुनि ताप निवार ॥ झाला भार व्यर्थ परी ॥ १ ॥

## पद

(भला जन्म हा तुला.) या चालीवर.

क्षात्र कुळीं तूं जन्म पावुनि डाग कसा लाविला ॥
शरणागत दूर कसा दवडिला ॥ धृ० ॥
गुरुनें तुजला खड्ग दिलेना? काय तरी पाहुनी ॥
धिःकार असो तुज लागुनी ॥
द्वादश सहस्र बळ नागाचें मंत्रास्त्र सर्व तरी ॥
दिसतो भाराचि देहावरी ॥
धिक् आश्रम तो धिक् श्रोता तो धिक् वक्ता मानिती ॥
जे शंकरास कधिं न पूजती ॥
संतति संपति व्यर्थ जाण तरि जो न रक्षि द्विजवरा ॥
धिःकार असो ऐशा नरा ॥ चाल ॥
पतिव्रता नाहीं नारी ती पापिणी ॥
पुत्र नव्हे तो जननीस करी जाचणी ॥
धिक् शिष्याचि तो न नमी गुरु पाहुनी ॥ चाल ॥
जननीला कां त्रास दिलासी व्यर्थ भार वाहिला ॥
आतां ती काय म्हणेल रे तुला ॥ १ ॥

## अंजनीगीत

निस्तेज मुख तें भद्रायूचें ॥ झालें ऐकुन बोल तयाचे ॥
अधोवदन तो करूनी वाचें ॥ बोले विप्राला ॥ १ ॥

## दिंडी.

तुला देइन मी इच्छिलेंच आतां ॥ करी पुढती तूं रूपवती कांता ॥
ना तरी बा तूं राज्य घेइ माझें ॥ विप्र बोले कासया राज्य तूझें ॥ १ ॥

## पद.

( शंकित कां होसि ) या चालीवर.

नलगे लग्नचि तें ॥ रायारे ॥ धृ० ॥
स्त्रीहीनाला साधन कैसें जगीं नसें त्या सुख तें ॥
अंधा पुढती दर्पण धरणे व्यर्थ जसें तें दिसतें ॥
संन्यासचि तो तरुणा देणे वा मूढा ग्रंथचि ते ॥
वृद्धपणीं तें लग्न व्यर्थची जैसें वृत तृप्तिताते ॥
क्षुधिताला त्या व्यर्थ अक्षता वा गंधाचे तें त्याते ॥
चिंतातुराला गायन व्यर्थचि तैसें राज्यचि माते ॥
यास्तव राया आणुन देई झडकरि मम कांतेते ॥ १ ॥

## अंजनीगीत.

माझी कांता कीर्तिमालिनि ॥ जा वा विप्रा तिला घेउनी ॥
दुसरि गोष्ट ती न दिसे नयनीं ॥ दिधली मी तुजला ॥ १ ॥

## पद.

( उरला भेद न ज्या कांहीं, ) या चालीवर.

नाहीं पापचि या देहीं ॥ मग तें भय कोठें राहीं ॥ धृ० ॥
घेइन मी तव कांतेला ॥ नाहीं भीतचि पापाला ॥
मम तप लाजवि मेरूला ॥ उंचचि गेलें शिखराला ॥
ढेकुळ काय सागराला ॥ डहुळिल पडुनी तें त्याला ॥
आकाश न मळें धुळिनेंही ॥ तैसा पवित्र मी पाहीं ॥ १ ॥

## साकी

मम बळ गेलें व्याघ्रानें जैं द्विजांगनेला नेलें ॥
आतां कांता विप्रा अर्पुनि भक्षिन मी या वेळें ॥
अग्नी काष्टें तीं ॥ अश्रू नयनीं बहु येती ॥ १ ॥

करुनि संकल्प विप्रा हातीं कीर्तिमालिनि दिधली ॥
विप्र ते क्षणिं गुप्त जाहला नृपें चिता पेटविली ॥
जाती त्या ज्वाळा ॥ वाटे भेदिति गगनाला ॥ २ ॥

## दिंडी

करी भद्रायू स्नान तये वेळीं ॥ चर्चि अंगाला भस्म तसें भाळीं ॥
करी धारण रुद्राक्ष सर्व देहीं ॥ गुरू चरणाते आठवीत राही ॥ १ ॥
शंकराचें नाम तें मुखीं घेई ॥ ह्मणे देवा काय ही वेळ येई ॥
प्रदाक्षिणाहि त्या करुनि तीन वेळा ॥ अग्निकुंडाच्या समिप उभा ठेला ॥२॥

## श्लोक.

जयजया गिरिजावर शंकरा ॥ जयजया मदनांतक ईश्वरा ॥
जयजया शरणागत वत्सला ॥ झडकरी पादें ने तारे तूं मला ॥ १ ॥

## साकी.

नमःशिवाय ह्मणुनी जेव्हां उडी टाकी तो लागे ॥
गिरिजे सह तो कपालमाळा प्रगटाचि होई वेगें ॥
त्या कुंडांतुन ता ॥ जो भक्ता रक्षण करितो ॥ १ ॥
भाके दखुना प्रसन्न झालों इच्छित मागे बाळा ॥
विप्र स्त्री तार आगुन दे जरी प्रसन्न तूं मजला ॥
देवा दासाचा ॥ दूर करी डागाचि साचा ॥ २ ॥
व्याघ्र मीच तो विप्र मीच तो भवानि घेउनि गेलों ॥
भाक्त तुझी वा बघण्यासाठीं प्रकटाचि आह्मी झालों ॥
घ कीर्तिमालिनि ॥ ही आपली तूं भामिनी ॥ ३ ॥

## अंजनीगीत.

सुरगण सारे सुमनें वर्षाते ॥ शिव चरणा ते दोघे लागाते ॥
शिव नामात अंतरीं ध्याती ॥ होती लीन तरी ॥ १ ॥

## दिंडी

अपेक्षित तें मागुनी घेइ बाळा ॥ दिलें तुजला इच्छिलें याच वेळा ॥
वज्रबाहू तो पिता सुमति माता ॥ तसा पद्माकर तशिच त्याचि कांता ॥
ह्यास देई ठाव रे जगन्नाथा ॥ पार्श्व भागीं ठेवि रे त्यास ताता ॥
कीर्तिमालिनि इच्छिलें माग आतां ॥ तात चित्रांगद सिमंतिनी माता ॥
तुझे जवळीं राहोत शूलपाणी ॥ सदां यावें हें रूप तया ध्यानीं ॥
उभयतांनीं जें काय इच्छियेलें ॥ सर्व तें मी दीधलें याच वेळे ॥

## आर्या

भद्रायूनें केलें, संगें घेऊन कीर्तिमालिनि ती ॥
राज्य सुखानें तेव्हां, किति वर्षें यास हो नसे गणती ॥ १ ॥
वज्रबाहु सुमती ती, चित्रांगद तो सिमंतिनी राणी ॥
स्त्रीसुतसह पद्माकर, गेले स्वर्गास बैसुनी यानीं ॥ २ ॥
भद्रायूला नेलें, कीर्तिमालिनी सहीत स्वर्गास ॥
श्रीशंकरें मग दिली, मुक्ती ती हो क्षणांत सर्वांस ॥ ३ ॥

## साकी.

भद्रायूचे आख्यानातें नित्य करिति जे पठण ॥
विजयी नर ते सदां सर्वदां होइ सदां कल्याण ॥
कीर्ति दूर जाई ॥ लिहितां परम सूख होई ॥ १ ॥

## दिंडी.

पुण्यकारक ही कथा तुह्मी जाणा ॥ पद रचना तारि बिल्वदळें माना ॥
शंकराला भक्तिनें अर्पितांही ॥ भवनदींतुनि ते सहज तरति पाही ॥ १ ॥
कीं कथा ही कैलासगिरी मानी ॥ करी पारायण स्मरुनि मुर्ति ध्यानीं ॥
सर्व संगहि तोडील गिरीराणा ॥ ह्मणुनि मदनारी नित्य मनीं आणा ॥ २ ॥

## अंजनीगीत.

ब्रह्मानंदा गिरिजा रमणा ॥ बाळकृष्ण हा नमितो चरणा ॥
प्रसन्न होउनि भवभय हरणा ॥ सुमती ती द्यावी ॥ १ ॥

## पद.

( तूं माझा यजमान, ) या चालीवर.

करि मजला भव पार ॥ शंकरा करि मजला भव पार ॥ धृ० ॥
काम क्रोध हे जाचिति मजला ॥ होतो त्रासचि फार ॥
अविद्येनें फार पीडिलें ॥ नलगे हा संसार ॥
संसारार्णव जाळूं पाहे ॥ यांतुनि मजला तार ॥
बाळकृष्ण हा दास तुझा रे ॥ नमितो वारंवार ॥ १ ॥

GENERAL LIBRARY

NATIVE GENERAL LIBRARY, 1807
सार्वजनिक वाचनालय
खेड, (पुणें.)

# अध्याय ९ वा.

## श्लोक

बुडेन भवसागरीं जरि तुला नये बा दया ॥
किती तरि तुला स्तवूं शशिधरा हरावें भया ॥
असंख्य तरले पदीं शरण येति जे पापिरे ॥
असें असुनि शंकरा मजविशी दया कां सरे ॥ १ ॥

## साकी.

शिवनामाचा घोष निरंतर पुनर्जन्म मग कैचा ॥
कळीकाळ तो त्यांनें जिंकिला करि जप शिवनामाचा ॥
तुजला तारक तो ॥ अंतीं पदास मिळवीतो ॥ १ ॥
धनेच्छा जशि प्रबळचि असते तैशी होवो नामीं ॥
किंवा विषयीं असाक्ति दावी असतो नर जो कामी ॥
तैशी हो नामीं ॥ नेइल मग ती शिव धामीं ॥ २ ॥
धन्य धन्य ते समजा प्राणी जे रतती शिव ध्यानीं ॥
वामदेव तो ऐसा होता ऐक कथा ती श्रवणीं ॥
सूत शौनकाला ॥ वदती तें मी तुह्माला ॥ ३ ॥
शिवध्यानीं रत फिरे काननीं भेद रहित जो पाही ॥
वस्त्रादिशा ज्या भस्म चर्चुनी सदां दिगंबर राही ॥
शिवमय विश्वचि हें ॥ मानुनि जो हिंडत राहे ॥ ४ ॥

## श्लोक

अक्रोध वैराग्य क्षमा दया ही ॥ निर्लोभ दाता भय शोक नाहीं ॥
पंचेंद्रियें तीं वश ही जयाला ॥ ना मान इच्छी नच दुःख ज्याला ॥ १ ॥
कांता मुलें ही नलगेच कांहीं ॥ व्यासंग ज्याला कसलाच नाहीं ॥
मौनी न बोले शिव नाम घेई ॥ या मौन बोला इतरास काई ॥ २ ॥

## पद.

( भला जन्म हा तुला लाधला, ) या चालीवर.

अनुग्रहास्तव शंकर विचरे रूपें धरुनि ही बरीं ॥
जड जीव तारक व्हाया तरी ॥ धृ० ॥
कार्याकार्यंचि सारुनि कारण आत्मस्वरूपीं तदा ॥
पावे समाधान सर्वदां ॥
देहत्रय रहित विधिनिषेधहिन, प्रवृत्तिहुनि वेगळा ॥
निरंकुश जाणा तरि तो भला ॥
ब्रह्मारण्यीं मातंग फिरे तसा अभंगाचि दिसे ॥
ज्याला वेदहि वर्णींतसे ॥
गगनाहिं अंगा रुततें ह्मणूनी सारी दूरचि वरी ॥
हेतु दृष्टांत वर्जित तो तरी ॥
तेजाचें तें दाहकत्व हीं ज्यानें हो जाळिलें ॥
उर्वीचें कठिणत्वाहि मोडिलें ॥ चाल ॥
प्रभंजनाचें ही चंचलत्व पळविलें ॥
आर्द्रत्व काढुनी जीवन शुद्ध करविलें ॥
पिंड ब्रह्मांड हें जाळुनि भस्म चार्चिलें ॥ चाल ॥
जडभरतचि वा शुका सारिखा क्रौंचारण्यांतरीं ॥
देखे शिवरूपचि तो तरी ॥ १ ॥

## साकी

महा भयानक शरीर अद्भुत शेंदुर दिसतो भाळीं ॥
ळळलळीत ती जिव्हा मोठी मुखा बाहेरि आली ॥
बहु जीव भक्षिले ॥ अपरमित पापची केलें ॥ १ ॥
ऐसा पापी ब्रह्मराक्षसाचि हिंडत हिंडत गेला ॥
वामदेव तो नयनीं पाहुनि मिठी घालि कंठाला ॥
लोहें परिसासी ॥ होई सुवर्ण तें सरसी ॥ २ ॥

दुष्ट राक्षसा तैसें झालें माति त्याची ती फिरली ॥
असुर भाव तो दूर पळाला सत्ववृत्ति ती झाली ॥
वामदेव स्पर्शें ॥ राक्षस पवित्र झालासे ॥ ३ ॥

## पद

( दिसली पुनरपि गुप्त जाहली, ) या चालीवर.

पिशिताशन तो उद्धरिलासे अंगस्पर्शें करुनि जरी ॥ धृ० ॥
हें ही ज्याला भान नसे हो होति समाधी त्यास तरी ॥
सुख दु:ख तसें शीतोष्णाहि तें नच ठावें हो त्या शरिरीं ॥
निंदिति किंवा वंदिति हें ही नाहिं ठावकें त्यास तरी ॥
शरिरिं भोग कीं रोगाचे दारुण हें ही कळेना तीळभरी ॥
देशिं विदेशीं हें ही कळेना असा हिंडतो भूमिवरी ॥ पिशिताशन ॥ १ ॥

## साकी.

दिव्य रूप तो राक्षस होउनि लागे त्याच्या पायीं ॥
सहस्र जन्मापासुनि तेव्हां आठव त्याला होई ॥
जलपान मानसीं ॥ देई तेजचि काकाशी ॥ १ ॥
अमृत प्राशन करितां सहजचि देवपणा तो येई ॥
शशिकिरणानें चंद्रकांत तो द्रवुनी जैसा जाई ॥
तैसा उद्धरला ॥ राक्षस दिव्य रूप झाला ॥ २ ॥
तुझ्यां दर्शनें पावन झालों ज्ञानचि झालें मजला ॥
सहस्र जन्मिचा आठव झाला सर्व सांगतों तुजला ॥
पापें जीं घडलीं ॥ पंचवीस जन्माचीं सगळीं ॥ ३ ॥

## पद.

( दो दिवसाची तनु ही साची, ) या चालीवर.

गुरुवर्या मी दुर्जय नामें राजा होतों भूमिवरी ॥
यौवन मद जैं अंगीं भरला दुराचार मी फार करी ॥
ब्राह्मण सारे फार पीडिले गेले त्रासुनि बहुत परीं ॥

वेदशास्त्र मी तुच्छ मानिलें नाहीं केला धर्म तरी ॥
ब्रह्महत्यादि पापें केलीं नारि अणल्या बहु मंदिरीं ॥
नित्य नूतन स्त्रिया भोगि मी देश धुंडुनी बहुत परीं ॥
एकवार जी नारि भोगिली पुन्हां न पाहिलें वदन तरी ॥
बंदिं घालुनी रक्षण केल्या तळमळती त्या बहु अंतरीं ॥
मम भीतीनें विप्र सर्व ही जाति सोडुनी देश दुरीं ॥

## साकी.

अशा रितीनें किती भोगिल्या ऐका त्याहो नारी ॥
ब्राह्मण क्षत्रिय तीन चारशें वैश्य स्त्रिया किती तरीं ॥
दहाशतें जाणा ॥ शुद्राच्या सहस्त्र ललना ॥ १ ॥
चांडाळाच्या चारशतें त्या मांग कन्यका त्याही ॥
एक सहस्त्रचि चर्मक कन्या पांच शतें त्या पाहीं ॥
अगणित त्या कुलटा ॥ केला संचय बहु मोठा ॥ २ ॥
रजक महारिणि चार पांचशें तितुक्या वृषली नारी ॥
इतर वर्ण ते मज वदवेना गणना नच होइ तरीं ॥
इतक्या भोगोनी ॥ तृप्ति नसे हो कधीं मनीं ॥ ३ ॥

## दिंडी

मद्यपानाचा नित्य नियम केला ॥ नित्य भक्षी मी फार अभक्षाला ॥
असें होतां क्षयरोग मज झाला ॥ त्याच रोगानें मला मृत्यु आला ॥ १ ॥
दूत नेती बांधुनी मला जेव्हां ॥ मला नेऊनि लोटिलें नरकिं तेव्हां ॥
यम पुरीचें तें दुःख सांगवेना ॥ परी चरणीं सांगतां राहवेना ॥ २ ॥

## कटाव

ताम्रभूमि ती तप्त करूनी ॥ नेती देवा मज त्या वरुनी ॥ लोहस्तंभ ही तप्त करूनी ॥ मिठि मारविती त्या मज कडुनी ॥ कढई मध्यें तेल घालुनी ॥ तप्त कारिति तें आग्नि लावुनी ॥ बुडविति मजला त्यांत नेउनी ॥ नरक मूत्र ह्या मुखांत दोन्ही ॥ घालति माझ्या पापी ह्मणुनी ॥ महा क्षार ही रस आणूनी ॥ मुखीं घालिती मज पाडूनी ॥ तीक्ष्ण चंचुचे गृध्र येउनी ॥

मम नयन ते टाकिति फोडुनी ॥ कुंभीं पाकीं शिजविति घालुनी ॥ तप्त लोह दंड घालिति कर्णीं ॥ रेत कुंड ही ॥ रक्त कुंड ही ॥ त्यांत पचविती मजला पाही ॥ सांडस लावुनि माझ्या देहीं ॥ मांस तोडुनी क्षारोदक ही ॥ वरी शिंपती माया नाहीं ॥ जिव्हा नाशिक कर्ण पाद हीं ॥ तीक्ष्ण शस्त्रें छेदिति पाही ॥ अंगाचा तो भाता काढिती ॥ तप्त शस्त्र तें शिरीं रोविती ॥ शस्त्र घेउनी शिश्न छेदिती ॥ तप्त अर्गला गुदीं घालिती ॥ सर्व देहिं मग टिपऱ्या लाविती ॥ पाश बंधन सर्वेचि करिती ॥ चरणीं ग्रीवा नेउनि बांधिती ॥ बोटीं बोटीं सुया रोविती ॥ वृषणान्वें तें चूर्णचि करिती ॥ हातीं पायीं बेडि घालिती ॥ नरका मध्यें नेउनि टाकिति ॥ वर्षें सहस्त्र त्यांतचि ठेविती ॥ बाहेर काढिती ॥ दात पाडिती ॥ ग्रीवेसी मग पाश घालिती ॥ आपली विष्टा खा खा ह्मणती ॥ देहाचे ते तुकडे करिती ॥ शाम सबल हीं श्वान धांवती ॥ चरचराच ते फाडुनि टाकिति ॥ शिरास्थी ही मांस उकरती ॥ लोहार्गळा ही तप्त करूनी ॥ पृष्ठीं हृदयीं लाविति नेउनी ॥ चूर्णाचि करिती उखळीं घालुनी ॥ माझे दोष ही अमित जाणुनी ॥

## अभंग

तीक्ष्ण औषधीचे रस आणवीती ॥ मग ते ओतिती कानां मध्यें ॥
वृश्चिक कूपांत लोटुनी हो देती ॥ बहुत विपत्ती भोगील्या मी ॥
जयाचें तें वीष बहुत दुर्धर ॥ ऐसे ते विखार डसवीती ॥
शिखेस तो अग्नि लावुनि सत्वर ॥ भाजिती शरीर दया कैची ॥
नेऊनी पर्वतीं ढकलून देती ॥ कांतडी काढीती अंगाची हो ॥
ऊर्ध्व नेऊनीया टांगुन ठेविती ॥ खालीं आपटीती क्रोध भरें ॥
इंगळाचें तें हो आंथरूण करती ॥ बळें निजवीती नेऊनीया ॥
पाषाण आणूनी मस्तकीं घालीती ॥ फोडून टाकती काय सांगू ॥ १ ॥

## अभंग

लोहाचें तें चणक तप्त हो करूनी ॥ खा खा ह्मणुनीया मार देती ॥
ओष्ठ धरूनीया फाडून टाकिती ॥ ग्रीवेसी बांधीती पाषाण ते ॥
गजपदाखालीं चूर्ण करवीती ॥ तप्त नीर देती प्राशावया ॥

भयानक भूतें भीती दाखवीती ॥ लिंग खाववीती छेदूनीया ॥
भूमींत शरीर रोवुनी टाकिती ॥ शर मार करीती वरती हो ॥
शूळावर मग पालथे घालीती ॥ मुसळें वरती मार देती ॥ १ ॥

## साकी

नरकामध्यें टाकिति नंतर ज्याचा अंत न लागे ॥
कांच शिशांचा करुनी रस बहु करविति प्राशन वेगें ॥
तप्त सळ्या नाकीं ॥ बहु दुःखचि तें होई कीं ॥ १ ॥
अंतारिक्षांताहि असिधारें ते बसविती नेऊनि जेव्हां ॥
पायीं बांधुनि जड पाषाणचि बहुत यातना तेव्हां ॥
भोगिलें दुःख जरी ॥ तेथें मरणाचि नाहिं तरी ॥ २ ॥
ऐसें स्वामी दुःख भोगिलें बहुतचि, वर्षें तीन ॥
त्यावरि मजला ढकलुनि देती पापी मी जाणून ॥
व्याघ्र योनि आली ॥ मजला स्वामीं त्या वेळीं ॥ ३ ॥
दुसरे तिसरे जन्मीं देवा अजगर वृक मी झालों ॥
सूकर सरडहि सारमेय मी सृगाल योनिंत आलों ॥
अठवा गवय तरी ॥ मर्कट गर्दभ नकुळ वरी ॥ ४ ॥
वायस बक वन कुक्कट गृध्राच बिडाल मंडुक कूर्म ॥
मच्छ त्यावरी मूषक उलुकहि द्विरद उष्ट्र कीं जन्म ॥
निषाद झालों मी ॥ आतां राक्षस मी स्वामी ॥ ५ ॥
गंगास्नानें पाप जळतसें अत्री नंदन ताप ॥
कल्पवृक्ष तो दैन्य हरूनी देतो सुख तें अमुप ॥
पाप तापचि दैन्य ॥ संत संगें जाइ जळून ॥ ६ ॥
तुझ्या दर्शनें पावन झालों पुनीत झाली काया ॥
उपदेश तरी करुनी मजला उद्धारि मज गुरु राया ॥
वामदेव तो बोले ॥ काय तरी हो त्या वेळे ॥ ७ ॥

## दिंडी.

विप्र होता एक रे पूर्व काळीं ॥ शूद्र ललना पाहुनी मिठी घाली ॥
होइ रत तो तिजसवें सर्वकाळ ॥ जिवें मारी पति तिचा काय बोल ॥ १ ॥
विप्रप्रेता टाकिलें दूर जेव्हां ॥ प्राण त्याचा दूतची नेति तेव्हां ॥
जाच बहुतचि तो भोगितसे तेथें ॥ पापि लोकांची दया नसे जेथें ॥ २ ॥

## आर्या

इकडे कैसें झालें, ऐका हो वर्तमान तें आतां ॥
शिव सदनीं भक्त बसुनि, प्रेमें पुष्पेंच वाहती ताता ॥ १ ॥
शिव सदना पुढती त्या, पडलें होतेंच भस्म हो फार ॥
तेथें श्वान सवेगचि, बैसे भस्मांत जाउनी स्थीर ॥ २ ॥
भस्म चर्चितांगें तें, विप्र प्रेतास पाहुनी धांवे ॥
प्रेता सन्निध जाउनि, योजी स्वमनांत त्यास हो खावे ॥ ३ ॥
मुख फिरवितांच लागे, कुणपासी भस्म तेंच प्रेताच्या ॥
भस्म स्पर्शें जळाल्या, विप्राच्या अमित राशि पापाच्या ॥ ४ ॥
नरकांतुनि काढुनि त्या, शिवदूतीं बसविला विमानांत ॥
जाउनि कैलास नगीं, शंभु पदीं राहिला अनंदांत ॥ ५ ॥

## अंजनीगीत

भस्म महिमा ऐसा परिसुनी ॥ राक्षस बोले कर जोडोनी ॥
वारि वारि लागे गुरूच्या चरणीं ॥ ह्मणे दया करावी ॥ १ ॥
भस्म कोणतें उत्तम तरि तें ॥ लावूं कवणेपरिं देहातें ॥
जेणें होई तोष हरातें ॥ मार्ग तो सांगावा ॥ २ ॥

## पद

(भीमक बाळा ह्मणे नृपाळा ) या चालीवर.

मंदर गिरि तो परम पवित्रचि उंच योजनें किती तरी ॥
अकरासहस्र ऐसे जाणा त्रिनेत्र वसतो तया वरी ॥

एकवार तो संगें घेउनी देव सर्व ही बरोबरी ॥
यक्ष गंधर्व किन्नर चारण पिशाच गुह्यक वेद तरी ॥
एकादश ते रुद्र सर्व ही उपवेदचि ते सर्व परी ॥
मरुद्गणाही पित्रगणाही द्वादश ते हो मित्र तरी ॥
वसुभैरव ही अष्ट अष्ट ते अष्ट दिक्पाल गिरीवरी ॥
अठ्याऐंशी सहस्त्र ऋषि ते वेष्टुनि बैसती मदनारी ॥
साठसहस्त्र ही वालखिल्य ते अगणित राजे मिळति वरी ॥
सर्व मिळूनी शिव ध्यानाचि तें करती सारे सुर अंतरीं ॥ १ ॥

## साकी.

साठ कोटि गण घेउनि संगे वीरभद्र ही आला ॥
शुभ्र नंदि तो नयनीं बघतां मांदारचि तो गमला ॥
सनत्कुमारहि ते ॥ येउनि स्तविती शंभूते ॥ १ ॥
देवाला ते वंदन करुनी विभूति धारण पुसती ॥
शुद्ध विभूती कशी असावी श्रवण कराया बसती ॥
जाश्वनीळ बोले ॥ विभूति महिमा त्या वेळें ॥ २ ॥

## पद.

( बघुनी उपवना, ) या चालीवर.

गोमय घेऊनि शुद्ध करावें सुकवा मग तें तरी ॥
जाळुनि तें हो भस्म करावें शुद्धचि समजांतरी ॥
शिव गायीत्री मंत्र ह्मणोनी मंत्रित मग तें करी ॥
अंगुष्टें तें उर्ध्व लाविजें ऐकुनि घ्याहो तरी ॥
मस्तकावर ही वेष्टन करितां भय नसते तिळभरी ॥
निषिद्ध तर्जनी कनिष्टिकाही दूर करा क्षणभरी ॥
दो बोटांनीं भाळीं लाविजे अंगुष्ट रेखावरी ॥ चाल ॥
तर्जनी न लावितां अंगीं लावा तरी ॥

त्रिवोटीं लावितां गोहत्याचे परी ॥
अभक्ष भक्षण तें पापचि जातें दुरी ॥ चाल ॥
भस्माचा तो ऐसा महिमा शंकर सांगे तरी ॥ १ ॥

## दिंडी

वामदेवानें ब्रह्म राक्षसाला ॥ भस्म महिमा तो सर्व विदित केला ॥
दिव्य यानचि तें येत त्यास न्याया ॥ दिव्य त्याची जाहली असे काया ॥ १ ॥
त्यास नेले मिरवीत शिव पदाशी ॥ ऐक्यरूपीं मुक्ति ती मिळे त्यासी ॥
वामदेवहि तो पर्यटणा गेला ॥ संत संगें तो असुर मुक्त झाला ॥ २ ॥

## कामदा.

( या चालीवर. )

मंत्र तिर्थ ही विप्र देवता ॥ औषधी गुरू यज्ञ भाकिता ॥
भाव त्यावरी ठेवती जसा ॥ देव त्यास तो पावतो तसा ॥ १ ॥

## श्लोक.

( इंद्रवज्रा. )

पांचाळ देशीं नृप सिंव्हकेत ॥ शत्रूस भासे रणिं कुंतिसूत ॥
तो एक वेळीं मृगयेस गेला ॥ घेऊनि संगींहि निषादमेळा ॥ १ ॥

## श्लोक.

(शिखरिणी.)

असा हिंडे राजा शबर बळ घेऊन वन तें ॥
वनीं त्याहो देखे शिव सदनही भग्न पारि तें ॥
अशा देवागारीं शबर शिरला भाव धरुनी ॥
ह्मणे देवा शंभो मम अघ तरी टाक हरुनी ॥ १ ॥

## अंजनीगीत

उन्मळोनि तें दिव्य लिंग ही ॥ पडलें होतें नयनीं पाही ॥
पंचसूत्रि तें अभंग देहीं ॥ शबर तें घेई ॥ १ ॥

राजा जवळी येऊनि बोले ॥ लिंग मला हें नृपा मिळालें ॥
राजा बोले लिंग चांगलें ॥ परि भाव पाहिजे ॥ २ ॥
व्यर्थ पुजा ती कशास व्हावी ॥ दंभ करोनी लोका दावी ॥
कासार जसा प्रतिमा ठेवी ॥ विक्रय करण्याला ॥ ३ ॥
ब्राह्मण वेषें मैंद हिंडती ॥ वाट लुटाया साधू होती ॥
ब्राह्मण साधू ह्मणुनी फसती ॥ जन बहुतचि ते ॥ ४ ॥
कालनेमि तो साधु होउनी ॥ वाट लुटाया बैसे येउनि ॥
देव पुजा ती भावा वाचुनि ॥ व्यर्थ तरी जाण ॥ ५ ॥

## श्लोक

( इंद्रवज्रा. )

कैसा पुजेचा क्रम सांग राया ॥ पूनीत जेणें मम होय काया ॥
पूजेंत बापा बहु भेद राही ॥ आणी चिताभस्म शिवास वाही ॥ १ ॥

## श्लोक

( शिखरिणी. )

विनोदें सांगे तो नृपतिहि चिताभस्म शबरा ॥
चिताभस्मावीणें कधिंहि नच पूजी शशिधरा ॥
खरें मानूनीया वचन तरि तें जाय सदना ॥
प्रियेला सांगूनी निशिदिनिं स्तवी पंचवदना ॥ १ ॥
मुहूर्तें स्थापी तो निज सदनिं तें लिंग बरवें ॥
चितेचें आणी हो पुजनसमयीं भस्माचि नवें ॥
जईं एकातीं तो फिरवि तइं नैवेद्य ललना ॥
समर्पी, आणी ती, शबर तरि तो पंचवदना ॥ २ ॥
समर्पूनी दोघे स्तविति मग ते जान्हविधरा ॥
अशी निष्ठा देखे नवल मग तो दाखवि जरा ॥
चिताभस्माला हो तुट पडलि ती एक दिवशीं ॥
महीं हिंडे भारी परि नच तया प्राप्त सरशी ॥ ३ ॥

## श्लोक.

( मालिनी.)

परतुनि सदनाला येउनी सर्व वार्ता ॥
कळवि परि तयाला लागली फार चिंता ॥
प्रियसखि मग त्याला बोलली प्राणनाथा ॥
पुजन तरि कसें हो शंभुचें होय आतां ॥ १ ॥

## साकी.

शिवदिक्षा ती परम कठिणची निष्ठा पाहे देव ॥
शबरी बोले प्रिया लागुनी वचनीं माझ्या भाव ॥
ठेवुनि ऐका हो ॥ शंका मानें आणुं नका हो ॥ १ ॥
पाकसदानें मी बसुनी आतां अग्नि लावुनी घेते ॥
शिवपूजा ती पूर्ण करावी अर्पुनि मम भस्माते ॥
शुचिर्भूत होऊनी ॥ घेई अग्नी लावूनी ॥ २ ॥
कलेवराचें भस्मचि झालें शबर भस्म तें घेई ॥
सदाशिवाशीं प्रेमें चर्चुनि आनंदित तो होई ॥
भोळा शंकर तो ॥ दासाचें धैर्यचि बघतो ॥ ३ ॥
शिवध्यानीं तो तल्लिन झाला नाहीं भानचि ज्याला ॥
भार्येनें तो देह जाळिला आर्ति करूनी तिजला ॥
पूर्वाभ्यासें तो ॥ प्रिये ह्मणुनी मग बाहतो ॥ ४ ॥
नैवेद्य शीघ्र अर्पण करि बा एकार्ती ती होतां ॥
विलंब होतां क्षोभ येतसे फाराचे त्या गुहताता ॥
क्षमा नच तिळभरी ॥ जाई क्षोभुनी मदनारी ॥ ५ ॥
नैवेद्य आण सत्वर ललने ऐसें मग तो बाही ॥
नैवेद्य करीं घेउनि शबरी उभी पाठिशी राही ॥
तेव्हां ती शबरी ॥ दिसे रंभेसम सुंदरी ॥ ६ ॥

नैवेद्य शबर अर्पण करुनीं करी पूर्ण ती पूजा ॥
शबर शबरि मग हस्त जोडुनी स्तविती त्या गिरिराजा ॥
जय शंकर ताता ॥ आह्मी शरणचि तुज आतां ॥ ७ ॥

## पद.

(शारदे दास कामदे,) या चालीवर.

हरहरा ॥ शंभुशंकरा ॥ पार्वतीवरा ॥ भवचक्रचालका ॥
पतित मी, तारि तारि मज मदनांतका ॥ १ ॥
शिवशिवा ॥ भवानी धवा ॥ जन्म चूकवा ॥ ब्रह्मांडनायका ॥
शरण शरण तुजरे मी भवहारका ॥ २ ॥
करि त्वरा ॥ सकळ सुरवरा ॥ जान्हवीधरा ॥ लीन तुझे पायीं ॥
दया करुनि बा निजपदीं मज नेईं ॥ ३ ॥

## दिंडी.

पुजा करुनी जों शबर स्त्रीस पाही ॥ मेनिका कीं कोण ही उभी राही ॥
असें पाहुनि जाहला हर्ष त्याला ॥ मागुती तो शिवरूप शबर झाला ॥ १ ॥
वरुन येई तें यान त्यास न्याया ॥ झालि दोघांची तरी दिव्य काया ॥
शिवपदाला मिरवीत त्यास नेती ॥ ईशमाहिमा ते मुखीं सर्व गाती ॥ २ ॥

## कामदा.

( या चालीवर. )

पाहुनी असें सिंहकेत तो ॥ काय हो मनीं राव बोलतो ॥
भक्त तो खरा शबर जाहला ॥ शंकरें तया पादिंच ठेविला ॥ १ ॥

## अंजनीगीत.

विनोद करुनी तया कळविलें ॥ चिताभस्म कीं मुख्यचि धरिलें ॥
शबरासहि तें खरें वाटलें ॥ आणी भस्म नित्यची ॥ १ ॥
धन्य ह्मणावी शबरी कामिनी ॥ भस्मा साठीं देह जाळुनी ॥
प्रसन्न केला पिनाकपाणी ॥ धन्य धन्य धन्य ती ॥ २ ॥

निष्ठा मनिं ती जरी वसेना ॥ पिनाकपाणी कधीं वळेना ॥
तोच मार्ग तरि मुख्यचि जाणा ॥ शिवपद प्राप्तीला ॥ ३ ॥

## पद.

( रुचती कां तीर्थ यात्रा, ) या चालीवर.

गायाला छंद लागे शिवनामीं रंगला ॥
शिवलीला नित्य गायी भजनीं तो लागला ॥
शिवरात्रीं सोमवारीं पूजी त्या शंभुला ॥
धन देई ब्राह्मणांना शिवनामीं वेधला ॥ १ ॥

## साकी.

ऐसें करितां भजन शिवाचें शिव रूपीं तो झाला ॥
शिव पादिं मग तो जाउनि राहे त्याचा फेरा चुकला ॥
शिव शिव तरि बोला ॥ फेरा तुमचा मग चुकला ॥ १ ॥

## पद.

( जाउं नकारे विषया, ) या चालीवर.

शिवलीलामृत मंडप मोठा त्याच्या खालीं ही ॥
श्रीधर वाणी वल्ली सम ती पसरुनि हो राही ॥ धृ० ॥
अहळ बहळ ती पसरुन गेली वर वर ती वाढती ॥
सघन शीतल छाया पाहुनि भक्त तिथें बैसती ॥
प्रेम हींच हो द्राक्ष फळें तीं पक्क बहुत भक्षिती ॥
त्या वल्लीचीं कृपाफळें हो मिळोत मजलाही ॥ १ ॥

## अंजनीगीत

मृडानि हृदया शशीशेखरा ॥ ब्रह्मानंदा शिवा श्रीधरा ॥
लीला वदवी तुझी उदारा ॥ या दास मुखीं रे ॥ १ ॥

## पद.

( विठाबाइ माउली, ) या चालीवर.

मृडानि हृदया पशुपती ॥ जय जय उमारमण तूं सुरपती ॥ धृ० ॥
वामांगी पार्वती ॥ सव्यांक शोभवि तो गणपती ॥
चर्मासन गण पसरती ॥ दयाळा तव मुर्तिवर बैसती ॥
कैलासनगा वरती ॥ वंदाया तुज नित्य सुर जमती ॥
दर्शन सुखांत रंगती ॥ तें घेतां पापी उद्धरती ॥
बाळकृष्णदासस्तुती ॥ मानुनि घे तूं पशुपती ॥ १ ॥

NATIVE GENERAL LIBRARY (POONA)

# अध्याय १० वा.

## श्लोक

रमारमण ही तुझें सतत बा करी ध्यानरे ॥
मुनीजनहिं मानसीं सतत बा तुला ध्यातिरे ॥
उमारमण शंकरा सतत मी पदीं लीनरे ॥
कुबुद्धि मनिं या वसे दहन ती करी शंभुरे ॥ १ ॥

## अंजनीगीत

काम गजाला अंकुश तरि तूं ॥ क्रोध जळाला विध्वंसक तूं ॥
मद तम हरता सूर्य तरी तूं ॥ वृषभध्वजारे ॥ १ ॥
मत्सरदुर्धरविपिन जाळशी ॥ दंभनगाते छेदुन टाकिशी ॥
धर्मवर्धना साठीं येशी ॥ वरि वरि तूं भूवरी ॥ २ ॥
कैलासावरि विहार करिशी ॥ निगमागमही वंदिति तुजशी ॥
दयानिधे बा तव चरणांशीं ॥ सुर वसती सर्व ही ॥ ३ ॥

## साकी.

नवमाध्यायीं शबरासह तो सिंहकेत ही तरला ॥
कथा तरी ती यथामतीनें केली श्रुत तुह्मांला ॥
पुढें सूत वदती ॥ सांगिन तुह्मांस कथा ती ॥ १ ॥
अनर्त देशीं विप्र वेदरथ वैदिक ब्राह्मण होता ॥
त्याची कन्या नाम शारदा जिच्या स्वरूपा पहातां ॥
तटस्थ जन सारे ॥ ह्मणती धन्य विधातारे ॥ २ ॥
द्वादश वर्षें तिच्या वयाला जेव्हां पूर्णचि झाली ॥
तिच्या पित्यानें पद्मनाभ या विप्राला ती दिधली
करुनि संभ्रम तो ॥ कन्यादानचि तो करितो ॥ ३ ॥

## दिंडी.

तोहि ब्राह्मण विद्वान फार होता ॥ मान देती सर्वही गृहीं जातां ॥
श्वशुर विनवी ह्मणुनि तो तिथें राही ॥ पुढें होणारें कांहिं कळत नाहीं ॥ १ ॥

एक दिवशीं जाइ तो नदीतीरीं ॥ करुनि संध्याही ब्रह्मकर्म सारी ॥
गृहीं येतां झोंबला व्याल पायीं ॥ प्राण जाउनि तत्काल पडे ठायीं ॥ २ ॥
हाक झाली नगरांत शीघ्र जेव्हां ॥ शारदाही धांवुनी आलि तेव्हां ॥
गतप्राणाहि देखुनी प्राणनाथा ॥ ह्मणे आतां कायहो करूं ताता ॥ ३ ॥

## पद.

( नकळे होइल गति कैशी, ) या चालविर.

पतिविण राहूं मी कैशी ॥ झाले व्यर्थ परी ॥ धृ० ॥
सोडुनि गेले मम पतिराज ॥ आज बुडालें माझें जहाज ॥
मजवर कां कोपे गिरिराज ॥ याचें काज काय तरी ॥
सांगूं गुज तें कोणा माय ॥ ओस पडली मम शेजची हाय ॥
सर्प रूपीं तो तस्कर काय ॥ लुटली गाय त्यानें खरी ॥
वस्त्राभरणें नलगे फार ॥ झाला माझ्या देहीं भार ॥
देवा शंभो दुःख निवार ॥ टाकी शृंगार दूर वरी ॥ १ ॥

## अंजनीगीत

करुणा ऐशी ऐकुनि श्रवणीं ॥ अश्रू येती त्या जन नयनीं ॥
ह्मणती देवा कैशी करणी ॥ केलि तुवा शंभो ॥ १ ॥
विप्राचें मग दहनचि केलें ॥ शारदेसह ते परतचि आले ॥
बहुत दुःख तें जननिस झालें ॥ पाहुनि शारदेला ॥ २ ॥
बहुत दिवस ते गेले या परी ॥ घरची कार्या जात बाहिरी ॥
एकटि शारदा होति मंदिरीं ॥ अपूर्व तों घडलें ॥ ३ ॥

## साकी.

नैध्रुव नामें ऋषीश्वर तो बहुत वृद्धची होता ॥
नेत्र हीन तो शिष्य घेउनी आला फिरतां फिरतां ॥
शारदा सदनाला ॥ ऊर्जित काळ तिचा आला ॥ १ ॥

आसन सत्वर देउनि त्याला पूजी यातें भावें ॥
नमस्कार मग करी ऋषीला बोले वरिवारि यावे ॥
ह्या मम सदनाला ॥ आहे सादर सेवेला ॥ २ ॥
विप्रा न दिसे केवळ अंधचि आशिर्वाद तो वदला ॥
सौभाग्य तुझें अपार वाढो होवो पुत्रचि तुजला ॥
ऐकुनि ती सांगे ॥ घडली गोष्टचि जी मागें ॥ ३ ॥
माझ्या जिव्हे बाहिर आलें असत्य कैसें होई ॥
अघटित तेंची घडविन आतां अनुभव याचा पाही ॥
अशक्य होणें हें ॥ काय तरी हो वदतां हें ॥ ४ ॥

## पद.

( दिसली पुनरपि, ) या चालीवर.

ऋषिचीं वचनें असत्य कशि बा ऐका थोरवि त्याचि तरी ॥
रंकाचा तो सहस्रनेत्रही वचन तयाचें क्षणें करी ॥
शापबळानें राजा नहुषही सर्पचि केला त्यास तरी ॥
यादवकुल तें भस्मचि झालें भीती ज्यांना विधी हरी ॥
सागारें तरि ती बुडून गेली शक्र संपती हो सारी ॥
विष्णूला ही अंबऋषीचा घ्यावा लागे जन्म तरी ॥
राव परिक्षिती भस्म जाहला होता जपुनी फार जरी ॥
स्त्रिया असूनी पांडूला तो भोग मिळेना जन्मवरी ॥
जमदग्नीचा क्रोध कठिणची चौघे पुत्रचि भस्म करी ॥
साठसहस्र ते सगर जळाले ब्रह्मशाप तो याच परी ॥ १ ॥

NATIVE GENERAL LIBRARY, KHED. (POONA)
सार्वजनिक वाचनालय खेड (पुणे)

## दिंडी.

कुबेर तनय ते वृक्ष कसे झाले ॥ दंडकाला कोणिहो भस्म केलें ॥
सरडरूपीं नृगराज कसा झाला ॥ अत्रिनंदन रोगि हो कुणी केला ॥ १ ॥
सकळ देवाचा इंद्र देव पाही ॥ परी कैसी हो भगें तया देहीं ॥
सूर्यनंदन तो दासिपुत्र केला ॥ उदधि सारा कोरडा कुणी केला ॥ २ ॥

दगड असुनी हो तया देव केलें ॥ मंत्रसामर्थ्यें नवल तरी झालें ॥
वाळलेल्या काष्ठास पर्ण आलें ॥ ब्रह्म सारें मोडुनी पुन्हां केलें ॥ ३ ॥
ह्मणुनि ब्राह्मण थोर हो तिन्ही लोकीं ॥ ह्मणुनि त्यांना मान तो फार द्या कीं ॥
शारदे तूं ऐकगे गोष्ट माझी ॥ उमामहेश तूं नित्य तरी पूजी ॥ ४ ॥

## साकी.

मंत्र षडाक्षर नित्य जपावा भाव ठेवुनी चित्तीं ॥
या नियमानें नित्य राहुनी पूर्णाचि पूजा कर ती ॥
ऐसे बोलोनी ॥ राही तद्गृहिं मठ करुनी ॥ १ ॥

## श्लोक

आरंभ याला कर चैत्रमासीं ॥ किंवा करावा मग मार्गशीर्षीं ॥
शुद्धांत गे अष्टमि सोमवारीं ॥ पाहोनि पूजी मदनांतकारी ॥ १ ॥

## दिंडी.

नाहिं तर तो आरंभ करी बाई ॥ चतुर्दशीस गे फार पुण्य होई ॥
एक संवत्सर नेम ठेवि बाई ॥ षडाक्षर तो मग मंत्र तीस देई ॥ १ ॥

## पद.

(भला जन्म हा,) या चालीवर

शिव मंदिर तें दिव्य करूनी शुभवितान त्यावरी ॥
चारि स्तंभ भूषित मग ते करी ॥ धृ० ॥
सुवास सुमनें अष्टगंध ही रंगित माळा वरी ॥
षोडश वर्ण यंत्र नाना परी ॥
अष्टदळें तीं चतुर दळेंही तांदुळ वर घालुनी ॥
शोभा आणी घट स्थापुनी ॥
उमामहेश प्रतिमा दोन्ही सुवर्णाच्या करी ॥
स्थापी मग त्या मध्यंतरीं ॥
निष्ठा धरुनी उमामहेशा पूजी नित्यचि तरी ॥
षोडशोपचार घेऊनि करीं ॥

यथासांग तें ब्राह्मण भोजन सुवासिनी पूजिजे ॥
षड्रसअन्नचि त्या देइजे ॥ चाल ॥
पुराण कीर्तन तें करी श्रवण नित्य गे ॥
येणेंच करावा जागर तो नित्य गे ॥
गुरुच्या वचनीं तो विश्वास हि ठेव गे ॥ चाल ॥
प्रतिमा स्थापुनि पुजन करावें भक्तियुक्त अंतरीं ॥
आणी ध्यानिं मुर्ति मग ती बरी ॥ १ ॥
कुंदेंदुवर्ण कर्पूरगौर पयःफेन धवल जो ॥
जोतिर्मय रजतवर्ण निर्मळ जो ॥
कोटिसूर्यसम तेज विराजित शुभ्राभरणें वरी ॥
जगदानंदकंद असे तो तरी ॥
स्वर्धुनि मस्तकिं शुभ्रजटा त्या व्याल अंगिं वेष्टती ॥
चंद्रप्रभा भाळीं बहु शोभती ॥
उन्मिल तमाल लोचन भासाति नृमुंडमाळा गळा ॥
दिसति नेत्र सूर्यचि तारि ते मला ॥
केयुरांगद शुभ्र वीर कंकण करिं बहु शोभती ॥
दिव्य गरुड पांच कमी ह्मणाविती ॥
विराजमानचि नीलकंठ तो अयुधें त्या दशभुजीं ॥
झळकतीं प्रळय चपळेंसम जीं ॥ चाल ॥
खट्वांग त्रिशुळ तो डमरु अंकुश करीं ॥
पाश नाग घंटा पिनाककमल तें धरी ॥
पाशुपतास्त्र ही धरितो एके करीं ॥ चाल ॥
शार्दूलचर्म वसन जयाचें गजाजिन त्यावरी ॥
बसतो शंकर नित्यचि तरी ॥ २ ॥

## साकी.

कैलासगिरी शूभ्रवर्ण तो शुभ्रचि मंडप वरती ॥
जैसा गगनीं सूर्य प्रकाशे तैशी शोभा दिसती ॥
पाहतां नंदी तो ॥ ऐरावत न्यूनचि दिसतो ॥ १ ॥

NATIVE GENERAL LIBRARY, KHED (POONA)

मणिमय कुंडल कैशीं कर्णीं तक्षक शेषचि दिसतीं ॥
ब्रह्मानंदा मनीं स्मरूनी ओतिलि शिव मूर्ती ती ॥
ध्यान भवानीचें ॥ आतां करिगे तूं साचे ॥ २ ॥

## पद.

( बघुनी उपवना, ) या चालीवर

बाला तन्वंगी सुंदर ती बैसे अंकावरीं ॥
शंभूच्या त्या, नित्य धरी जो पाशांकुशही करीं ॥
बकुळ मल्लिका सुरतरु सुमनें यांच्या माळा वरीं ॥
इभयुक्त अवतंस डोलतही शोभा बहुतचि तरी ॥
हरिमध्या ती भुजंग वेणी मुख तें कमलापरी ॥
द्वादशादित्य शोभा जघनीं झळके कांचीवरी ॥
पदनखतेजा पाहुन जीच्या लाजति त्या सुंदरी ॥
अंगींचा तो सुवास जाई ब्रह्मांडाच्या वरी ॥
कोटिमदनसम तेज विराजें शोभा बहु साजिरी ॥
पदमुद्रा त्या जेथें उमटति उगवतिं कमळें तरी ॥
दंततेज तें क्षितिवरि पडतां खडे मण्याचे परी ॥
ब्रह्मांडामाधिं कोण अशी हो आहे ती सुंदरी ॥
चंद्र सूर्य जे प्रकाश देती तिच्याच तेजावरी ॥ चाल ॥
शक्रादिक बाळें गर्भी पाळण करी ॥
त्रिभुवन सारेही खेळवि नानापरी ॥
निगमागम ध्याती नित्य जिला अंतरीं ॥ चाल ॥
त्रिभुवन जननी त्रिपुरसुंदरी कृपा दिनावर करी ॥ १ ॥

## पद.

( श्रीसांबाच्या समान दैवत, ) या चालीवर.

बिंबाधर अति आरक्तचि तें तेज जयाचें अती ॥
वर्णाया नच चाले मन्मती ॥ धृ० ॥
नासिकेवरी मुक्त डोलती प्रवाळ सम भासती ॥
नेत्रांजनें गुंजे सम दीसतीं ॥

आदि देवि ही जगन्माता झाली मग हासती ॥
तो रंग शुभ्र दिसे मागुती ॥
हंस पंक्तिसम हसतां सारे दंत तिचे झळकती ॥
अधर ते रक्त वर्ण दीसती ॥
पक्व बिजें तीं डाळिंबीचीं जैशीं बहु शोभतीं ॥
तैसे दंत तिचे भासती ॥
इंद्रनीळसम कंठीचे ते मुक्तहार शोभती ॥
श्यामलांग प्रभा माधें बिंबती ॥
कमंडलुसम सुंदर दिसती पयोधर ते अती ॥
ज्यांतिल सुरगण अमृत प्राशिती ॥ चाल ॥
चपळा गाळुनि रंगविलें अंबर तरी ॥
मुक्तलग कंचुकी प्रभाकर वाहूवरी ॥
इंद्रनीळ वर्णी लीला वेषा धरी ॥ चाल ॥
प्रळयरूपिणी आदिजननि ही भक्ताला पावती ॥
माये वर्णितां थकली मती ॥ १ ॥

## दिंडी.

आदि पुरुषाची ज्ञान कळा पाही ॥ घडी मोडी ब्रह्मांड वेळ नाहीं ॥
जिचे रूपा पाहुनी जाश्वनीळ ॥ मनीं बोले या रुपा नाहिं मोल ॥ १ ॥
कृत्तिकेचा पुंज तो गगनिं जैसा ॥ जलजघोषहि डोलतो कार्णी तैसा ॥
अरुणसंध्यारागास उणें आणी ॥ कुंकुमाची रेष ती मनीं जाणी ॥ २ ॥
सगुणपण तें टाकुनी शंभु पाही ॥ प्रळय काळीं निर्गुण असा होई ॥
परी सौभाग्यहि तिचें गहन फार ॥ कुंकुमाचा महिमाच बहू थोर ॥ ३ ॥
भवानीनें शंभूस दोन वेळा ॥ वरुनि लाविती बिजवरा कपाळा ॥
वदनचंद्रा उपमाच जिच्या नाहीं ॥ वर्णनाला चाले न मती कांहीं ॥ ४ ॥

## श्लोक

( भुजंग प्रयात. )

प्रयागीं त्रिवेणी जसी शोभती हो ॥ तशी वेणि शोभे भवानी तुझी हो ॥
अलंकार ते मच्छ कच्छादि कैसे ॥ नदींतील त्या मच्छची काय भासे ॥ १ ॥

IVE GENERAL LIBRARY, KHED. (POONA)

## श्लोक

(स्रग्धरा.)

केशाग्रीं गुच्छ मोठा बघुनि हि मज तो सागराकार भासे ॥
केसांचा वर्ण काळा कुरळचि दिसती शोभती ते हि कैसे ॥
जैसी वाहे रवीचीप्रियकरतनया भास तैसाच होई ॥
पाहोनी शुभ्र हारा मम मन समजे काय गंगाच वाही ॥ १ ॥

## साकी.

हारामध्यें अरक्त कमलें बघतां नयनीं दिसतीं ॥
पद्मजनंदिनि गुप्त तरी ती त्रिवेणि सम वेणी ती ॥
कारितां स्नान तरी ॥ प्राण्या मुक्ती तीच खरी ॥ १ ॥

## पद.

(जाउं नकारे विषया,) या चालीवर.

तिणें गुंफिली देहा भोंवति ब्रह्मांडे सारी ॥
ती समजा कीं मोहनमालाचि अंबे मज तारी ॥ धृ० ॥
जिव शिव दोन्ही स्तन ते दोनाचि धरती पक्षाला ॥
सौभाग्या त्या क्षय नाहीं हो ह्मणुनि वदाति त्याला ॥
वज्रचुडेमंडितकर ह्मणती नमा भवानीला ॥
दशांगुलीं त्या घालि मुद्रिका दशावताराला ॥
पायीं नेपुर पैंजण वाजाति शंभु समाधीला ॥
विसरुन सेवी नेत्र चकोरें त्या मुखचंद्राला ॥ चाल ॥
भक्ति पाहुनी पावे भक्ताला ॥
करुनी जोडवी बांधी चरणाला ॥
धन्यताच येई ऐशा भक्ताला ॥ चाल ॥
ऐसें स्वरूप ध्यात शारदा झालें सुख भारी ॥
अकराशत दंपत्य पूजुनी ह्मणे मला तारी ॥ १ ॥

## श्लोक.

( इंद्रवज्रा. )

झाला रवी अस्त करीत ध्यान ॥ झाली असे रात्रहि याम दोन ॥
आली भवानी मग त्याच ठायीं ॥ देते वराला वर माग बाई ॥ १ ॥

## कामदा.

( या चालीवर. )

अमित तेज तें नयनें देखुनी ॥ ऋषिस नेत्र हो येत ते क्षणीं ॥
प्रेमयुक्त ते चरणिं लागती ॥ स्तवन देविचें करिति मागुती ॥ १ ॥

## पद.

देवी जगदंबे ॥ अंबे ॥ धृ० ॥
चिद्विलासिनी मुळप्रकृती प्राणव स्वयंभे अंबे ॥
ब्रह्मानंददायिनी माते सौभाग्यसरिते अंबे ॥
धराधरेंद्रनंदिनि माते सर्वारंभे अंबे ॥
चिन्मय सुख तें भक्तां मिळतें तुज पासुनि गे अंबे ॥
वेद पुराणीं वंद्य तरी तूं हेरंबजननी अंबे ॥
अंध पाहती पांगुळ धांवति कृपा तुझी ही अंबे ॥
वाचाळ मुके मुर्ख हि पंडित सिकता रत्नें अंबे ॥
भवभयहारक भक्तपालके मनोल्हासिनी अंबे ॥
ब्रह्मादिक ही ध्यानीं वेधले त्रिभुवनजननी अंबे ॥
वेदमाते द्विजवर नंदिनी त्रिपुरसुंदरी अंबे ॥
त्रिकाळ ध्याती ते जन होती त्रिदेहविरहित अंबे ॥
शिवमानससरमराळीका तूं सर्व व्यापके अंबे ॥
सकळ कल्याण तोष दायिके शारदा नमी अंबे ॥ १ ॥

## साकी

ऐसें ऐकुनि प्रसन्न देवी माग ह्मणे वरदान ॥
शारदावृत्त सर्व कळवुनी नैध्रुव धरितो चरण ॥
अंबे सत्य करी ॥ दासाचें वचन तें तरी ॥ १ ॥

## दिंडी.

ऐक विप्रा सांगते सर्व कांहीं ॥ पूर्व जन्मीं कोण ही होति तें ही ॥
द्रविडदेशीं पूर्वि ही विप्रकन्या ॥ इच्या रूपा पाहुनी वदति धन्या ॥ १ ॥
स्त्रिया दोघी पतिस हो इच्या होत्या ॥ कलह करिती अपसांत नित्य हो त्या॥
धाकटीही रुपवान अशी होती ॥ मधुर बोलोनी घेइ पती हातीं ॥ २ ॥

## पद.

( थोर तुझे उपकार ) या चालीवर.

काय पुढें झालें ॥ ऐका काय पुढें झालें ॥
शेजारी तो एक जारचि ॥ होता त्या वेळें ॥
ईस पाहुनी मोहित झाला ॥ एकांतीं हो धरिलें ॥
इनें करोनी नेत्र अरक्तचि ॥ लोटुनि त्या दिधलें ॥
खेदयुक्त तो होउनि गेला ॥ गृहास त्या वेळें ॥
इच्या ध्यासें झुरुनी झुरुनी ॥ मरण तया आलें ॥
विधवा हो तूं ह्मणुनि सवतिनें ॥ इजला हो शापिलें ॥
दोघीला ही कालेंकरुनी ॥ मृत्युनें गाठिलें ॥
भामिनि जी ती मृत्यु पावली ॥ शारदा ह्या वेळें ॥
पद्मनाभ तो जार पूर्वीचा ॥ त्यानें हिला वरिलें ॥
पूर्व जन्मिचा दावा ह्मणुनी ॥ वैधव्य तें दिधलें ॥ १ ॥

## साकी.

पूर्व जन्मिचा इचा पती. तो द्रविड देशिं बा आहे ॥
स्त्रीहीन इचें रूप आठवुनि तळमळ अंतरीं साहे ॥
आहे दूर वरी ॥ तिनशें साठ योजन तरी ॥ १ ॥
स्वप्नामध्यें नित्य येउनी भोगिल तो वा इजला ॥
जागृतिहुनही विशेष सुख तें होइल ह्या दोघाला ॥
होइल पुत्र इला ॥ शारदानंद नाम त्याला ॥ २ ॥

## अंजनीगीत.

सांगुनि ऐसें गुप्त जाहली ॥ अंतरधानचि देवि पावली ॥
नित्य शारदा देखति जाहली ॥ स्वप्न तैसेंची ॥ १ ॥
गर्भकळा मग तिजवर आली ॥ निंदा करिती जन त्यावेळीं ॥
सासुस्वशुर ऐकुनि आली ॥ घेउनि सर्वांला ॥ २ ॥
देवीची ती अघटित करणी ॥ खदखद हांसती ऐसें बोलुनी ॥
कधीं भेटली देवि येउनी ॥ इजला नकळें ॥ ३ ॥
कर्णनासिका टाका कापुनी ॥ घरांतुनि द्या बाहिर घालुनी ॥
आकाशवाणि बोले गर्जुनि ॥ सत्य गर्भ शारदेचा ॥ ४ ॥
अमंगळ परी जन ते दिसती ॥ कपटचि हें हो ऐसें ह्मणती ॥
वृद्ध पुण्यशिल त्यांतिल वदती ॥ ऐका तें आतां ॥ ५ ॥

## दिंडी

ईश मायेचा काय नेम आहे ॥ खांब नसुनी आकाश कसें राहे ॥
जळावरि ही कुंभिनी कशी पोहे ॥ ग्रहण भ गणें रवि यास कोण आहे ॥ १ ॥
सर्व देहीं व्यापुनी ईश राहीं ॥ परी त्याचा ठाव तो कुणा नाहीं ॥
पंच भूतामाधिं वैर किती आहे ॥ एक रूपीं चालली थोर नां हें ॥ २ ॥
जननि गर्भी गर्भास कोण पाळी ॥ स्तनामध्यें दूध हो कोण घाली ॥
अज्ञ बाळाला ज्ञान कसें येई ॥ जगन्नाथचि तो सर्व तोच होई ॥ ३ ॥

## पद.

( शिवाज्ञेचि वाट न पाहतां,) या चालीवर.

एके काळीं यूषकेतचें रेत जळीं पडलें ॥
सहजी वेश्या प्राशी जळ तें नवल कसें झालें ॥ धृ० ॥
तेणें तिजला गर्भ राहिला पुत्र प्रसव झाला ॥
विभांडकाचें रेत तसेंची एके वेळेला ॥
जळामध्यें पडलें, हरिणी प्राशी हो त्याला ॥
त्या हरिणीला ऋष्यश्रृंग तो पुत्र किं हो झाला ॥

दशरथ यागीं जाउनि तो ऋषि मिळवी किर्तीला ॥
सवराष्ट्र राजस्पर्शें मृगि ती प्रसवी पुत्राला ॥
मत्स्यापासुनि गर्भ राहिला त्या, सत्यवतीला ॥
मत्स्यराज हा पुत्र जाहला मग त्या राणीला ॥
महिषी पोटीं महिषासुर तो कैसा हो झाला ॥
रेवतीरमण कैसा गेला रोहिणिगर्भाला ॥ चाल ॥
मुसळ कसें हो झालें सांबाला ॥
पांडव कैसे झाले कुंतीला ॥
मान असा हा ब्राह्मण वचनाला ॥ चाल ॥
वृद्धजनांनीं अशा रितीनें उपदेशाचि केले ॥
दुर्जन लोक परि निंदा करिती नाहिं मना आलें ॥ १ ॥

## साकी

मागुति झाली देववाणि ती ऐका मुर्खानो रे ॥
शारदेस जे असत्य ह्मणातिल झडेल जिव्हां ती रे ॥
ऐकुनि वाणी ती ॥ सात्विक सत्य सत्य ह्मणती ॥ १ ॥
परि दुर्जन ते निंदा करिती कापट्यचि हें ह्मणती ॥
अकस्मात तों जिव्हां चिरुनी त्यांत किडे हो पडती ॥
देखुनि जन ह्मणती ॥ शारदे सत्य तूं जगतीं ॥ २ ॥

## अभंग.

मग तीस झाला पुत्र तो सतेज ॥ शारदाऽत्मज ह्मणती तया ॥
हळूं हळूं वाढे द्विजराज जैसा ॥ वाढुं लागे तैसा बाळक तो ॥
अष्ट वर्षे होतां व्रतबंध केला ॥ नंतर तो गेला गुरु गृहीं ॥
चारी वेद त्यानें मुखोद्गत केले ॥ शास्त्रही सगळें पुराणें तीं ॥
नवग्रहीं शोभे दिनमणी जैसा ॥ शोभे तोही तैसा पंडीतांत ॥
शिवव्रतें त्यानें बहु आचरीलीं ॥ कृपा तया केली शंकरानें ॥ १ ॥

## अभंग

त्यावर शारदा संगें पुत्र घेई ॥ गोकर्णा ती जाई शिवरात्रीला ॥
द्राविड देशींचा ब्राह्मण तो आला ॥ दर्शन घेण्याला शंभूचें हो ॥
परस्पर पाहुनी कष्टती अंतरीं ॥ अंतरीं विचारी शारदा हो ॥
देवीचें तें वचन स्मरोनीयां मनीं ॥ वाहे नेत्रीं पाणी तिच्या तेव्हां ॥

## साकी.

उमामहेश्वरव्रत तूं केलें त्याचें पुण्यचि बाई ॥
अर्धें, तैसा तुझा पुत्र ही पतीस तूं तरि देई ॥
पति जवळी राही ॥ समागम पण नको कांहीं ॥ १ ॥

## श्लोक.

( मंदाक्रांता. )

यात्रा सारी करुनिहि तिनें वंदिलें प्राणनाथा ॥
ध्यावा बोले स्वसुत तरि हा कां तरी किंतु आतां ॥
जें जें केलें व्रत तप तिनें पुण्य अर्धेंच देई ॥
देऊनी हो पति नगारें ती पुत्र घेऊन जाई ॥ १ ॥

## आर्या.

राहे व्रतस्त ती हो, पति दर्शन दुरुनि नित्य ती घेई ॥
विख्यातचि पुत्र तिचा, पंडित लोकांत मान्य तो होई ॥ १ ॥
मातृ पितृ भजनिं सदां, सादर तो हेंच योग्य पुत्रास ॥
पार्वति माताच पिता शंकर तो, हचि भावना त्यास ॥ २ ॥
माता पित्यास न भजे, धिःक् त्याचें ज्ञान तें तरी जाण ॥
धिःक् विद्या भाग्य तरी, व्यर्थचि होईल जाण थोरपण ॥ ३ ॥
स्त्रीगोत सांठवि घरीं, आई बापास देउनी शीण ॥
घाली बाहिर त्यांना, अपवित्रचि तो अनामिकेहून ॥ ४ ॥

मुख न बघावें त्याचें, स्पर्श तरी तो कदां न हो त्याचा ॥
यद्यपि झाला तरि तो, नेम करावा सचैल स्नानाचा ॥ ५ ॥

## कामदा

( या चालीवर. )

शारदापती निधन पावला ॥ शिव पदींच तो जाण राहिला ॥
चिंतुनी मनीं पार्वतीपती ॥ शारदा सती जाइ हो सती ॥ १ ॥

## साकी

शिवलीलामृत दिव्य रसायण किंवा अमृत जाण ॥
भवरोगी जे त्यांनिं सेवितां नासिल रोगचि पूर्ण ॥
अंतीं शिव होती ॥ कैलासीं जाउन बसती ॥ १ ॥
मृत्यु जयानां कवळिल त्यांना नावडेच हा सहज ॥
ज्याचें सुकृत तेजःपुंजाचि सेविति हा रसराज ॥
टाळा मृत्यूला ॥ सेवुनि शिवनाम रसाला ॥ २ ॥

## अंजनीगीत.

श्रीधर वरदा गिरिजारमणा ॥ बाळकृष्ण हा नमितो चरणा ॥
देउनि सुमती भवभय हरणा ॥ कथा वदवी पुढें ॥ १ ॥

## पद.

( धांव विभो, ) या चालीवर.

पाव मला गौरीहर शंकर सकळ देव तुला करिती वंदन ॥ धृ० ॥
हा भव मजला भासे दुस्तर ॥ पावन करि मज शशिधर शंकर ॥
नाम तुझें तें मम मुखिं यावें ॥ कृपा अशी तूं कररे सत्वर ॥
मनिची चिंता दूर करीरे ॥ चरणीं शरण बाळकृष्ण किंकर ॥ १ ॥

NATIVE GENERAL
सार्वजनिक वाचनालय
खेड, ( पुणें. )

NATIVE GENERAL LIBRARY
सार्वजनिक वाचनालय
खेड, (पुणें.)

# अध्याय ११ वा.

## श्लोक

असें शरण मी तुला शशिधरा कृपा कां नये ॥
बहू पतित तारिले ह्मणुनि कां तुला शीण ये ॥
असें कार्धं नहो तुझेविण मला नसे आसरा ॥
तुझे पदरजा नमी सतत मी प्रभो शंकरा ॥ १ ॥

## साकी.

शौनक ऋषिचा प्रश्न परिसुनी सूत वदे हो ऋषिला ॥
रुद्राक्ष करीं धारण नित्याचि भस्म चर्चि अंगाला ॥
त्याच्या पुण्या हो ॥ गणना कैसी होइल हो ॥ १ ॥
सहस्र रुद्राक्ष धारण करि जो नित्य आपले देहीं ॥
शक्रादिक ही सुरगण सारे वंदिति त्याला पाही ॥
त्याचें दर्शन तें ॥ उद्धरील बहु जीवातें ॥ २ ॥

## पद.

( नको कचा निशीं बाहेर जाऊं, ) या चालीवर.

रुद्राक्षाची ते षोडश षोडश बांधा अपुल्या दंडीं हो ॥
शिखे माजें तो ठेवा एकाचि शिवस्वरुप त्या ह्मणुनी हो ॥
त्यावरून तें मज्जन करितां त्रिवेणि स्नानचि होतें हो ॥
द्वादश द्वादश बांधा मणगटिं बत्तिस बांधा कंठीं हो ॥
मस्तक वेष्टा चोवीसांनीं सहा सहा ते कर्णीं हो ॥
अष्टोत्तरशत माळ असावी गळ्यामधें ती नित्याचि हो ॥
एकमुखी रुद्राक्ष पूजितां विशेष भाग्याचि येइल हो ॥
पंचमुख षण्मुख अष्टमुखाचे नित्याचि पूजा भावें हो ॥
चतुर्दश मुखीं पूजन करितां लक्ष्मीकारक होइल हो ॥
रुद्राक्ष करी धारण नेमें घडे त्याला शिवार्चन हो ॥
रुद्राक्ष कथा परम धन्यची कथा त्याचि ती ऐका हो ॥ १ ॥

## साकी

कास्मिर देशीं भद्रसेन नृप मोठा पंडित होता ॥
प्रधान त्याचा परम चतुरची राजा सम जो दाता ॥
प्रजा दायाद ते ॥ ह्मणती धन्य धन्य त्याते ॥ १ ॥
सुंदर कांता मृदुभाषिणि ही सूत सभाग्यचि ज्ञानी ॥
कृपावंत गुरु शिष्य कसा हो गुरुचीं आज्ञा मानी ॥
क्षमावंत वक्ता ॥ चतुर सावधानचि श्रोता ॥ २ ॥
धनी उदारचि रोग कसा तो ठाउक नाहीं देहीं ॥
पूर्वदत्तें रत्नें ऐशीं होतिल प्राप्तचि पाही ॥
इतकीं हीं त्याला ॥ होतीं अनुकुल राजाला ॥ ३ ॥

## दिंडी.

बहुत करितां तें अनुष्ठान पाही ॥ भद्रसेनाला एक पुत्र होई ॥
प्रधानासहि तो एक पुत्र झाला ॥ उपजतांची ते भजति शंकराला ॥ १ ॥
सुधर्मचि तें नांव त्या राजपुत्रा ॥ नाम तारक तें जाण सचिवपुत्रा ॥
नित्य पूजिति दोघेहि शंकराला ॥ नाम इच्छिति तें, न, त्या ध्रुवपदाला ॥ २ ॥
वस्त्र भूषण दोघांस लेववीती ॥ बाळ दोघे काढुनी टाकिताती ॥
करिति धारण रुद्राक्ष सर्व देहीं ॥ श्रवण करितीं मागुती शिवलिलाही ॥ ३ ॥
काय ह्मणुनी नावडे यांस कांहीं ॥ बळें घाला हो भूषणेंच देहीं ॥
असें करितां मागुती काढताती ॥ सर्व वस्त्रें ब्राह्मणां अर्पिताती ॥ ४ ॥

## साकी.

शिक्षा केली बहुत परीनें नाहीं गुण तो आला ॥
ऐसें पाहुनि राव ह्मणतसे काय करावें याला ॥
चिंता रायाला ॥ लागे तैसी सचिवाला ॥ १ ॥
दिनमणि उगवे तसाचि तेव्हां पाराशर तो आला ॥
सर्वे घेउनी ऋषीभार तो आला राजसभेला ॥
पाहुनि त्या ऋषिला ॥ दोघे लागति चरणाला ॥ २ ॥

कृष्णद्वैपायन याचा जो जनिता केवळ भासे ॥
त्रिकाळज्ञानी पाराशर जो विधि ज्याला लाजतसे ॥
असुर सत्र केलें ॥ ज्यांनीं पित्यास बहु छळिलें ॥ ३ ॥
जैसे महिवर मानव फिरती तैसे रजनीचर ते ॥
पूर्वकालिं ते हिंडुनि बहुतचि त्रास देत सकळांते ॥
सत्र करुनि त्यांचें ॥ टाकी जाळुनि तरि साचे ॥ ४ ॥
जन्मेजय नृप यानें जैसें सर्पसत्र तें केलें ॥
अस्तिक ऋषिनें मधें पडूनी कांहिंजणा वांचविलें ॥
तैसा पौलस्ती ॥ करी ऋषीला मध्यस्थी ॥ ५ ॥
रावणादिक हि राक्षस सारे तेव्हां रक्षण झाले ॥
नाहींतर तो ठेवित नव्हता एक असुर त्यावेळें ॥
वादी बहु छळिलें ॥ विश्वामित्रासम केलें ॥ ६ ॥

## दिंडी

पौत्र ज्याचा शुकयोगि मान्य लोकीं ॥ असा पाराशर येइ तिथें तो कीं ॥
राव पाहुनि त्वरितची धांव घेई ॥ प्रधानासह तो चरणिं लीन होई ॥ १ ॥
ऋषी पूजा ती करुनि भूभुजानें ॥ अर्पि वस्त्रें भूषणें अनंदानें ॥
हस्त जोडुनि राव तो उभा राही ॥ हर्ष त्याचा माइना तयीं देहीं ॥ २ ॥

## पद.

( भक्ति आकळिला, ) या चालीवर.

शंका ये मजला ॥ दयाळा ॥ शंका ये मजला ॥ धृ० ॥
जन्मापासुनि दोन कुमर हे ॥ भजती शंभूला ॥
वस्त्राभरणें तया नावडे ॥ चर्चित भस्माला ॥
रुद्राक्षाच्या माळा घालति ॥ त्यागुनि रत्नाला ॥
इंद्रिय भोगहि नको तयांना ॥ घेती नामाला ॥
गज वाजी वा यानीं बसणें ॥ नलगे दोघाला ॥
वैराग्याचे पुतळे दिसती ॥ आह्मां सर्वांला ॥
कोणासी ते करति न भाषण ॥ काय करूं याला ॥
राज्य पुढें हे कैसें करतिल ॥ शंका ही मजला ॥ १ ॥

## साकी.

भद्रसेन मग आणुनि पुत्रा घाली ऋषिचे चरणीं ॥
मित्र शशी सम तेजःपुंजाचि दिसले त्याचे नयनीं ॥
पाराशर बोले ॥ पूर्व वृत्त त्या वेळें ॥ १ ॥

## पद.

( दो दिवसाची तनु ही साची, ) या चालीवर.

काश्मिर देशीं नंदिग्रामीं होती वेश्या तिथें तरी ॥
महानंदा नाम तियेचें एक सुंदरी तीच खरी ॥ धृ० ॥
ललिताकांति ती पाहुनि नयनीं कंदर्पहि तो नृत्य करी ॥
पूर्ण चंद्र हा चाले भूवरि कैसा आला खालिं तरी ॥
रत्नखचित तें यान बसाया मणिमय शोभे दंड करीं ॥
चरण पादुका रत्नखचित त्या शोभति चरणीं बहुत परीं ॥
विचित्र वसनें दिव्य सुवासिक शोभति देहीं तिच्या तरी ॥
सुवर्णमय तो पलंग पाहुनि चंद्रप्रभा ती लाज धरी ॥
भाग्या पाहुनि शक्रहि लाजे कैसें भाग्या वर्णु तरी ॥ १ ॥

## पद.

( जाऊ नकारे विषयाटविची, ) या चालीवर.

गोमहिषीची खिल्लारें तीं तिचे गृहीं होतीं ॥
वाजी गज बहु दासदासिही तिजला सुख देती ॥
तिचें गायन ऐकुन किन्नर तटस्थ बहु होती ॥ धृ० ॥
नृत्यगती ती पाहुनि नयनीं कीर्ति बहू गाती ॥
काम भोग तो तिचा इच्छुनी भूप गृहा येती ॥
वेश्या असुनी पतिव्रता ती कीर्ति अशी होती ॥
प्रथम नेमिल्या पुरुषाचा तो दिवस न सरतां ती ॥
इंद्रासहि ती वश होईना सांगु किती कीर्ती ॥
शिवभक्तीपरि तिला बहुतची उदार बहु होती ॥ चाल ॥

एकादशी करि ती नियमानें ॥ सोमवारहि आचरि प्रेमानें ॥
शिवरात्र ही पाळि अनंदानें ॥ चाल ॥
अन्नसत्र ती सदां चालवी याचक कीर्ति गाती ॥ १ ॥

## आर्या

लक्ष त्रिदळें घेउनि, नित्य पुजी ती शिवास भक्तीनें ॥
रुद्राभिषेक करवी, ब्राह्मण हस्तें शिवास प्रेमानें ॥ १ ॥
जें जें याचक इच्छिति, तें तें ती त्यास देइ भावानें ॥
प्रतिश्रावणमासीं ती, कोटिलिंग करवि नित्य नियमानें ॥ २ ॥
कुक्कट मर्कट दोघे, प्रीतीनें पाळिले तिनें सदनीं ॥
नाचावयास शिकवी, बांधी रुद्राक्ष त्यास हस्तांनीं ॥ ३ ॥
नृत्यागारीं स्थापी, तेजस्वी लिंग तें तरी जाण ॥
कुक्कट मर्कट दोघे, बांधुनि तेथेंच ती करी भजन ॥ ४ ॥
शिवलीला श्रवण करी, लिंगा पुढतीच ती करी नृत्य ॥
शिवनाम मुखीं घेई, दोघे ही श्रवण करिति तें नित्य ॥ ५ ॥
सोडुनि दोघा करवीं, करवी हो नृत्य ती शिवा पुढती ॥
त्यांच्या गळां कपाळीं, स्वहस्तेंच लावि शुद्ध हो विभुती ॥ ६ ॥
वेश्येच्या संगतिनें, नासाचा लाभ तो तया झाला ॥
कैसें सत्व तियेचें, बघण्या तें शंभु तो तिथें आला ॥ ७ ॥

## अंजनीगीत.

सौदागर तो शंकर झाला ॥ वेश्येच्या त्या सदना आला ॥
स्वरूपं त्याचें देखुनि अबला ॥ तन्मय ती झाली ॥ १ ॥
यथासांग मग पूजन करुनी ॥ रत्नमंचकीं बसवी नेउनी ॥
तों ती पाही कंकण नयनीं ॥ त्याचें हस्तकीं ॥ २ ॥
स्वर्गांतिल ही वस्तू दिसते ॥ विधिनें निर्मिलि ऐसें गमतें ॥
मानव प्राण्या शक्य न, हो, तें ॥ खचित मज वाटतें ॥ ३ ॥
बोल ऐकुनि ते त्यावेळीं ॥ वेश्ये हातीं कंकण घाली ॥
आनंदित ती वेश्या झाली ॥ नेम करी तेव्हां ॥ ४ ॥

## पद.

( सखे अनुसये, ) या चालीवर.

पृथ्वी मोलचि कंकण तरि हें ॥ बत्तिस लक्षणि मीं ही आहे ॥
तीन दिवस मम सदनीं राहे ॥ दासी तुमची झाले पाहे ॥ १ ॥

## पद

( गजानना दे दर्शन, ) या चालीवर.

तयासि तें तरि योग्य वाटलें ॥ सर्वेंचि त्यानें लिंग काढिलें ॥
सूर्यप्रभेहुन तेज आगळें ॥ न जाय वर्णिलें ॥ १ ॥
लिंग देखुनी ती त्यावेळीं ॥ महानंदा तन्मय झाली ॥
बोले जय जय शंकर शूली ॥ जगदात्मा तूं तरी ॥ २ ॥
लिंगप्रभेनें नयन झांकती ॥ कोट कंकणें तुच्छ भासतीं ॥
अनन्य भावें भजतां मुक्ती ॥ मिळेल ती मजला ॥ ३ ॥

## साकी

सौदागर मग तिला बोलला जतन करींगे याते ॥
लिंगापाशीं माझा प्राणाची जरि भंगुनि गेलें तें ॥
झालें दग्ध जरी ॥ अग्नी भक्षिन मीच तरी ॥ १ ॥
अवश्य ह्मणुनी नेउनि ठेवी नृत्यागारीं त्याते ॥
ते दोघे ही रत्नमंचकीं करिती मग शयनाते ॥
शंकर मग पाहे ॥ कैसें सत्व, तिचें आहे ॥ २ ॥
त्याचे आज्ञें अग्नि लागला नृत्यागारा तेव्हां ॥
चहूं कडुन ते लोक धांवती झाली हाकाची तेव्हां ॥
जागृत ती केली ॥ मदनारीनें त्यावेळीं ॥ ३ ॥
प्रळयकाळसम अग्नि पाहुनी झाली घाबरी अबला ॥
तैशा माजीं उडी घालुनी सोडुन दे दोघाला ॥
कुक्कट मर्कट ते ॥ जे तिनें पाळिले होते ॥ ४ ॥

जेव्हां शाळा दग्ध जाहली अग्नि शांतची झाला ॥
सौदागर तो पुसूं लागला तेव्हां त्या वेश्येला ॥
लिंग कुठें आहे ॥ आणून दे मज लवलाहे ॥ ५ ॥
बोल ऐकुनी होइ घाबरी वक्षस्थळ तें बडवी ॥
ह्मणें लिंग तें दग्ध जाहलें काय कोपली देवी ॥
अंबे जननी गे ॥ कैसी करणी झाली गे ॥ ६ ॥

## श्लोक

नेमाचा तो दूसरा आज दीन ॥ लिंगा साठीं प्राण देईन जाण ॥
या हत्येची गोष्ट गे तूंच केली ॥ देवाला कां बोल गे याच वेळीं ॥ १ ॥

## दिंडी

अग्नि आणुनि सत्वरीं सिद्ध केला ॥ गगनपंथीं जाति हो तई ज्वाला ॥
होइ सौदागर सिद्ध त्याच वेळां ॥ उडी टाकावी ह्मणुन जवळि आला ॥
अती लाघवि तो उमारंग पाही ॥ भवनदींतुन तारण्या तारु तो ही ॥
येइ कुंडाच्या जवळि शंभु तो कीं ॥ 'नमः शिवशिवाय' ह्मणुन उडी टाकी ॥

## पद

( दिसली पुनरपि गुप्त जाहली, ) या चालीवर.

ऐसें देखुनि महानंदा नमन करी त्या शिवचरणा ॥ धृ० ॥
संपत्ती ती लुटवी सारी कांहिं नसे हो त्या गणना ॥
अश्वशाळा गजशाळाही दान करी त्या सर्वांना ॥
सर्व वस्तु त्या दान करूनी करिती झाली मग स्नाना ॥
भस्म चर्चुनी रुद्राक्षहि ते लेवुनि करि हो शिवध्याना ॥
शिव शिव ह्मणुनी उडी टाकिली नाहीं पुण्या त्या गणना ॥ १ ॥

## साकी.

उदयाचलिं तें सूर्य बिंबही जैसें उदया येई ॥
तैसा शंकर भक्ता करितां प्रगटाचि तेथें होई ॥
महानंदेचें ॥ रक्षण करण्या हो साचें ॥ १ ॥

जटाभार तो माथ्यावरती त्रितिय नेत्र तो वन्ही ॥
झुळझुळ वाहे शिरीं नीर तें अभयकर महा ज्ञानी ॥
शोभे चंद्र शिरीं ॥ भस्म चर्चिलें त्या शरिरीं ॥ २ ॥
खट्वांगधारि नीलकंठ ज्या कसिलें व्याघ्रांबर तें ॥
नरमुंडाची माळ गळ्यामधिं वेष्टी गजचर्मातें ॥
व्याल सर्व देहीं ॥ दशभुजा मिरविती पाही ॥ ३ ॥
ऐसा शंकर प्रगट होउनी कंदुकवत सहजचि हो ॥
वरचेवरती दशभूजांनीं झेलुन धरि तिजला हो ॥
प्रसन्न मी तुजला ॥ इच्छित मागे तूं मजला ॥ ४ ॥
प्रसन्न जरि तूं नागरीक हे उद्धरि सर्वचि देवा ॥
यानीं वसवुनि निजपदिं नेई इच्छा तरि ही पुरवा ॥
तथास्तु शिव बोले ॥ सर्व नगर ते उद्धरिलें ॥ ५ ॥
महानंदा बैसुनि यानीं सर्वांसह मग चाले ॥
माता बंधू सर्वें घेउनी शिवपद जवळी केलें ॥
आधिव्याधि नाहीं ॥ क्षुधा तृषा विरहित पाही ॥ ६ ॥

## श्लोक

( चामर वृत्त. )

काम क्रोध द्वंद दुःख मत्सरादि ज्या नसे ॥
अमृता परीस जेथ नीर गोड ही असें ॥
कल्पवृक्ष शोभवीतसे अपार तीं वनें ॥
कामधेनु इच्छिलेंच देत भक्त कारणें ॥ १ ॥

## दिंडी

महानंदा जाऊनि पदीं राहे ॥ सर्वदा तें अविनाश असें आहे ॥
भद्रसेनाला सांगुनी कथा ही ॥ ऋषी बोले काय तें पुढें पाही ॥ १ ॥

## साकी.

कुक्कट मर्कट पूर्वीचे हे पुत्र तुझे बा राया ॥
रुद्राक्ष कंठिं भालिं विभूती त्या पुण्यें या समया ॥

६४८६

शिवभक्तचि झाले ॥ पूर्वपुण्य उदया आलें ॥ १ ॥
निर्दोषचि हें राज्य करूनी शिवभजनीं बा बहुता ॥
लावुनि अंतीं नेतिल तुह्मां भेटायां गुहताता ॥
ऐकुनि नृप बोले ॥ धन्य धन्य मी यावेळें ॥ २ ॥

## दिंडी.

किती वर्षें करतील राज्य हो, हे ॥ किती वर्षें आयुष्य यास आहे ॥
नवस केले बहुतची सुता साठीं ॥ अंतिं आह्मां होणार हीच काठी ॥ १ ॥
सत्य जरि मी बोलेन देख राया ॥ होइ कारण तें तुह्मा दुःख व्हाया ॥
मृषा बोलें मूर्खत्व अंगिं येई ॥ सत्य तरि तें विषचि तुह्मां होई ॥ २ ॥
सत्य बोला संकोच नको स्वामी ॥ दास आहें ऐकण्या सिद्ध हा मी ॥
वर्ष द्वादश तारे तुझे सुता पूर्ण ॥ सात दिवसांनीं मरण यास जाण ॥ ३ ॥

## कामदा.

(या चालीवर.)

राव ऐकुनी शोक हो करी ॥ मूर्छना तया येत वरवरी ॥
पडत भूमिला ग्लानि येउनी ॥ काय व्यर्थ हो जन्म घेउनी ॥ १ ॥
सकल कामिनी करिति शोक हो ॥ अंत त्या नसे वर्णण्यास हो ॥
ऊर बडविती वरिवरि तरी ॥ पाहुनी मुनी खुणावितो करीं ॥ २ ॥

## अंजनीगीत

सावध करुनी मुनी बोलतो ॥ ऐके राया तुला सांगतों ॥
ठेवी वचनीं विश्वासचि तो ॥ माझ्या तूंचि तरी ॥ १ ॥

## पद.

( श्रीसांबाच्या समान दैवत, ) या चालीवर.

पंचभुतें जैं न्व्हती कोठें माया न्व्हतीं तरी ॥
रविशशिही कांहीं नव्हते वरी ॥ धृ० ॥
ब्रह्ममय तरी सगळें होतें स्फुरणाचि झालें वरी ॥
अहंब्रह्म मी ह्मणुनियां तरी ॥

तो ध्वनि माया सत्य जाण बा महत्तत्व तेथुनी ॥
त्रिविध अहंकार ते मागुनी ॥
सत्वांशानें पीतवसन तो द्रुहिण रजांशें तरी ॥
तमांशें रुद्र निर्मिला वरी ॥ चाल ॥
स्वर्ग स्थित्यंत या कारणाचि जो जाहला ॥
विधिस ह्मणतसे आतां रचि सृष्टिला ॥
विधि मग ह्मणाला नाहीं ज्ञानचि मला ॥ चाल ॥
चौ वेदाचा उपदेशाचि तो शंभू मग त्या करी ॥
ऐकुनी तोषे विधि अंतरीं ॥ १ ॥
चौवेदाचें सार असें बा रुद्राध्यायाचि तरी ॥
जपतां पातक दूरचि करी ॥
विशेष गुह्यज्ञान असेना याहुनि भुवनत्रयीं ॥
ह्मणुनि जप करी तूं या समयीं ॥
रुद्राध्याय हा शिवरूपचि बा श्रीशंकर बोलला ॥
जपतां पावेल तो कीं तुला ॥
जे जे ऐकिति पठणाचि करिती त्यांचें दर्शन तरी ॥
नेईल भवनदिच्या पैलतिरीं ॥ चाल ॥
कमलोद्भव सांगे सप्तसुताला तरी ॥
सांप्रदाय ऋषिंनीं आणला मग भूवरी ॥
रुद्राध्यायचि तो किति वर्णूं मी तरी ॥ चाल ॥
जपतपदानाहि करणें नलगे याहुनि दुसरें तरी ॥
ह्मणुनी आळस नको बा क्षणभरी ॥ २ ॥

## पद.

( रुचती कां तीर्थ यात्रा, ) या चालीवर.

करतां हो पठण याचें नित्याचि तें अंतरीं ॥
त्याच्या हो दर्शनाते सुर घेती वरवरी ॥
रुद्राचा फार मोठा महिमा या भूवरीं ॥
महिमा हो फार झाला यम भ्याला अंतरीं ॥ १ ॥

## पद.

( जाउं नकारे विषया, ) या चालीवर.

यमकिंकर ते रिते हिंडती पाप नसें कांहीं ॥
पापी प्राणी कोणि दिसेना रिते पाश तेही ॥ धृ० ॥
यम मग पुसुनी विधिस निर्मी अभक्ति कृत्या ती ॥
जनहृदयीं ती संचरली मग मत्सर करवी ती ॥
शिवद्वेष ते करूं लागले अल्प मती हो ती ॥
नरकांमधें ते मग पडती कीटक ते होती ॥
हरिहर यांचा भेद मानिती नरकीं ते जाती ॥
रुद्रानुष्ठान आयुष्याची वृद्धी करतें ही ॥ १ ॥

## साकी.

रुद्रावर्तन अयुत करीबा शिवावरी तूं राया ॥
अभिषेकाची धार धरावी टळे मृत्यु या समया ॥
अथवा शतघट ते ॥ स्थापुनि कारि बा शांतीतें ॥ १ ॥
शतघट स्थापुनि वृक्षपल्लवा आणुनि त्यांतचि घाली ॥
रुद्रानें तें उदक मंत्रुनि शिंचन कर या वेळीं ॥
तुझे पुत्रावरी ॥ टळेल मृत्यु जाण तरी ॥ २ ॥

## अंजनीगीत

अवर्तनें तीं दहासहस्रची ॥ नित्य करावि तूं शांत मनेंची ॥
सप्तदिनांतीं पुजा शिवाची ॥ पूर्ण करी राया ॥ १ ॥

## पद.

( शंकित कां होशी, ) या चालीवर.

नमितों मी तुजला ॥ मुनिराया ॥ धृ० ॥
सकळामध्यें मांडित तरि तूं पळवी मम शोकाला ॥
आचार्यत्वचि तुह्मी करूनी सांग करा शांतीला ॥
तुह्मां संगें विप्र असति हे आणिक सांगा मजला ॥

तितके आतां येथें अणतों आज्ञा कारि बा मजला ॥
रुद्रानुष्ठान जाणाति पूर्णाचि जाणाति जे ध्यानाला ॥
परधन दारा वमन समजती पूजिति जे शंभूला ॥
दुष्टप्रतिग्रह कधिं नच घेती प्राण जरी तो गेला ॥
सामर्थ्यें ते चालुं न देती थांबविती सूर्याला ॥
साक्षात् आणुनि उभा कारिति त्या गिरिजावर शंभूला ॥ १ ॥

## साकी.

ऐसे ब्राह्मण सर्वें घेउनी व्यासापिता तो बसला ॥
सहस्त्रघट ते स्थापुनि हातीं मंत्रित कारि सर्वांला ॥
गंगाजळ ओती ॥ आम्रपल्लव घटावरती ॥ १ ॥
रुद्रघोष तो ब्राह्मण करुनी अनुष्टान ते करिती ॥
सप्तदीन ते पूर्णचि झाले आला रवि तो वरती ॥
मृत्युसमय आला ॥ बाळ पडे तो धरणीला ॥ २ ॥
घाबरला नृप गुरू बोलतो ना भी ना भी राया ॥
रुद्रोदक तें शिंपुन नंदन सावध कारि त्यां समया ॥
पुसती मग त्याला ॥ सांगे सर्वचि आह्माला ॥ ३ ॥
परम भयानक उर्ध्व जटा त्या भाळीं शेंदुर लाल ॥
विशाळ दाढा नेत्र लालचि मला भासला काळ ॥
ऐशा पुरुषानें ॥ धरलें मज निजपाशानें ॥ ४ ॥
पंचवदन ज्या दशभुजाही भस्म आंगीं हो ज्याच्या
दशहस्ती तीं आयुधें सारीं रविसम तेजहि त्याच्या ॥
देहीं मज दिसलें ॥ अघतम सारें जें हरलें ॥ ५ ॥
महाराज ते येउनि त्यांनीं बंध मुक्त मज केलें ॥
काळपुरुष तो पाशीं बांधुनि ताडण कारिताचि गेले ॥
तेथुन आलों मी ॥ धन्य दयाळा तूं स्वामी ॥ ६ ॥
पुत्र मुखींचे बोल ऐकुनी जयजयकारचि केला ॥
नमस्कार तो घालि ब्राह्मणां संतोष नृपा झाला ॥
विप्र चरणीं लोळे ॥ गडबड गडबड त्यावेळें ॥ ७ ॥

## दिंडी.

बहुत वाद्यांचा गजर होउं लागे ॥ नाद त्यांचा जाइ हो दूर वेगें ॥
शृंगभृंगादिक महाकाल थोर ॥ नाद सनया मंजूळ देति फार ॥ १ ॥
शंभुलीला गावुनी नाचताती ॥ घोष नामाचा करुनि भागताती ॥
भद्रसेनानें होम पूर्ण केला ॥ बहुत रत्नें देइ तो द्विजगणाला ॥ २ ॥

## आर्या.

किति दिली दक्षिणा ती, गणना त्याचि नये मला करितां ॥
याचक सारे ह्मणती, श्रमलो आह्मी गृहास ती नेतां ॥ १ ॥
मंत्राक्षत देउनि त्या, विजय असो बा तुझ्या सुता आतां ॥
तों एक नवल झालें, ऐसा आनंद होत जों असतां ॥ २ ॥
सुगंधवनीं वसंतचि, काशीं क्षेत्रांत स्वर्धुनी वाहे ॥
श्वेतोत्पल मृडाणी, रमणलिंगास भक्तिनें वाहे ॥ ३ ॥
किंवा निर्धनिकाला, चिंतामणि तो जसा मिळावा हो ॥
क्षीराब्धि जसा क्षुधिता, तैसा नारद मुनी हि आला हो ॥ ४ ॥

## पद.

( चाल साधी. )

वाल्मिक मुनि ही प्रल्हादाहि तो ऐसे शिष्यचि ज्याचे ॥
ज्याचे शिष्यहि वंद्य जगाला भाग्य किती त्या गुरुचें ॥ धृ० ॥
चौसष्टकळा चौदा विद्या करतळमल हो ज्याला ॥
रूप जयाचें पाहुनि भासें नारायण हा आला ॥
इंद्रादिकही भीती बहुतचि पाहुनि तत्तेजाला ॥
नारदमुनि तो देखुनि अग्नी मूर्तिमंत वर आला ॥
दक्षिणाग्नी गार्हपाहवनी उठती पाहुनि मुनिला ॥
पाराशरादि सकळ विप्र ते नमती पदयुग मुनिचे ॥ वाल्मिक० ॥

---

१ होमा मध्यें तीन अग्नि असतात ते:—दक्षिणाग्नि, गार्हपत्याग्नि आणि अहवनीताग्नि. असें तीन अग्नि नारदास पाहून उभे राहिले.

## दिंडी.

बहुत वाद्यांचा गजर होउं लागे ॥ नाद त्यांचा जाइ हो दूर वेगें ॥
शृंगभृंगादिक महाकाल थोर ॥ नाद सनया मंजूळ देति फार ॥ १ ॥
शंभुलीला गावुनी नाचताती ॥ घोष नामाचा करुनि भागताती ॥
भद्रसेनानें होम पूर्ण केला ॥ बहुत रत्नें देइ तो द्विजगणाला ॥ २ ॥

## आर्या.

किति दिली दक्षिणा ती, गणना त्याचि नये मला करितां ॥
याचक सारे ह्मणती, श्रमलो आह्मी गृहास ती नेतां ॥ १ ॥
मंत्राक्षत देउनि त्या, विजय असो बा तुझ्या सुता आतां ॥
तों एक नवल झालें, ऐसा आनंद होत जों असतां ॥ २ ॥
सुगंधवनीं वसंतचि, काशीं क्षेत्रांत स्वर्धुनी वाहे ॥
श्वेतोत्पल मृडाणी, रमणलिंगास भक्तिनें वाहे ॥ ३ ॥
किंवा निर्धनिकाला, चिंतामणि तो जसा मिळावा हो ॥
क्षीराब्धि जसा क्षुधिता, तैसा नारद मुनी हि आला हो ॥ ४ ॥

## पद.

( चाल साधी. )

वाल्मिक मुनि ही प्रल्हादाहि तो ऐसे शिष्याचि ज्याचे ॥
ज्याचे शिष्यहि वंद्य जगाला भाग्य किती त्या गुरुचें ॥ धृ० ॥
चौसष्टकळा चौदा विद्या करतळमल हो ज्याला ॥
रूप जयाचें पाहुनि भासें नारायण हा आला ॥
इंद्रादिकही भीती बहुताचि पाहुनि तत्तेजाला ॥
नारदमुनि तो देखुनि अग्नी मूर्तिमंत वर आला ॥
दक्षिणाग्नी[१] गार्हपाहवनी उठती पाहुनि मुनिला ॥
पाराशरादि सकळ विप्र ते नमती पदयुग मुनिचे ॥ वाल्मिक० ॥

---

१ होमा मध्यें तीन अग्नि असतात ते:—दक्षिणाग्नि, गार्हपत्याग्नि आणि अहवनीताग्नि. असें तीन अग्नि नारदास पाहून उभे राहिले.

## दिंडी.

प्रधानासह तो भद्रसेन जाई ॥ हस्त जोडुनि मुनि पुढें लीन होई ॥
दिव्य सुमनें आणुनी पुजा केली ॥ षोडशोपचार, पूर्ण तयेवेळीं ॥ १ ॥
त्रिकाळाचें ज्ञान तें तुह्मां आहे ॥ गमन त्रिभुवनिं आपलें सदां राहे ॥
मार्गीं कांहीं देखिलें नवल स्वामी ॥ सर्व सांगा ऐकण्या सिद्ध हा मी ॥ २ ॥

## पद.

(नाहीं पापचि या देहीं.) या चालीवर.

पाहिलें शंभु दूताला ॥ दशभुज पंचवदन ज्याला ॥ धृ० ॥
बांधुनि नेती मृत्यूला ॥ सोडिति ते तव पुत्राला ॥
उत्तम केलें शांतिला ॥ प्रेरिलें वीरभद्राला ॥
बा तव पुत्र रक्षण्याला ॥ वीरभद्र तो मृत्यूला ॥
बोले मज देखत त्याला ॥ कोणी दिधलें आज्ञेला ॥
अणण्या नृपतनयाला ॥ दहासहस्त्र वर्ष याला ॥
असें अयुष्य हो ज्याला ॥ तो पावेल राज्याला ॥
रुद्रमहिमा तो तुजला ॥ ठाऊक असुनी तूं त्याला ॥
कैसें आणलें चांडाळा ॥ पाहिले० ॥ १ ॥

## दिंडी.

चित्रगुप्ताते पुसे पितृराज ॥ कशी झाली चूक हो तरी आज ॥
पत्रिका ती वांचुनी तई पाही ॥ वर्ष द्वादश होतांच मत्यु येई ॥ १ ॥
मृत्यु नोहे गंडांतरची होतें ॥ महत्पुण्यें निरसुनी जाइ हो, तें ॥
स्वापराधें कष्टि तो सूर्यसूत ॥ शंभु चरणीं लीन तो तरी होत ॥ २ ॥

## अंजनीगीत

कृतांत मग तो उभा राहिला ॥ गिरिजावर मग त्यानें स्तविला ॥
न कळतां हा दोषाचि घडला ॥ क्षमा करावी ॥ १ ॥
नारदवचना परिसुनि नृपती ॥ लोळण घाली चरणा वरती ॥
आणिक सहस्त्र अवर्तनें तीं ॥ करी आनंदानें ॥ २ ॥

शंभर रुद्रचि करितां पाही ॥ होई नर तो शतायुषी ही ॥
अध्यायाचें करितां पठण ही ॥ शिवरूपीं तो होई ॥ ४ ॥
समजा तरि तो मुक्ताचि येथें ॥ वहुत तरति ते त्याचे तीर्थें ॥
गुप्त जाहले नारद मुनि ते ॥ पाराशर तोषें ॥ ५ ॥
अगणित धन तें अर्पी गुरुला ॥ संतोषचि तो गुरुते झाला ॥
सर्वें घेउनी सर्व द्विजाला ॥ जाई तो आश्रमीं ॥ ६ ॥

## अभंग

भद्रसेनाचें हो आख्यान पढती ॥ आयुष्य संतती वाढे त्यांची ॥
अंतीं काळाची हो नाहीं तया भीती ॥ वंदोनिया नेती शीवपदा ॥
ऐकतां पढतां पुण्य तें विशेष ॥जाती सर्व दोष नीरसूनीं ॥
सहस्रकपिलादान पुण्य होत ॥ नित्य जे वाचीत आख्यान हें ॥
अभक्ष भक्षण सुरापानादीक ॥ ब्रह्महत्यादीक पापें जातीं ॥ १ ॥
वाचा अध्याय त्रिकाळीं ॥ गंडांतरें दूर झालीं ॥
तरावयासि निःशेष ॥ आयुष्यहीन लोकांस ॥
कलियुगीं तारक बोरे ॥ अनुष्ठान हें निर्धारें ॥
रुद्रघोष तो करी नित्य ॥ हेंच अंतीं तारक सत्य ॥ २ ॥

## साकी.

सुधर्मपुत्रा राज्य देऊनी युवराजहि तें पाही ॥
प्रधानात्मजा सुखें देऊनी तपो वनीं मग राही ॥
सचिवासह गेला ॥ अनुष्ठान तें करण्याला ॥ १ ॥
रुद्रध्यान ते करिती दोघे महारुद्र तो तोषे ॥
राव प्रधानाहि मिरवित नेले बसवुनि यानीं सरसें ॥
कांहीं दिवस होते ॥ वैकुंठीं त्या दोघे ते ॥ २ ॥
शेवटिं गेले ।शिवपादें दोघे शिवरूपीं ते झाले ॥
अकराव्या ह्या अध्यायाला शिवरूपाचि वा आलें ॥
अकरा रुद्राचें ॥ ह्मणा शिव शिव तारि वाचें ॥ ३ ॥

## पद

( शिवाज्ञेची वाट न पाहतां, ) या चालीवर.

अध्यायाचें श्रवणाचि करितां तोषाचि रुद्राला ॥
कल्पद्रुम हो हा तरि जाणा पुरवि कामनेला ॥ धृ० ॥
मृत्युंजयजप रुद्रावर्तन कराच नियमानें ॥
ग्रहपीडा ती दूर होइ बा टळतिल तीं विघ्नें ॥
पिशाच बाधा कधिं नच होई याचे पठणानें ॥
दारुण रोगहि नाश पावती जाण निश्चयानें ॥ चाल ॥
सारें लटकें मानिल जो येथें ॥
अल्पायुष तें होइल हो त्यातें ॥
चांडाळचि तो निंदिल जो यातें ॥ चाल ॥
विटाळ त्याचा कधिं नच व्हावा सोडी संगतिला ॥
वांझ ह्मणावी जननी त्याची जरि तिला हा झाला ॥ १ ॥

## पद.

( दोदिवसाची, ) या चालीवर.

भाषण करि जो अशा नराशी पापि ह्मणावें त्यास तरी ॥
स्वगृह त्यांना वर्ज करावें न जावें बा त्याचे घरीं ॥
हिंस्त्रकगृहिं ते सुशिल न जाती तेवि त्यजावें त्यास दुरी ॥
वीष्ट भक्षितां नयनीं पाहती पंक्तिस त्याच्या मूर्ख तरी ॥
वसती त्यांना मृत्यु आला संदेह नाहीं तीळभरी ॥
शिवलीला जे अखंड पढती त्यावरि शंभू कृपा करी ॥
ना तरि वाचा अध्यायचि हा ब्रह्मानंद तो त्यांचे घरीं ॥
अनुष्ठान तें करितां याचें नित्य रुद्र तो होइ तरी ॥ १ ॥

## अंजनीगीत

गिरिजारमणा कृपा करावी ॥ बाळकृष्ण या दासा द्यावी ॥
सुमति नाथा देउनि बरवी ॥ वदवी तव लीला ॥ १ ॥

## पद.

( अहा हे कृष्ण मुकुंदा, ) या चालीवर.

शिव शिव मुखें बोला ॥ चर्चुनि भस्मचि शरिराला ॥ धृ० ॥
रुद्राक्षाच्या माळा ॥ प्रेमें कंठीं हो नित्यचि घाला ॥
स्थापुनि शिवलिंगाला ॥ रुद्राभिषेकची कर मग त्याला ॥
वाहुनि मग रत्नाला ॥ भावें अर्पा सुमनें हो त्याला ॥
धूप दीप नैवेद्याला ॥ अर्पुनी करि मग शिवस्तवनाला ॥
पदरचनात्रिदळाला ॥ बाळकृष्ण हा अर्पितो तुजला ॥ १ ॥

NATIVE GENERAL LIBRARY, KHED. (POONA)
सार्वजनिक वाचनालय खेड, (पुणें.)

# अध्याय १२ वा.

## श्लोक

प्रभो शरण मी तुला करि दया हि दासा वरी ॥
किती तारि तुला स्तवूं सदयता मनीं बा धरी ॥
दया मनि तुझ्या नसे सुख मला तरी ना मिळे ॥
तुझे चरण पाहण्या मन हि घाबरें जाहलें ॥ १ ॥

## पद.

( श्रीसांबाच्या समान दैवत, ) या चालीवर.

ब्राह्मण क्षत्रिय वैश्य शूद्र ही ब्रह्मचारि ते तरी ॥
गृहस्थ वानप्रस्थ पूर्णचि परी ॥ धृ० ॥
वृद्ध तरुण हो स्त्री बालानो शिव नामचि अंतरीं ॥
ध्याहो नका विसंबूं क्षणभरी ॥
शिव स्मरण हें जया नावडें अपवित्रचि तो तरी ॥
समजा अंत्यजाहुन ही वरी ॥
वस्त्राभरणें मंडित तनु जरि नित्य स्वयें तो करी ॥
समजा तें भूषित प्रेता परी ॥
पशुसम तोही अन्न भक्षितो नेत्र तयाचे तरी ॥
मयुरांगिच्या ते नयना परी ॥
वारुळ छिद्रासम कर्णचि ते हस्त चरण ते तरी ॥
दिसती शाखा गेल्या वरी ॥ चाल ॥
शिव भजनाविण जो बुडो समुद्रांतरीं ॥
ना तारि वडवाग्नी भस्म करो सत्वरी ॥
वा काळसर्प तो दंशुनि जावो तरी ॥ चाल ॥
जैसी मुंगी गुळा न सोडी अर्ध तुटे ती परी ॥
तैशी बा श्रवणीं आवड धरी ॥ १ ॥
एक सूत बा पोटीं असुनी होता प्रियकर अती ॥
चुकला शोधा न चाले मती ॥

अकस्मात तों वार्ता आली आईबाप धांवती ॥
ऐकण्या तशी कथेस हो बा मती ॥
ग्रामांतारें तो प्रियपति गेला प्रिया वाट पाहती ॥
तों पत्र आलें ऐकण्या धांवती ॥
निर्धनासि धन अंधा नयनांचे तृषिता जीवन जसें ॥
श्रवणीं तुह्मा सुख व्हावें तसें ॥
चिंता निद्रा दूर करूनी श्रवणीं सादर असा ॥
कदर्यू राखि धनाला जसा ॥ चाल ॥
वक्ता पंडित तो गुरु समजा अंतरीं ॥
शंकर मानुनि त्या पूजन त्याचें करी ॥
वदतां शिवमहिमा प्राशन करि सत्वरी ॥ चाल ॥
सुरभीच्या त्या स्तनांतुनी बा सुधा धार वरवरी ॥
येई तशी लीला प्राशन करी ॥

## श्लोक.

वक्ता मोठा समज तरि तूं श्रेष्ट या मृत्यु लोकीं ॥
जें जें सांगी श्रवण करि तूं मानुनी सत्य तें कीं ॥
खोट्या प्रश्ना करुनि जरि तूं त्रासवीशील त्यातें ॥
भूताची बा गति सहजची प्राप्त होईल तूंतें ॥ १ ॥

## साकी

पुराणिकाला नमन करावें सभेमधें बा जाणी ॥
उगाचि गर्वें जाशिल उठुनी जरी कथा सोडूनी ॥
अल्पायुषि होशीं ॥ भोगशील बहु दुःखाशी ॥ १ ॥
कुटील खळ वा पापी धूर्तचि नलगे ऐसा श्रोता ॥
दुग्ध जरी तें वपू पुष्टवी परि तें वीषचि ज्वरिता ॥
श्रवणीं बैसुनी ॥ खंडुं नको ती कुतर्कांनीं ॥ २ ॥
गप्पा नलगे मनन करावें कथा सर्व ऐकूनी ॥

प्रीतीनें बा पूजुनि वक्ता भूषावि मग रत्नांनीं ॥
रत्नें देतां तीं ॥ नेत्र प्रकाशित हो होती ॥ ३ ॥
भावें पूजन करितां त्याचें तुष्टे पार्वतिरमण ॥
दरिद्र कधिं तें त्यास शिवेना मिळेल शिवपद जाण ॥
धरुनी भक्तीला ॥ भावें पूजा वक्त्याला ॥ ४ ॥

## अभंग.

टाकी पाऊल कथेशीं ॥ संहारिती पापराशी ॥
घालुनि ऊष्णीष[1] ऐकती ॥ जन्मांतर पक्षी होती ॥
ह्मणाल मग तुह्मी आतां ॥ काय दोष त्या काढीतां ॥
मुख्य पल्लव तो सोडा ॥ सुखाचा बा हाचीं जोडा ॥ १ ॥

## अभंग

विडा खाऊनीया कथा जे ऐकती ॥ यातना भोगीती नानापरी ॥
ऐकतां कथेशी निद्रा जे हो घेती ॥ निद्रा मोडावी ती बहु यत्नें ॥
अंतर सद्गद नेत्रीं यावें पाणी ॥ मग निद्रा कोठूनी स्पर्शेल ती ॥
वरी तें जीवन व्यर्थहो लावून ॥ भक्ति भावावीण व्यर्थ तें हो ॥ १ ॥
वक्त्याहून उंच आसनीं तत्वतां ॥ धरूनी अहंता बसूं नये ॥
हें न मानीती ते काग होती ॥ जगपुरिष भक्षिती सर्वदां हो ॥
विरासन घालती वृक्ष ते हो होती ॥ पाय पसरीती त्यास दंड ॥
जेठा घालूनीया बळेंच बैसती ॥ नरकीं त्या टाकीती यमदूत ॥
श्रवण सोडूनी दाटूनी नीजती ॥ अजगर होती जाणा ते हो ॥
नमन केलिया वांचून बैसती ॥ वंशवृक्ष होती चांडाळ ते ॥ २ ॥

## कटाव

कथेंत बोलति भलत्या गोष्टी ॥ मंडुक होउन सदां वटवटी ॥ टाळि न वाजवि होउन हट्टी ॥ संसारी तो होतो कष्टी ॥ शिव कीर्तनीं करी चावटी ॥ ॥ सारमेय तो शतजन्म कोटी ॥ दुरुत्तरें जे बोलती निश्चिती ॥ सरडाचे

१ पागोटें.

ते जन्मा जाती ॥ अनादर जे श्रवणीं करिती ॥ अन्य जन्मीं सूकर होती ॥ शिव चरित्रा उच्छेदीती ॥ वृकयोनीला जाण पावती ॥ वक्त्यासी जे आसन देती ॥ शिवा सन्निध तेच बैसती ॥ वस्त्र अर्पितां अन्नें मिळती ॥ पुराण श्रवण जे वरवर करिती ॥ वैराग्य भक्तिहि अंगीं येती ॥ या विषयींची मूळ कथा ती ॥ सांगिन आतां तुह्मांसाठीं ॥ १ ॥

## दिंडी

दक्षिणेसी ग्राम तें एक पाही ॥ नाम बाष्कळ हो धर्म तिथें नाहीं ॥
स्त्री पुरुष ते सर्व हो व्यभीचारी ॥ धर्म नाहीं ठाउका अनाचारी ॥ १ ॥
वेदशास्त्रहि ठाउके नसे कोणा ॥ नयन असुनी अंध ते तरी जाणा ॥
याच परिचे अपवित्र लोक जेथें ॥ धर्म कैसा राहील सांग तेथें ॥ २ ॥
जार तस्कर चहाड दुराचारी ॥ मद्यपी ते मार्गघ्न वित्तहारी ॥
जनक जननीला त्रास बहू देती ॥ अशी वस्ती नगरिची तरी होती ॥ ३ ॥

## साकी

त्या ग्रामीचा एक विप्र तो नामें विदुरचि होता ॥
वेश्येशीं रत अहोरात्र ही सोडुनि अपुली कांता ॥
काम कर्दमीं तो ॥ स्वस्त्री सोडुनि बहु रमतो ॥ १ ॥
बहुला नामें त्याची कांता तीही जारिणि फार ॥
जारासी ती क्रीडत असतां धरी तीस तो विदुर ॥
जार पळुनि गेला ॥ विदुर मारि हो कांतेला ॥ २ ॥

## पद.

( गणया गणया, ) या चालीवर.

होउनि वश तूं जाराला ॥ मीळविलें बहु द्रव्याला ॥
द्रव्याचि दे गे तें मजला ॥ नेउनि अर्पिन वेश्येला ॥
देऊं कोठुनि द्रव्याला ॥ ऐकुनि मारी तो तिजला ॥
घेत हिरूनी वस्तूला ॥ टाकी देडानि वेश्येला ॥ १ ॥

## श्लोक

संपत्ति सारी गणिकेस वाही ॥ जारास अर्पी बहुला तशी ही ॥
दोघेहि पापांत बुडोनि गेली ॥ तों मृत्युपाळी विदुरास आली ॥ १ ॥

## पद.

( जाउं नकारे विषया, ) या चालीवर.

कुंभींपाकीं जाउनि पडला भोगित दुःखा हो ॥
विंध्याचालिं मग पिशाच योनिंत ढकलिति त्याला हो ॥ धृ० ॥
आळेपिळे ते देउनि अंगा हिंडे रानीं हो ॥
क्षुधा तृषा बहु पीडा देती खाण्या न मिळे हो ॥
रक्तवर्ण तो देह तयाचा शेंदुर भाळीं हो ॥ चाल ॥
वृक्षासी तो घेई टांगूनी ॥ सर्वेचि देई हाकहि फिराफिरुनी ॥
रक्तपितीनें गेला नासूनी ॥ चाल ॥
फळमूलादिक त्यास मिळेना भोगि विपत्ती हो ॥ १ ॥

## पद.

( दिसली पुनरपि, ) या चालीवर.

इकडे बहुला धवरहित जरी दुःख तयाचें नसे तिला ॥
पोटीं होता एक पुत्र हो कोणा पासुनि तो तिजला ॥
झाला, याचें स्मरण मुळीं हो कांहीं नव्हतें त्या स्त्रीला ॥
शिवरात्रींचें पर्व जवळिं तें आलें जाणुनि जन सगळा ॥
गोकर्णाला जाउं लागला वाजति वाद्यें त्या वेळां ॥
शिवनामाचा घोष करिति ते ठाव नसे हो पापाला ॥
नाम मुखीं जे गाति सर्वदां त्यांनीं जिंकिलें त्या कालिला ॥
संगें घेउनि पुत्रा चाले त्यांच्या संगें ती बहुला ॥
स्नान करूनी लिंगदर्शना जाती झाली मग अबला ॥
महाबलेश्वर दर्शन घेउनि बसली पुराण श्रवणाला ॥ १ ॥

## साकी.

वनिता जी हो जारिण आहे यमकिंकर ते तिजला ॥
धरुनी नेउनि स्मरगृहामाधें तप्तलोहपरिवाला ॥
घालुनि, ते तिजला ॥ ह्मणती करी विलासाला ॥ १ ॥
ऐसें ऐकुनि बहुला तेव्हां भयाभीत बहु झाली ॥
अनुताप तिला फार होउनी ढळढळ अश्रू गाळी ॥
मग पुराणिकाला ॥ सांगे सर्वहि त्यावेळां ॥ २ ॥

## पद.

(अक्रुर हा नेतो श्रीकृष्णाला,) या चालीवर.

गुरुराया दासी लीन चरणाला ॥ सांगा उपाय ते मजला ॥ धृ०॥
व्यभिचार आजवरी बहु केला ॥ त्यांतुनि तारा हो इजला ॥
यमकिंकर ते ममांत समयाला ॥ छळतिल हो बहुताचि मजला ॥
कैसें सोसूं अपार दुःखाला ॥ कंपचि आतां मज सुटला ॥
तीव्रपाश ते बांधुनि कंठाला ॥ मारिति घेउनि शस्त्राला ॥
असिपत्रवनीं फिरवीति बहु वेळा ॥ उफराटे टांगुनि मजला ॥ चाल ॥
नरकीं देतिल फेंकूनी ॥ गुरूराया ॥
तप्तभूमिवर नेऊनी ॥ गुरुराया ॥
हिंडविती मजला मारूनी ॥ गुरुराया ॥
तीक्ष्ण शस्त्र तें टोंचिति पोटाला ॥ धूम्रावर टांगुनि मजला ॥
चंडशिळा बांधतील चरणाला ॥ कोण सोडवील हो मजला ॥ १ ॥

## दिंडी.

गोड लागेना अन्न तिला कांहीं ॥ शोक करिते त्यास हो पार नाहीं ॥
जाउं कोणा शरण मी तरी आतां ॥ कोण होइल हो सांग मला त्राता ॥ १ ॥
गुरूराया शरण मी तुझे पायीं ॥ कृपा जरि तूं करशील उणें काई ॥
वदुनि ऐसें करिं धरी चरण त्याचे ॥ तारि तारी हेंच हो वदे वाचें ॥ २ ॥

## साकी.

मग गुरु सांगे पंचाक्षरिही मंत्र तरी तो तिजला ॥
शिवलीलामृत गुरूमुखानें सर्वचि ऐके बहुला ॥
श्रवणभक्ति बा ती ॥ श्रेष्ठचि जाणा त्रीजगतीं ॥ १ ॥
सत्संगें निःसंगचि होई निःसंगें बा पाही ॥
निर्मोहचि तो निर्मोहत्वें निश्चित मन होई ही ॥
उद्वेग मग नाहीं ॥ प्राणी पापरहित होई ॥ २ ॥
शिवनामा ती घेइ सर्वदां दोष कसा मग राही ॥
परम पवित्रचि बहुला झाली ह्याचा अनुभव पाही
संशय कसला ही ॥ प्राण्या घेउं नको कांहीं ॥ ३ ॥

## पद.

( दो दिवसाची, ) या चालीवर.

तव्यांचा[1] तो बुरसा[1] जातां सहज आरसा होई हो ॥ धृ० ॥
परिस लागतां लोहाला तो सुवर्ण तरि तें होतें हो ॥
अग्नीं मध्यें काष्ठें पडतां अग्नीमय तीं होतीं हो ॥
ओहळ मिळतां गंगानदिला गंगाजळ तें होई हो ॥
जप करितां तें पुण्य बहुतची पाप सर्वही जातें हो ॥
ज्ञानाहुन तें ध्यान विशेषचि मनन श्रेष्ठ तें श्रवणा हो ॥
मननाहुनि ही निदिध्यास तो साक्षा मग ती सहजचि हो ॥
शिवरूप तो झाला पाही कांहीं संशय नाहीं हो ॥
निर्दोष तशी बहुला झाली नाम गातसे वाचें हो ॥ १ ॥

## पद.

( झाली ज्याची उपवर, ) या चालीवर.

श्रवणें पावन प्राणी होती ॥ या जन्मीं मुक्तिच मिळते ती ॥ धृ० ॥
तीर्थाटन तें करणें नलगे ॥ सार्थकता ती श्रवणें येती ॥
सत्समागमहि ज्यास मिळेना ॥ करावें त्यानें तीर्थें तरि तीं ॥

---

१. तवा आणि बुरसा हे शब्द पोथींत होते तेच कायम ठेविले आहेत.

अष्टांग योग साधन नलगे ॥ एका श्रवणें सर्वहि मिळती ॥
योग याग व्रत साधन नलगे ॥ भक्ती नवविध श्रवणें येती ॥
चारि वर्ण ते चारी आश्रम ॥ पावन परमाचे श्रवणें होती ॥ १ ॥

## साकी.

गुरुची सेवा अखंड करुनी गोकर्णीं ती राही ॥
जटा वल्कलें अजिन धारिही कारि समुद्र स्नाना ही ॥
भस्म चार्चे देहीं ॥ रुद्राक्ष करी धारण ही ॥ १ ॥
अप्त सोयरे सोडुनि सगळे गुरुची सेवा केली ॥
महाबळेश्वर दर्शन घेउनि पावन बहुला झाली ॥
तृतियोध्यायीं हो ॥ गोकर्ण महिमा वदला हो ॥ २ ॥

## अंजनीगीत.

स्वर्याति[1] कीर्ती पुष्टी वर्धन ॥ तीन देह ते तिणें जाळुन ॥
त्याचें भस्माचि अंगीं चर्चुन ॥ शिवरूप जाहली ॥ १ ॥
शंकर धाडी विमान खालीं ॥ बहुला तेंव्हां शिवपदें नेली ॥
एवढि पापिण कशी तारिली ॥ वाटे नवलाचे हें ॥ २ ॥
शिवापुढें ती जाउनि बहुला ॥ स्तवन करूनी गायी लीला ॥
मागुति स्तवि त्या जगज्जननिला ॥ प्रसन्न तीं झाली ॥ ३ ॥
प्रसन्न मी तारि तुजला बाई ॥ इच्छित आतां मागुन घेई ॥
नकळे कोठें मम पति, आई ॥ पावन कारि त्यातें ॥ ४ ॥

## साकी.

त्रिजगज्जननी अंतरिं पाहे तेंव्हां तिजला कळलें ॥
विंध्याचलिं तो पिशाच होउनि भोगी पाप जें केलें ॥
ऐसें जाणुनि ती ॥ बहुलेस काय तरी वदती ॥ १ ॥

---

१ वंश.—यश आणि आरोग्य याचें वर्धन करणारे.

## पद

( ठुंबरी चाल. )

तुंबरास घेउनि जाई ॥ विंध्याचलीं तूं सत्वर बाई ॥ धृ० ॥
पती तुझा तो पिशाच होई ॥ विंध्याचलिं तो हिंडत राही ॥
शिवलीला त्या श्रवण करवि कांहीं ॥ तुंबरास० ॥ १ ॥

## पद

( चरण चालि चालतां तिघे तीं, ) या चालीवर.

विंध्याचलिं ती सत्वर गेली आज्ञा झाल्यावरी ॥ धृ० ॥
पिशाच तेथें नग्न देखिला हिंडत वेड्यापरी ॥
तुंबर हस्तें त्यास बांधिलें एका वृक्षावरी ॥
मस्तवल्लिका काढुनि मिळवी सप्तसूर सत्वरी ॥
शिवलीला मग गाउं लागला रागरागिणी वरी ॥
पशुपक्षी ते उद्धरती हो ऐकुनि लीला तरी ॥
शिवकीर्तन ही मात्रा देतां आला शुद्धीवरी ॥
सोडा सोडा ह्मणूं लागला आतां मज सत्वरी ॥
सोडतांच तो जाउनि पडला तुंबर चरणावरी ॥
धन्यधन्य तूं स्वामि दयाळा आतां पावन करी ॥ चाल ॥
कांते मजला तूं धन्यचि केलें तरी ॥
उद्धरिलें मजला कांता तूं गे खरी ॥
उपदेश मला तो द्यावा हो सत्वरी ॥ चाल ॥
उपदेशी मग तुंबर त्याला मंत्रहि पंचाक्षरी ॥
जप करितां तों विमान आलें स्त्रीसह गेला वरी ॥ १ ॥

## साकी

शंभूपाशीं मिरवित नेले दोघे लागति चरणा ॥
शिवरूपीं ते मिळून गेले जळीं स्थिती जी लवणा ॥
होते तैशी हो ॥ शिव रूपीं ते मिळती हो ॥ १ ॥

जळीं गार ती नाद अंबरीं कर्पुरिं मिळते ज्योती ॥
ऐक्य होउनी सागरिं गेली जैशी गंगानदि ती ॥
पतिसह ती बहुला ॥ मिळून गेली रूपाला ॥ २ ॥
शिवमंत्राचा तसा कथेचा महिमा मोठा आहे ॥
भस्मलेपनें उद्धरिले जन संख्या नाहीं पाहे ॥
शिवदिक्षा ती ही ॥ रुद्राक्ष धारण तैसें ही ॥ ३ ॥
भस्मांतुनि तो भस्मासुर ही निघतां झाला कैसा ॥
शिवद्रोहि तो परम घातकी पापी असुनी ऐसा ॥
कैसा उद्धरिला ॥ सांगेन त्या चरित्राला ॥ ४ ॥

## पद.

( चरण चाली चालतां तिघे ती, ) या चालीवर.

कैलासनगीं प्रदोषकाळीं भस्म घेउनी करीं ॥
अंगीं चर्ची उमारमण तों झालें नवलचि परी ॥
यांत एक तो खडा सांपडे टाकी भूमीवरी ॥
नवल शिवाचें सांगुं किती मी असूराचि प्रगटे तरी ॥
भस्मासुर त्या नांव ठेविलें तोषे बहु अंतरीं ॥
सदाशिवारे दास तुझा मी सांगे मज चाकरी ॥
चिताभस्म तें आणुन द्यावें नित्य नित्य तें तरी ॥
सेवा तरि ही योग्य तुला बा नित्य नेम तूं धरी ॥
ऐशी आज्ञा होतां त्याला लोळे चरणावरी ॥
कर्मभूमिला नित्य येउनी शोधी पृथ्वी तरी ॥ चाल ॥
शिवभक्तिच ज्याला, पारायण जो करी ॥
लिंगार्चन घडलें ज्याला शिववासरीं ॥
प्रदोष शिवरात्रहि प्रेमें जो आचरी ॥ चाल ॥
सदां सर्वदां नाम घेउनी ऐके कीर्तन वरी ॥
भस्म तयाचें शिवास देतां अंगिकार तो करी ॥ १ ॥

## साकी.

अभेद प्रेमळ भक्त पाहुनी त्याच्या मुंडाची हो ॥
माळ करूनी गळ्यांत घाली खंति नसे त्याला हो ॥
भोला शंकर तो ॥ राहे नित्य स्मशानीं तो ॥ १ ॥
स्मशान त्यजुनी गृहास येती त्यांची जडते प्रीती ॥
विषयावरती ह्मणुनि स्मशानीं शंकर कारितो वस्ती ॥
भोला शंकर तो ॥ शरणागत रक्षण कारितो ॥ २ ॥

## पद.

( श्रीसांबाच्या समान दैवत, ) या चालीवर.

पिंड ब्रह्मांड पंच भुतेंही तत्वासह जाळुनी ॥
जें उरतें सर्व परी निरसुनी ॥ धृ० ॥
स्वात्मसुखाचें भस्म तें तरी ब्रह्मानंद होउनी ॥
सुखावे अंगीं तें चर्चुनी ॥
षड्विकार ही ज्याला नसती अमूर्त मूर्त मानुनी ॥
भजती हो त्यास लीन होउनी ॥
विकार रहिताचि निर्विकार जो, परब्रह्म जो जनीं ॥
ऐसा भासत नाहीं कुणी ॥ चाल ॥
[1]अस्ति जायतें विपरिणमतचि तें तरी ॥
[2]अपक्षीयतें निधनाचि वाटें वरी ॥
षड्गुणैश्वर्य जो वसतो भुवनांतरीं ॥ चाल ॥
यशःकीर्तिही ज्ञान औदार्य वैराग्य पूर्णपणीं ॥
वाटे तोष तो त्यास पाहुनी ॥ १ ॥

---

१ अस्ति=आहे, जायतें=जन्मतें, विपरिणमतें=नाश पावतें.
२ अपक्षीयतें=क्षय पावतें.

## पद.

( ऐक सज्जना मन मोहना, ) या चालीवर.

आणिक मंडित षट्चिन्हांनीं ऐका नांवें तरि त्यांचीं ॥
कर्तृत्व नियंतृत्व भोक्तृत्व विभुत्व साक्षित्वहि साची ॥
मायाचक्रा चालक तो बा त्रिविधभेद जो गणिनाची ॥
ऐसा शंभू असुरा तेव्हां सांगे सेवा भस्माची ॥ १ ॥

## दिंडी

नित्य आणुनि तो भस्म देइ देवा ॥ पूज्य भावहि दावुनी करी सेवा ॥
परी गर्वानें मातला असुर भारी ॥ ह्मणे संहारिन प्रजा तरी सारी ॥ १ ॥
गाइ ब्राह्मण देखतां कोप येई ॥ कधीं मारिन हे असें त्यास होई ॥
त्यास मारुनि मागुती सर्व देव ॥ कधीं जिंकिन हो हाच मनीं भाव ॥ २ ॥
प्रथम जिंकावे इंद्र ब्रह्मदेव ॥ मागुती तो विष्णुहीं वामदेव ॥
तीन लोकां जिंकितां इंद्र कोण ॥ मीच होइन शेवटीं तरी जाण ॥ ३ ॥
मनीं बांधोनी अशी गांठ पाही ॥ जाय कैलासा कपटि असुर तो ही ॥
ह्मणे देवा भस्म तें मिळेनारे ॥ पृथ्वि सारी शोधुनी पाहिलीरे ॥ ४ ॥
चार लक्षांची वस्ति जरी आहे ॥ सवालक्षांची घडामोड पाहे ॥
भस्म अर्पावें तुला नेम माझा ॥ नेम टळतो युक्ति ती कांहिं योजा ॥ ५ ॥

## अंजनीगीत.

हरहर शंभो पार्वतिरमणा ॥ विरूपाक्षा त्रिपुरछेदना ॥
उमावल्लभा नागभूषणा ॥ देई वर माते ॥ १ ॥

## साकी.

ज्याचे मस्तकिं ठेविन कर मी भस्म तरी तो व्हावा ॥
येणें साधें कार्य फारची प्रसन्न होउनि देवा ॥
ऐसा वर देई ॥ ह्मणुनी लागतसे पायीं ॥ १ ॥

वर द्यायासी सिद्ध पाहुनी गिरिजा बोले स्वामी ॥
परम नष्ट हा दुराचारि हो ऐका वदतें जें मी ॥
देता वर याला ॥ भस्म करिल हा जगताला ॥ २ ॥

## अंजनीगीत

महा शद्ब तो करावयाची ॥ हौस मनीं हो फारचि साची ॥
फाल्गुन महिना आला तोंची ॥ इच्छा पुरवाया ॥ १ ॥
वाट लुटारू चोराला हो ॥ निरोप दिधला राजानें हो ॥
स्त्रीराज्याचें प्रभुत्व तें हो ॥ दिधलें जाराला ॥ २ ॥

## दिंडी

मर्कटाला दीधलें मद्य प्याया ॥ वृश्चिकानें दंशिली त्यांत काया ॥
त्यांत संचरलें भूत तया देहीं ॥ काय सांगूं अन्योन्य करी तो ही ॥ १ ॥
असुर तामसि हा वर न कदां द्यावा ॥ वरा देतां गांजिल सर्व देवा ॥
वीरभद्रादिक सांगतात हेंच ॥ नका देऊं हो अशा वरालाच ॥ २ ॥

## साकी

मूल तरी हें भस्मासुर बा द्यावा वर कीं याला ॥
अन्य रहाटी काधिं न करी हा योग्य तरी देण्याला ॥
दिधला वर तुजला ॥ भोलाशंकर तो वदला ॥ १ ॥
ऐकतांच त्या तोष होउनी नाचुं लागला फार ॥
त्रैलोक्यामाधिं तोष माइना नाहीं त्याला पार ॥
मृत्यूलोकाला ॥ सत्वर मग तो तरि गेला ॥ २ ॥
गाइ ब्राह्मण संत भक्त ते ऋषिचक्रा शोधूनी ॥
ठेवि मस्तकीं हस्त तयाच्या जाति भस्म होऊनी ॥
छपन्न देश सगळे ॥ सर्व भूभुज भस्म केले ॥ ३ ॥
कांता घेउनि ब्राह्मण पळती गिरीकंदरीं लपती ॥
पृथ्वि सर्वही भयाण झाली लोक भीउनी जाती ॥
उपाय नच कांहीं ॥ जन झाले त्राही त्राही ॥ ४ ॥

६४८६

## दिंडी.

श्येनपक्षी तो अकस्मात येई ॥ इतर पक्ष्यांचा प्राण जसा घेई ॥
अंतरिक्षांतुन तशी धांव मारी ॥ हस्त ठेवुनि करि प्रजा भस्म सारी ॥ १ ॥
समरिं योद्धा जरि जिंकि कृतांताला ॥ असा योद्धा बलहीन तरी झाला ॥
जसा पाखांडी नावरे कुणाला ॥ तसें सर्वहि भीति त्या राक्षसाला ॥ २ ॥

## श्लोक

असुर करित चाले नित्य संहार ऐसा ॥
परि नच कळला त्या हा समाचार कैसा ॥
वरिवरि तरि जाई शंभुला भस्म देई ॥
शिवहरचरणाला लीन तो फार होई ॥ १ ॥

येई सर्वेची मग मृत्यु लोकीं ॥ इच्छा मनीं तो धरि सत्य ही कीं ॥
देवासही त्या शचिनायकाला ॥ जिंकीन मी मागुति अच्युताला ॥ २ ॥

## कामदा

( या चालीवर. )

करुनि भस्म त्या मागुती हरा ॥ हिरुन ध्यावि ती गौरि सुंदरा ॥
शंभु वृद्ध तो नावडे तिला ॥ ह्मणुनि ती भुले पाहुनी मला ॥ १ ॥

## साकी

पृथ्वी पडली उदास जेव्हां प्रजा ऋषी ही मिळुनी ॥
इंद्राला ते शरणाचे गेले रक्षी रक्षी ह्मणुनी ॥
चरणीं लागति ते ॥ ह्मणती रक्षा आह्मातें ॥ १ ॥
सकळांसह तो मघवा जाउनि सांगि वृत्त हें विधिला ॥
क्षीराब्धीच्या जामाताला जाउं शरण ये वेळां ॥
ऐसें विधि बोले ॥ हेंच योग्य हो या वेळें ॥ २ ॥
अक्षज नामहि इंद्रिय ज्ञाना ज्यानें केलें दमन ॥
अधोक्षज तरी नाम तयाला ह्मणूनि असें बा जाण ॥
जाउनि त्याजवळीं ॥ नमिती सारे त्या वेळीं ॥ ३ ॥

सर्वांसह मग नारायण तो ॥ शंभूजवळी आला ॥
भस्मासुर तो मातुनि गेला त्रास देत सर्वांला ॥
सर्व भस्म केलें ॥ आतां कांहीं नच उरलें ॥ ४ ॥
उरलों आह्मीं समस्त सुरही करिल अंत तो अमुचा ॥
तुझे वरानें मातुनि गेला करिल अंत तव साचा ॥
गिरिजा जतन करी ॥ ऐकुनि हांसे मदनारी ॥ ५ ॥

## दिंडी

मरण असुराचें जवाळे असें जाणा ॥ तुह्मीं जावें आपुल्या सुखें स्थाना ॥
असें बोले शंभु तों असुर आला ॥ भस्म घेउनि हातिं तो उभा ठेला ॥ १ ॥
काय कारण अमरास येथ याया ॥ येति गाऱ्हाणें शिवा जवळि द्याया ॥
सरड हालवि आपली मान जैशी ॥ तुकावितसे मान तो तरी तैशी ॥ २ ॥
अमर जे जे पाहिले इथें जाण ॥ उद्यां त्यांचा घेईन खचित प्राण ॥
असें बोलुनि शंकरा जवळ गेला ॥ नित्य नियमाचि तो नसे भीति त्याला ॥३॥

## साकी

दुष्टा अधमा चांडाळारे शेवट कैसा केला ॥
पृथ्वीचा तो नाश कराया दिधला वर कां तुजला ॥
मरण समिप आलें ॥ ऐसें जाणाचि या वेळें ॥ १ ॥
आतां मजला तुझी सुंदरा दारा गिरिजा देई ॥
नाहीं तर मी तुझ्या मस्तकीं ठेविन कर या समयीं ॥
असुर असें बोले ॥ हांसे शंकर त्या वेळें ॥ २ ॥

## कामदा

( या चालीवर. )

बोल ऐकुनी पार्वतीं सती ॥ चकित होउनी उठुनि गेलि ती ॥
असुर हालवी मान तिजवरी ॥ जिंकुनी शिवा नेत तुज तरी ॥ १ ॥
शंभु मस्तकीं ठेवण्या कर ॥ असुर धांवला फार सत्वर ॥
पाहुनी असा रोख तो तरी ॥ शंभु चालला पळत सत्वरी ॥ २ ॥

भक्तजन भयाभग जो करी ॥ लाघवी अती जाण तो तरी ॥
घोर काननीं पळत चालला ॥ असुरहि तया पाठीं लगला ॥ ३ ॥

## साकी

अरे जोगड्या धीर धरीरे संहार तुझा करुनी ॥
या देहासी रक्षा लाविन श्रमूं नको बा पळुनी ॥
वेदहि ज्या नेणें ॥ असुर तयाला धरिन ह्मणे ॥ १ ॥
ब्रह्मादिक ते सर्व अमर ही ज्याला ध्याती नित्य ॥
सनकादिक ही पूजिति ज्याला धरिन ह्मणे त्या सत्य ॥
लागे त्या पाठीं ॥ शिरीं कर ठेवण्यासाठीं ॥ २ ॥
देखुनि जवळीं हस्त पुढें तो धरण्यासाठीं करितो ॥
हस्त न लागे त्याला परि हो पुन्हां दूर तो दिसतो ॥
धांवे सत्वर तो ॥ परि त्यास कसा सांपडतो ॥ ३ ॥
कोटी वर्षें धांवे ऐसा नाहीं हातां आला ॥
उणे पुरे ते शद्ब बोलुनी हाका मारी त्याला ॥
शास्त्रहि ज्या नेणें ॥ असुरहि त्याला धरिन ह्मणे ॥ ४ ॥

## पद.

( शिवाज्ञेचि वाट न पाहतां,) या चालीवर.

प्रेमळ भक्ता शुद्ध भाविका आहे तो विकला ॥
पार्वति सह तो गृहीं राहुनी सुखवी बहु त्याला ॥ धृ० ॥
विद्येनें वा तपोबलानें धरूं ह्मणाति शंभूला ॥
कल्पकोटि हीं फेरे घेतां न दिसे तो त्याला ॥
अहंकारें भस्मासुर तो लागे पाठीला ॥
कैसा तरि तो तया सापडे नकळे मूर्खाला ॥
इकडे पार्वति स्तवूं लागली लक्ष्मीरमणाला ॥ १ ॥

## पद.

( शेष शयन कमल नयन, ) या चालीवर.

कमलनयन कमलनाभ असुरमर्दना ॥ शेषशयन नित्य तुझें हे जनार्दना ॥ ॥ धृ० ॥ जगद्वंद्य जगव्द्याप धांव वामना ॥ कमलधारि उदधिवासि पतित

पावना ॥ असुरभयें प्राणपती पळति रे वना ॥ असुरप्राण हरण करी पुरवि कामना ॥ १ ॥

## कामदा

( या चालीवर. )

प्रार्थना अशी ऐकिल्यावरी ॥ धरित मोहिनीरूप सत्वरी ॥
होय आडवा असुर पाहुनी ॥ शंभु जाणतो आपल्या मनीं ॥ १ ॥

## साकी.

शिवन्यग्रोधाचे होउनि पाही कौतुक सारें नयनीं ॥
मोहिनिरूपा पाहुनि तेंव्हां गेला राक्षस भुलुनी ॥
उपमा नच दुसरी ॥ रतिहुनि असे ही सुंदरी ॥ १ ॥

## कामदा.

(या चालीवर.)

बसुनि यानिं ते अमर पाहती ॥ रूप पाहुनी काय बोलती ॥
अष्ट नायका चरणिं लोळती ॥ कोण ही तरी भासते रती ॥ १ ॥

## पद.

( काल मादिरीं,) या चालीवर.

नृत्य करित ती बघुनि मोहिनी ॥ असुर मनीं होइ गार, तन्मय फार, त्रासवि मार, प्रगटुनी मनीं ॥ ह्मणत तिजला जवळ जाउनी ॥ धृ० ॥ मुखावरून, जावे मरून, गिरजेहुन, तूंच चांगली, सुंदरी अशी नाहिं पाहिली ॥ ॥ १ ॥ तव नयन बाण, घेति प्राण, देइ दान, बाण अवरुनी ॥ तृप्त मज करी माळ घालुनी ॥ २ ॥ पदकमलिं फार सुवास, तो घ्यावयास, वसंत कारि वास, तुझ्या या चरणीं ॥ मी करिन तसें वारिसी मज लागुनी ॥ ३ ॥

## पद.

( रामचंद्र नाहिं घरी,) या चालीवर.

वारिन तुला त्वरित परी ऐक नेम रे ॥ पैलतरू एक असे पाहि नीट रे ॥ ॥ धृ० ॥ दैवत मम त्यांत असे फार क्रुद्ध रे ॥ केला मी नवस त्यास ऐक

तो किरे ॥ पातें सहीत करिन नृत्य एक दिवसरे ॥ नियम पूर्ण होय वरी लग्न नाहिंरे ॥ चाल चाल नृत्य करूं वृक्ष जवळिरे ॥ ठेविन मी जेथं हस्त ठेव तेथंरे ॥ हाव भाव करिन जसें कर तसें त्वरें ॥ त्यांत कांहिं न्यून होय क्षोभे देवरे ॥ दैवत मम क्रुद्ध बहू पृथ्वि जाळिरे ॥ १ ॥

## साकी

राक्षस बोले करीन तैसें जैशी आज्ञा करशी ॥
ऐसा भुलवुनि वटच्छायेशी आणी सत्वर त्यासी ॥
नमुनी देवाला ॥ आरंभी मग नृत्याला ॥ १ ॥

## पद.

( घेउनि मुशाफर वेश, ) या चालीवर.

अष्टनायका तटस्थ होती पाहुनि नृत्यांतरी ॥
किन्नर गायक भुलून जाती गायन ऐकुनि तरी ॥ धृ० ॥
सर्व देव ते षट्पद होउनि रुंजी घालति वरी ॥
गुंजारव ते वरिवरि करिती पाहुनि ती सुंदरी ॥
ब्रह्मदेवही भुलून गेला शेषहि येई वरी ॥
जेथें ठेवी हस्त मोहिनी असुरहि तैसें करी ॥
ऐसें करतां मोहिनि ठेवी हस्त मस्तकावरी ॥
असुरहि ठेवी हस्त मस्तकीं भस्म होय सत्वरी ॥
मोहिनिरूपा त्यागुनि केशव स्वरूप धारण करी ॥ चाल ॥
बटुरूप सोडुनी शंकर प्रगटे तिथें ॥
हरिहरहि भेटले होति आनंदित ते ॥
पुष्पवृष्टि करिती वरिवरि सुरगण ते ॥ चाल ॥
मोहिनिरूपा पाहुनि द्रवलें वीर्य शिवाचें तरी ॥
अष्ट भाग ते त्याचे झाले पडतां ते भूवरी ॥ १ ॥

## साकी.

अष्ट भैरव अवतार तरि ते झाले प्रसिद्ध पाहीं ॥
असित, अंगार, चंडक्रोधही, उन्मत कपाल, हे ही ॥
भीषण, सहवा तो ॥ संहार भैरव शेवटिं तो ॥ १ ॥

## दिंडी

असुर वधिला ही मात प्रगटतांच ॥ तिन्ही लोकीं आनंद माइनाच ॥
हस्त धरुनी ते उमारमानाथ ॥ मिळुनि दोघे कैलासनगरीं येत ॥ १ ॥
अंबिका ती तत्काल प्रगट झाली ॥ हरिहराते साष्टांग नमन घाली ॥
दोन मूर्ती बैसवी आसनीं हो ॥ प्रथम पूजा मग करीं प्रार्थना हो ॥ २ ॥

## पद.

( सुंदर मुख तुंदिल तनु, ) या चालीवर.

हरिहरहो नारायण नागभूषणा ॥ शिवसीतावल्लभहो शांत सद्गुणा ॥
पंचवदन फणाशयन नाम निर्गुणा ॥ नीलकंठ निलदवर्ण तापनाशना ॥
विश्वनाथ विश्वंभर असुर मर्दना ॥ विष्णू, स्थाणू, वर्णू, ॥
तव महिमा त्रिविक्रमा ॥ हे त्रिलोचना ॥ १ ॥

## पद.

( बघुनी उपवना, ) या चालीवर

कमलोद्भवपिता कर्पुरगौरा पिनाकपाणी हरा ॥
पीतांबरधर गोवाहन हर गोविंदा रमावरा ॥
वृंदारकपाते वृंदानीहो भोगिसि बहु सुंदरा ॥
चंद्रशेखरा चक्रधरा तूं शंखहि शोभे करा ॥
कपालनेत्रा कमनियगात्रा भक्तां बहु आसरा ॥
मुरहर मायामल्लहरा तरि पाव मला शंकरा ॥
अंधकमर्दना अघबकहरणा भक्ताला उद्धरा ॥
सिंधुजावरहि सिद्धेश्वर तूं हे नगतनयावरा ॥
नंदकिशोरा निःसंसारा पावे मज ईश्वरा ॥ चाल ॥

ईशानईश्वरा शोभे बहु इंदिरा ॥
क्षीरवर्णतनुही क्षीराब्धी ईश्वरा ॥
ब्रह्मादिक नमिती ब्रह्मानंदचि खरा ॥ चाल ॥
जगदंबा ती तोष पावली प्रार्थुनि त्या हरिहरा ॥ १ ॥

## अंजनीगीत.

आतां श्रोते सावधानची ॥ सुरस कथा ती आसे पुढेंची ॥
वीरभद्र शिवपार्वतिलग्नची ॥ षडाननजन्म असें ॥ १ ॥

## साकी.

शिवलीलामृतग्रंथ कसा हा गौतमि स्वर्धुनि येई ॥
या अध्यायीं हरिहर दोघे भेटति एके ठायीं ॥
तरि या सिंव्हस्थी ॥ अघमर्षण भक्ताचे करिती ॥ १ ॥

## अंजनीगीत

श्रीधरस्वामी तोष पावती ॥ पाहुनि नयनीं विठ्ठलमूर्ती ॥
त्यानें मजला देउनि सुमती ॥ कथा वदवावी ॥ १ ॥

## पद.

( सोडि पदर जाउ दे मजला, ) या चालीवर.

कृपा कशी येइना तुजला ॥ दिनरजनीं करी ध्यानाला ॥ धृ० ॥
कामादिक ते गांजिति मजला ॥ त्रास फार जाहला ॥
कोल्हाटिण ही आशा भासे ॥ नावरे ती मजला ॥
कांहीं चुकलों असेन जरि मी ॥ शरण आहे तुजला ॥
बाळकृष्ण हा किंकर तुमचा ॥ वंदित पदकमला ॥ १ ॥

NATIVE GENERAL LIBRARY, KHED. (POONA)
सार्वजनिक वाचनालय
खेड. (पुणे)

# अध्याय १३ वा.

## श्लोक

जगद्गुरु जगत्पती अखिल ह्या जगीं तूंच रे ॥
तुझे चरण पाहणें सतत ही मनीं आस रे ॥
गजास्यजनका उमाहृदय तूं हरा ईश्वरा ॥
मनोरथ तरी कधीं पुरविशी प्रभो शंकरा ॥ १ ॥

## साकी.

सूतवदाति हो शौनकऋषिला एक कथा जी घडली ॥
त्रेतायुगिं त्या अद्भुत मोठी दक्षाच्या त्या वेळीं ॥
ऐका ती सगळी ॥ कळविन तुह्मां या वेळीं ॥ १ ॥

## पद

( दो दिवसाची तनु ही साची, ) या चालीवर.

दक्ष प्रजापति पवित्र मोठा आरंभी गृहिं सत्रचि हो ॥
पाचारी तो सर्व अमर परि देई सोडुनि शंकर हो ॥ धृ० ॥
ज्याला वंदिति इंद्र विधि हरी वेदहि ज्याची स्तुती करी ॥
शिवमहिमा तो नेणुनि चित्तीं निशिदिनिं निंदी दक्ष तरी ॥
अपवित्र किती ह्मणुनी सांगूं नरमुंडाची माळ करीं ॥
गजचर्मचि तें, तें ही ओलें नाहीं खंती त्यास तरी ॥
नरमस्तक तें घेउनि हातीं भिक्षा मागें घरोघरीं ॥
स्मशान ज्याचें वसतीस्थानचि चिताभस्म तो लावि शिरीं ॥
भूषण पाही विखार देहीं भुतें तयाच्या बरोबरी ॥
अभद्र तितकें यानें वरिलें देव नव्हे तो खरोखरी ॥
त्रितीय नेत्रीं प्रळयाग्निचि तो वाटे त्रिभुवन जाळिल हो ॥
दैत्य माजवी वर देऊनी बैसे देउनि सर्वचि हो ॥ १ ॥

## दिंडी.

नीर वाहे मस्तकीं सदोदीत ॥ भक्त देखुनि आनंद त्यास होत ॥
कीर्तनीं तो जाउनी नाचुं लागे ॥ भक्त देखुनि सर्वही देइ वेगें ॥ १ ॥
थोर लहान ना कळे त्यास कांहीं ॥ बैल वाहन हो त्यास तरी पाही ॥
अशा मूर्तीला कोण ह्मणे देव ॥ मूर्ख लोकचि ते ह्मणाति त्यास पात्र ॥ २ ॥
शंभु निंदा ती करावया पाही ॥ भेट घ्यावी इच्छुनी जाय तोही ॥
दक्ष कैलासा एकवार गेला ॥ शंकरानें नाहींच मान केला ॥ ३ ॥

## पद

( जाऊ नकारे विषयाटविची, ) या चालीवर.

या या परिनें दक्ष निंदि हो गिरिजारमणाला ॥
याज्ञें न पूजी विभाग कांहीं देई नच त्याला ॥ धृ० ॥
आयुष्याची अवधी पुरली धरी कुबुद्धीला ॥
शिवभजन जो न करी पापी विघ्नें बहु त्याला ॥
जप तप दानाहि व्यर्थ परी तें न भजे शंभूला ॥
बहुत निर्दय दुर्जन खळ ते निंदिति ताताला ॥
चांडाळासम समजुनि त्यांना, जपा विटाळाला ॥ १ ॥

## श्लोक

दाक्षायणी ती बहु वाट पाही ॥ बोलावणें कां मज येत नाहीं ॥
तातगृहीं यागचि होत आहे ॥ आश्चर्य वाटें मजला तरी हें ॥ १ ॥

## पद

( श्रीहरिच्या वेणु नादें ) या चालीवर.

गिरिजा ती विनवि नाथा आज्ञा द्या झडकरी ॥
जातें मी तात गेहीं यागाते तो करी ॥
आणी तो सर्व कन्या मानानें त्या तरी ॥
विसर कां त्यास झाला मजविषयीं अंतरीं ॥
जातें मी प्राणनाथा बोले तो त्यावरी ॥ १ ॥

NATIVE GENERAL LIBRARY, KHED. (POONA)

## पद.

( कांते फार तुला मज साठीं,) या चालीवर.

मम प्राणविसावे मृगनयने संकट मज पडलें ॥ पितृसदानें गे जाण्याचा तव नेम बघुनि, मम मन गडबडलें ॥ धृ० ॥ तव पिता तरि तो निंदक मोठा ॥ मम द्वेषी तो दुर्जन खोटा ॥ पिता नव्हे तो शत्रू समजे ॥ जातां तुजला निंदिल पाहिलें ॥ १ ॥

## साकी.

यापरि दोघे बोलत असतां नारद तेथें आला ॥
पितृगृहाला जाण्याला गे मान कशाला तुजला ॥
ऐकुनि वचनाला ॥ होई तोषाचि गौरीला ॥ १ ॥
बसली मग ती नंदीवरती भूतगणाला संगें ॥
घेउनि अंबा निघती झाली आली सदना वेगें ॥
पाही मंडप तो ॥ सुखरें भरलासा दिसतो ॥ २ ॥
सन्मानें ते देव बसविले त्यांच्या पूज्य स्थानीं ॥
ऋषीसुरवरा भावें पूजी एक वेगळां करुनी ॥
उडुगाणिं चंद्र जसा ॥ मधें शोभतो दक्ष तसा ॥ ३ ॥
शिवद्वेषि तो दक्ष टाकितो कुंडीं अवदानें तीं ॥
भवानि जवळीं आली तेव्हां सुरवर तोषित होती ॥
धूर नेत्रिं भरला ॥ नाहीं दिसलें दक्षाला ॥ ४ ॥

## दिंडी

नंदिवरूनि उतरुनी समिप गेली ॥ वदन मुरडी भूमीस ग्रंथि घाली ॥
जगन्माता निरखुनी वदन पाही ॥ परी दक्षानें पाहिलेंच नाहीं ॥ १ ॥
धूम्र भरला नयनांत फार पाही ॥ ह्मणुनि जनकाला कांहिं दिसत नाहीं ॥
असें जाणुनि नीट ती आंत गेली ॥ सकळ भागिनींच्या जवळ उभी ठेली ॥२॥
सकळ भगिनींचा मान करी माता ॥ ह्मणुनि पाही तिजकडे जगन्माता ॥
परी बोलेना जननि बोल कांहीं ॥ असें देखुनि स्तब्ध ती उभी राही ॥ ३ ॥

## आर्या.

मग मानें दक्ष ह्मणे हो, कोणी बोलाविलें तरी इजला ॥
जामात आणि कन्या, यांची आवड नसेचि हो मजला ॥ १ ॥
भ्याले सारे सुरवर, देखुनि अपमान तो तिचा नयनीं ॥
भुलला दक्ष तरि कसा, जाळिल ब्रह्मांड सर्व कोपूनी ॥ २ ॥
देखुनि अपमान असा, क्रोधें संतप्त होय गिरिजा ती ॥
कुंडांत उडी टाकी, भासे जासि वीज भूवरी पडती ॥ ३ ॥

## साकी.

डळमळुं लागे कुंभिनि तेव्हां शेषहि कंपित झाला ॥
कमळभवांडीं हाक जाहली यमही भीउन गेला ॥
बुडालि सृष्टी ती ॥ कैशी रक्षण तरि होती ॥ १ ॥
कैलासगिरी वैकुंठहि तें तेव्हां डळमळुं लागे ॥
धाक घेउनी शिवगण पळती शंभूपाशीं वेगें ॥
वर्तमान सगळें ॥ सांगति शिवगण जें घडलें ॥ २ ॥
प्रळयकाळिंचा कृतांत जैसा तैसा शंकर दिसला ॥
हाक देउनी आक्रोशानें जटा अपटितां झाला ॥
वीरभद्र प्रगटे ॥ प्रळयाग्निसाच तो वाटे ॥ ३ ॥
प्रळयाग्नीचें द्वादश रविचें तेज ओतिलें वाटें ॥
नक्षत्राचा सडा होतसे वीरभद्र जैं प्रगटे ॥
स्वर्गहि डळमळलें ॥ सूर्यचंद्र दिपुनच गेले ॥ ४ ॥
कुंभिनि सारी आतां बुडते ऐसी हाकाचि झाली ॥
दक्षगृहीं ती शोणित वृष्टी मेघानें हो केली ॥
अवाचित भू फाटे ॥ दिवांध दिवसा हो भेटे ॥ ५ ॥
दक्षाची हो सर्व शक्ति ती निवून गेली तेव्हां ॥
जटेपासुनी वीरभद्र तो झाला प्रगटचि जेव्हां ॥
स्तवुनी शंभूला ॥ वीरभद्र निघतां झाला ॥ ६ ॥

## पद.

( घेउनि मुशाफर वेश, ) या चालीवर.

असंख्य दळ तें संगें घेउनि वीरभद्र धांवला ॥
साठकोटि गण घेउनि मागुति शंकर तेथं आला ॥ धृ० ॥
शिवसूतानें पुढें जाउनी कीर्तिध्वज पसरिला ॥
वारणचक्रहि असंभाव्य जरि वधी सिंह एकला ॥
अपार विघ्नें देखुनि नयनीं वक्रतुंड धांवला ॥
तैसा पडला वीरभद्र तो संहारित चालला ॥
देव सर्व ते पळून गेले सोडुनि त्या भूमिला ॥
अवदानें तीं सोडुनि सत्वर ऋत्विज पळुं लागला ॥
प्रळयकाळिचा पावक भासे आक्रांत बहु जाहला ॥
शक्रादिक ते देव कापती भूगोल दुमदुमला ॥
एक भयें मळमूत्र विसर्जिति वस्त्र गळें धरणिला ॥
नैऋत्यपतिनें एकाएकी काकवेष घेतला ॥ चाल ॥
कुक्कटरूपें तो धांवें रोहिणिपती ॥
शिखि होऊनिया शिखी धांवे त्या मागुती ॥
बक वेषें झाकी स्वरूप दक्षिणपती ॥ चाल ॥
रसनायक तो शशकाचि पाही सूर्य अर्क जाहला ॥
इंद्र कीर तो नवग्रहांनीं पक्षिवेष घेतला ॥ १ ॥

## साकी

मेंधिया वरी वीज पडावी तैसा येऊनि पडला ॥
दक्षा वरि तो वीरभद्रची षड् बाहू हो ज्याला ॥
त्रिशूळ डमरू तो ॥ चाप बाण ते करिं धरितो ॥ १ ॥

## पद.

( राग सारंग. )

पूषाचे ते दांत पाडिले नेत्र फोडले इंद्राचे ॥
चरण धरूनी आपटिले बहू चरण मोडिले बहुतांचे ॥

वीरभद्र तो नयनीं देखुनि प्राणहि गेले बहुतांचे ॥
ऋत्वीज्यांच्या खांड मिशाला हाणी फटके शस्त्रांचे ॥
मागुति आला शंकर त्यानें क्षालन केलें सैन्याचें ॥
कुंडमंडपा जाळुनि टाकी शरीर कांपतें दक्षाचें ॥ १ ॥

## साकी

मूर्खा दक्षा कसें निंदिलें त्व तरि त्या विरूपाक्षा ॥
शिवद्वेषिया पाहे आतां लाविन तुजला शिक्षा ॥
घेऊनि शस्त्र करीं ॥ घाली मग ते दक्षशिरीं ॥ १ ॥
उर्ध्व करूनी शस्त्र करींचें दक्ष शीर तो छेदी ॥
वीरभद्र मग क्रोधानें हो रगडी शिर तें पादीं ॥
प्रळय थोर झाला ॥ सुरगण भिवुनी वहु गेला ॥ २ ॥
सकळ सुरांसह विधी येउनी शंकरास तो विनवी ॥
उमावल्लभा दया करुनियां दक्षा लागी उठवी ॥
शंकर तोषूनी ॥ ह्मणे लावा शिर आणुनी ॥ ३ ॥
वीरभद्र तो शिर देईना रगडी पाया खालीं ॥
शिव द्वेषि जे दुराचारि हो रगडिन त्या पादतळीं ॥
जिव्हा छेदिन मी ॥ आवड नच ज्या शिवनामीं ॥ ४ ॥

## सवाई

जो न करी शिवपूजन जो नच पाहि नित्य शिवमंदिर त्यास ॥
निंदिति श्रीपति वंदिति शंकर एक थोर कमि भांडिति त्यास ॥
दंडिन मी तरि पापि जनासचि दक्ष शीर नच देइन मी तें ॥
काय मला करतील विधी हर विष्णु नाहिं भय हो मजला तें ॥ १ ॥

## दिंडी.

मेषमस्तक आणुनी लावियेलें ॥ दक्ष केला सजिवची त्याच वेळें ॥
तीर्थ यात्रा करण्यास शंभु जाई ॥ एक तप तो सेवीत वनें राही ॥ १ ॥

महा स्मशान आनंद त्यास देई ॥ ह्मणुनि शंभू मागुती तिथें येई ॥
सहस्त्र वर्षें तपाचरीत राही ॥ पुढें कैसी जाहली कथा पाही ॥ २ ॥

## श्लोक.

हिमाचळाचे उदरास आली ॥ भवानि माता तरि त्याच वेळीं ॥
मनांत पूजी शिव शंभु नित्य ॥ मिळो पती तो मजलाच सत्य ॥ १ ॥

## पद.

(दोदिवसाची,) या चालीवर.

हिमनगस्त्री ती सती मेनिका मेनाक पर्वत पुत्र तिला ॥
पार्वति कन्या तिची जाहली अवतार तिनें तो धरला ॥ धृ० ॥
ब्रह्मांडांताहि दुसरी प्रतिमा नाहीं दिसली तरि मजला ॥
दुसरी प्रतिमा करितां करितां विधी इंद्र तोही थकला ॥
अप्रतिम रूप पाहण्यासाठीं सुरभूसुर तो ही जमला ॥
स्वरूपवर्णन करितां करितां शेषहि जाणा तो थकला ॥ १ ॥

## पद.

(भला जन्म हा तुला,) या चालीवर.

आकर्ण नेत्र निर्मळ मुख तें लज्जित शशि देखुनी ॥
पीकहि लाजे कंठीं रव ऐकुनी ॥ धृ० ॥
परम सकुमार वर्ण घनश्याम इंद्रनीळ गाळुनी ॥
वाटे ओतिलि ही भामिनी ॥
दंततेज तें पडतां मेदिनिं पाषाण होती मणी ॥
आदिजनानि ही प्रणवरूपिणी ॥
ती झाली हो हिमनगनंदिनी वंद्याचि जी त्रिभुवनीं ॥
अनंत शक्तीची स्वामिनी ॥ चाल ॥
चरणांगुष्ठीचें तेज भासतें अती ॥
अष्टनायका त्या पाहुनि मानें लाजती ॥

मीनकेतन कोटी नख तेजा लाजती ॥ चाल ॥
अंगीचा तो सुवास जाई ब्रह्मांडहि फोडुनी ॥
ब्रह्मादिदेव पाळी जी मुळिहुनी ॥ १ ॥

## पद

( श्री हारिच्या वणुनादें ) या चालीवर.

वदतांना तेज फांकें मुखकमला पासुनी ॥
सुकुमारी गौरवर्णा रति लाजे पाहुनी ॥
अंबा जैं बोलु लागे भासचि हो जनमनीं॥
रत्नाच्या राशि त्या हो जाती कीं विखरुनी ॥ १ ॥

## साकी.

पदमुद्रा त्या उमटति जेथें उगवति दिव्यचि कमलें ॥
सुगंध घेण्या वसंत धांवे घेउनि गडबड लोळे ॥
कनकलता आली ॥ कैलासाहुन ही खालीं ॥ १ ॥
नंदीसह तो येउनि शंभू हिमाचलीं तप करितो ॥
शिवदर्शन तें घेण्यासाठीं सत्वर हिमनग येतो ॥
लोटांगण घाली ॥ शिवस्तुति बहुताचि केली ॥ २ ॥
त्यावरि पार्वति येउनि तेथें शंभूदर्शन घेई ॥
साठसहस्त्रचि सुंदर दासी तीच्या संगति पाही ॥
करि सेवा जननी ॥ दासी संगे घेऊनी ॥ ३ ॥

## दिंडी.

द्वारें सुरभीपुत्र तो उभा राही ॥ पंचवदनाहि ध्यानस्त सदां होई ॥
नेत्र झांकुनि हो ध्यान करी तो कीं ॥ स्वस्वरूपीं मग्न तो सदां हो कीं ॥

## साकी.

तारक नामा असुर तयाचे पुत्र तिघे बा पाही ॥
तारकाक्ष तो विद्युन्माली कमललोचनाचि तो ही ॥
तिघे तपाचरती ॥ उमारमण पूजन करती ॥ १ ॥

सहस्रदळांचीं कमळें आणुनि त्रिवर्ग पूजिति तात ॥
एक दिनीं तों एक न्यून हो पडलेंचि सहस्रांत ॥
आर्पीति शिवचरणीं ॥ नेत्रकमल ते काढूनी ॥ १ ॥

## अंजनीगीत

मागुति आलें एक न्यून हो ॥ स्वशीरकमलें आर्पिति ते हो ॥
पाहुनि ऐसें प्रसन्न शिव हो ॥ उठवी मग त्यांना ॥ १ ॥
इच्छित वर ते त्यांना दिधलें ॥ अनिवार जगीं बहुताचि झाले ॥
आणिक त्यांना शंभू बोले ॥ ऐका तें आतां ॥ १ ॥

## साकी.

अंतरिक्ष गगनिं त्रिपुरें दिधलीं आणिक तुह्मांला तीं ॥
सहस्र वर्षें शोधुनि पाहतां निमिषीं एकचि होती ॥
कोणापासुनिही ॥ तुह्मां भीती ती नाही ॥ १ ॥

## दिंडी.

लक्ष लावुनि मारील बाण यास ॥ तुह्मांसह ती जातील जळुन खास ॥
वरानें ते माजून फार गेले ॥ त्रिभूवन ते फारची त्रासवीलें ॥ १ ॥

## पद.

( झाली ज्याची उपवर, ) या चालीवर.

देव पळविले स्थान सोडुनी ॥ पापानें ती पीडिलि धरणी ॥ धृ० ॥
देवऋषि मग सर्व मिळूनी ॥ विष्णूच्या ते गेले चरणीं ॥
शंभू जवळीं मग तो गेला ॥ देव ऋषीतें संगें घेऊनी ॥
सर्वांनीं मग स्तवनचि केलें ॥ होय प्रसन्न तो स्तवनांनीं ॥
प्रसन्न झालों तुह्मां कारणें ॥ इच्छित घ्यावें पूर्ण करूनी ॥
त्रिपुरें आह्मां बहुत पीडिलें ॥ ठाव नसेहो तिळभर धरणी ॥
शंभू बोले त्रिपुरमर्दना ॥ रथ द्यावा मज लागूनी ॥
समस्त देवहि तयीं बोलती ॥ देऊं स्यंदन सिद्ध करूनी ॥ १ ॥

## पद.

( यक्ष वदे हा देव कशाचा, ) या चालीवर.

कुंभिनि स्यंदन रवि शशि चक्रें अक्ष होत तो मंदागिरी ॥
पुरुषार्थ चार स्तंभ जाहले चार वेद ते वारु तरी ॥
विधी सारथी झाला पाही शास्त्र दोर ते घेइ करीं ॥
पुराणें तीं तटबंदचि तें उपपुराणें खिळे तरी ॥
कनकाद्री तो धनुष्य झाला भोगिंद्र गुणाचे होय वरी ॥
वैकुंठपती बाण जाहला तेज तयाचें जाय दुरी ॥
उमानाथ तो स्यंदनिं चढला रसातळां तो जाय तरी ॥
कोणी त्याला उपडुं न शकती नंदी स्यंदन काढि वरी ॥
अपार युद्ध तें करुनी शंकर त्रिपुर दळाचा नाश करी ॥ १ ॥

## कामदा.

( या चालीवर. )

वीर भद्र तो युद्ध हो करी ॥ युद्धचक्र तें मातलें तरी ॥
असुर ते तिथें बहुत मारिले ॥ पुनरपी तरी सजिव जाहले ॥ १ ॥

## साकी

अमृत कुंडें दैत्यापाशीं बहूत होतीं जाणा ॥
असुर मरति जे अमृत शिंपुनि सजीव करती त्यांना ॥
मेघास्त्र सोडूनी ॥ कुंडें टाकी बुडवूनी ॥ १ ॥

## कामदा

( या चालीवर. )

अंतराळिं तीं त्रिपुर चालती ॥ लक्ष साधितो पार्वतीपती ॥
पाति ती कदां निमिष लाविना ॥ त्रिपुर ते परी दृष्टि येतना ॥ १ ॥
आंगीं चालला घर्म पूरहो ॥ पाहुनी तया भास होइ हो ॥
सुरनदी इचा ओघ चालला ॥ काय श्रम तरी होय शंभुला ॥ २ ॥

## साकी.

सहस्त्र वर्षें युद्ध चाललें नाहीं राक्षस मेला ॥
राक्षस कांता पतिव्रता बहु तेणें जय तो त्याला ॥
बौध्य रूप धरितो ॥ विष्णू स्त्रियामधीं शिरतो ॥ २ ॥

## दिंडी.

वेद सोडुनि अपवित्र शास्त्र केलें ॥ स्त्रिया कडुनी धर्म ते सोडवीले ॥
व्यभीचारहि त्या बहु करिती पाही ॥ ह्मणुनि दैत्याचें अकल्याण होई ॥ १ ॥
लक्ष साधुनि शंकरें धनुष्याला ॥ विष्णुबाणाचा योग तयीं केला ॥
पाशुपतास्त्रही सोडि त्याच वेळीं ॥ अस्त्र पाहुनि सर्वांस भ्रांत झाली ॥ २ ॥

## पद.

( जाउं नकारे विषया, ) या चालीवर.

सहस्त्र सूर्याचि काय उगवले भासे सकळाला ॥
उभा राहिला काळदंड कां जाळिल विश्वाला ॥ धृ० ॥
प्रळयाग्नीची शिखा सबळ ही बांधिले सर्वाला ॥
कृतांत जिव्हा किंवा चपळा चाले प्रळयाला ॥
सप्त कोटि तें मंत्र तेज हो आलें अस्त्राला ॥
देव दैत्यही भिऊनि गेले प्रळय समय आला ॥
न्यास सहितही मंत्र जपूनी सोडी बाणाला ॥
धरणी अंबर तडाडिलें हो दिग्गज तो भ्याला ॥
सहस्त्र चपला धांवति जैशा सोडुनि मेघाला ॥
अस्त्रशक्ति ती तशी चालली भासे सकळाला ॥
विमानसह ते अमर पळाले घेउनि सर्वाला ॥
मूर्च्छा येऊनि असुर पडाति हो सोडिति प्राणाला ॥ चाल ॥
त्या अस्त्रानें वधिलें दैत्याला ॥
भस्मचि केलें त्या तारि त्रिपुराला ॥

त्रितिय नेत्रिचा पावक तो त्याला ॥ चाल ॥
सहाय होउनि तीन ग्राम सह जाळी सैन्याला ॥
त्रिपुर जाळिलें पाहुनि देवें स्तविलें शंभूला ॥ १ ॥

## कामदा

( या चालीवर. )

त्रिपुरतात तो तारकासुर ॥ प्रळय मांडिहो बहुत त्यावर ॥
अमर सर्वही दूर पळविले ॥ चंद्र सूर्य ही बंदिं घातले ॥ १ ॥
जान्हवीसही धरुन नेत तो ॥ देव अंगना बंदिं घालतो ॥
श्रीपती विधी इंद्र मागुती ॥ मारण्या तया युक्ति शोधिती ॥ २ ॥

## साकी

शंकर पार्वति एक करावी होइल पुत्रचि त्यास ॥
षण्मुख तो तरि त्याच्या हस्तें मरेल राक्षस खास ॥
आज्ञा ती दिधली ॥ मन्मथास ही त्या वेळीं ॥ १ ॥
हिमनागें शंकर तप करि जेथें तेथें सत्वर जावें ॥
काम बाण तो तया मारुनी त्याला तूं भुलवावें ॥
रति सह जाई तो ॥ जेथें शंकर तप करितो ॥ २ ॥

## श्लोक

( शिखरिणी. )

वसंतानें केलें सकळ वन तें भूषित बरें ॥
उमा देहीं तेव्हां रतिहि तरि ती सत्वर शिरे ॥
शिवाच्या देहीं तो मदन शिरला त्याच समया ॥
विनाशाचे वेळीं विपरितहि बुद्धी तरि तया ॥ १ ॥

( मंदाक्रांता. )

नंदी गेला बहुत दुर तो पक्षि ते घालवाया ॥
मायेला ही मदन भुलवी आणिली त्याच ठायां ॥

शंभू तेव्हां नयन उघडी पाहि तों काम तेथें ॥
अन्यायी जो खचित ठरला त्या क्षमा नाहिं जेथें ॥ १ ॥

## साकी.

भाललोचना पासुनि तेव्हां काढी वैश्वानर तो ॥
त्या अग्नीनें मदन जाळिला फाल्गुनमासीं तरिं तो ॥
दिवस पौर्णिमेचा ॥ केला नाशाचि मदनाचा ॥ १ ॥
महाशब्द तो करुनी तेव्हां देती हाकचि सारे ॥
स्मरगृहाचें नाम घेउनी ह्मणती कैसें हें रे ॥
शंभो देवारे ॥ कैसी करणी केलिसरे ॥ २ ॥
शिवाज्ञा तरी तेव्हां पासुनि सकळ जनांला झाली ॥
फाल्गुनमासीं करुनि हुताशनि जो व्रत नेमें पाळी ॥
अवदशा न बाधी ॥ विजय कल्याण तो साधी ॥ ३ ॥

## श्लोक.

जाळूनी रतिनाथ या परि तरी तात्काळ कीं ऊठला ॥
शंभू मागुति तो विचार करुनी कैलासिं कीं पातला ॥
ऐकूनी रतिचा विलाप श्रवणीं सांगे तिला सत्वरी ॥
रुक्मिण्योदरिं जन्म घेइल पती कृष्णावतारीं तरी ॥ १ ॥

## साकी

काममदानें व्यथित होउनी भूलचि पडली त्याला ॥
कमलासन तो भोगी कन्या शापी मग मदनाला ॥
शंकर तो तुजला ॥ दहन करिल तुज चांडाळा ॥ १ ॥

## पद

( बघुनि उपवना विरहाग्नीची, या चालीवर. )

हिमनगकुमरी बहू तप करी शंकर व्हाया पती ॥
सप्तऋषी ते नगीं जाउनी शंकरास प्रार्थिती ॥ धृ० ॥
हिमनगकन्या तुवा वरावी सुंदर ती पार्वती ॥

पार्वति जेथें तप करि तेथें जाई तो पशुपती ॥
बटुवेष तो धरुनी शंकर पुसे भवानीप्रती ॥
काय निमित्तें तप करशी गे येथें तूं पार्वती ॥
तप करितें मी प्राप्त व्हावया शंकर मजला पती ॥ चाल ॥
स्मशानवासि तो भिकारि केवळ तरी ॥
गजचर्म वस्त्र तें ओलें अंगावरी ॥
महाक्रोधि तो व्याल भूषणें तरी ॥ चाल ॥
व्याघ्रचर्म तो नित्य नेसतो योग्य नव्हे तुज पती ॥
तुला एक वर योग्य सुंदरी तो तरि लक्ष्मीपती ॥ १ ॥

## साकी

बोल ऐकुनी क्षोभ पावली बहुताचि तेव्हां माता ॥
शंभु निंदका होई परतां मुख न दाखवी आतां ॥
शिव द्वेषि दिससी ॥ मज समीप कां तरि येशी ॥ १ ॥

## अंजनीगीत

शिक्षा तुह्मां लाविन आतां ॥ परंतु तुह्मी ब्राह्मण दिसतां ॥
सत्वर तुह्मीं येथुनि परतां ॥ दिसे मज चांगलें ॥ १ ॥
दुर्गेचा तो निश्चय देखुनी ॥ प्रगट होइ तो स्वरूप धरुनी ॥
जयजयकारचि तिणें करुनी ॥ चरण दृढ धरिले ॥ २ ॥
प्रसन्न झालों मागे सत्वरी ॥ अंबा बोले हे मदनारी ॥
आर्धांगी मज करी सत्वरी ॥ इच्छा हीच असे ॥ ३ ॥
ठाव देइन तुला सुंदरी ॥ कैलासी मग जाय अवसरी ॥
पितृगृहीं ती अंबा झडकरी ॥ गेली तेव्हां हो ॥ ४ ॥

## दिंडी.

सप्तऋषिला पाठवी हिमनगासी ॥ हिमनगानें दाविलें प्रेम त्यासी ॥
भवानीला ती अरुंधती पाही ॥ ह्मणे जोडा मिळणार असा नाहीं ॥ १ ॥

## साकी

चैत्रमासीं ते अष्टमिला हो मन्मथ वर्षीं जाणा ॥
लग्ननिश्चया करुनी ऋषि ते परताचि येती स्थाना ॥
लग्न हो सत्वरी ॥ इच्छिताति सुरगण हेंच तरी ॥ १ ॥
कधीं होइल लग्न शिवाचें पुत्र कधीं त्यांना तो ॥
होउन घेइल प्राण सत्वरी तारकासुराचा तो ॥
इंद्र विधी ह्मणती ॥ येवो सत्वर लग्नतिथी ॥ २ ॥

## पद.

(जीं जीं कर्में त्या प्राण्याच्या,) या चालीवर.

नंदी जाउनि निरोप कळवी शंभूचा सकळा ॥ धृ० ॥
देवासह तो इंद्र निघाला जाइ त्या गिरिला ॥
लक्ष्मीसह तो विष्णु येउनी सभेमधें बसला ॥
चतुर्वक्र ही सावित्रीसह कैलासीं आला ॥
अठ्याऐंशी सहस्र ऋषिही शिष्ये संगातिला ॥
घेउनि ऐसा ऋषिभार तरी येई लग्नाला ॥
एकादश ते रुद्र घेउनी द्वादश त्या रविला ॥
पितृभूतगण वसुअष्टकही ऐसा गण जमला ॥
सिद्धचारण गुह्यक ह्यांनीं मंडप तो भरला ॥
अष्टनायका किन्नर गायक मेळा तो जमला ॥ १ ॥

## साकी

सर्वांसह मग शंकर सत्वर हिमाचलासीं आला ॥
हिमनग येउनि समोर त्यांच्या पूजुनि ने सर्वांला ॥
सुवर्णमंडप तो ॥ जानवसासी तो देतो ॥ १ ॥
शिवरूपासी पाहुनि होती विस्मित वऱ्हाडी ते ॥
पुराणपुरुष हा वृद्धचि दिसतो ऐसें ह्मणती हो, ते ॥
सगूण नवरी ती ॥ निर्गुण स्थितीच याची तो ॥ २ ॥

कमलोद्भव तो स्वयें करितसे साहित्य तरी सगळें ॥
नवनिधि सगळे अष्टसिद्धि त्या राबति हो त्या वेळें ॥
न्यून नसें कांहीं ॥ कैसें न्यून तरी राही ॥ ३ ॥
देवप्रतिष्ठा पूर्ण करूनी मूळ हिमाद्री आला ॥
नवरा मिरवित मंडपिं नेउनि करी मधूपर्काला ॥
लग्न घडी भरली ॥ आली ती हिमनगबाळी ॥ ४ ॥

## दिंडी.

उभी केली ती पटा आड जेव्हां ॥ लग्न घटिका पाहेच रवी तेव्हां ॥
बृहस्पति तो अष्टकें ह्मणूं लागे ॥ सावधानचि तें विधी ह्मणे वेगें ॥ १ ॥
यथाविधिनें तें लग्न पूर्ण झालें ॥ होम करिती दोघे हि त्याच वेळें ॥
जरी याज्ञिक हें मंडपांत झालें ॥ कोणिं वधुला नाहींच पाहियेलें ॥ २ ॥
होम करुनी ती प्रदक्षिणा घाली ॥ विधी पाही पदनखें तयें वेळीं ॥
कामबाणें मूर्च्छीत विधी होई ॥ वीर्य त्याचें द्रवलेंच तयें ठायीं ॥ ३ ॥

## साकी.

साठ सहस्त्रचि वालखिल्य ते तेव्हां जन्मा आले ॥
अन्याय असा नयनीं देखुनि मदनांतक त्या वेळें ॥
गेला क्षोभूनी ॥ देव भीति तें पाहूनी ॥ १ ॥
छेदुनि टाकी ब्रम्ह्याचें तें शीर पांचवें तेव्हां ॥
हाहाःकार हि एकचि झाला चहूंकडे हो जेव्हां ॥
वैकुंठपती तो ॥ समाधान बहुताचि करितो ॥ २ ॥

## अंजनीगीत

चतुर्वक्र तें नाम तयाला ॥ ठेविति सारे तरि त्या विधिला ॥
कामानें जो व्यापुन गेला ॥ भोगी भोगाला ॥ १ ॥
यथाविधी तें लग्न जाहलें ॥ अलंकार ते सर्वा दिधले ॥
हिमनगानें गौरव केलें ॥ देवांचें बहुतची ॥ २ ॥

पार्वति संगें घेऊनि आला ॥ शंभू मग त्या कैलासाला ॥
सर्व देव ते प्रार्थिति त्याला ॥ देवा तूं पावरे ॥ ३ ॥
उत्पत्ती ती गेली खुंटुनी ॥ मन्मथ उठवी कृपा करूनी ॥
सजीव केला अनंग करुनी ॥ मन्मथ तो पुढती ॥ ४ ॥

## दिंडी

तारकासुर तो पुत्र अंधकाचा ॥ देव पळवी देउनी त्रास साचा ॥
शिवासी हो होईल पुत्र केव्हां ॥ हेंच इच्छिति देव ते तरी तेव्हां ॥ १ ॥
चार युग ते एकांतीं रमत होते ॥ परी होईना पुत्र तरी त्याते ॥
असुर तारि तो फारची त्रास देई ॥ देव ललना सर्वची धरुनि नेई ॥ २ ॥

## पद.

(हसुं नये कामिनी,) या चालीवर. राम जोशी याचें.

शिवपदिं सर्वही जाति शरण मग देव हो ॥ धृ० ॥ शिवास मग ते पाहण्या जाती ॥ एकांतामाधिं दोघे होती ॥ कैसें तारि ते आंतचि जाती ॥ अग्नीला ते आंत प्रेषिती मग देव हो ॥ १ ॥ अतीत वेषें हाका मारी ॥ ऐकुनि हाका मग मदनारी ॥ अतीत हाका मारी भारी ॥ पार्वतिला तो सांगू लागे मग देव हो ॥ २ ॥ तेज माझें धरुनी घाली ॥ भिक्षा अतिता तारि या वेळीं ॥ शिवाज्ञा ती पूर्णाचि केली ॥ तेज धरुनी अग्नीला ती ह्मणे ध्यावें हो ॥ ३ ॥

## साकी

जेथें पडलें वीर्य तरी तें रेतकूप तो झाला ॥
जाणा पारा तोचि तरी हो धरवेना कोणाला ॥
वीर्य तरी प्याला ॥ अग्नि तो त्या समयाला ॥ १ ॥

## पद.

( रंग सावळा तारि अंगीं, ) या चालीवर.

अग्नीला मग गर्भ राही लज्जित हिंडे दिशा दाही ॥ धृ० ॥ हिंडत असतां सहज पाही ॥ साहि कृत्तिका ऋषि स्त्रिया ही ॥ गंगास्नान करुनी त्याही ॥ तापत बसल्या त्या साही ॥ काढी गर्भ अग्नि तोही ॥ पोटिं घालि तो

त्यांच्या ही ॥ होती मग गर्भिणी त्याही ॥ चकिताचि झाल्या त्या साही ॥ ॥ १ ॥ लज्जा त्यांना फार ये, ती ॥ गर्भ काढुनि फेकुन देती ॥ रक्तबिंदु ते एक होती ॥ दिव्यरूपें हो जन्मे मूर्ती ॥ सहा मुखें हस्त शोभती ॥ द्वादश द्वादश तरी पाही ॥ अघटित करणी तरी हो, ही ॥ २ ॥

## दिंडी

कार्तिकाच्या माहिन्यांत जन्म झाला ॥ कृत्तिकेचा योग तो त्याच वेळां ॥
कुमाराचि तो जन्मला महा योगी ॥ मयुरवाहन भस्म तें सदां अंगीं ॥ १ ॥
निजसुतचि हा जाणुनी शंकरानें ॥ उमास्तानें त्या लाविं हो अनंदानें ॥
सप्त वर्षें पूर्ण तीं होतिं त्यातें ॥ करी पालन तोंवरी उमा त्यातें ॥ २ ॥

## साकी

वैश्वानर तो जाउनि सांगे तेव्हां देवाला हो ॥
स्कंदपुत्र हा शिवासि झाला तोष होय अमरां हो ॥
ऐकुनि वाणी ती ॥ देव तारकावर जाती ॥ १ ॥

## पद.

( दिसली पुनरपि, ) या चालीवर.

सेनापतित्व इंद्रानें हो दिधलें कार्तिकस्वामीला ॥
दिव्य रथावरि त्यास बसवुनी अभिषेक करी हो त्याला ॥ धृ० ॥
देवदानव इकडें लढती परि जय आला दैत्याला ॥
देव सर्वही पळुनी येती स्तविती तेव्हां स्वामीला ॥
तारकासुर तो प्रचंड मोठा स्वामी रक्षी आह्मांला ॥
देववाणि ती परिसुन स्वामी धरिती विशाळ रूपाला ॥
शिवकुमार तो नयनीं देखुनि राक्षस धांवत तरि आला ॥
तेहतिस कोटी देव सर्वही उभे स्वामिपाठिला ॥
दशसहस्रगज यांचें सम बळ होतें पाही असुराला ॥
बाणवृष्टि ती करूं लागला वरिवरि तरि तो त्या वेळां ॥
मोठे शूरहि भिऊनि गेले पाहुनि त्याच्या वृष्टीला ॥ १ ॥

## कामदा

( या चालीवर. )

नयनिं देखुनी इंद्र तो तरी ॥ असुर सोडि हो शक्ति त्या वरी ॥
प्रळय वीज ती काय धांवती ॥ शक्ति पाहुनी वीज लाजती ॥ १ ॥
अमर सर्वही जाति भीउनी ॥ स्तविति विष्णुला हस्त जोडुनी ॥
इंदिरावरा धांव सत्वरी ॥ शक्ति ही तरी दूर रे करी ॥ २ ॥
विश्वव्यापका इंदिरावरा ॥ पापनाशका सकळ भूधरा ॥
असुर मर्दना धांव सत्वरी ॥ शक्ति ही तरी दूर रे करी ॥ ३ ॥

## दिंडी

योगमाया पाठवी विष्णु खालीं ॥ तिणें त्वरितचि मग शक्ति जवळ केली ॥
शक्तिला ती फेकुनी दूर देई ॥ सकळ देवां आनंद फार होई ॥ १ ॥

## आर्या.

तारकमेघांतुनि हो, बाणाची वृष्टि फार ती होई ॥
जितके शर तो सोडी, तितके ते स्वामि गिळुन हो जाई ॥ १ ॥
नाना शस्त्रास्त्र जरी, सोडी तारक कुमार देखूनी ॥
तितके गिळून टाकी, शंभुकुमर शास्त्रसंख्यवदनांनीं ॥ २ ॥

## साकी.

ब्रह्मास्त्र दिलें सोडुनि असुरें तेंही त्यानें गिळिलें ॥
कल्पांतरुद्रासम तो दिसला भयानकचि त्या वेळें ॥
रथावरुन खालीं ॥ उतरे राक्षस त्या वेळीं ॥ १ ॥

## अभंग

स्वामी वरी तरी धांवें अनिवार ॥ चोळुनिया कर दांत खाई ॥
कृतांताचे परी हाक हो दिधली ॥ आला रथा खालीं कुमार ही ॥
मल्लयुद्ध त्यांनीं आरंभाचि केलें ॥ सप्त दीन झालें युद्ध तें हो ॥
तारकासूर तो जर्जराचि केला ॥ खालीं आपटिला स्वामींनीं हो ॥ १ ॥

## साकी.

पायीं धरुनी चक्रासम हो गरगर फिरवी त्याला ॥
जायें धरणीला आपटि चूर्णाचि मृद्घटवत तो झाला ॥
प्राण निघुन गेला ॥ इंद्र वाजवी दुंदुभिला ॥ १ ॥
पुष्पें वर्षाति सुरगण सारे स्तवन कराति हो त्याचें ॥
तारकासुर जेव्हां वधिला लहान वय बहु त्याचें ॥
सप्त वर्षांचा ॥ होता कुमार तो साचा ॥ २ ॥
सर्व नगर तें इंद्रें लुटुनी देवस्त्रिया त्या सोडी ॥
देव सर्वही मुक्तचि केले लागे सर्वां गोडी ॥
शंभुकुमराची ॥ वाद्यें वाजाति बहु साची ॥ ३ ॥
वाराणशीस कुमार जाउनि नमि तो शंकर ताता ॥
मातेला ही नमन करूनी बहु सुख झाला देतां ॥
मौंजिबंधन तें ॥ झाल्यावर कारि तीर्थातें ॥ ४ ॥

## दिंडी

कपाटीं तो बैसला जाउनी हो ॥ अनुष्ठानाचि तें करी सर्वदां हो ॥
भवानी ती जाउनी त्यास बोले ॥ ब्रह्मचर्याचि तूं आजवरी केलें ॥ १ ॥
लग्न करुनी स्त्री सहित सुखें राही ॥ गृहस्थाश्रम तूं अतां करावा ही ॥
षडानन तो बोलला अंबिकेला ॥ सांग कैशा गे स्त्रिया असाति माला ॥ २ ॥
आजवर मीं नाहींच पाहिल्या गे ॥ आकृती त्यांची कशी मला सांगे ॥
मज समचि तरि त्या सर्व स्त्रिया बाळा ॥ येत हांसे ऐकुनी कुमाराला ॥ ३ ॥

## पद.

(रामचंद्र नाहिं घरी,) या चालीवर.

तुजसम त्या सर्व स्त्रिया सत्य हें जरी ॥
वचन तुझें मान्य मला जाण तूं तरी ॥
अंतर कांधें यास कारिन दोष मज वरी ॥
जननि अतां स्वस्थ मनें जाइ सत्वरी ॥ १ ॥

## साकी.

ऐसें बोलुनि जाऊनि बैसे महा कपाटीं जेव्हां ॥
जगज्जननि ती धांवु लागली त्यास धराया तेव्हां ॥
नाहीं सापडला ॥ अंबा पडली धरणीला ॥ १ ॥

## दिंडी

अरे बाळारे वदन मला दावी ॥ हाक मारी मी दया न कां यावी ॥
स्तनीं पान्हा दाटुनी फार येई ॥ कुणा पाजूं मी सांग मला कांहीं ॥ १ ॥

## साकी

दुग्ध लोणि हें तुझें घेइगे ऐसें ह्मणुनी वमला ॥
क्रोधें तेव्हां चापपाणि तो बोलतसे जननीला ॥
काय तरी वदला ॥ ऐका देउनि चित्ताला ॥ १ ॥
माझें दर्शन घेण्यासाठीं येइल जी स्त्री ती हो ॥
सप्तजन्म ती विधवा होइल भोगिल बहु दुःखा हो ॥
त्यांची संगति ती ॥ दुःख बहुताचि देइल ती ॥ २ ॥
कार्तिक मासीं योगिं कृत्तिका त्यावर दर्शन घेई ॥
पुरूष तो बा सभाग्य होउनि वेद मुखोद्गत होई ॥
सगळ्या जातींना ॥ दर्शनें लाभ सम जाणा ॥ ३ ॥

## अंजनीगीत.

सकल ऋषि तरी स्वामीला हो ॥ विनाविती जोडुनि कर तेव्हां हो ॥
रात्रंदिन ती उमादेवि हो ॥ तळमळते पाही ॥ १ ॥
वाराणशिला जाउनि सत्वर ॥ भेटुनि तिजला तोषित तूं कर ॥
आनंदवनीं तो जाई नंतर ॥ जननिस भेटाया ॥ २ ॥
समाधान तें त्यांचें करुनी ॥ मागुति गेला अपुल्या स्थानीं ॥
कथा अशी ही स्कंद पुराणीं ॥ श्रवण करा तुह्मी ॥ ३ ॥

हरहर शंभो पुराण पुरुषा ॥ पूर्ण करी तूं माझी मनिषा ॥
बाळकृष्ण या तुझे दासा ॥ सुमती ती द्यावी ॥ ४ ॥

## पद.

( पावना वामना,) या चालीवर.

शशिधरा हे हरा शंकरा ॥ तव पदकमलीं निरंतर आसरा ॥ धृ० ॥
शशिकर धरसी मस्तकीं देवा ॥ योगि ध्याति तुज ईश्वरा ॥ १ ॥ तव० ॥
श्रीकरत्राळा दाविसि रूपा ॥ कां कृपा नये ईश्वरा ॥ २ ॥ तव० ॥
बिल्वदळें ही मानुन घेई ॥ दासाला तरि उद्धरा ॥ ३ ॥ तव० ॥
तव चरणीं दे वास ईश्वरा ॥ या बाळकृष्ण किंकरा ॥ ४ ॥ तव० ॥

NATIVE GENERAL LIBRARY. KHED. (POONA)
सार्वजनिक वाचनालय खेड, ( पुणें. )

## अध्याय १४ वा.

### श्लोक

त्रितापशमना त्रिदोषहरका दयाळू हरा ॥
त्रिभूवनवरा शिवा शशिधरा दया हो करा ॥
अहर्निशिं करी तुझें स्तवन मी प्रभो शंकरा ॥
कृपा करुनि शंकरा झडकरी मला उद्धरा ॥ १ ॥

### श्लोक

देवा झाले सकळ तरि हे पूर्ण अध्याय तेरा ॥
चौदावा हा कळस तरि त्या पूर्ण होऊं पसारा ॥
स्वामीचें हो जनन कथिलें गौरिचें लग्न तें ही ॥
आतां ऐका पुढिल कथना सांगतों सर्व कांहीं ॥ १ ॥

### साकी.

लंबोदर तो कार्तिकस्वामी लहान दोघे होते ॥
खेळवि त्यांना जगदंबा ती दावुनि बहु प्रीतीते ॥
मांडीवर घेई ॥ वक्रतुंडास त्या समयीं ॥ १ ॥
त्याला देई स्तनपानचि तें घेउनि मांडीवरती ॥
शुंडादंडें दुग्ध ओढितो दावुनि बहुतचि प्रीती ॥
शुंडा फिरवी ती ॥ अंबेच्या पृष्ठा वरती ॥ २ ॥
शुंडेमध्यें पय साठवुनी षडाननाला बोले ॥
देवासहि जें दुर्लभ अमृत प्राशन करि या वेळें ॥
क्रोधयुक्त स्वामी ॥ बोले उच्छिष्ट नच घे मी ॥ ३ ॥

### दिंडी.

लंबनासिक तो काय तरी बोले ॥ जननि नाहीं कां तुवां ऐकियेलें ॥
धरुनि शुंडा पाडुं कां यास खालीं ॥ कधीं शिकवीली यास अशी बोली ॥ १ ॥

इंद्र शशि रवि ते सुर प्रसवलीस ॥ मनोहर ते पाहतां दिसति खास ॥
लंब नासिक हें कर्ण थोर ऐसा ॥ एकदंताचि हा प्रसवलीस कैसा ॥ २ ॥

## अंजनीगीत

स्कंद बोल ते ऐकुनि कर्णीं ॥ हासुं लागला त्रिशूलपाणी ॥
तैशी ती ही हिमनगनंदिनि ॥ पाहुनि त्या हांसे ॥ १ ॥
स्कंद ह्मणे हो माझे आई ॥ स्तनपान तें मजला देई ॥
जगदंबेनें मग त्या समयीं ॥ विघ्नेशा उतरिलें ॥ २ ॥
मांडीवर मग षण्मुख घेउनी ॥ स्तन जो घाली त्याचे वदनीं ॥
पांचमुखें तीं आक्रंदोनी ॥ रडूं लागली ॥ ३ ॥

## पद

( उद्धवा शांतवन कर जा, ) या चालीवर.

देखुनि ऐसें गणराजा, हांसे गद गद त्या वेळां ॥
कैसा सुत हा तव अंबे ॥ रडतो किति मोठ्यानें ॥
देसि एक स्तन तो वदनीं ॥ बसुनि स्वस्थ मनानें ॥ चाल ॥
रडतीं पांच मुखें त्यांना ॥ कोठुनि देशिल स्तनपाना ॥
येइ हांसे पंचवदना ॥ मग तो बोले अंबेला ॥ देखुनि० ॥ १ ॥

## दिंडी

काय बोलें गजवदन सांग माते ॥ ह्मणे षण्मुख हीं कशी तरी याते ॥
तुह्मा सम हा जाहला पुत्र खास ॥ पांच तुह्माला सहा तरी यास ॥ १ ॥
बोल ऐकुनि आनंद त्यास झाला ॥ पुत्र पाहूनी तोष शंकराला ॥
पुढें दोघे खेळती भांडती हो ॥ मनीं प्रीती फार ती तयांच्या हो ॥ २ ॥

## पद.

( झाली ज्याची उपवर, ) या चालीवर.

दोघे रडती खेळत असतां ॥ ऐकुनि धांवे गौरी माता ॥
गजवदनाला धरुनी पोटीं ॥ बोले कां तरि दोघे रडतां ॥

स्कंदानें बघ कर्णाचि धरिला ॥ बोले कठिणचि त्यजुनी ममता ॥
तत्र साकारे नयनचि दिसती ॥ ऐकुनि हांसे तेव्हां माता ॥
स्कंदा कांरे ऐसें वदसी ॥ शिक्षा लाविन तुज मी आतां ॥
नेत्र मोजिले यानें माझे ॥ नको नको मी ह्मणताचि असतां ॥
मोजालि यानें शुंडा माझी ॥ अन्याय हा थोराचि पहातां ॥
ताडण करि गे माते स्कंदा ॥ त्यावर झाला स्कंद बोलतां ॥ १ ॥

## साकी.

यानें माझे हस्त तरी कां मोजावे गे माते ॥
कारिमुख त्यावर सांगु लागला त्याच्या अन्यायातें ॥
गौरी शंकर हो ॥ ऐकति त्याच्या वचना हो ॥ १ ॥

## कामदा.

(या चालीवर.)

हा मला तरी भेडसावुनी ॥ काय बोलला घेइ ऐकुनी ॥
पोट कां तुझें थोर जाहलें ॥ मोदकास कां बहुत भक्षिले ॥ १ ॥
बोल ऐकुनी हांसती तरी ॥ शंभु पार्वती फार अंतरीं ॥
प्रीतिनें तया ह्रदयिं ती धरी ॥ समजुती करी बहुत सत्वरी ॥ २ ॥

## आर्या

मदनांतक तो त्यावरि, सिंहासनिं स्वस्थ बैसला असतां ॥
जगदंबा हास्य करी, शंभूच्या त्या मुखाकडे बघतां ॥ १ ॥

## पद

( छेकापन्हुति, ) या चालीवर.

विरूपाक्ष तो तेव्हां बोले हांससि कां सुंदरी ॥
सांग सखे कारण मजला तरी ॥ धृ० ॥
जटामुगुटिं त्या, ललना पाहुनी हांसें ये मज तरी ॥
कोठुनि आणिली ती सुंदरी ॥

संशय भलता कां तरि घेसी नारि नव्हे ती तरी ॥
सखये नीरचि धरिलें शिरीं ॥
स्त्रीवदनचि तें कोठुनि दिसतें मस्तकीं जळांतरीं ॥
नाथा संशय दूरचि करी ॥
संशय भलता कां तरि घेसी वदन नव्हें सुंदरी ॥
वारिज तें दिसतें तुज जें शिरीं ॥
कमळाला ते-कुरळ केश हो कृष्णवर्ण ते तरी ॥
कोठुनि दिसती हो त्यावरी ॥
संशय-भलता कां तरी घेसी केस नव्हे सुंदरी ॥
कमळीं मिलिंद बसले वरी ॥
भिवया कैशा कमळाला त्या दिसती मज त्यावरी ॥
तव करणी कुणा नेणवे तरी ॥
संशय भलता कां तरि घेसी भिवया नव्हे चातुरी ॥
सलील लहरी तळपती वरी ॥ चाल ॥
कमलनयन कसे आकर्णचि दीसती ॥
नेत्र नव्हे ते जळीं मीन खेळती ॥
कमंडलूसम कां स्तनयुगुलें शोभतीं ॥ चाल ॥
स्तन नव्हे ते चक्रवाकची बसली ती साजिरी ॥
गंगानदीचे दोन्ही तिरीं ॥ १ ॥

## पद.

( कारे इतुकी बळजोरी, ) या चालीवर.

पार्वति बोले मदनारी ॥ काय सांगू थोरी ॥ धृ० ॥
एकाचे ते अनेक करुनी ॥ दाखवितां तुह्मी भारी ॥
मौनें तुमचे चरण धरावें ॥ तव बोलचि प्रमाण जरी ॥ १ ॥

## अंजनीगीत.

मांडुनि मग तो सारिपाटही ॥ खेळे पार्वति नीलकंठ ही ॥
खेळ ऐकतां भक्त होति ही ॥ श्रेष्ट त्रीजगती ॥ १ ॥

## साकी

गौरीशंकर खेळ खेळती आनंदानें पाही ॥
अकस्मात तों तेथें आला कमलोद्भवनंदन ही ॥
ब्रह्मविणा हातीं ॥ गायी मुखिं शिवलीला ती ॥ १ ॥
एक क्षण तो स्वस्थ होउनी खेळ विलोकी नयनीं ॥
रंग न ये तो खेळाला हो पण केल्या वांचूनी ॥
अवश्य ते ह्मणती ॥ पण मग दोघे ही करिती ॥ २ ॥
जिंकिल त्याला एक वस्तु ती द्यावी हो दुसऱ्यानें ॥
करुनी पण मग खेळुं लागलीं दोघे आनंदानें ॥
प्रथम डाव जिंकी ॥ व्याघ्रांबर ती घेई कीं ॥ ३ ॥

## दिंडी

दुजा डावहि जिंकिला भवानीनें ॥ घेतलें तें गजचर्म अंबिकेनें ॥
एक मागें एक ती डाव जिंकी ॥ आयुधें तीं सर्वही हिरुनि घे कीं ॥ १ ॥

## श्लोक.

जो तो जिंकी डाव ती अंबिकाहो ॥ वस्तू साऱ्या जिंकिल्या त्या तिणें हो ॥
लावी शंभूनंदिही शेवटाला ॥ देवीनें तो नंदिही जिंकियेला ॥ १ ॥

## साकी

कौपिन सोडुनि दिगांबर तरी शंभू तेव्हां झाला ॥
ऐसें पाहुन गदगद हांसे नारद त्या समयाला ॥
तुह्मा स्त्री जिंकी ॥ तुमचा महिमा गेला कीं ॥ १ ॥

## पद.

( घेउनि मुशाफर वेश, ) या चालीवर.

सृष्टी अवघी मायाधिन तूं निराकार निर्गुणी ॥
चराचर तरी मायाधीनची ठेवी रे समजुनी ॥
इणेंच दिधलें सगूणपण तें पाही तुज लागुनी ॥

नाहींतर बा अव्यक्ताचे तूं कोणि पुसेना जनीं ॥
मायाधिन बा तूं झालासी न पुसे तुज लागुनी ॥ चाल ॥
भक्ताला कैसें दाविसि वदना तरी ॥
हांसाति जन सारे देखुनि तुज अंतरीं ॥
अशा स्त्री जवळी राहु नये क्षणभरी ॥ चाल ॥
वनवास तरी यापरि बरवा सत्वर जा येथुनी ॥
मुनिवचनाते ऐकुनि शंकर गेला दुसरे वनीं ॥ १ ॥

## अंजनीगीत.

इतकें करूनी नारद गेला ॥ शंकर टाकी संगहि सगळा ॥
निरंजनीं मग वासाचि केला ॥ त्या शंकरानें ॥ १ ॥
योगी ध्याती ज्याला हृदयीं ॥ शोधहि करितां न पडे ठायीं ॥
मूळाग्र नसें ज्याला कांहीं ॥ जातिकुळ नसेची ॥ २ ॥
नामरूप तें गुणातीत हीं ॥ गोत्रवर्ण ज्या आश्रम नाहीं ॥
शोधुनि थकले वेद सर्वही ॥ कोणा अंत न मुळीं ॥ ३ ॥

## पद.

( सखे अनुसये, ) या चालीवर.

सख्या घेऊनी जगदंबा ती ॥ शोधा जाई शंभूच्या ती ॥
गिरीकंदरीं हिंडे हो, ती ॥ भागुनि गेली जगदंबा ती ॥
तीर्थें सगळीं जीं जीं होतीं ॥ शोधुनि पाही सर्व तरी तीं ॥
सर्वांना ती झाली पुसती ॥ कोणी तिजला मार्ग न वदती ॥ १ ॥

## पद

( श्रीसांबाच्या समान दैवत, ) या चालीवर.

पंचाग्नीते साधन करिती धूम्र सदां सेविती ॥
मस्तकीं जटा बहुत राखिती ॥
एक नग्नची एक नयन ही सर्वकाळ झांकिती ॥
कांहीं मौन धरुनि राहती ॥

एक उभे हो सदां सर्वदां एकनभ विलोकिती ॥
कांहीं वायु सदां भक्षिती ॥
यज्ञयागही बहुतचि करिती हिंसा बलि दान किती ॥
करुनि ते देहा कष्टविती ॥
चौदा विद्या मिरविति लोकीं सर्व कळा दाविती ॥
वाद विवाद करुनि भागती ॥
कित्येक पुराण सांगति नाचति लोकां उपदेशती ॥
परी उमारमण नच पहाती ॥ चाल ॥
कूश मृत्तिका किती तसें उदक नाशिती ॥
पावन आह्मी हो झालोंसे बोलती ॥
त्यासहि पुसतां ते ह्मणती न चले मती ॥ चाल ॥
इतराचा तो काय पाड हो जेथें हैमवती ॥
शोधिता भागुनि गेली अंती ॥ १ ॥

## पद.

( दोदिवसाची, ) या चालीवर.

शिव रूपा ते पाहण्या साठीं नारायण तप नित्य करी ॥
मघवा द्रुहीण करिती निशिंदिनिं ठाव निघेना त्यास तरी ॥ धृ ॥
ऋग्वेद स्थापी कर्म मार्ग तो यजुर्वेद तो ज्ञान जरी ॥
अथर्वणवेद उपासना ती लावुन देती बहुत परी ॥
सामवेद तो गायन करितो न्यायशास्त्र तें भेद करी ॥
मीमांसक तरि कर्ममार्ग तो स्थापन करितो बहुत परी ॥
पातंजळि तो व्याकरणाचे योग शब्द हे भाग करी ॥
सर्व निरसुनी उरले उत्तम वेदांती हो त्यास तरी ॥
ब्रह्म ह्मणाति त्या शिवब्रह्म तें समजुनि ध्याहो तेंच तरी ॥
वेदा शास्त्रा अगम्य आहे महिमा वर्णूं कोठवरी ॥ १ ॥

## साकी

शिव नामातें मुखीं घेऊनी शोधाया मग चाले ॥

सर्वाभिमान टाकुनि देवा शरण तुला मी आलें ॥
दर्शन दे मजला ॥ अभिमान सर्व तो गेला ॥ १ ॥
सगळीं तत्वें शोधुनि बघतां साक्षी शेवटिं होते ॥
तैसें ती हो हिमाचलीं मग पाही शिवरूपाते ॥
स्वात्मसुखी झाला ॥ तल्लिन झाकुनि नयनाला ॥ २ ॥

## दिंडी

श्वशुर गृहिं कां येउनि वास केला ॥ परी शेवटिं कीं लाभ मला झाला ॥
याच रूपें मी जरी जवळि जाई ॥ विलोकुनि मज राग तो त्यास येई ॥ १ ॥

## अंजनीगीत.

भिल्लीणीचा वेष धरूनी ॥ शिखिपिच्छाचें वसन करूनी ॥
ऐशा वेषें मुरहरभगिनी ॥ चालली सत्वरी ॥ १ ॥
अनंत कमळें भवांड माळा ॥ त्रिभुवनसुंदरि गुंफी हेळा ॥
नृत्यगायन तें करुनि मोहिला ॥ स्मर हर तो तरी ॥ २ ॥

## पद

( परम सुवासिक पुष्पें, ) या चालीवर.

अनंत शक्ती जिच्या भोंवती विराजिती त्या बहुत रिती ॥
यानीं बसुनी अष्टनायका रूप पाहुनी बहू भुलती ॥ धृ० ॥
किन्नर गायक तन्मय होती पाहुनि तियेची नृत्यगती ॥
प्रवाह सारे खुंटुनि जाती वैरभाव तो पशु त्यजती ॥
निश्चळ झाला पवन क्षणभरी विधिकुरंग ते ही भ्रमती ॥
कुंभिनि सोडुनि येऊं पाहे वरवर तरि तो फणीपती ॥
अंगिचा तो सुगंध ध्याया निर्जर शटपद ते होती ॥
चंद्रकिरण तें शीत जाहलें काय नवल हें जन ह्मणती ॥
देवांगना हि ह्मणती तेव्हां काय तरी हें रूप अती ॥
ओवाळूनि हो आह्मी जाऊं समस्त कीं हो त्या वदती ॥
आदिजननिचें अपार लाघव शक्रविधी ते न नेणती ॥ १ ॥

## पद.

( जाउं नकारे विषया, ) या चालीवर.

दंततेज तें देई वैभव माणिक खाणिला ॥
खड्यालाही सुरंग येई पाहुनि तेजाला ॥ धृ० ॥
तनुसुगंध तो वरवर जातो भेदुनि गगनाला ॥
पदमुद्रा त्या जेथें उमटती तेथें त्या वेळां ॥
सुगंध कमळें उगवति सारीं त्याचे सुगंधाला ॥
वेधुनि घाली प्रदाक्षिणा त्या वसंत बहु वेळां ॥
अनंत चपळा लाजुनि जाती पाहुनि रूपाला ॥
नेत्र उघडुनी रूप पाहुनी शंकर तो धाला ॥
पायीं पैंजण रुणझुण वाजति करितां नृत्याला ॥
क्षुद्रघंटा रसाल गर्जती त्यांतचि त्यावेळां ॥
करिं कंकणें झणत्कारिती करितां भावाला ॥
भ्रुलता चाप चढवुनि ओढी तीव्रचि बाणाला ॥
नयनबाण त्या कामशत्रुला मारी त्या वेळां ॥ चाल ॥
पाहुनि ऐशा सतेज रूपाला ॥
पंचशरानें पंचवदन मोहिला ॥
जप तप विसरुनि तीस पुसूं लागला ॥ चाल ॥
कोणाची गे कामिनि तूं तरी सांगे यावेळां ॥
कामानल मम शांत करींगे देउनि सुरताला ॥ १ ॥

## दिंडी

वदनचंद्रा पाहुनी तुष्ट झालें ॥ चकोरनयन मम फार याच वेळें ॥
वरी मजला आधीन तुझ्या झालों ॥ कृपा करिगें तूं शरण तुला आलों ॥ १ ॥

## पद.

( रामचंद्र नाहीं घरीं, ) या चालीवर.

रूपवती त्याजोलि उमा किन्निमित्य रे ॥
कैलासा त्यजुनि असा फिरसि वनीं रे ॥

परनारी खचित असे मी न वरीरे ॥
सुरत कसें घडें तरी सांग मलारे ॥
इंद्रिय तरि दमन तुवां नाहीं-केलिरे ॥
तपस्वि तरि कोण तुला ह्मणिल सांगरे ॥ १ ॥

## साकी.

दुर्गेवरि मी रुसून आलों नाहिं कधीं बघणार ॥
तिचें वदन तें, तसें नामही नाहिं कधीं घेणार ॥
स्वप्निंहि, तूं समजे ॥ मम बोल मनीं तूं उमजे ॥ १ ॥

## दिंडी.

पती माझा रागिष्ट फार आहे ॥ त्रिभूवन हें जाळील सर्व पाहे ॥
अणूभर ही गोष्ट त्या श्रूत होई ॥ ह्मणुनि भीती फारची मनीं येई ॥ १ ॥
बहू काळाची कठिण तरी आहे ॥ दक्ष यागीं घातली उडी पाहे ॥
पुढें गेली पर्वताचिये पोटीं ॥ पुन्हा वरली मी परी कपटि मोठी ॥ २ ॥
तूंहि कपटी आहेस तीजहूनी ॥ स्वर्धुनी कां ठेविली शिरिं जपूनी ॥
भवानी ती तुजहून भोळि आहे ॥ त्यजशि तिजला आश्चर्य किती हो हें ॥ ३ ॥
परस्त्रीला देखुनी धांव घेशी ॥ मिठी मारुनि वेडाच कसा होसी ॥
तपश्चर्या ती पूर्ण कशी होई ॥ याच योगानें देह नरकिं जाई ॥ ४ ॥
क्षणामध्यें सृष्टिची घडामोड ॥ शुंभ निशुंभ जिंकुनी करी मोड ॥
अशी जरि ती येऊनी प्रार्थि माते ॥ परी नाहीं मी ऐकणार तीते ॥ ५ ॥
तिच्या संगें बोलणें वर्ज्य केलें ॥ तुझे आधिन जाहलों याच वेळें ॥
जिथें नेशी येईन तिथें जाण ॥ तुझें वचनाधीन मी खचित मान ॥ ६ ॥

## साकी.

दोन वेळरे तुजला वरिलें तिची गती केली ही ॥
माझा पाडचि काय तुला मग टाकुनि तूं मजलाही ॥
केव्हां जासिल रे ॥ काय तुझा तरि नेमचिरे ॥ १ ॥

द्यूत खेळतां तुमचें तुह्मी पणामधें हो हरला ॥
बोलुन इतकें नाचुं लागली भिल्लिण त्या समयाला ॥
शंभू मग उठला ॥ आलिंगन तें देण्याला ॥ २ ॥
अंबा सत्वर चाले पुढती मागुति शंकर चाले ॥
मोठ्यानें तो हाक मारुनी मुखशशि दावी बोले ॥
मम भाकचि घेई ॥ घाली माळचि या समयीं ॥ ३ ॥

## पद

( देव स्त्री मेनका ) या चालीवर.

जगदंबा मग हांसुन बोले या मम सदनाला ॥
मग मी होइन कामिनि तुमची सोडुनि शंकेला ॥
शंकर ऐसा वेधुनि अणला मग कैलासाला ॥
बसवुनि आसनीं उपचारासह पूजी हो त्याला ॥
नमस्कार मग करुनी घाली मिठीच कंठाला ॥
स्वरूप कारि मग प्रगटचि देवी ती त्या वेळेला ॥ १ ॥

## साकी.

धन्य भवानी त्वांचि आणिलें समजाउनि गे मजला ॥
धन्य धन्य तूं धन्य तरी मी झालों या समयाला ॥
पुनरपि नगिं आलों ॥ त्यागुनि ज्याला मी गेलों ॥ १ ॥

## अंजनीगीत.

ब्रह्मवीणा तो करीं घेउनी ॥ कैलासनगीं नारद जाउनी ॥
शिवस्तुति ती पूर्ण करोनी ॥ वदतां तो झाला ॥ १ ॥

## पद.

( गजानन तांडव, ) या चालीवर.

तव भक्त देखिले बहुत परी ॥ धृ०॥
श्रियाळासम भक्त तुझारे नसे अवनीवरीं ॥
कांतानगरीं श्रियाळ वसतो खरा भक्तचि तरी ॥

वीर गंभीर उदार मोठा कीर्ती दिगंतरीं ॥
क्षमावंत तो केवळ सात्विक न दुजा अवनीवरी ॥
वर्षें झालीं दहा सहस्रची अन्नसत्रचि करी ॥
इच्छाभोजन तसें दानही दे अतिता तरी ॥
अगम्य वस्तू अतित मागतां आणवी झडकरी ॥ १ ॥

## कामदा

( या चालीवर. )

ऐकुनी असें वृत्त तें तरी ॥ शंभु तो तिथें जात सत्वरीं ॥
आतितवेष कुश्चितचि घेतला ॥ राजअंगणीं त्वरित पातला ॥ १ ॥

## दिंडी

परम कोपी तो दिसे अग्निसा हो ॥ दुष्ट वचनें कठिणचि बोलला हो ॥
रूप सारें कुश्चितचि असा पाहीं ॥ येत दुर्गंधी फार तया देहीं ॥ १ ॥
देइ इच्छाभोजना त्वरित राया ॥ न तरि जातों मी सत्व घेउनीया ॥
श्रियाळासह चांगुणा धांव घेती ॥ चरण धरूनी आसनीं बैसवीती ॥ २ ॥
क्रोधवचनें सर्व तीं सोसुनीयां ॥ नमन करिती त्यास हो पूजुनीया ॥
हस्त जोडुनि प्रार्थिती अहो स्वामी ॥ वदा इच्छा पुरविण्या सिद्ध हा मी ॥३॥

## साकी

नरमांस मला आणुन देईं सत्वर तरि तूं राया ॥
चोर हेर वा दुसऱ्याचें रे मांस नको तें खाया ॥
आणुं नको कोणी ॥ विकत तरी मानवप्राणी ॥ १ ॥

## दिंडी.

चांगुणा ती बोलली अतीताते ॥ भोजनाला माझेंच मांस देतें ॥
जरी तुह्मां मानेल मांस माझें ॥ राव बोले देईन मांस ताजें ॥ १ ॥

## साकी.

तुह्मी दोघे पवित्र खचितचि दोष कसा तो नाहीं ॥

भक्षण करितां तुह्मांलाहो अन्नसत्र मग नाहीं ॥
रडतिल याचक ते ॥ कोण तरी त्राता त्याते ॥ १ ॥
एकुलता जो प्रियकर तुमचा पांचचि वर्षं ज्याला ॥
बत्तिस लक्षणि चिलया बालक भोजनास दे मजला ॥
दूर करुनि माया ॥ ह्मणती जावें घेउनियां ॥ २ ॥

## दिंडी

व्याघ्र वृक वा रीस मी कांहिं नाहीं ॥ मांस कैसें भक्षु मी तरी पाही ॥
उबग तुह्मी मनिं नका आणुं कांहीं ॥ घालि पचवोनी मांस मला तें ही ॥ १ ॥
मोह ममता कां धरुन रुदन केलें ॥ सत्व घेउनि जाईन याच वेळें ॥
उशिर तरि कां लावितां तुह्मी त्यास ॥ उठुन जाइन आतांच तरी खास ॥२॥

## साकी.

हे मम तनया कोठें असरी चिलया बाळा धांवें ॥
खेळाया तूं कुठें गुंतला बाळा लौकर यावें ॥
अतित वाट पाही ॥ बाळा लवकर तूं येई ॥ १ ॥

## अंजनीगीत

ऐसें ऐकुनी धांवत आला ॥ नमन करी हो त्या अतिताला ॥
मागुति नमुनी जनकजननिला ॥ ह्मणे कां बाहिले ॥ १ ॥
पिशितदान तें तुझें मागतो ॥ अतित तुझी बा वाट पाहतो ॥
नाहीं तर तो निघून जातो ॥ मन माझें भ्रमलें ॥ २ ॥
स्नेहें करुनी बाळक बोलें ॥ शिवार्पण तरी शरीर केलें ॥
तृप्त होय तो तरि मी दिधलें ॥ शरीर हें माझें ॥ ३ ॥

## पद

( शिवाज्ञेची वाट न पाहतां, ) या चालीवर.

ऐसें ऐकुनि झडकरि घेउनि अपुल्या बाळाला ॥
पाकशाळेभीतरीं गेली त्यासि वधायाला ॥ धृ० ॥
चिलयाचें तें चुंबन घेऊनि हृदयीं धरि त्याला ॥

बाळपणें मी पुढती येइन तुझेच उदराला ॥
मायाजाळ ही सर्व तिणें तो दूर किहो केला ॥
वज्राहुनिही कठिणचि केलें मन त्या समयाला ॥
चिलयाचें तें शीर छेदिलें सोडुनि ममतेला ॥
पुत्र नसे हो ह्मणुनी ठेवी त्या शिरकमळाला ॥
शरिराचा तो पाक करूनी उठवी अतिताला ॥ चाल ॥
सर्व साक्षि जो शंकर तो त्याला ॥
कळलें कीं शिर ठेवि पाहण्याला ॥
मनीं जाणे तो सर्वचि जगताला ॥ चाल ॥
उठुन चालिला झडकारे तेव्हां दावुनि कोपाला ॥
श्रियाळ चांगुणा धांवत जाती धरती चरणाला ॥ १ ॥

## साकी

गात्रामध्यें प्रमुख असें जें शीर कुठें तें आहे ॥
वंचुनि कैसें तुवां ठेविलें आणी तें लवलाहे ॥
लागति तीं चरणीं ॥ ह्मणती घालूं पचवोनी ॥ १ ॥
न धरावा हो क्षोभ अंतरीं नेणतपणिं जें चुकलें ॥
सर्वाज्ञा तूं क्षमा करी रे अपराधचि जे केले ॥
आह्मी दास तुझे ॥ आतां क्षमा तरी करिजे ॥ २ ॥

## दिंडी.

शीर येई बाहेर घेउनीया ॥ घाले उखळीं करि चूर्ण कांडुनीया ॥
कष्टि होऊनि अश्रु कां नयानें येती ॥ पुत्र गेला सत्वास हानि हो ती ॥ १ ॥

## अंजनीगीत.

अवश्य ह्मणुनी नृपतीललना ॥ शीर आणुनि करी कंडणा ॥
सत्व पाहि तो कैलास राणा ॥ सद्गद होऊनी ॥ १ ॥
निज सत्वाचें उखळ करोनी ॥ धैर्य मुसळ तें करी घेउनी ॥
वेल्हाळी ती कांडी बैसुनी ॥ निर्धार अचळ धरूनी ॥ २ ॥

मंगळदायक-गीत तूं तरीं ॥ गीत गायि गे रसिक सुंदरी ॥
खंती करतां तो मदनारी ॥ दुरावेल जाण गे ॥ ३ ॥
सद्भाव सरविलासनी ती ॥ कोमलहृदया नृपकांता ती ॥
किंवा निश्चळ गंगानदि ती ॥ जाय मर्यादा धरुनी ॥ ४ ॥
तिचे पाहतां मुख कमळाला ॥ रोहिणिरमण काळवंडला ॥
उपमा द्याया तिचें रुपाला ॥ दुसरें न दिसें तें ॥ ५ ॥

## पद.

( नकळे होइल गति कैशी, ) या चालीवर.

येउनि उदरां तूं माझ्या ॥ धन्य तुवां केलें ॥ धृ० ॥
माझें बाळक बहु सुकुमार ॥ किशोरपण परी बहु उदार ॥
हास्य वदन तें तुझें फार ॥ बहु उदारपण केलें ॥ येउनि० ॥ १ ॥
दिसे बहु तुझें कोमल अंग ॥ निष्ठुर मी रे किति तरि सांग ॥
माझ्या पापा नाहीं थांग ॥ तूं तरि सांग जें केलें ॥ येउनि० ॥ २ ॥
परदेशी मी तुजविंण बाळ ॥ माझे हस्तचि झाले काळ ॥
दुबळी झाल्यें होतिल हाल ॥ मम कर व्याल तुज झाले ॥येउनि०॥३॥
स्तनीं पान्हा फुटला फार ॥ भूलिंगासी लागे धार ॥
धांवें धांवें मम सुकुमार ॥ दुग्ध फार रे आलें ॥ येउनि० ॥ ४ ॥
अतीत-जेउनि जव कीं जाय ॥ त्यागिन मी तरि माझी काय ॥
धीर नसे हो होत्यें हाय ॥ करूं काय या वेळें ॥ येउनि० ॥ ५ ॥

## पद.

( आजि शेवटचा, ) या चालीवर.

सखया बाळा टाकुनि मजला जाशी ॥ लक्षुनि कैलासाशीं ॥ धृ० ॥
सखया बाळा उभा राहि क्षणभररे ॥ तुज संगें मी येइनरे ॥
मोक्षाचें तूं केणें भरुनी जाशी ॥ कां तरि मजला त्यजिशी ॥
उदकाविण ती मासोळी हो जैशी ॥ तळमळते तुजविण मी तैशी ॥
मम हृदय कैसें झालें निर्दय कठिण ॥ कोवें दावुं जाने हें वदन ॥

तुझी माउली ह्मणतां लाजचि ये गुणवंता ॥ केलिस तरि तूं सार्थकता ॥
गेलासी तूं त्या शिवपदिं अविनाशी ॥ उद्धरून ने तरि मजशीं ॥ १ ॥

## अंजनीगीत.

त्रिभुवन सारें जरी शोधिलें ॥ तुजसम बाळक कधीं ना मिळें ॥
बाळाचे ते तुकडे केलें ॥ म्यां पापिणीनें ॥ १ ॥
पचवुनि आणिलें उटा सत्वरीं ॥ भोजन आतां करा झडकरी ॥
झाले श्रम हो आपणा भारी ॥ दया करा मजवरी ॥ २ ॥

## दिंडी.

श्रियाळा तूं यजमान ह्मणुनि येई ॥ पंक्तिलाभचि तो मला तरी देई ॥
असें ऐकुनि संकोच तया झाला ॥ चांगुणा ती बोलली श्रियाळाला ॥ १ ॥

## पद.

( दैव योग दुर्विपाक, ) या चालीवर.

नऊमास गर्भ याच उदरिं वाहिला ॥
चार प्रहर काय तुझा भार जाहला ॥ धृ० ॥
सत्व तरी राखिं आतां अतित कोपला ॥
चिंता ती काय बसा तुह्मि पंक्तिला ॥
पाहि पाहि अतित तरी निघुनि चालला ॥
स्वसुत पोटिं घालण्यास काय शंकला ॥ १ ॥

## साकी.

नृपती बैसे पंक्तीला मग ताटें वाढुनि आणलीं ॥
चांगूणेसी अतित बोलला बाई बैसे खालीं ॥
तूंही पंक्तीला ॥ बैसे, पाहुनि समयाला ॥ १ ॥
त्यावरि बोले अतित तो तरी ऐकुनि दचके अबला ॥
तुमचे मंदिरिं अन्न न घ्यावें ऐसें वाटें मजला ॥
ऐका कारण तें ॥ सांगिन तुह्मां सर्वांतें ॥ २ ॥

## दिंडी.

दीप नसतां सदन तें शून्य जैसें ॥ घ्राण नसतां वदन तें दिसें जैसें ॥
फळा वांचुनि वृक्ष तो शून्य जैसा ॥ तारकाविण तो नयन दिसे जैसा ॥ १ ॥

## साकी

निपुत्रिक तरी तैसे समजे पापी ते हो प्राणी ॥
अन्न कोण हो घेइल तेथें क्षणभरि तरि बैसोनी ॥
तेवी सदनाची हें ॥ पुत्राविण शून्यचि पाहे ॥ १ ॥
सद्गद होऊनि दोघे वदती एक सूत जो होता ॥
तो चरणीं या अर्पण केला अंत किती हो बघतां ॥
अतीत जाइल हो ॥ सत्व कसें मग राहिल हो ॥ २ ॥

## पद.

( किती सांगु तुला, ) या चालीवर.

एक बाळ तो, मज तो न दिसे ॥ धृ० ॥
दया कसी बा तुज येत नसे ॥ महाराजा सत्व जातसे ॥
नयनांतुनिया पूर येतसे ॥ बाळक जाउनी सत्व जातसे ॥ चाल ॥
हा हा शंकरा ॥ धांव उमावरा ॥ करुनि त्वरा ॥ दीन मी असे ॥ १ ॥

## अंजनीगीत.

वंशा खंडन कैसें झालें ॥ शंभु शंकरा कैसें केलें ॥
पुत्रसुखाला मी अंतरलें ॥ काय करूं आतां ॥ १ ॥

## साकी

ऐसें ऐकुनि अतीत लोचन श्रवो लागले भारी ॥
वर्तमान तें बाहिर फुटलें वळसा झाला नगरीं ॥
लोक दुःख करिती ॥ नृप किशोर दावा ह्मणती ॥ १ ॥
सुरवर सारे ह्मणूं लागले बैसुनि तेव्हां यानीं ॥
सत्वधीर ही पतिव्रता हो धन्य चांगुणा राणी ॥
शंकर काय तिला ॥ नकळे देइल आज्ञांला ॥ २ ॥

जें प्रिय असेल तुझे मानसीं माग चांगुणे मजला ॥
प्रसन्न झालों इच्छित देइन सर्वचि तें तरि तुजला ॥
त्यावर ती बोले ॥ अतिताला हो त्या वेळें ॥ ३ ॥

## अंजनीगीत.

मला निपुत्रिक ह्मणतिल आतां ॥ धुवोनि काढी कलंक ताता ॥
शरण असें मी तुजला अतिता ॥ हेंचि मागणें माझें ॥ १ ॥
मम वचन तें सत्य मानुनी ॥ दीर्घ स्वरानें हाक मारुनी ॥
बाही पुत्रा संशय सोडुनी ॥ येइल तो धांवुनी ॥ २ ॥

## दिंडी.

सत्य मानुनी अतितवचन तें हो ॥ दीर्घ हाका फोडिते चांगुणाहो ॥
ह्मणे चिलया येइ बा धांवुनीया ॥ अतित खोळंबे ग्रास मुखीं घ्याया ॥
नको राहूं खेळण्या गुंतुनीया ॥ सत्व राखी सत्वरीं येउनीया ॥
जाउं पाहति तुजविणें प्राण बाळा ॥ दश दिशा ती पाहि हो तये वेळां ॥
सूर्य उगवे हो नभोंगणीं जैसा ॥ धांवुनीया बाळ तो येत तैसा ॥
श्रियाळाला प्रेम तें फार येई ॥ अतित तरि तो शिवरूप तयीं घेई ॥ १ ॥

## साकी

चिलयाला मग हृदयीं धरुनी बसवी अंकावरती ॥
श्रियाळ चांगुणा लागति पायीं वर वर लोळण घेती ॥
शिव शिव शंभोरे ॥ आतां निज पद दावीरे ॥ १ ॥
दुंदुभिनादें अंबर भरलें सुमन वृष्टि सुर करिती ॥
आनंदित तें नगर जाहलें पहावया जन येती ॥
जयजयकार करिती ॥ शिव शिव हर हर ते वदती ॥ २
चिलयासी मग राज्यि स्थापुनी छत्र तयावरि धरती ॥
शिवकृपेनें श्रियाळ चांगुणा दिव्य रूप हो होती ॥
सचिवाला ह्मणती ॥ आतां राज्य करा पुढती ॥ ३ ॥

## अंजनीगीत

यानीं मग हो त्यास बसवुनी ॥ स्थापी दोघा निज पादें नेउनी ॥

शंकर शंकर ह्मणती वदनीं ॥ दोघे ही सर्वदां ॥ १ ॥
कांती नगरीं तोष जनांना ॥ होइल तैसा सकळ त्रिभुवना ॥
शिवनामाची करति गर्जना ॥ श्रीधर स्वामी ते ॥ २ ॥

## अभंग.

चौदा अध्याय संपूर्ण जाहले ॥ कळसा हो आलें निरूपण ॥
चौदा विद्याचें हें सार तरी जाणा ॥ न करवे गणना कोणालाही ॥
चौदा गाठिचा हा अनंत परिकर ॥ भजा निरंतर मनोभावें ॥
गयावर्धन हें चौदा पद झालें ॥ पुण्य तें घडलें अपारची ॥
चौदा रत्नांचा हा प्रकाश पडला ॥ चौदा ही लोकाला प्रिय झाला ॥
चौदा कांडे वेद कीं चौदा कोहळी ॥ द्रव्य भरलेली मिळाली हो ॥
चौदा ह्या कोठड्या शुद्ध तरी फार ॥ निर्मिलें मंदीर शिवाचें हो ॥ १ ॥

## आर्या.

श्रवण पठण लेखनही, अनुमोदन निदिध्यास तो जाणा ॥
रक्षण ग्रंथाचि करितां, फळ समान तें असेंचि सर्वांना ॥ १ ॥
इतुक्यासहि शंकर तो, अंगाची साउली करी पाही ॥
आयुरारोग्य वाढुनि, ऐश्वर्यचि प्राप्त होय त्यांना हीं ॥ २ ॥
व्याधी निरसुनि जाई, वंधला पुत्र तो तरी होई ॥
बहु दिन ग्रामीं गेला, भेटाया पुत्र तो तरी येई ॥ ३ ॥
संपत्ती बहु दाटे, ऋणमोचन होय तें तरि त्वरित ॥
शत्रुक्षय यथार्थचि, दक्षिण मुखिं वाचितांच तो होत ॥ ४ ॥
शतावर्तनें करितां, पोटीं शिवभक्त सूत तो होई ॥
त्रिमासावर्तनही, संकट निरसोन दूर तें जाई ॥ ५ ॥
ज्या गृहिं ग्रंथचि राही, पिशाच भूत न रिघेच हो तेथें ॥
भावें प्रचीत पहावी, अभाविका काय हो तरी येथें ॥ ६ ॥

## दिंडी

सोमवारी ग्रंथ हा पूजुनिया ॥ प्रदोष कालिं शिवरात्र लक्षुनीया ॥
शुचिर्भुतपणिं जर तुला नीज लागे ॥ स्वप्निं प्रगटुनि सर्वही शंभु सांगे ॥ १ ॥

## अंजनीगीत.

जें जें संकट ये तुह्मातें ॥ निवारील हो शंभू तें तें ॥
ह्मणुनि स्मराहो शिवनामातें ॥ संकट मग कैचें ॥ १ ॥

## पद.

( दो दिवसाची तनु ही साची, ) या चालीवर.

मंगलाचरण प्रथमा ध्यायीं गाउनि केली शंभुस्तुती ॥
दाशार्हराया उद्धरिला हो धन्य तरी ती कलावती ॥
द्वितियाध्यायीं शिवरात्रीची कथा सर्वही वदली ती ॥
तिसऱ्यामध्यें गौतम सांगी गोकर्ण महिमा शुद्ध रिती ॥
कल्माषपाद उद्धरिला हो झाली हत्या दूरचि ती ॥
चवथ्यामध्यें बाळाला तो प्रसन्न झाला पशूपती ॥
पांचव्यांत हो शिवाज्ञेनें उमा पाळि हो अर्भक ती ॥
साहव्यांत हो सिमंतिनीची कथा साग्र ही वदली ती ॥
सात आठ माधें भद्रायूचें कथनाचि केलें यथामती ॥
नवमोध्यायीं वामदेव तो फिरताचि असतां भूवरती ॥
त्याचें संगें दुर्जय तरला जन्म दुःख हो कथिलीं तीं ॥
दाहव्यामाधें शारदेस तो पुत्र दिला त्वां बहु सुमती ॥
आकराव्यामधिं रुद्राक्षाची कथा फार हो सुरसाचि ती ॥
महानंदा उद्धरिली हो भद्रसेन तो जात गती ॥
बाराव्यामाधें बहुला तरली भस्मासुर तो दुष्टमती ॥
मोहिनीरूपें विष्णू मारी दुष्टालाही दिली गती ॥
तेराव्यामधिं शंकरास हो वरिती झाली पार्वति ती ॥
चौदामध्यें शंकरपार्वति विनोद करिती बहुत रितीं ॥
शंकरास हो भुलवुन आणी होउनि पार्वति भिल्लिण ती ॥
श्रियाळ चरित्र अगाध कथिलें संपूर्णाचि हें याच रिती ॥ १ ॥

## श्रीधरस्वामी यांची गुरु परंपरा आणि आख्यायिका.

### अंजनीगीत.

श्रीधर स्वामी ब्रह्मानंदचि ॥ ते तरि आनंद सांप्रदायची ॥
क्षीरसागरीं तो गोविंदची ॥ विधिला उपदेशी ॥ १ ॥

### साकी.

अत्रिऋषीते तेथुन पुढती दत्तात्रय महाराज ॥
तया पासुनी सदानंद ते रामानंद यतिराज ॥
अमलानंद तरी ॥ ब्रह्मानंदचि ते त्यावरी ॥ १ ॥
कल्याणामधिं राहणार जे सहजानंदचि स्वामी ॥
पूर्णानंद मग त्यावर झाले दत्तानंदाचि स्वामी ॥
ब्रह्मानंद पुढती ॥ तेच मला उपदेशिती ॥ २ ॥

### पद.

( भला जन्म हा तुला लाधला, ) या चालीवर.

पंढरीहून चार योजनें नैऋत्य कोणावरी ॥
आहे नाझरे ग्रामाचि तरी ॥ धृ० ॥
त्याग्रामीचे पूर्वज माझें देश लेखक तरी ॥
रोज लिहिणें लिहिती करीं ॥
पूर्वाश्रमें मी ब्रह्मानंदाचे आलों मग पंढरीं ॥
आश्रम केला मग तो दुरी ॥
चतुर्थाश्रम घेउनि केली अक्षय वस्ति पंढरीं ॥
समाधी घेउनि तेथें तरी ॥
ब्रह्मानंद तो मम जनकची सावित्रि माता खरी ॥
वंदाया भक्त येती पंढरी ॥
वंदुनि दोघा शिवलीलामृत पूर्णचि केलें तरी ॥
अर्पिलें नेउन चरणावरी ॥
शकें सोळासे चाळीस सालीं विलंबी संवत्सरीं ॥
फाल्गुण पौर्णिमा रविवासरीं ॥

ब्रह्मकमंडलु नदिच्या तीरीं बारामति नगरीं ॥
आद्यंत ग्रंथचि झाला तरी ॥ चाल ॥
शिवलीलामृत हा ग्रंथ पूर्ण जाहला ॥
ईशकृपेनें त्या शेवट तरि लागला ॥
जय जय शंकर तव पदीं ग्रंथ वाहिला ॥ चाल ॥
पार्वतिजीवन कर्पुरगौरा ब्रह्मानंद तूं तरी ॥
करि दया श्रीधरदासा वरी ॥ १ ॥

## साकी

शिवलीलामृत स्कंदपुराणीं ब्रह्मोत्तर खडांत ॥
सदां सर्वदां लीलामृत हें भक्त तरी पारसोत ॥
अध्याय चवदावा ॥ गोडचि सर्वा हा व्हावा ॥ १ ॥

## अंजनीगीत

जय जय शंकर अनाथनाथा ॥ बाळकृष्ण हा चरणीं माथा ॥
ठेवुनि संपवी जगन्नाथा ॥ शिवलीलामृत हें ॥ १ ॥

## पद.

(सुंदर नार तूं) या चालीवर.

शंकर शंकर नाम वदावें ॥ भवसागर हा तरुनी जावें ॥ धृ० ॥
नाम मात्रा सेवा तुह्मी ॥ मुक्तचि झाला तुह्मी या जन्मीं ॥
महत्पापि ते तरुनिच गेले ॥ नाम मुखीं ज्या सहजचि आलें ॥
संकट सारें निरसुन जाई ॥ सदां सौख्य त्या प्राण्या होई ॥
जेथें जेथें तो नर जाई ॥ तेथें तेथें यश तें येई ॥
बाळकृष्ण हा गातो भावें ॥ संकट त्याचें निरसुन जावें ॥ १ ॥

समाप्त.

# आरती

( आरती भुवनसुंदराची, ) या चालीवर.

ओवाळिण त्या शंकराला ॥ पार्वतीवरा त्र्यंबकाला ॥ धृ० ॥
दाशार्हराजा पादिं नेला ॥ पंचाक्षराचा जप केला ॥
शिव शिव छंदें व्याध गेला ॥ आली सहजी त्यावेळा ॥
गोकर्णाचा काय महिमा ॥ प्रसन्न होउनि, देउनि टाकी, आत्मलिंग दशाननाला ॥ काय हें गण ह्मणतीं त्याला ॥ १ ॥
गजाननानें स्थापियेलें ॥ कल्माषपदा श्रुत झालें ॥
ब्रह्महत्या पापाचि गेलें ॥ उद्धरुनी त्या पादिं नेलें ॥
दर्शन दिधलें गोप बाळा ॥ राजपुत्र जो, धर्मगुप्त तो, संकटिं पडला, पवुनि त्याला ॥ राज्यपद तें देशी त्याला ॥ २ ॥
सिमंतिनी करी स्तवनाला ॥ प्राणपती तिचा वर आला ॥
पाही भद्रा तव रूपाला ॥ भस्म लागतां असुर तरला ॥
शारदेस तो पुत्र दिधला ॥ रुद्राक्ष महिमा, ऐकुनि तरला, भद्रसेन तो, तसि ती नंदा ॥ निज पादिं नेलें बहुलेला ॥ ३ ॥
मोहिनी होई विष्णू तो ॥ भस्मासुरा मग वधितो ॥
निंदुनी तुजला दक्षचि तो ॥ होमहवन तो बहु करितो ॥
पार्वति गेली अपमानिली ॥ टाकी कुंडांत, उडी त्या क्षणांत, वीरभद्र मग, वधि दक्षाला ॥ गौरिसी मग विवाह केला ॥ ४ ॥
अपर्णा विनोद बहु करिशी ॥ पणीं जिंकी मग ती तुजसी ॥
रागावुन तूं वनीं जाशी ॥ भिल्लिण पाहुन परत येशी ॥
श्रियाळाचें सत्व हराया ॥ अतीत होशी, मागशि चिलया, भक्षायाला, मारुनि त्याला ॥ देती पाक करुनी तुजला ॥ ५ ॥
सत्वाला पारि नच ढळला ॥ पाहुनि प्रसन्न तूं त्याला ॥
देशी मुक्तिच दोघाला ॥ महिमा गाता शेष थकला ॥
बाळकृष्ण हा दास तुमचा ॥ नमितो चरण, शरण असें मी, स्वामि कृपाळा, ॥ तनु कर्पूरा, समही तुजला, ॥ ओवाळिण त्या शंकराला ॥ पार्वतीवरा त्र्यंबकाला ॥ १ ॥

